# महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन

## (१६३० ते १६८०)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या
सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील
विद्यावाचस्पती पीएच.डी. पदवीकरिता
सादर केलेला संशोधन प्रबंध

– संशोधक –
श्रीकांत नारायण तापीकर

– मार्गदर्शक –
डॉ.न.म.जोशी
एम.ए.एम.एड., पीएच.डी.

जुलै २०१२

**''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन''**

**''टिळक महाराष्ट्र विद्यापीठा''च्या** सामाजिक शास्त्र विद्या शाखांतर्गत

**''इतिहास विषयातील''** विद्यावाचस्पती **(पी.एच्.डी.)**

पदवीकरिता सादर केलेला संशोधन प्रबंध

**संशोधक**

**श्रीकांत नारायण तापीकर**

**मार्गदर्शक**

**डॉ.न.म.जोशी**

जुलै २०१२

# प्रतिज्ञापत्र

मी श्रीकांत नारायण तापीकर प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कि, **''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन''** हा संशोधन प्रबंध मी स्वत: लिहिलेला असून तो **''टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे''** ह्यांच्या सामाजिकशास्त्र विद्याशास्त्रांतर्गत **इतिहास** विषयातील **''विद्यावाचस्पती'' (पी.एच.डी.)** पदवीसाठी सादर केला आहे.

हा, वरील विषयावरील संशोधन प्रबंध कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

संशोधक
**श्रीकांत नारायण तापीकर**

**स्थळ :** पुणे
**तालुका :** हवेली, जिल्हा पुणे
**दिनांक :** जुलै २०१२

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, ''**महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन**'' या विषयावर संशोधन प्रबंध **टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे** यांच्या सामाजिक-शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील ''**विद्यावाचस्पती**'' **(पी.एच.डी.)** या पदवीसाठी सादर केला आहे.

प्रस्तुत संशोधन प्रबंध श्रीकांत नारायण तापीकर ह्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वत: लिहीला आहे व तो इतर कोणत्याही विद्यापीठाच्या पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

संशोधकाच्या संशोधन कार्याबाबत मी समाधानी आहे.

**मार्गदर्शक**

**डॉ.न.म.जोशी**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पी.एच.डी. पदवीसाठी ''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग, प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या विषयावर संशोधन कार्य पूर्ण करून संशोधन प्रबंध सादर करेपर्यंत अनेक थोर व्यक्तींचे मार्गदर्शन व सहकार्य मला लाभले, म्हणून संशोधक प्रत्येकाचे मन:पूर्वक आभार मानून ऋण व्यक्त करणे आपले कर्तव्य समजतो.

माझे संशोधक मार्गदर्शक डॉ.न.म.जोशी यांच्या सहकार्यामुळे मी हा प्रबंध पूर्ण करू शकलो.

योग्यवेळी मिळालेले मार्गदर्शन, उपयुक्त सल्ला तसेच जमा केलेली माहिती त्वरीत तपासून देवून, त्यावर चर्चा करून, संकलीत माहितीची संयुक्तिक मांडणी करण्यास योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचा शतश: ऋणी आहे.

आदरणीय डॉ.दिपक टिळक, कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे कुलसचिव आदरणीय श्री.उमेश केसकर, आदरणीय श्री.एम.सी.दिक्षीत, प्रा.विजय कारेकर अधिष्ठाता, सामाजिक शास्त्र विभाग, टिळक विद्यापीठ पुणे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल व कर्मचारी वर्ग ह्यांचा मी ऋणी आहे.

''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग, प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या प्रबंध लेखनास वस्तुनिष्ठ माहिती देऊन संशोधनात्मकदृष्ट्या बहुमुल्य असे मार्गदर्शन केल्याबद्दल मा.मार्गदर्शक डॉ.न.म.जोशी मा.इतिहास संशोधक श्री.निनादराव बेडकर यांचे ऋण मानण्यापेक्षा मी त्यांच्या ऋणातच सदैव राहू इच्छितो.

भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे डेक्कन कॉलेज, पुणे मातृस्मृती ग्रंथालय पुणे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, भांडारकर संस्था, पुणे, तापीकर परिवार, सचिन जोशी आणि माझी पत्नी सौ.अर्चना श्रीकांत तापीकर, हिने माझ्या ध्यासाप्रती नेण्यासाठी आत्मविश्वास वाढविला. तिच्या आयुष्यभर मिळालेल्या प्रेरणा व प्रेमाने हे काम उत्साहाने पूर्ण करू शकलो.

प्रख्यात इतिहास संशोधक मा.श्री.निनादराव जी.बेडेकर यांच्या प्रोत्साहनामुळे व सहकार्याने हा प्रबंध पूर्ण होण्यास अमूल्य मदत झाली.

अचूक व अल्पवेळात टंकलेखन, संगणकीकरणाची सर्व जबाबदारी स्विकारल्याने श्री.प्रविण जोशी व त्यांचे सहकारी यांचा मी ऋणी आहे. शेवटी सर्व ज्ञात व अज्ञात सहकाऱ्यांचे निर्देश करणे शक्य झाले नाही. तरी त्यांचे ऋण मी व्यक्त करतो.

संशोधक

**श्रीकांत नारायण तापीकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | संशोधनाची ओळख | ८–१४ |
| प्रकरण २ | महाराष्ट्रातील किल्ल्यांचे विविध प्रकार व वैशिष्ट्ये | १५–६४ |
| प्रकरण ३ | महाराष्ट्रातील गड किल्लयांचे वास्तुशास्त्र संदर्भ व महत्व | ६७–१०९ |
| प्रकरण ४ | गडाची वास्तुरचना, व्यवस्था, देवदेवता व द्वारशिल्पे | ११२–१३१ |
| प्रकरण ५ | (अ) बखर वाङमय (ब) अस्सल साधने | १३४–१५१ |
| प्रकरण ६ | शिवाजी महाराजांच्या दोन राजधान्या : राजगड व रायगड | १५३–१८१ |
| प्रकरण ७ | निष्कर्ष | १८४–१८५ |
| | (अ) संदर्भ ग्रंथ सूची | १८६–१८७ |
| | (ब) दुय्यम साधने | १८७–१८७ |

# प्रकरण १

| | | |
|---|---|---|
| **संशोधनाची ओळख** | | **८–१४** |
| १.१ | प्रास्ताविक | ८–९ |
| १.२ | संशोधनाचा विषय | ९–११ |
| १.३ | संशोधनाची गरज | ११–११ |
| १.४ | संशोधनाचे महत्त्व | ११–११ |
| १.५ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ११–१२ |
| १.६ | गृहितके | १२–१२ |
| १.७ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | १२–१२ |
| १.८ | आजवर झालेला अभ्यास | १२–१२ |
| १.९ | संशोधन पद्धती | १३–१३ |
| १.१० | संशोधनाची साधने | १३–१४ |

# संशोधनाची ओळख

## १.१ प्रास्ताविक

''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या विषयाचा विचार करता ऐतिहासिक अवशेषांशी संवाद व्हावा ही उत्सुकता होती. म्हणून या विषयामध्ये संशोधन करावयाचे ठरवले. या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे संशोधकाने संशोधनातून शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

मी ठरवलेल्या संशोधन विषयाबद्दलचा अधिक इतिहास लोकांना माहिती व्हावा या हेतूने इतिहासातील स्थानिक इतिहास (लोकल हिस्टरी) व स्थल महात्म्याचं ऐतिहासिक व पुरातात्विक सर्वेक्षणाच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन केले आहे.

'किल्ला' हा शब्द मूळ अरबी आहे.

'पर्वतादिभि: दुर्गम पूरम कोट्टम इत्थमर' असे अमर कोषात आहे. सहज पोचता न येणारे अवघड ठिकाण असा याचा अर्थ होतो.

इंग्रजी भाषेतील (FORT) हा शब्द मूळ फ्रेंच भाषेतील आहे. शत्रूपासून संरक्षण करण्यास व सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता येण्याकरता, याकरिता बांधलेली वास्तू म्हणजे किल्ला होय.

प्राचीन, पाश्चात्य व पौर्वात्य साहित्यामध्ये किल्ल्यांचे विविध प्रकारांचे वर्णन केले आहे.

प्रामुख्याने किल्ल्यांचा विचार करता तीन प्रकार महत्त्वाचे आहेत.

१) भुईकोट

२) जलदुर्ग

३) गिरीदुर्ग

किल्ल्यांमुळे विविध अवशेषांची माहिती होण्यास मदत होते. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील विपुल गिरीदुर्गांचा वापर अंतर्गत व्यवस्था ठेवण्याकडे केला. सर्व गडकोट आपल्या खास नियंत्रणाखाली घेऊन त्यावर हवाले नेमून त्याकडे सरकारी महसूल धान्यातच करणे असल्याने ती साठवून ठेवणे, सैन्यभरती व त्यासाठी जो मुशाहिरा द्यावयाचा तो त्यातून देणे, शस्त्रास्त्रांचा साठा करुन तो पुरवणे व परत संग्रहित करणे वगैरे काम गडाभोवताली प्रदेशापुरते त्या त्या हवाल्याकडे दिले गेले. त्यामुळे ठिकठिकाणी सैन्य जमविणे व तेथून जवळपास तातडीने रवाना करणे फार सोईचे पडे. मुख्य सेना सोई व जरुरीप्रमाणे निरनिराळ्या भागात तळ देऊन राहत असे व तिची सरबराई या गडकोटातील कोठारामधून होत असे. त्यामुळे जरुर ती उपरी मदत चटकन मिळत असल्याने त्या सैन्याचा जसा स्थानिक देशमुखादि लोकांवर वचक असे तसाच तो परकीय सैन्यालाही बसे. विशेषत: धान्याचा साठा ठिकठिकाणी होऊन तो शीघ्रगतीने जरुर तेथे उपयोगास देणे सोपे जाई आणि दोन तीन वर्षे पुरणारा साठा त्या दुर्घट गडांवर पूर्णपणे सुरक्षितही राही. तसेच शत्रूच्या सैन्याला पिछाडीवरुन सतावण्यास व शत्रूची रसद लुटण्यास या किल्ल्यांचा चांगला उपयोग करुन घेता आला. सारांश, या लहान, लहान गिरीदुर्गांचा जरी शहर कोट म्हणून उपयोग्य होणे कठीण होते तरी आसपासची धान्याची संपत्ती सुरक्षित ठेवण्याची चांगली सोय होत होती. गडकरी किंवा आसपासचे गडांवर काम करणारे लोक जरुर तेव्हा गडावर चढून

तो रक्षण करण्याचे काम करीत व इतर वेळी गडाच्या पायथ्यास छोट्या छोट्या जमावाने राहून आपली शेती करुन कालक्रमणा करीत.

मावळ कोकणातील गडांची विपुलता आणखी एका दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. गडांपासून दूरवर टेहळणी ठेवणे व परचक्राचा दुरवर थोड्याच अवधीत इशारा देणे शक्य होत होते. बहुतेक सर्व गड रांगे रांगेने एकमेकांपासून पाच दहा मैलांच्या आतच असल्याने ही टेहळणी बिनचूक राखता येत असे आणि धोका दिसताच सावध होऊन. प्रतिकाराचीच तयारी नव्हे तर आसपासच्या लोकांनाही इशारा देऊन तयारीत राखीत. बारीक सारीक कोटांचा चौकी पहाऱ्याकरता उपयोग केला जात असे. शिवकालातील अनेक घटना, त्यावेळची परिस्थिती व सेनापती यावर प्रकाश पडण्यास मदत होते. या सर्व गोष्टी महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन या प्रस्तुत संशोधन कार्यास उपयुक्त आहेत.

## १.२ संशोधनाचा विषय

संशोधकाला लहानपणापासूनच किल्ल्यांविषयी विशेष आवड होती.

संशोधक शनिवार वाड्याजवळील परिसरात लहानाचे मोठे झाल्याने 'किल्ला' ह्या विषयी उत्सुकता निर्माण झाली. दिवाळीत काळ्या व तांबड्या मातीने किल्ला तयार करीत असत. पुढे शालेय जीवनानंतर आपल्या 'भ्रमंती' नावाच्या संस्थेद्वारे तरुणांना बरोबर घेऊन विविध किल्ले पाहण्याचा उपक्रम सुरु केला. संशोधकाने आजवर किमान १५० किल्ल्यांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आहेत तसेच ८००० तरुणांना किल्ले दाखवले आहेत. तसेच त्यांना किल्लेविषयक माहिती सांगण्याचा उपक्रम आजवर चालू आहे. अशा उपक्रमांमुळे हळू हळू किल्ल्यांविषयी उत्सुकता वाढू लागली.

**गडाचे व्यवस्थापन**

आज्ञापत्राचे कर्तेअमात्य रामचंद्र पंत बावडेकर यांनी आपल्या ग्रंथात मौलिक लेखन केले आहे.

गडांचे व्यवस्थापनाबाबत ते म्हणतात गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक, परम नाजूक स्थळास एखादा मामलेदारादि जे लोक ठेवणे, त्यानी भेद केलियामुळे अथवा शत्रू चालोन आला असता नामर्दी केल्यामुळे अथवा त्यांचे गाफिलीमुळे स्थळास दगा जाहला तर स्थळसहित तितके राष्ट्र हातीचे गेलेच. उरल्या स्थळास एखादा मामलेदारादि जे लोक ठेवणे त्यानी भेद केलियामुळे अथवा शत्रू चालोन आला असदा नामर्दी केल्यामुळे अथवा त्यांचे गाफिलीमुळे स्थळास दगा जाहला तर स्थळसहित तितके राष्ट्र हातीचे गेलेच. उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला. शत्रू प्रबळ येऊ पावला असता जो गेला किल्ला, त्या किल्लेकराचे वारे इतर राहिले. किल्लेकरास लागोन तेही स्थळास अपाय योजितात. म्हणजे एक, एक राज्यासच धक्का बसतो. या कारणे किल्ले कोट जतन करणे ही गोष्ट सामान्य असे न समजता. तेथील उस्तवारी व शासन यास तिळतुल्य अंतर पडो न द्यावे. त्यास आधी किल्ल्याचा जीव तो हवालदार तसाच (सदर) सरनोबत (सेनापती) म्हणजे निस्पृह, कोणाचे निसपतीचे अथवा एकाचे आर्जवामुळे ठेवावे असे नाही. जे कुलवंत मराठे आणि शिपाई, जे शरम धरीत असतील. कबीलेदार (कुटुंबवत्सल) विश्वास, उद्योगी, अलालुची, अनिद्रिस्त, सकल लोकांचे समाधान इथून यथोचित सर्वापासून स्वामिकार्य घेत, हे स्थळ म्हणजे धन्पाने ही परमप्रिय, ठेवी दिली आहे. आपले प्राणान्त यास दगा होऊ नये, असे पूर्ण चित्तात आणून जे धन्यांनी लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडो न देता, दिवसाचा उद्योग दिवसा, रात्रीचा उद्योग रात्री, तिरलस्यपणी करुन सर्व प्रयत्ने स्थल जतन करीत, असे

ठेवावे तसेच सबनीस व कारखानीस हे कारकून धन्यांनी लावून दिल्हे मर्यादेचे प्रेरक, सकळ अचितानुचित कार्याचे सूचक जसे हवालदार, सरनोबत खावंद तसे हेही खावंद, याणीही त्याच न्याचे सकळास वर्तवून आपण वर्तावे लागते. याकरिता तेही याच गुणांचे आणि लिहिणार, अमीन निर्भिड असे पाहून ठेवावे. तसेच तटसरनोबत, बादगीर, नाईक वाडी, रजपुत, जे ठेवणे ते बरे मर्दान कबिलेदार, विश्वासु असे पाहुन  नजर गुजार (नजर परीक्षा) करुन ठेवीत जावे. किल्ल्यास दहा टक्क्यांचा  रजपूत (प्यादा) ठेवणे तोही हुजूरचे सनदे खेरीज न ठेवावा. किल्ल्यांमध्ये मनुष्य ठेवणे ती चालक (चंचल) चोरटे, खुनी, तऱ्हेवाईक, कैफी, फितवखोर असे सर्व यादी न ठेवावे. जे ठेवणे ते परीक्षा करुन ठेवीत जावे. त्यातही तीन वर्षांनी हवालदार काढावा, चार वर्षांनी सरनोबत काढावा, पाच वर्षांनी सबनीस, कारखानीस काढावे, आणि त्या मामलेवर त्या त्या मामले योग्य आणखी तशा गुणसंपत्तीचे मामलेदार पाठवावे. (याचा अर्थ त्याही वेळी बदलीच्या नोकऱ्या दिल्या जात असत. एकच माणूस एकाच जागी फार वर्षेराहिला म्हणजे प्रशासनामध्ये काही अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते. ते टाळण्याकरिता ह्या बदल्या आवश्यक आहेत हे तत्त्व त्या वेळी अमलात आणले जात होते.)

त्याचेही त्याचे स्वरुपानुरुप समाधान करुन काही एखादे दिवशी समागमे वागवून स्वामिसेवक भावाची त्यांची बुद्धी काही मलिन जाहली असली तर सहवासामुळे पुन: सौज्वळ करुन, श्रमी होऊ न देता, त्यांचे त्यांचे आटोणनुरुप आणखी मामले सांगावे.

किल्ल्याचा हवालदार सरनौबती करीत असता तो मृत्यू पावला असता तो मामला त्याचे पुत्रास अथवा भाऊबंदांना असतील त्याचे समाधान करुन त्यांचे स्वरुपानुरुप आणखी उद्योग सांगून चालवावे.

लष्करचे सरदाराचे भाऊबंदांना अथवा त्याचे निसपत लोक त्यास परिछिन्न किल्ल्याचा मामला सांगू नये. तसेच एका घराचे भाऊबंद, एक, दोन, तीन आहेत आणि इतकेही गडवई तर त्यास किल्लेचे मामले आवश्यमेव सांगावेच लागतात. काय निमित्त की, किल्ल्याचे कामास माणूस मिळणे परम कठीण आहे. परंतु त्यास समीप समीप किल्ल्यावर न ठेवावे. दूर दूर किल्ले, एकाचा हात एकास न पावे, मध्ये आणखी किल्ले असतील अशा किल्ल्यांचे मामले सांगून सेवा घ्यावी. किल्लेखालील मुलुखातील देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले आदिकडुन  मिरास वतनापासून दहा पाच गावे दूर किल्ले असतील तशा किल्ल्यावर ठेवावे. तेच वतन आणि समीपतेची सेवा जाइलियावरी चाकरीवर दुरुस्त न राहता क्षणा क्षणा घरास जाणार, किंबहुना समयविशेषी वतनाचे आशेने स्थळास भेद करुन दयाही करणार. याकरिता किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावे.

किल्ल्याची सेवा परम कठीण, शासन परम उग्र. शासन करिता किल्ले याचे काम सर्वसाधारण होऊ जाणार असे सर्वथैव न करावे. शरीरासंबंधी आप्तविषयी अथवा त्यांचे निसबतीचे लोक अंतर पडलिया शासनकरिता आपणास संकोच, असे लोकास किल्ल्याचे मामले सर्वथैव न सांगावे. शासनास अंतर जाईलिया दुसरयिास अर्ज करावयास जागा होतो. भिडेने भीड वाढते. केली मर्यादा ते भंगतेच. तेच राज्यशासनाचे कारण याकरिता मर्यादाभंग सहसा होऊ न द्यावा.

आज्ञापत्र या ग्रंथाद्वारे शिवकाळातील व्यवस्थनाबाबत (किल्ल्यांचे) विविध गोष्टी ज्ञात होतात.

महाराष्ट्र इ.स.पू.६०० च्या सुमारास आर्य लोक दक्षिणेत आले आणि गोपराष्ट्र. महाराष्ट्र, पांडुराष्ट्र इ. वसाहती करुन स्थायिक झाले.

अशोकाच्या शिलालेखात जो ‘राष्ट्रीय’ लोकांचा उल्लेख आढळतो. तेच हे लोक होत. आंध्रमृत्य

म्हणजेच सातवाहन यांच्या साम्राज्यात ते एक मोठे राष्ट्र निर्माण झाले व या मोठ्या राष्ट्रालाच महाराष्ट्र असे नाव पडले. (चि.वि.वैद्य)

गड = गिरीदुर्ग

कोट = तटबंदी युक्त / गढीसारखा तटसंरक्षित भाग.

दुर्ग = किल्ला – मुख्यत: हे एक लढाऊ ठिकाण असे.

व्यवस्थापनाची व्याख्या (mactar land daltan)

management is the fundamental integratins and operating machanism underlying organized effort.

संघटीत प्रयत्नाच्या मुळाशी असलेली मुलभूत एकात्मक व चलित (operating) रचना machanism म्हणजे व्यवस्थापन होय.

१.३ संशोधनाची गरज

''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या विषयाकडे आजपर्यत कोणाचेही लक्ष गेलेले नव्हते म्हणून एक दुर्लक्षित, परंतु अत्यंत महत्त्वपूर्ण अशा विषयाचा अभ्यास करण्याची गरज भासली.

किल्ला, किल्ल्यांचे प्रकार, किल्ल्याचे स्थान, स्थापत्य, गडाची बांधणी, बुरुज, वास्तु, बुरुजांचे प्रकार, गडाची व्यवस्था, बखर वाङ्मय, गडावरील अधिकारी वर्ग आदि बाबींचा संशोधनात्मक सर्वेक्षणातून अवशेषांचा अभ्यास करुन त्याचे पुरातत्वीय महत्त्व मांडण्याच्या जिज्ञासेतून गरज निर्माण झाली.

**''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन''** या बाबत ऐतिहासिक सर्वेक्षणाच्या अनुषंगाने माहिती मांडण्यासाठी संशोधन करणे महत्त्वाचे वाटले.

### १.४ संशोधनाचे महत्त्व

इतिहासाच्या अभ्यासाने वर्तमानकालीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न आणि भविष्यकाळ उलगडण्या करिता मदत होते. उज्वल भविष्यकाळ निर्माण करावयाचा असेल तर ऐतिहासिक व सांस्कृतिक अवशेषांची जपणूक करणे अधिक गरजेचे आहे. महाराष्ट्रातील अनेक किल्ले आज बऱ्यावाईट अवस्थेत इतिहासाची साक्ष देत उभे आहेत. किल्ल्याच्या प्रत्येक ठिकाणची स्थलपरत्वे स्थिती वेगळीच आहे. संशोधकाने ''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'' ह्या विषयाद्वारे किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व मांडले आहे व त्याचा मागोवाही घेतला आहे.

### १.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये –

संशोधन समस्याला अनुलक्षुन आणि संशोधनाचे महत्त्व व संशोधनाचा वेळ याचा विचार करुन संशोधकांनी संशोधनाची खालील उद्दिष्ट्ये विस्तृत केली आहेत ती अशी –

१) दुर्गांच्या इतिहासाचा मागोवा घेणे.

२) वास्तुशास्त्राच्या दृष्टिने किल्ल्याच्या रचनेचा अभ्यास करणे.

३) दुर्गांचे वर्गीकरण करणे.

४) महाराष्ट्रातील दुर्गांचे महत्त्व स्पष्ट करणे.

५) दुर्ग व्यवस्थापनेचा अभ्यास करणे (शिवकाल) उल्लेख आज्ञापत्र व राजकोष

६) मध्ययुगीन दुर्गांचे महत्त्व व त्याची कारणे शोधणे.

७) किल्ल्यांच्या परिभाषेचा अभ्यास करणे.

८) शिवाजी महाराजांच्या राजगड व रायगड ह्या राजधान्याचा अभ्यास करणे.

**१.६ गृहितके**

१) १६३० ते १६८० मध्ये महाराष्ट्रात अनेक प्रकारचे किल्ले होते

२) शिवकाळात काही प्राचीन किल्ले होते.

३) किल्ल्यांना संरक्षणाच्या व युद्धशास्त्राच्या दृष्टिने महत्त्व होते.

४) शिवाजी राजांनी भुईकोट, जलदुर्ग व गिरीदुर्ग यांचा उपयोग करुन घेतला होता.

**१.७ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

१) प्रस्तुत प्रबंधामध्ये प्रामुख्याने शिवकाळातील संबंधित असलेल्या किल्ल्यांचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

२) हा अभ्यास करताना रचना व स्थापत्य असे म्हटले तरी स्थापत्यशास्त्राच्या दृष्टिने त्याचा काटेकोर अभ्यास करणे अपेक्षित नाही.

ऐतिहासिक साधनांमध्ये येणाऱ्या उल्लेखांना अनुसरुन दुर्ग स्थापत्याचा अभ्यास करणे अपेक्षित आहे.

**१.८ किल्ल्यांसदर्भात आजवर झालेल्या अभ्यासाचा आढावा**

कै. चिं. ग. गोगटे यांनी 'महाराष्ट्रातील किल्ले' हा ग्रंथ लिहिला आहे.

श्री. स. आ. जोगळेकर यांनी 'सह्याद्री' या ग्रंथातून किल्ल्यांची उपयुक्त माहिती दिली आहे.

श्री. बा. सी. बेंद्रे यांनी गड, कोट, दुर्ग व त्यांची वास्तू या नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

श्री.निनाद जी. बेडेकर यांनी 'दुर्गकथा' नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

श्री. गो.नि.दांडेकर यांनी 'किल्ले' या ग्रंथाचे लेखन केले आहे.

डॉ.एम.एस. नरवणे यांनी किल्ल्यांविषयी विपुल लेखन केले आहे.

डॉ.गो.ब. देगलुरकर यांनी 'दुर्गम दुर्ग देवगिरी किल्ले दौलताबाद' या ग्रंथाचे लेखन केले आहे.

श्री.जी.एन. कमलापूरकर यांनी Deccan Forts या नावाने इंग्रजी भाषेत ग्रंथ लिहिला आहे.

श्री.रमेश देसाई यांनी Shivaji The Last Great Fort Architect' हा ग्रंथ लिहिला आहे.

श्री.प्रभाकर देव यांनी 'कंधार एक ऐतिहासिक शहर' याचा मागोवा घेतला आहे.

श्री.प्र.के.घाणेकर यांनी 'साद सह्याद्रीची', 'अथातो दुर्ग जिज्ञासा' या ग्रंथांचे लेखन केले आहे.

सौ.रमा लोहारीकर यांनी 'रायगड किल्ल्यावरील राजकीय बदल – एक ऐतिहासिक दृष्टिकोन' यावर संशोधन केले आहे.

प्रा. डॉ. लता अकलूजकर यांनी 'किल्ले नळदुर्ग' या किल्ल्यावर संशोधन केले आहे.

श्री.श्रीकांत तापीकर यांनी 'Forts in Maharashtra' हा ग्रंथ इंग्रजी भाषेत लिहिला आहे. 'चला किल्ले पहायला', 'वैभव किल्ल्यांचे' अशा काही ग्रंथांचे लेखन केले आहे.

किल्ल्यांच्या संदर्भात आजवर अनेक भारतीय व पाश्चात्य संशोधकांनी ग्रंथ लिहिले आहेत. परकीय लेखक सिडने टॉय यांनी भारतातील किल्ल्यांना भेटी देऊन किल्ल्यांच्या वास्तुरचनेच्या दृष्टिकोनातून खालील तीन ग्रंथांचे लेखन केले आहे.

१) Strong holds of India

२) Histroy of Fortification

३) The Fortified cities of India

महाराष्ट्रातील 'गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन' या विषयाकडे आजपर्यंत कोणाचेही लक्ष गेले नाही म्हणून एका दुर्लक्षित परंतु महत्त्वपूर्ण अशा विषयावर अभ्यास करण्याचे संशोधकाने ठरवले.

**१.९ संशोधन पद्धती**

१) संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती व वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

२) ''महाराष्ट्रातील गड, कोट, दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या प्रबंध लेखन विषयाबाबत मार्गदर्शकासमवेत तसेच जेष्ठ अभ्यासकांशी चर्चा करुन माहिती घेतली आहे.

३) उपलब्ध प्रकाशित साधने व क्षेत्रभेटी यांच्या साह्याने माहिती संकलित केली आहे.

४) आवश्यक त्या ठिकाणी नकाशाचा वापर केला आहे.

**१.१० संशोधनाची साधने**

ज्याच्या सहाय्याने प्रत्यक्ष ज्ञान होते अथवा घटनेची माहिती मिळते, त्याला इतिहासाची साधने (source of History) असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक साधने उपलब्ध ठरली आहे.

**१) मोडी कागदपत्रे**

मोडी लिपीचे पुण्यातील एक तज्ञ डॉ.म.वा.कुलकर्णी ज्यांनी पुणे विद्यापीठात बरीच वर्षे मोडी लिपी शिकवण्याचे काम करुन एक भरीव योगदान दिले अशा ज्येष्ठ अभ्यासकाशी प्रत्यक्ष भेटून किमान तीन वेळा मोडी लिपीबाबत चर्चा केली. मोडी लिपीतील काही प्रकाशित पत्रेही पाहिली. शिवकाळात मोडी लिपीस विशेष महत्त्व होते. मोठ्या प्रमाणावर या लिपीत पत्रव्यवहार होत असे. पेशवे काळातही याच लिपीत पत्रव्यवहार होत असे.

२) प्रकाशित कागदपत्रे –

भारत इतिहास संशोधक मंडळाने १९२६ ते १९८३ या कालावधीत एकूण १४ खंड प्रकाशित केले. जे शिव चरित्र साहित्य या नावाने ओळखले जातात. वरील सर्व खंड मी स्वत: पाहिले आहेत व त्यातील माहितीही वाचली आहे.

मंडळाने २०१२ साली १५ वा खंड प्रकाशित केला आहे. तोही मी स्वत: वाचला आहे. याचे

संपादन डॉ.अनुराधा कुलकर्णी व अजित पटवर्धन यांनी केले आहे. त्यांना डॉ.गजानन मेहेंदळे या नामवंत अभ्यासकांनी मोलाचे सहकार्य केले आहे व वेळोवेळी संपादनाबाबत काही मौलिक सूचनाही केल्या आहेत.

या खंडामध्ये इ.स. १५८० ते १७०० या काळातील एकूण ११५ पत्रे आहेत. शिव चरित्र साहित्याच्या खंडा प्रमाणेच हे लेखांक घराणेवार लावलेले आहेत. शिवकाळातील बऱ्याच गोष्टीवर यातील पत्रांमुळे प्रकाश पडतो.

कबुल कतवा, कौलनामा, जमीन पत्र, खरेदीखत, वाटणीपत्र अशा विविध प्रकारच्या कागदपत्रांचा या खंडामध्ये समावेश आहे. हा खंड मंडळाचे वतीने (परवानगीने) पुण्यातील डायमंड प्रकाशनाने उत्तमरित्या प्रकाशित केला आहे.

३) किल्ल्यांवरील सर्वेक्षण

प्रबंध लेखनाचे निमित्ताने शिवकाळातील काही किल्ल्यांना मी स्वत: (संशोधकाने) भेटी दिल्या आहेत व त्या ठिकाणातील असलेल्या अवशेषांची माहिती करुन घेतली आहे. याचे पूर्वीही मी अनेक वेळा किल्ल्यावर गेलो आहे. या विषयांवर माझे ग्रंथ रुपाने लेखनही प्रकाशित आहे. किल्ल्याचा घेरा, किल्ला, बुरुज, तटबंदी, जंग्या, पाण्याच्या टाक्या, बालेकिल्ला या बाबत माहिती समजवून घेतली आहे. राजगड, रायगड या किल्ल्यांना भेटी दिल्या आहेत.

**४) किल्ल्यासंबंधी नकाशे**

शिवाजी महाराजांच्या दोन राजधान्या राजगड व रायगड याबाबत प्रकरण सहा मध्ये दोन्ही किल्ल्यांचा स्वतंत्र नकाशा दिला आहे.

१) किल्ल्यांची बांधणी- चित्र रेखाटन - श्रीकांत तापीकर पान नं. ४२, ४३

२) राजगड- या किल्ल्याचा नकाशा व फोटो राहुल बांदल यांच्या राजांचा गड राजगड या पुस्तिकेतून घेतला आहे. पान नं. १५७,१५८

३) रायगड- या किल्ल्याचा नकाशा शा.वि.आवळसकर यांच्या रायगडची जीवनकथा या ग्रंथातील आहे. पान नं. १६९

■ ■ ■

# प्रकरण २


| | | |
|---|---|---|
| **महाराष्ट्रातील किल्ल्यांचे विविध प्रकार व वैशिष्ट्ये** | | **१५–६४** |
| २.१ | किल्ल्यांचा प्राचीन इतिहास | १६–३० |
| २.२ | शिवकाळातील किल्ल्यांची वैशिष्ट्ये | ३१–३४ |
| २.३ | राज्याचे सार ते दुर्ग | ३५–३८ |
| २.४ | किल्ल्यांची बांधणी | ३९–४३ |
| २.५ | आरमार आणि सागरी किल्ले | ४४–५० |
| २.६ | महाराष्ट्रातील किल्ल्यांची यादी | ५१–६४ |

# २.१ किल्ल्यांचा प्राचीन इतिहास

**किल्ल्यांचा प्राचीन इतिहास :**

वसाहतींच्या समृध्दीबरोबर हिंस्र पशूंच्या उपद्रवापेक्षा शेजारील शत्रुसंकटाच्या परिहाराची अधिकाधिक आवश्यकता वाढत गेली. परिहरार्थ केलेल्या यत्नप्रयत्नात नैसर्गिक आणि मानवी बलसामर्थ्याची वाढ करीत राहणेही क्रमप्राप्त झाले. शत्रूच्या आघातील शक्तींची विविधता जसजशी वाढत गेली तसतशी त्या विविध प्रकारांच्या संहारक शक्तीला तोंड देण्याची खबरदारी घेण्यात आली. या चढाओढीत संरक्षणार्थ बांधल्या जाणाऱ्या गड-कोटांच्या वास्तू बलिष्ट व दुर्गम करण्यात दिवसेंदिवस प्रगती होत गेली... या प्रगतीचा इतिहास भारतातील वसाहतींचा व त्यांच्या राजकीय परिस्थितीचा सहजच बोध होतो.

भारतातील गड-कोटांचा विचार केला, तर गड कोट कोणत्याही राज्य अधिराज्य किंवा साम्राज्य यांच्या सीमेची संरक्षक तटबंदी म्हणून बांधले गेले होते असे दिसत नाही. भारताच्या विशिष्ठ निसर्गसिध्द प्रदेशात साम्राज्य किंवा राज्ये यांच्या सीमा मर्यादित केल्या जाऊ शकत नव्हत्या. राज्यमर्यादांचे रक्षण स्थानिक मांडलिक जहागीरदारांच्याच बळाबळावर सोपविले जात असल्या कारणाने त्या जहागीरदारांचे सर्व लक्ष आपआपली जहागीर टिकवण्याकडे राही आणि त्यामुळे परिस्थितीप्रमाणे आपल्या राज्यसत्तेची खांदेपालट करीत असत. विशेषत: डोंगराळ व जंगली भागात तर राज्याच्या मर्यादा निमंत्रित राखणे फार कठीण जात असे. एक तर नदीनाले व पर्वत; यामुळे रस्ते नुसतेच बिकट होते असे नाही, तर पावसाळ्यात प्रवास करणे अतिशय दुर्घट असे. अशा डोंगराळ व जंगली प्रदेशातील लोकांची राहणी इतकी साधी होती की, त्यांनी त्या आड आडोशाच्या साहय्याने आपले जीवन कंठण्यात सुख समाधान मानले.

त्या आडोशात बाहेरच्या शत्रु सैन्यालाच काय, पण स्वकीयांच्या मोठ्या जमावालाही पुरेसा निवारा व पाण्याचा पुरवठा मिळणे कठीण होते; त्यामुळे जे जे गडकोट आज आपणास शहराभोवती व इतरत्र पाहावयास मिळतात त्यांच्या उभारणीमागे मुख्यत: स्थानिक संपत्ती व लोकांच्या संरक्षणाचे साधन इतकाच विचार होता. राज्याच्या सीमेवरील संरक्षक फळी किंवा तटबंदी म्हणून त्यांच्या बांधकामाची व्यवस्था केलेली नव्हती. इतकेच नव्हे, तर कोणाशी राजसत्तेला तशा तऱ्हेचा उपयोगही करून घेता आला नाही. भारतात तरी सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या राजकीय परिस्थितीत सामान्यत: सर्व दुर्गात मानवदुर्गालाच अग्रमान प्राप्त झालेला होता असा इतिहास निर्वाळा देतो. १

ज्या काळी उत्तरेकडून येणाऱ्या टोळ्या भारतात वसाहतीसाठी सोईस्कर जागा शोधीत होत्या त्या काळी त्यांना हिंस्र पशुपक्षी व निसर्गाच्या अपत्तीनाच साहजिकच तोंड द्यावे लागत होते. धनसंपत्ती किंवा जमीनजुमलादी बाबींवरून भांडणे होण्यापर्यंत त्यांच्या वसाहतींना कायमचे स्वरूप आले नव्हते. गुरे ढोरे व अन्न इतक्याचीच काय ती काळजी होती. जमीन मुबलक पडून होती. येथपर्यंत या टोळ्यांचे संघटित बल, पुरेसा आडोसा व सभोवार प्रतिबंधक काटेरी कुंपणवजा तट पाणवठ्याजवळ उभारला की, त्यांचे काम भागत असे; परंतु स्थायीभूत होताना जेव्हा पूर्वीच्या स्थानिक जमातीशी संघर्ष होऊ

लागले तेव्हा नुसत्या काटेरी कुंपणावर संरक्षणाचा भार टाकणे धोक्याचे होऊ लागले अर्थात शत्रूला दूर राखण्यासाठी जाळपोळ करणे किंवा आसपासच्या भागात वणवा पेटवून शत्रूला पळवून लावणे आवश्यक झाले. पाण्याच्यादुर्भिध्यतेमुळे साहजिकच त्या अग्न्यस्त्राला हिंस्र जनावरासारखेच स्थानिक लोकही भिऊन पळत असत. जाळपोळीची दहशत सर्वांना सारखीच भासत असे. शत्रूचा हल्ला परतविण्यासाठी आपल्या वसाहतीसभोवती चर खणून त्यात जंगलातील झाडांच्या फांद्या पाचोळा वगैरे दृश्य वस्तू टाकून वेळ येताच त्या पेटवून दिल्या जात. अर्थातच शत्रूला माघार घेणे भाग पडे, कारण अन्नपाण्यावाचून दूर राहणे जड होत असे. कित्येक गुहा, दऱ्या, लेणी याचा आश्रय करून डोंगरात अवघड जागी निवास घेत. कोणी पाण्यातील खडकावर रात्रीची वस्ती करून राहत.

पावसाळ्यात असल्या निवाऱ्याच्या जागाही निरुपयोगी ठरत; परंतु कालगतीचे ह्या वसाहतींना स्थायी स्वरुप प्राप्त होऊ लागताच त्या जमातीत आपआपसातील भांडणांना वाव मिळू लागला आणि या जमातींना आपआपल्यापरी अधिकाधिक बळकट अशा संरक्षणाच्या योजना प्रयत्नाने शोधून काढून त्यांच्या साहाय्याने आपआपल्या वसतिस्थानांना स्वास्थ आणि सुरक्षितता मिळवण्याची काळजी घ्यावी लागली.

वेदकालीन वसाहती तितक्या स्थिर झालेल्या नव्हत्या; त्यामुळे नूतन वसाहतीच्या किंवा मोठ्या ग्रामीण वस्तीच्या संरक्षणासाठी काटेरी झाड, पाल्यांची कुंपणे अथवा महत्त्वाचे ठिक़ाणी दगडी कोट उभारले जात होते. अशा ग्रामांना ऋग्वेदात 'पूर' म्हणून संबोधले आहे.

सामान्यत: प्रत्येक राजधानीची जागा निसर्गसिंध्द सुरक्षित नसेल, तर कृत्रिम संरक्षक तटबंदीचे त्या वेळी चार प्रकार होते; जल, गिरी, वाळवंट व जंगल. कृत्रिम तटबंदीत राजधानी वाढ करून ठेवणे; इत्यादी; परंतु या सर्व प्रयत्नांचे ध्येय म्हणजे संकटकाळी आपली धनसंपत्ती व वेळ पडल्यास माणसे यांना काही काळ संरक्षण देणे हे होय. कोणीही शत्रू फार दिवस आपला लढा चालवू शकत नसे. एकतर शत्रूसैन्याला खाण्यापिण्याची फार काळ सोय करणे कठीण जात असे आणि तशी ती करू म्हटले, तरी ह्या रसद घेऊन जाणाऱ्या लोकांनाच लुटण्याची शत्रू विशेष खबरदारी घेत असे, कारण एकदा का दाणागोटा तोडला की, शत्रू आपल्या राज्याबाहेर फार दिवस काढू शकत नसे. शिवाय पावसाळ्यात निवारा मिळणे दुस्तर असल्याने स्वारी शिकारीवर निघणाऱ्या सैन्याला पावसाळा सुरू होण्यापूर्वीच स्वस्थानी परतावे लागत असे; परंतु शत्रुत्व स्वीकारणारे शेजारीपाजारी एकमेकांना उपद्रव देऊ लागले तेव्हा धनसंपत्तीच्या रक्षणाव्यतिरिक्त संरक्षणाची आपली सर्व भिस्त राजशासनाधिकाऱ्याला मानवी बलावरच ठेवावी लागे आणि या मानवी दुर्गाच्या साहाय्याने कितीही शेजारीपाजारी मांडलिक म्हणून अंकित केले गेले, तरी या मानवी दुर्गांची पाठ वळताच पुन्हा स्वतंत्रपणे वागू लागत. सारांश, दहशत निर्माण करण्यापलीकडे काही कायम स्वरूपाची घटना करणे, विस्तृत देशचित्रणाला पुरेसे मानवी सामर्थ्य हाती नसल्यामुळे व वाहतुकीच्या सोयी व मार्ग याच्या अभावी, शक्य झाले नव्हते.

इ.स.च्या पूर्वी भारतात ठिकठिकाणी राज्यशासन व्यवस्था बरीच प्रगत झाली होती. त्या काळी गडकोटांना बरेच महत्त्व प्राप्त झाले होते. मनुस्मृतीत जी काही वचने आली आहेत त्याकडून तत्कालीन गड किल्ल्यांच्या वास्तु व उपयोग यात कोणती प्रगती झाली होती त्याचे थोडेबहुत चित्र आपणास पाहावयास मिळते. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायात व दुर्गांबद्दल चर्चा झाली आहे. त्यातील आशय असा: ''राजाने दुर्गाच्या जवळ बसविलेल्या नगरात आपले वास्तव्य ठेवावे. हे दुर्ग सहा प्रकारचे

आहेत. ते येणे प्रमाणे: धनुदुर्ग, महीदुर्ग, अब्दुर्ग, राधादुर्ग, नृदुर्ग, व गिरीदुर्ग.'' या सहा दुर्गांची गुणभेदाने व्याप्ती व प्रकार तत्कालीन समजुतीप्रमाणे असे: ''आजूबाजूच्या वीस कोसपर्यंत पाणी नसणाऱ्या किल्ल्यास धनदुर्गी म्हणत.

ज्याला बारा हातांपेक्षा अधिक उंचीचे, युध्दाचा प्रसंग आल्यास ज्या वरून व्यवस्थित रीतीने फिरता येईल आणि ज्याला झरोक्यांनी युक्त असलेल्या खिडक्या ठेवलेल्या आहेत अशा, तटांनी युक्त असलेल्या किल्ल्यास महिदुर्ग म्हणावे. अपरिमित जलानी चोहीकडून वेढिलेल्या किल्ल्यास अब्दुर्ग किंवा जलदुर्ग अशी संज्ञा आहे. तटाच्या बाहेर चारी बाजूला चार कोसपर्यंत मोठाले वृक्ष, काटेरी झाडे, कळकीची बेटे आणि वेलींच्या जाळ्या यांनी वेष्ठिलेल्या किल्ल्यास वृक्षसंबंधी म्हणजे राधादुर्ग म्हणत. गज, अश्व, रथ व पती या चतुरंग सैन्याने रक्षण केलेल्या किल्ल्यास नृदुर्ग असे नाव आहे. आसपास वर चढण्याला एकच संकुचित मार्ग असणारा, नदी, झरे इत्यादिकांच्या जलांनी व्यापिलेला व धान्ये निर्माण होण्यासारख्या क्षेत्रांनी मुक्त असलेला डोंगरी किल्ला गिरिदुर्ग या संज्ञेस पात्र होतो.'' या वरून तत्कालीन सुरक्षितता साधणाऱ्या या नियोजनावरून शत्रूचे सामर्थ्य, दूरवर जाऊन रणसंग्राम करण्याची तयारी आणि प्रदेश जिंकण्यापेक्षा धनधान्यसंपत्ती संपादनाला दिलेले विशेष प्रामाण्य याची कल्पना करीत असे.

या सहा दुर्गांचे गुणवैशिष्ट्य सांगताना मनु म्हणतो, ''या सहा प्रकारच्या दुर्गात गिरीदुर्ग हाच बहुगुण विशिष्ट आहे; म्हणून अनेक प्रयत्नांनी त्याचा आश्रय करावा. धनुदुर्गात हरिणादि पशु राहतात, महिदुर्गात उंदीर वगैरे प्राण्यांचा निवास असतो, जलदुर्गात साप, सुसरी, मासे इत्यादी जलचर प्राणी वस्ती करतात, वार्धादुर्गात वानर असतात, नृदुर्गाचा मनुष्य आश्रय घेतात आणि शेवटच्या गिरिदुर्गात देव आपले निवासस्थान समजतात. अर्थात या सहा प्रकारच्या दुर्गांमध्ये गिरिदुर्गच श्रेष्ठ होय.''

पुढे मनु दुर्गांच्या महत्त्वासंबंधी म्हणतो की, ''हरिणादिकांनी किल्ल्याचा आश्रय घेतला असता त्या आधी शत्रू पीडा देऊ शकत नाहीत. त्याच प्रमाणे राजाने दुर्गाचा आश्रय केल्यास त्यालाही शत्रुपक्षीय अन्य राजे पीडा देऊ शकत नाही.

दुर्गशक्तीबाबत मनु सांगतो, ''दुर्गाचा आश्रय घेतलेल्यांपैकी एकच योध्दा बाहेरील शंभर मनुष्यांशी युध्द करितो आणि दुर्गाश्रित शंभर योध्दे बाहेरील दहा हजार योध्द्यांशी युध्द करू शकतात.''

किल्ला समृध्द कसा ठेवावा याबद्दल तो सांगतो की, ''राजाने या दुर्गात नाना प्रकारची आयुधे, अनेक प्रकारचे धनधान्ये, वाहने, ब्राह्मण, लोहार, सोनार इत्यादी शिल्पकलाभिज्ञ लोक, यंत्रे, गवत आणि विपुल जल याचा संग्रह करावा. राजाने या किल्ल्याच्या मध्यभागी आयुधागारादि निरनिराळ्या स्थानांनी युक्त, गुप्त, सर्व ऋतुतील पुष्पाफळे फसविणाऱ्या वृथानी मंडित, शुभ्रवर्ण आणि पाणी व झाडे यांनी व्याप्त असे आपले निवासस्थान रचावे.''

वरील उल्लेखावरून असे दिसून येते की, मनुस्मृतीत फक्त आर्यावर्ताचा म्हणजे विंध्याचलाच्या उत्तर भागातील संस्कृतीचा विचार केलेला आहे; त्यामुळे त्या विशिष्ट प्रदेशातील गिरीदुर्गाची कल्पना त्या विवेचनात अंगभूत झालेली आहे. त्या वर्णनात महाराष्ट्रातील सह्याद्री सातपुडा पर्वतातील गडांच्या वास्तूंचा आणि विशेषत: काळ्या फत्तरावर उठविलेल्या वास्तूंचा विचार नाही हे येथे लक्षात घेणे जरुरी आहे.

मनुस्मृतीपेक्षा महाभारतात थोडा अधिक तपशील येतो. गडकोटांची माहिती महाभारतातील शांतीपर्वात पाहावयास मिळते. भीष्मांच्या मते ४४ पुरुषचयासारखा दुसरा कोणताही कोष राजाला श्रेष्ठ

नाही आणि शास्त्रांमध्ये जे सहा दुर्ग सांगितले आहेत त्यामध्ये नृदुर्ग हा दुर्भेद्य म्हणून सांगितला आहे.

पुढे युधिष्ठिराने प्रश्न केला की, ''राजाने जेथे राहावयाचे, ते नगर कशा प्रकारचे असावे किंवा नवीन बांधावयाचे झाल्यास ते कोणत्या प्रकारे बांधावे ?''

तेव्हा भीष्म सांगतात : ''तुला विशेषत: दुर्ग कसे असावेत ते सांगतो. ते ऐकून तू तशा प्रकारचे दुर्ग बांधून घेऊन त्यांच्या आश्रयाने नगरे वसवावीत, त्यामध्ये सर्व प्रकारची संपत्ती असावी व पुष्कळ लोक राहण्याचीही सोय असावी. हे दुर्ग धन्वदुर्ग, महिदुर्ग, गिरिदुर्ग, मनुष्यदुर्ग, मृददुर्ग आणि वनदुर्ग अशा सहा प्रकारचे असतात. त्यांपैकी एखाद्या दुर्गाच्या आश्रयाने राजनगर असावे. यात सतत धान्य आणि आयुधे यांची विपुलता असावी. त्याचे तट मजबूत असावेत व सभोवतीचा खंदकही बळकट असावा. त्यामध्ये गज, अश्व आणि रथ पुष्कळ असावेत. अनेक कुशल शिल्पकार असावेत. तेथे सर्व प्रकारची सामग्री असावी. धार्मिक आणि उद्यमदक्ष लोक तेथे राहत असावेत. त्यामध्ये बलसंपन्न लोक आणि अश्व असावेत. त्यात मोठमोठे शोभिवंत चौक आणि बाजार असावेत. सर्व व्यवहार उघडपणे चालून तेथे नित्य शांती असावी. भीती कोठूनही नसावी. तेथे सदोदित रमणीथता असून वाद्यनाद चालत असावेत.''

शत्रूचा त्रास होऊ लागला म्हणजे या गडकोटांची व्यवस्था कशी राखावी याबद्दल भीष्म सांगतात : ''एखाद्या आपल्यापेक्षा बलवान राजाकडून आपल्याला त्रास होतो असे वाटल्यास बुध्दिमान राजाने किल्ल्याचा आश्रय करावा. किल्ल्याच्या भोवताली असणाऱ्या क्षुद्र वृथांची मुळे तोडून टाकावीत. अश्वत्थ वृक्षाचे मात्र पान देखील खाली पडू देऊ नये. किल्ल्याच्या तटावर, कोण लोक कोठून येतात. त्यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी निरनिराळ्या चौक्या ठेवल्यात व त्यावर शूरलोकांचा पहारा असावा. तटावरच्या लोकांना बाहेरच्या गोष्टी दिसण्यासाठी भिंतीला बारीक भोके ठेवावीत.

प्रसंगवशात या भोकातून तीर वगैरेचा मारा करता येईल अशी व्यवस्था असावी. किल्ल्याच्या भोवतालचा खंदक मासे, नक्र, इत्यादिकांनी परिपूर्ण असावा किंवा त्यात जागोजाग शूल उभे केलेले असावेत. नगरातील लोकांना संकटकाळी बाहेर निघता यावे येवढ्यासाठी सूक्ष्मद्वारांची गुप्त भुयारांची योजना असावी व या द्वारावर इतर ठिक़ाणाप्रमाणेच पहारा असावा. प्रत्येक दरवाजावर मोठमोठाली द्वारे ठेवावीत.''

नंतर सैन्याची बिरुदे कशी लावून ठेवावी हे सांगतात. दुर्गाच्या जवळच सैन्याचा तळ असावा. अशा रीतीने सैन्याचा तळ देऊन व पदातीचे गोपन करून शत्रूवर मारा करणे हाच संकट निवारण्याचा उत्तम उपाय होय. जेथे चिखल पाणी, सेतुप्रकासादिकांचे भाग व ढेकळे नसतील अशाच ठिकाणी अश्वभूमी करावी, असे युध्दकुशल लोकांचे मत आहे. रथदलाला सपाट, चिखल व खाचखळगे नसलेली, जागा प्रशस्त होय. लहान, लहान वृक्ष, अरण्य आणि पाणी असलेला प्रदेश गजदका दलला योग्य होय. सभोवती डोंगराळ जागा, अनेक दुर्ग तसेच कळक आणि वेत यांनी युक्त प्रदेश असून त्याच्या समीप पर्वत, उपवने असतील, तर ती जागा पायदळाला प्रशस्त होय. सैन्यात पायदळ विशेष असणे सर्वदा श्रेयस्कर होय.''

तसेच दुर्गाधिकाऱ्याकडे अधिक महत्त्वाचे काम द्यावे असेही भीष्म सांगतात. ''राज्याचे सुरक्षण, युध्दाची तयारी, न्यायाने राज्य चालवणे, गुप्त विचार करणे आणि प्रत्येकाला सुख देणे ह्या पाच गोष्टींनी राज्याची अभिवृध्दी होत असते. ह्या सर्व गोष्टीवर एकालाच नजर ठेवता येणे शक्य नसल्याने दुर्गाधिकारी प्रभुतीकडे त्या सोपवाव्यात असे केल्याने राजाला पृथ्वीचा उपभोग घेता येतो.''

मनुप्रमाणेच महाभारतकारही गड कोटांचे सहा प्रकार मानतात. मनुच्या जलदुर्गाऐवजी महाभारतात मृद्दुर्ग दिला आहे. अर्थात हा फरक देशमानाला धरून आहे. तसेच महाभारतात कालमानाप्रमाणे नरदुर्गाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. भीष्मांच्या राजनीतीत गडकोटांचा जो विचार आलेला आहे तो सर्वच राजधानी अगर नरदुर्गाचा आहे. यात नगराभोवतालीच्या तटाबाहेरील खंदकांना बरेच महत्त्व दिले गेले आहे. तटाच्या भोवतीचा उपयोग हेरण्याखेरीज त्यातून (बंदुकीच्या) गोळ्या झाडण्यासाठी करीत होते व तटावर तोफाही डागल्या होत्या असे भाषांतरकारांनी लिहिले आहे; परंतु ते चूक आहे. त्या काळी तोफा किंवा बंदुका वापरात आल्या नव्हत्या. बाण व राताग्नि म्हणजे चामड्याच्या पिशवीत भरलेली स्फोटक द्रव्ये यांच्या मिश्रणाने केलेले मोठे बाण असाच अर्थ घेतला पाहिजे.

सारांश, महाभारत काली नरदुर्ग व नगरसंरक्षणार्थ बांधलेल्या गिरिदुर्गांनाच फार महत्त्व होते. त्यावरील अधिकारीही तसेच थोर पुरुष असत. म्हणूनच महत्त्वाचे राज्याधिकार या दुर्गाधिकाऱ्यांना देण्याचा उपदेश भीष्माने युधिष्ठीराला केलेला आहे.

रामायणातही दुर्गकोट याबद्दल सूचक उल्लेख आहेत; परंतु त्यात तपशील आलेला नाही. शिवाय जी माहिती नमूद केलेली आहे ती अर्थात रामायणाच्या रचना काळातील आहे. रामकालीन नाही. रामायणात वनदुर्गाचा किंवा सधर्म दुर्गाचा जरी उल्लेख असला, तरी ते दुर्ग मर्यादित स्वरूपाचे आहेत. जर काही तपशीलवार माहिती येत असेल, तर ती लंका वर्णनात. त्या माहितीचा गडकोट वास्तूंच्या संदर्भात थोडा सारांश येथे देत आहे. ''मोठ्या खबरदारीने रक्षण केलेल्या लंकेमध्ये आपल्या सामर्थ्यांच्या जोरावर शिरून कोण जिवंत परत येईल ? राक्षसांचा कडक पहारा असणाऱ्या त्रिकूटाच्या शिखरावरील लंका... मारुती म्हणाला, ''किल्ल्यांची बांधणी कशी आहे, त्याची मजबुती कशी आहे...सांगतो. ऐक. मस्त हत्ती, रथ व राक्षस यांनी लंका गजबजली असून... तिच्या चार मोठ्या वेशींची दारे भक्कम आहेत. त्यास मोठे मोठे अडसर आहेत. त्या वेशीवर बाण व धोंडे फेकण्याची मोठमोठी यंत्रे असून आलेल्या शत्रूसैन्याला त्याच्या योगाने अटकाव होतो. काळ्या भोर अशा लोखंडाची शेकडो लोकांना मारणारी मोठमोठी लोखंडाची यंत्रे राक्षसांनी वेशीवर तयार ठेवून दिली आहेत. कोणाचे काही चालू न देणारा असा सोन्याचा मोठा तट तिच्या भोवती असून त्यात हिरे-माणके वगैरे बसविली आहेत. त्याच्याभोवती गार पाण्याचे खोल, सुसरींनी व माशांनी भरलेले. भयंकर खंदक आहेत. त्याच्या वेशीतून चार रुंद सरकपूल असून त्या वेशीवरून मोठमोठी यंत्रे व घरांच्या रांगा लागून राहिल्या आहेत. शत्रूसैन्य आले असता या यंत्रानी त्याचे संरक्षण होऊन प्रसंगी ते खंदकामध्ये ढकलले जातात. यापैकी एक मोठा सरकपूल तर फार भक्कम असून पुष्कळ सोन्याचे खांब व बसण्यासाठी केलेले ओटे. यांनी त्याला अप्रतिम शोभा आलेली आहे. लंकेवर चढण्याला काही आधार नसून देवांनी निर्माण केल्याप्रमाणे ती भयदायक आहे.

समुद्राच्या लांब पलीकडे ती नगरी असून नावेलाही तेथे वाट नाही व आजूबाजूला काही प्रदेश नाहीत. पर्वताशिखरावर बसविलेली ती दुर्गम नगरी अमरावतीसारखी असून हत्ती, घोडे यांनी भरलेली आहे. ती शत्रूला अजिंक्य आहे. खंदक, लोखंडी नानाप्रकारची यंत्रे यांच्या योगाने त्या लंकेला फारच शोभा आलेली आहे. हातात शूल व तरवारी घेऊन लढणारे दहा हजार राक्षस पूर्वेकडच्या वेशीला आहेत. एक लक्ष चतुरंग सैन्य दक्षिणेच्या वेशीला. पश्चिम द्वाराला दहा लक्ष अस्त्रांची त्यांना माहिती आहे. उत्तरेच्या द्वाराला बहुमान्य व कुलीन असे दहा कोट रथी व स्वार आहेत.'' ही माहिती विसंगत व

विपर्यस्त आहे. यात जरी शंका नसली, तरी रामायण लेखनकाली नगरकोट व नरदुर्ग याची जोडी कशी राबवीत असत याची कल्पना येण्यासारखी आहे. गडकोटांची वास्तू त्या काळी अखंड तटाच्यापेक्षा इतर दृष्टीने प्रगत झाली होती किंवा तशी प्रगती करण्याचा काळ आला होता असे वाटत नाही.

पुराणातही काही उल्लेख आढळतात, पण त्यात वास्तुविषयक विशेष माहिती नसल्याने त्यांचा त्याचा विस्तार करण्याचे कारण नाही. कौटिली अर्थशास्त्र होई किंचित इसवी सनापूर्वीचे असल्याने त्यात तत्पूर्वीचा गडकोटांच्या शिल्पांचा सर्व विचार आलाच आहे. शिल्पकलेतील प्रगतीचे दर्शन कौटिलीय अर्थशास्त्रात मिळते. यातील अधिकरण २, अध्याय २४ व २५ मध्ये 'दुर्गरचना' व 'किल्ल्यातील नगररचना' यामध्ये बराच तपशील आहे.

ही माहिती तत्कालीन गडकोटांच्या वास्तुशास्त्राविषयीची बरीच ओळख करून देते. मात्र ही वास्तुशास्त्राच्या अभ्यासकाला जितकी पुरेशी तपशीलवार असावयास पाहिजे तेवढी नाही, परंतु इतरत्र या इ.स. पूर्व वास्तुशास्त्राचा बारकाईचा तपशील कोठेच मिळत नाही. अशा परिस्थितीत कौटिलीय अर्थशास्त्रातील माहितीला बरेच महत्त्व प्राप्त होत आहे. त्यातील दुर्गरचनेबद्दल कौटिल्याचे निवेदन असे : ''आपल्या राज्याच्या सरहदीवर चारी दिशांना नैसर्गिक भूरचनेचा फायदा घेऊन युध्दोपयोगी अशा दुर्गाची रचना करावी. जलवेष्ठित, खंदकाने वेष्ठिलेले, डोंगरामधील दगडात रचलेले किंवा खोदलेले, निर्मळ व निर्वृक्ष अशा दलदलीने ओसाड प्रदेशात बसविलेले किंवा कुसळाच्या गवताने वेष्ठिलेले, काटेरी झाडांनी घेरलेले असे किल्ल्याचे आठ भेद आहेत. यांपैकी जलदुर्ग व पर्वतदुर्ग यांच्या योगाने देशाचे रक्षण होते. धान्वन (ओसाड प्रदेशातील) व वनदुर्ग यांनी अटवी स्थानाचे रक्षण होते किंवा संकटाचे वेळी त्यात आश्रय घेता येतो.'' राजधानीसाठी जे स्थानीय (नगरदुर्ग) बांधावयाचे त्याच्या वास्तुयोजनेबाबत कौटिल्य लिहितो, ''देशाच्या मध्यभागी देवघेवीचे केंद्र असे शहर बसवावे. वस्ती करण्याला प्रशस्त अशा प्रदेशात नदीसंगमावर किंवा कधीही कोरडे न पडणाऱ्या सरोवराच्या किंवा तलावाच्या काठी स्थानीय बसवावे. जागेच्या सोयीप्रमाणे ते वर्तुळाकार, लांबट किंवा चौकोनी असावे. त्याच्याभोवती सर्व दिशांना पाणी असावे. त्यात निरनिराळ्या मालाच्या वेगवेगळ्या पेठा असाव्यात व त्याला खुस्कीवरून आणि तसेच पाण्यावरूनही येण्याजाण्याचे मार्ग असावेत. त्याच्या भोवती चार चार हातांच्या अंतरावर तीन खंदक असावेत. खंदकाची रुंदी अनुक्रमे चौदा, बारा व दहा दंड असावी आणि खोली रुंदीच्या तीन चतुर्थांश किंवा अर्धी असावी. तळाची रुंदी खंदकाच्या पाऊणपट असून तळाशी फारशी केलेली असावी. त्याच्या बाजू दगड अथवा पक्क्या विटा यांनी बांधून काढाव्यात. खंदकात जिवंत पाणी असावे किंवा बाहेरून पाणी सोडून तो भरावा. त्यातील पाणी जाण्याला वाट ठेवावी. खंदकात कमळे व नक्र असावेत.

आतल्या खंदकापासून चार दंडांच्या आतल्या खंदकापासून चार दंडांच्या अंतरावर सहा दंड उंच व बारा दंड रुंद असा तट बांधावा. तो खाली रुंद व वर निमुळता आणि मध्ये फुगीर असा असावा. त्याच्यामध्ये मातीची भर घालून ती हत्ती व बैल यांच्याकडून तुडवावी आणि त्यावर काटेरी झाडे व विषारी वेली लावाव्यात. नवीन मातीने तटाला असणारी छिद्रे भरून काढावीत.

तटाच्या वर रुंदीच्या दुप्पट उंचीचे असे दोन विटांचे बुरुज बारा हातांवर एक किंवा चोवीस हातांवर करावेत. तटावर रथ चालवताना वाट असावी आणि त्या वाटेच्या कडेला तालपूलाप्रमाणे किंवा मृदुंगासारखे किंवा माकडाच्या डोकीच्या आकाराचे दगडांचे कवडे असावेत. त्यात लाकडांचा उपयोग

करू नये, कारण लाकडाला अग्नीचे भय असते.

तीस दंड अंतरावर रुंदीच्या इतक्याच उंचीचा चबुतरा करावा व त्यावर चढण्याला व उतरण्याला जिना असावा. तटावरील दोन चबुतऱ्यांच्यामध्ये रुंदीच्या दीडपट लांबी असलेली दुमजली व वर गच्ची असलेली अशी देवडी बांधावी.

बुरुजांच्या व वाडपांच्या मध्यंतरी तिघे धनुर्धारी बसतील एवढी पुढे आलेली खिडकी असावी व त्या खिडकीच्या झडपांना भोके असून ती वाटेल तेव्हा उघडता झाकता यावीत. तटावर मध्ये दोन हात रुंदीचे गुप्त रस्ते तटाच्या अनुरोधाने व तटाच्या कडेपासून आठ हात आतल्या बाजूस असे करावेत. दोन दंड किंवा चार दंड अंतरावर तटावर चढण्याउतरण्याला आतल्या बाजूने जिने बांधावेत. तटात अवघड जागी बाहेर निघून जाण्याला काढता घालता पूल असावा व त्याचा चोर दरवाजा या वाटेजवळ असावा.

तटाच्या बाहेरच्या बाजूस बाहेर पडण्यासाठी गुप्त वाट करावी. तिच्यामध्ये जानुभाळीनी, त्रिशुल, प्रकर, कूपकूट वगैरे घातक वस्त्रे, काटे, सर्पांच्या हाडांचे सांगाडे, तालपत्र, शृंगाष्टक, श्वदंष्टार्गल वगैरे हत्यारे वाकडी तिकडी ठेवलेली असावीत आणि तिच्याजवळ रोगट पाण्याची डबकी असावीत. अशा तऱ्हेने ती वाट झाकलेली असावी. दाराच्या दोन्ही बाजूला कमानी करून सहा हात रुंदीचा दरवाजा सहा रस्त्यांना एक असा करावा किंवा दरवाज्यामधील अंतर वीस हातांपासून बत्तीस हातांपर्यंत असावे व दरवाजाची उंची आठ हात असावी किंवा रुंदीपेक्षा एक षष्ठांशाने किंवा एक अष्टमांशाने अधिक असावी. तटाच्या आत एक वाडा असावा. त्याचे खांब पंधरा हातांपासून अठरा हातांपर्यंत उंच असावेत. त्या खांबांचा परीघ तळाशी उंचीच्या एक षष्ठांश असावा व टोकांशी त्याच्या एक चतुर्थांश असावा व खांबाचा एक तृतीयांश भाग जमिनीत पुरावा.

वाड्याचे जेवढे क्षेत्र असेल त्याचे पाच भाग करावेत. त्यात मध्ये विहीर बांधावी, तिच्या दोन्हीही बाजूस दीर्घ चौरस आकार असे दोन सोपे बांधावेत आणि दोन्ही सोप्यांच्या दोनही टोकांस एकेक कोठडी बांधावी. प्रत्येक सोप्याच्या बाहेरच्या बाजूस घुमटयुक्त असे दोन दोन उंच ओटे बांधावेत. त्या ओट्यांच्या दरम्यान जाण्यायेण्याला लहानसा दरवाजा ठेवावा. वरच्या बाजूस दुमजला करावा. त्याची उंची तळमजल्याच्या अर्ध्याने असावी व त्याचे खांब फार जाड असू नयेत. तिसऱ्या मजल्याचा विस्तार तळमजल्याच्या क्षेत्रफळाच्या एक द्वितीयांश किंवा एक तृतीयांश एवढा असावा. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर चढण्याकरिता डाव्या बाजूच्या कोपऱ्यात वाटोळा जिना असावा. इतर बाजूंना भिंतीतून काढलेले गुप्त जिने असावेत.

वेशीच्या दरवाज्याच्या वरचे लाकुड दोन हात जाड असावे. दरवाज्याच्या बाजूचे उभे स्तंभ तीनपंचमांश हात जाडीचे असावेत. दरवाजा बंद करण्यासाठी दोन अडसर असावेत. दरवाज्याचे कुसु मुंढा हात लांबीचे असावेत. दरवाज्याच्या मधली दिंडी पाच हात उंचीची असावी आणि हत्तीला शिरण्याला प्रतिबंध करणारे असे चार अडसर असावेत.

गोपुराजवळ दरवाज्याच्या अर्ध्या रुंदी इतका आणि दरवाज्याच्या उंची इतका मातीचा बुरुज असावा. किल्ल्याच्या सभोवती फेरी घालण्याची वाट न मोडता येण्यासारखी पक्की असावी. जेथे किल्ल्याभोवती पाणी नसेल तेथे ती वाट भुईतून असावी.

तटाला शोभेल असा वेशीचा मुख्य दरवाजा करून त्या शिवाय त्या दरवाज्याच्या एकतृतीयांश एवढे सुसरीच्या तोंडासारखे द्वार प्रसलेले असे गोपुर बांधावे. तटाच्या आत बावडी बांधावी व तीत

उतरण्याला पुष्करिणीद्वार ठेवावे. वेशीच्या दिंडीच्या दीडपट आकाराचे असलेले असे कुमारीपूर बांधावे. त्याचा दरवाजा कमानीच्या आकाराचा असावा व त्याला शिखर किंवा गोपुर असू नये.

जागेचा विस्तार आणि हत्यारे वगैरे सामानाची अनुकुलता असेल त्या बेताने किल्ल्यात लागणारे सामान व शस्त्रे, हत्यारे इत्यादी ठेवण्याकरता गुप्त तळघरे करावीत. ती उंचीच्या मानाने एक तृतीयांश अधिक लांबी-रुंदीची असावीत. त्या तळघरात गोटे, कुदळी, कुऱ्हाडी, बाण, गजादिकांचे शृंगार, गदा, मुदर, दंड, चक्रे, यंत्रे, शेकडो लोकांचा एकदम घात करणारी शतन्घी नावाची यंत्रे, लोहारांनी बनविलेली किरकोळ हत्यारे, त्रिशूल, भाले, उंटाच्या मानेसारख्या वाकड्या बांबूच्या काठ्या, आगीचे बाण आणि प्रकरणात सांगितलेले अनेक पदार्थ यांचा संग्रह करावा.''[२]

कोटाच्या बांधकामाबरोबर या किल्ल्यातील नगररचनेबद्दल तत्कालीन रुढ शिल्पाची माहिती कौटिल्याने दिली आहे. तीही विचारात घेण्यासारखी आहे. कौटिल्य म्हणतो, ''किल्ल्याच्या आत पूर्वपश्चिम असे तीन व दक्षिणोत्तर तीन असे सहा रस्ते आखून नगराचे भाग पाडावेत. त्या नगराला बारा दरवाजे असावेत. त्यातले काही दरवाजे जमिनीवरून, काही पाण्यातून व काही भुयारातून जाता येईल असे असावेत. गावातले सामान्य रस्ते चार दंड रुंदीचे असावेत. राजमार्ग, त्याच प्रमाणे द्रोणमुख, स्थानीय, जनपद, गायराने, उतार पेठा, छावणी, स्मशान यांना जाणारे रस्ते चार दंड रुंदीचे असावेत. धरणावरील व वनाला जाणारे रस्ते चार दंड रुंदीचे असावेत. हत्तीच्या रानाला जाणारा रस्ता दोन दंड असावा. गाडीचा रस्ता पाच अरत्नी (मुंढा हात) गुरांचा रस्ता चार अरत्नी आणि शेळ्या मेंढ्या व माणसे जाण्याचा रस्ता दोन आरत्नी असावा.

शहराच्या मध्यापासून उत्तर दिशेला नवख्या भागात बळकट अशा जागी व जेथे चारही वर्णाची वस्ती आहे अशा जागी राजवाडा बांधावा. तो उत्तराभिमुख किंवा पूर्वाभिमुख असावा. राजवाड्याच्या ईशान्येला आचार्य, पुरोहित, यज्ञगार व जलागार आणि मंत्र्यांची राहण्याची जागा असावी. आग्नेय दिशेला पाकशाळा असावी. पूर्वेच्या बाजूला गंध, माल्य, धान्य, रस याचे व्यापारी, प्रमुख कारागीर आणि क्षत्रिय यांची वस्ती असावी. त्याच्या दक्षिणेला खजिना, सराफकट्टा व कारखाने असावेत.

नैऋत्य भागात वन्यवस्तु व आयुधे यांचे आगर असावे. वाड्याच्या दक्षिण दिशेला नगराध्यक्ष, धान्याध्यक्ष, व्यापाराध्यक्ष, कारखान्यांचा अध्यक्ष व सेनाध्यक्ष, तसेच पक्वान्ने, सुरा व मांस विकणारे, नट व वैश्य यांचा वास असावा. वाड्यात नैऋत्येला गाढवे व उंट यांचे गोठे व त्यांच्या कामाची जागा असावी. त्याच्या पलीकडे पश्चिमेला लोकरीची व कापसाची वस्त्रे करणारे, बुरुड, चामडे कमावणारे, चिलखते, शस्त्रे, म्याने यांचे कारागीर आणि शूद्र यांनी राहावे. नैऋत्येला दुकाने व औषधीशाळा असावी. ईशान्य भागात कोठार, गोशाळा, अश्वशाळा असावी. त्याच्या पलीकडे देवालये, लोहार, जवाहिर आणि ब्राह्मण यांचे स्थान असावे. मध्यंतरी जागा असेल तेथे स्थानिक व्यापारी व परदेशी व्यापारी यांचे संघाची जागा असावी.

शहराच्या मध्यभागी अपसाविता (लक्ष्मी), अप्रतिहत (विष्णु), जयंत (कार्तिकस्वामी), वैजयंत (इंद्र), शिव, कुबेर, अश्विनीकुमार, मदिरा (चामुंडा) इत्यादी देवतांची देवळे असावी. त्या देवालयातून वास्तूदेवतांना त्यांच्या, त्यांच्या योग्य जागी स्थान द्यावे. दरवाज्यावर ब्रह्मा, इंद्र, यम व कार्तिकस्वामी यांची स्थापना करावी. खंदकाच्या बाहेर चारशे हातांच्या पलीकडे चैत्य वृक्षाचे पार, मठ, तीर्थे, सेतू वगैरे करावेत. दहा दिशांना त्या त्या दिशेच्या देवतांची स्थापना करावी.

गावाच्या उत्तरेला व पूर्वेला स्मशान असावे. दक्षिण दिशेला श्रेष्ठ वर्णांच्या लोकांचे स्मशान असावे. त्यावर कोणी अतिक्रमण केल्यास दंड करावा. पाखांडी व चांडाल यांच्या वस्ती स्मशानापलीकडे असावी. कामाच्या गरजेप्रमाणे किंवा जागेच्या सोयीप्रमाणे कुटुंबांना जागा आखून द्यावी. त्यामध्ये अधिकाऱ्यांच्या परवानगीने त्यांनी फुलबाग, फळबाग, राई व मळे करावेत. धान्य व किराणा माल याची कोठार करावीत. दहा, दहा घरांच्या समूहाला एक विहिर असावी. तेल, तूप, मीठ, धान्य, सैंधवे, औषधे, वाळवलेल्या भाज्या, सातू, वाळविलेले मांस, गवत, लाकडे, धातू, कातडी, कोळसे, तात, विष, शिंगे, वेळू, वल्कलाला लागणाऱ्या झाली, इमारती लाकडे, हल्ला करावयाची हत्यारे, गोटे यांचा अनेक वर्षे पुरेल असा संग्रह करून ठेवावा. नवीन संग्रह हाती आला म्हणजे जुना काढून टाकावा.

हत्ती, घोडे, रथ व पायदळ यांच्यावर अनेक अधिकारी नेमून त्यांची किल्ल्यात स्थापना करावी. अनेक अधिकारी नेमले म्हणजे एकमेकांच्या भयाने ते शत्रूला फितूर होत नाहीत. अशाच रीतीने सरहद्दीवरील दुर्गाची व्यवस्था ठेवावी.

किल्ल्यांमध्ये शहर व राज्य यांचा घात करणारे विहार स्थापू देऊ नयेत. यांना जनपदात स्थान द्यावे व त्या सर्वांना कर द्यावयाला लावावे.

कौटिल्याच्या काळी वसाहतीचे बरेच स्थायीकरण झाले होते; त्यामुळे या कौटिलीय अर्थशास्त्रात झालेली गडकोटांची माहिती जरी बरीच तपशीलवार वाटली, तरी त्यात सर्व प्रकारच्या दुर्गांची माहिती नाही. फक्त राजधानीच्या कोटाचे विवेचन आले आहे आणि विशेषत: त्याच दुर्गातील व्यवस्थेबाबतचे अधिक विवरण आहे.

कौटिल्य दुर्गांच्या प्रकारात दोहोची अधिक भर घालतो. या काळापर्यंत गडकोटाचे जे सहाच प्रकार मानले जात होते. त्यांचीच वर्गवारी मागे जशी चाराची सहात झाली तशीच ती आता आठात केली आहे. कौटिल्याने ही वर्गवारी औदक, पर्वत, धान्वन व वनदुर्ग या चार विशिष्ट भौगोलिक प्रदेशानुरूप पोटविभागात केली आहे. औदकात अंतद्विप व स्थल, पर्वतात प्रांतर व गुहा, धान्वनात निरुदकस्तंभ व ईरण आणि वनदुर्गात दवजानोदक व स्तंबगहन असे आठ प्रकार सांगितले आहेत. मात्र सपाट प्रदेशात गिरीदुर्ग तुरळक असल्याने व परिस्थित्यनुसार शहर अगर नगर कोटावरच अधिक भर द्यावा लागल्याने इतर प्रकारच्या दुर्गांना तितके महत्त्व प्राप्त झाले नव्हते असे दिसते. सपाट प्रदेशात प्रवासाला आणि आक्रमणाला मार्ग सुकर व प्रदेश सुपीक असल्याने त्या काळी मनुष्यबलावरच म्हणजे नरदुर्गावरच विशेष जोर दिला असल्यास नवल नाही, कारण सैन्याच्या हालचाली व त्यांचा निर्वाद करण्याच्या सोयी सहजसाध्य होत्या. याबाबतीत महाराष्ट्राची परिस्थिती वेगळी होती; त्यामुळे सुरक्षितेसाठी डोंगरी गडकिल्ल्यास साहजिक सर्वदृष्टीने महत्त्व होते; परंतु कौटिल्याच्या काळी गडकिल्ल्यांना विशेष महत्त्व का नव्हते याचे दिग्दर्शन त्यांनी इतरत्र तत्कालीन निरनिराळे मतप्रवाद देऊन केले आहे. त्यावरून त्या काळची देशपरिस्थिती कशी होती हे अप्रत्यक्षपणे लक्षात येते.

''प्रकृतिव्यसनवर्ग:'' म्हणजे 'संकटांचा तारतम्य विचार' या प्रकरणात प्रथम बाह्य संकट म्हणजे व्यसन असा अर्थ देऊन या बाह्यसंकटांची कमी अधिक तीव्रता कोणत्या संकटापत्तीपासून प्राप्त होते हे सांगताना तो म्हणतो : ''राजाची आपत्ती अमात्याच्या आपत्तीपेक्षा, किल्ल्याची द्रव्याच्या आपत्तीपेक्षा आणि द्रव्याची मित्रांच्या आपत्तीपेक्षा अधिक भयंकर असे.'' यावर चर्चा करताना कौटिल्य मतप्रवाद सांगतात की, ''प्रजेवरची आपत्ती आणि किल्ला अथवा तटबंदी गावे यावरी आपत्ती यात किल्ल्याची

अथवा तटबंदी गावची आपत्ती अधिक भयंकर असे, पराशराचे अनुयायी समजतात. कारण किल्ल्यातून अथवा तटबंदी गावातून पैसा व सैन्य यांचा उगम होतो आणि संकटप्रसंगी प्रजेला आश्रय मिळतो. शहरातील व खेड्यातील लोकांपेक्षा किल्ले किंवा तटबंदी गावे अधिक बळकट असतात आणि संकटप्रसंगी राजाला त्यांचा चांगला आधार असतो; परंतु इतरत्र राहण्याचा लोकास काय, राजासारखा व शत्रूही सारखाच; परंतु कौटिल्य सांगतो की, ते तसे नाही. किल्ले किंवा तटबंदी गावे, पैसा, सैन्य, पाटबांधारे, इमारती, शेती, व्यापार, गोरक्षण, शौर्य, स्थैर्य, दक्षता व समृद्धी या सर्वांचा उगम जनतेपासूनच होतो. ज्या भागात लोकवस्ती आहे त्यात पर्वत व बेटे असतातच, पण ज्या प्रदेशात लढाऊ लोकांची बहुसंख्या असते त्या प्रदेशात किल्ले नसले, तरी त्यांची फिकीर करण्याचे कारण नाही.''

नंतर पिशुनाचे मत देतो: ''किल्ल्यांचा तुटवडा व पैशाचा तुटवडा यात पैशाचा अधिक भयंकर. किल्ल्यांचे संरक्षण व दुरुस्ती पैशावर अवलंबून असते. पैशाने शत्रूच्या किल्ल्यात असंतोष व द्रोह उत्पन्न करिता येतो. लोकास, मित्रास व शत्रूस पैशाच्या जोरावर दडपता येते. सैन्याच्या हालचाली व व्यवहार पैशावर अवलंबून असतात. संकटप्रसंगी तिजोरी घेऊन पळून जाता येईल, पण किल्ला घेऊन कसे जाणार ?'' या प्रवादावर कौटिल्याचे म्हणणे की, ''ते तसे नाही. किल्ल्यात तिजोरी व सैन्य सुरक्षित राहील. किल्ल्यामधून गुपचुप लढाई चालविता येईल. आपल्या बाजूकडील राजावर छाप ठेविता येईल. सैन्याचा बंदोबस्त करिता येईल. मित्राला मदत करता येईल आणि शत्रूचा किंवा रानातील बंडखोरांचा सामाचार घेता येईल. किल्ला नसला, तर तिजोरी शत्रूचीच झाली असे समजावे. जादा किल्ल्याचे पाठबळ आहे त्यांचा नाश होत नाही असे आपणास दिसते.

सारांश, कौटिल्याच्या काळापर्यंत तरी राज्याच्या मर्यादा किंवा राज्यातील खेडोपाडी किंवा त्यातील प्रजेच्या संरक्षणाची, त्यास शत्रूकडून ताप होण्याचा संभव कमी असल्याने, फारशी फिकीर करण्याचे प्रयोजन नसे असे दिसते. मोठ्या शहरातील संपत्ती व राजधानी सांभाळण्याचे प्रयत्न जरूर आणि त्या त्या शहराभोवताली कमी अधिक दुर्धर भौगोलिक परिस्थितीप्रमाणे गडकोटासारखा कृत्रिम बंदोबस्त करणे भाग पडे. परिस्थितीच तशी होती. वस्ती विरळ, वाटा दुर्घट व शेत जमिनी सोडल्या, तर घरादारांत किंवा जंगलात संपत्ती फारच अल्प प्रमाणात अडकलेली असे. पावसाळी पिकांना नदिनाल्यांमुळे शेजारीपाजारी लोकांखेरीज इतर मोठ्या परचक्रापासून संरक्षण मिळे आणि कोणत्याही परचक्राला लहान खेड्यांवर आघात करीत बसण्यास वेळही नसे व त्यापासून फायद्यापेक्षा तोटाच अधिक असे. इतकेच नव्हे, तर परदेशीय किंवा परप्रांती शत्रूला कोठेही फार दिवस राहून आपल्या सैन्याची गुजराण करणे कठीण असे. या परिस्थितीत गडकोटांपेक्षा मनुष्यबळाला अधिक महत्त्व मानण्याकडे कल होता. असे जरी असले, तरी कौटिल्याने गडदुर्गांच्या बलाबलाचा विचारही दूरदर्शित्वाने केलेला दिसतो.

कौटिल्य म्हणतो: अष्ट प्रकारच्या गडदुर्गात भुईकोट किल्ल्यापेक्षा पाणकोट किल्ला चांगला व पाणकोट किल्ल्यापेक्षा डोंगरी किल्ला चांगला. पुढे किल्ल्यांच्या आश्रयाने राहणाऱ्या शत्रूमध्ये भुईकोट किल्ल्यातील शत्रूपासून जमीन मिळवणे सोपे की, जंजिरा किल्ल्यातील शत्रूपासून मिळवणे सोपे ?

या बाबत कौटिल्य सांगतो की, भुईकोट किल्ल्याला वेढा घालून हस्तगत करावयास फार प्रयास पडत नाहीत व शत्रूसही तेथून निसटून जाता येत नाही. परंतु जंजिरा किल्ल्यास दुप्पट प्रयास पडतात.

शिवाय त्यातील शत्रूचा पाणी व अन्नसामग्री याचा साठा बंद करणे कठीण जाते. जंजिरा किल्ल्यापेक्षा डोंगरी किल्ला चांगला का, तर ''जंजिरा किल्ल्याला नदीचा वेढा असला, तरी तो हत्तीवरून, तात्पुरता पूल बांधून अथवा नावेवरून गाठता येतो.

काही ठिकाणी नदीला पाणी खोल नसल्यामुळे उतार मिळतो किंवा पाणी खोल असल्यास पाणी काढून टाकता येते; परंतु डोंगरी किल्ला स्वाभाविकपणे सुरक्षित असतो. त्यास वेढा घालण्यास किंवा चढून जाण्यास प्रयास पडतात. त्यावर मारा केला तरी काही भाग उद्‌ध्वस्त करीता येईल, सर्व किल्ला उद्‌ध्वस्त करिता येणार नाही. शिवाय शत्रूला डोंगरी किल्ल्यावरून मोठी मोठे दगड किंवा झाडे फेकून मारा करिता येतो.

कौटिल्याच्या विवेचनावरून भारत बराच समृध्द होत चालल्याने व वसाहतींना स्थिरत्व प्राप्त झाल्याने राजे महाराजे यांच्यातील प्रदेश जिंकण्याबाबतची स्पर्धा वाढीस लागल्याचे दिसते; त्यामुळे शत्रुपरिहारार्य गडकोटाची आवश्यकताही अधिकाधिक भासू लागली होती. ती म्हणजे नदी तळ्यांच्या आधारानेच बांधावी लागतात, कारण वेढा पडलाच, तर पाण्याचा साठा भरपूर असणे आवश्यक असे आणि तो तसा नसेल, तर कोट फार काळ लढवणे दुरापास्त होऊन साहजिकच शरणागती स्वीकारावी लागे. विशेषत: डोंगरी प्रदेशात व इतरत्र डोंगरी किल्ल्याचा आश्रय हाच जेव्हा अधिक सुरक्षिततेचा उपाय म्हणून वाटू लागला तेव्हा प्रथम पाण्याची सोय शोधण्याचा प्रश्न अधिक महत्त्वाने जाणवू लागला. वाटेल तेथे खडक फोडून असा साठा मिळणे किंवा शोधणे दुर्गम होते; परंतु कशाचीही वाण भासू लागली की, ती भरून काढण्याच्या दृष्टीने हरप्रयत्ने करून उपाय शोधून काढण्याची नैसर्गिकच मानवी प्रवृत्ती असल्याने याबाबतीतही अनुभवाने प्रगती काही काळानंतर केली गेली. सुमारे इ.स.च्या सहाव्या शतकात लिहिलेल्या 'बृहत्संहिते'त 'दुर्कागीलय' म्हणजे जिवंत पाण्याचा झऱ्यांचे शोधन या विषयावर दिलेल्या तपशीलावरून त्या काळापूर्वी या बाबतीत कसकसे शोध व किती व कशी प्रगती केली होती याचे चित्र पाहावयास मिळते. या प्रकरणावर नंतर हजार बाराशे वर्षांत बऱ्याच टिका लिहिल्या गेल्या आहेत. त्यात जरी काही अधिक तपशीलांची भर पडली असली, तरी 'बृहत्सहिते'तील मूळ तत्वे अनुभवाने सर्वत्र पटण्याचीच ग्वाही दिली आहे. या प्रकरणाचे १२५ श्लोक आहेत. त्यात पाण्याच्या शोधार्थ जो बाह्य लक्षणांचा विस्तार केला आहे. त्याचा येथे विस्तार करण्याची जरुरी नाही, परंतु वृक्षाच्या वाढीवरून किंवा कीटकांच्या अस्तित्वावरून अथवा जमिनीच्या किंवा खडकाच्या रंगरूपावरून अथवा गुणधर्मावरून हा पाणी शोधण्याचा मार्ग सांगितला आहे. जिवंत पाण्याच्या झऱ्यांच्या अस्तित्वाबाबतचे तत्त्व सांगताना वराहमिहीर म्हणतो: ''डोंगर असोत किंवा दऱ्या असोत, जमीन असो वा खडक असो, सर्वत्र कमी अधिक बरे झरे वाहणाऱ्या शिरा पृथ्वीत असू शकतात आणि त्या जाणण्याची साधने निसर्गातील उपस्थितीतल्याच दृष्टिगोचर करून घेता येतात.'' हा शोध इतर दुर्गापेक्षा गिरीदुर्गांना विशेष उपयुक्त ठरला आणि लोकसमाजही पर्वतातील प्रांतर व गुहा दुर्गांच्या संरक्षणाचा अधिकाधिक फायदा घेऊ लागला; त्यामुळे गिरिदुर्गांची योजना अधिक बलशाली व सुलभ होऊ लागली. सतराव्या शतकानंतरचे गिरिदुर्ग सोडले तर बहुतेक सर्व लहान मोठे गिरिदुर्ग व गुहा पाणीपुरवठ्याच्या बाबतीत समृध्द असल्याचे आढळून येते. या अनुभवज्ञानाप्रमाणे काही सिध्दसाधूही आपल्या आत्मबलाच्या दृष्टीने भूमीतल्या शिरांच्या बाबत मार्गदर्शन करीत; परंतु स्वानुभवावरून मी सांगू शकतो की, अशा सिध्दीसामर्थ्याचे अस्तित्व चांगल्या व आपल्याच मार्गात रममाण झालेल्या

योगीमहंतात पाहावयास मिळते. या गिरिदुर्गावरील झऱ्यांबाबत आणखी एक वैशिष्ट्य दिसून येते. जे पाणी वर चढते ते आपल्या 'सायफन सिस्टिम'प्रमाणे चढत असते. जर का या पाण्यावरील दाब कमी झाला की ते पाणी किंवा झरवणी ताबडतोब तुटते व ते टाके किंवा तो हौद कायमचा कोरडा पडतो. म्हणूनच ही पाण्याची शिर तोडताना तिची नैसर्गिक प्रवृत्ती जेथे उंटाच्या मानेसारखी अर्धवर्तुळाकार होते तीच शिर तिच्या उंच सपाटीवर न तोडता शक्य तितक्या अर्धवर्तुळाच्या तोंडाच्या खालच्या बाजूस तोडतात, कारण पृष्ठभागावर येणाऱ्या पाण्यावर हवेचा दाब सहन न झाल्यास तो झरा जमिनीत कोठेही वाव मिळताच आपली गती बदलतो. कर्नाळा किल्ल्यावर डोंगरात एक खोदीव टाके होते. त्यात पाण्यावर हवेचा दाब न पडेल अशी त्या टाक्याची पातळी ठेवली होती; परंतु एकदा या टाक्याची बाहेरील भिंत (खडकाचीच) वीज पडून फुटून त्या टाक्यात पोकळी होताच ते पाणी कायमचे नाहीसे झाले. बारमाही सतत तुडुंब भरून राहणारे ते टाके संपूर्णत: कोरडे पडले. हाच अनुभव विहिरी खोदताना येतो. झऱ्याच्या ओघाला निराळे वळण लागेल असा काहीही अडथळा झाल्यास भूमीत नाहीसे होत. सारांश, हे पाणी शोधनाचे शास्त्र बरेच प्रगत झाले होते यात शंका नाही आणि तोही इ.स.च्या सहाव्या शतकापूर्वीच झाल्याने गडकिल्ल्यांच्या इमारतीकडे राजे महाराजे व स्थानिक लोक यांचे त्याकडे अधिकाधिक लक्ष जाऊ लागले. मात्र या गडकिल्ल्यांच्या वास्तुंची उभारणी या पाण्याच्या शिरांच्या अनुरोधाने करणे भाग पडत होते. नगर व छोट्या शहरात कोट बांधून राहण्यापेक्षा चांगल्या डोंगरी किल्ल्याच्या आधाराने पायथ्याशी वस्ती करून राहणे जास्त सोयीस्कर व कमी त्रासाचे होते.

गिरिदुर्गांना जे सामर्थ्याच्या दृष्टीने प्रामाण्य लावले ते केवळ उंच, खडकाळ व दुर्घट शिखरांवरील गडांच्या वास्तु उभारण्यात जी हरप्रयत्नाने सुलभता व भक्कम बांधणीचा जो उच्च दर्जा गाठला गेला. विशेषत: पाण्याच्या विपुलतेसाठी उपयुक्त टाकी किंवा विहिरी काढणे, खडक फोडण्याच्या दुर्घट व किचकट कामात युक्तिप्रयुक्तीने सुलभता साधणे व बांधकामासाठी जे साहित्य किंवा जी साधने लागतात ती उत्तम तऱ्हेची बनवणे यावर अवलंबून होते. दुर्गाची योजना ही सर्वांच्याच धनवित्ताच्या संकटकालीन संरक्षणाची बाब असल्याने हे काम गावाच्या साहाय्याने पार पाडले जाई. त्याकरिता बाहेरूनही माहितगार कारागीर आणले जात. खडक किंवा मजबूत असा काळा फत्तर फोडण्याबाबतही काही उपाय शोधून काढले होते. वराहामिहीर म्हणतो की, ''खडक फोडणे कठीण जाऊ लागले, तर त्या खडकावर पळस व तिन्दुल झाडांची लाकडे पेटवून तो लाल होईपर्यंत तापवावा. मग त्यावर चुन्याचे पाणी शिंपडावे तसेच माणिबिक झाडाचे फांद्या व झाड गवत टाकून उकळिवलेले पाणी तापवलेल्या खडकावर सात वेळा शिंपडावे.

ताक, कांजी व दारू यांच्या मिश्रणात कुलित व बदराणी म्हणजे बोरे घालून सात दिवस ठेवावीत आणि नंतर वरीलप्रमाणे तापविलेल्या खडकावर ते मिश्रण ओतावे. निंबाची पाने व डहाळ्या, तिळाच्या देठी, आपामार्ग, तिन्दुक व गुडुची म्हणजे गुळवेल ह्यांची राख गोमुत्रात कालवून सहा वेळा तापलेल्या खडकावर पसरावी. असे केले तर तो खडक फुटतो. यानंतर फोडण्याच्या हत्याराचेही पाते तीक्ष्ण असावे लागते. ते तसे करण्याचा उपाय सांगताना त्यांनी विशिष्ट पाणी देण्याचे प्रकार सांगितले आहेत. चुना तयार करण्याच्या पध्दती, विशिष्ट प्रकारच्या झाडाचा उपयोग व ती लाकडे चांगली राहावीत म्हणून त्याला द्यावयाचे लेप, इत्यादी अनुभवपूर्ण गोष्टी जुन्या ग्रंथांतून 'कल्प' वगैरे नावाखाली दिलेल्या आहेत. त्यांचा विचार केला, तर त्या गडकोटदुर्गाच्या वास्तुशास्त्रात कशी प्रगती होत आली आहे हे

दृष्टिस पडते. अद्यापही चांगले तज्ञ किल्ल्यांच्या चुन्याची किंवा त्यात वापरलेल्या लाकडांची व लोखंडाच्या खिळ्यांची व अडसरांची आश्चर्यभरित होऊन वाखाणणी करितात. सारांश, गडकोटांच्या उपयोगात व वास्तूत जी प्रगती होत राहिली ती या साधन साहित्याच्या प्रगतीनुसारच होत आली.

अभिलाषितार्थ चिन्तामणीतील वर्णनावरून बाराव्या शतकाच्या सुमारास गडकोटांच्या संरक्षणविना सुखस्वास्थाची विवंचना वाटत होती असे दिसते. त्या काळी देशात कायम स्वरूपाच्या वसाहती करण्याकडे लोकांची ओढ होती आणि या वसाहती सुखसोईच्या सुरक्षिततेची जबाबदारी वाढत होती; त्यामुळे या काळात व नंतर भारतात गडकोट किल्ल्यांची बरीच वाढ झालेली दिसते. गड कोटांची वर्गवारीही त्या काळी विशेषत: वास्तूच्या स्वरूपावरून अथवा बांधकामाच्या गुणधर्मावरून केली जात होती असे दिसते.

**'अभिलाषितार्थ चिंतामणी'चा कर्ता सोमेश्वरदेव यांनी गडकोटदुर्गाचे नऊ प्रकार सांगितले आहेत. ते असे :**

१) निसर्गसिध्द जलाने वेष्ठित तो जलदुर्ग

२) दुर्घट चढाच्या व पाण्याच्या सोईने समृध्द अशा शिखरावरील गिरिदुर्ग

३) पाषाणात भक्कम बांधून काढलेला अश्मदुर्ग

४) विटाचुन्याने बांधलेला व खंदकाने वेष्ठित तो इष्टिकादुर्ग

५) चिखलमातीतच बांधून काढलेला तो मृत्तिकादुर्ग

६) दाट काटेरी झाडांच्या (निवडुंग किंवा करवंदी वगैरेसारख्या झाडांच्या) कुंपणाने संरक्षित तो वार्ध्य किंवा वनदुर्ग.

७) ओसाड व जलहीन प्रदेशात मध्येच पाण्याच्या आश्रयाने बांधलेला तो मरुदुर्ग.

८) वेळू किंवा लाकडाच्या कूड किंवा भिंती यांचा सभोवतार तट असलेला तो दारूदुर्ग.

९) शस्त्रास्त्रासहित शूर योध्द्यांनी रक्षण केला जात आहे तो नृ किंवा नरदुर्ग होय.

यातील गिरीदुर्ग व जलदुर्ग उत्तम, दारूदुर्ग व नरदुर्ग कनिष्ठ व इतर मध्यम असे मानले जात.

सारांश, गडकोटांच्या मुळातील चार प्रकारानंतरच्या बाराव्या शतकापर्यंतच्या काळात गडकोटांचे नऊ प्रकार प्रसिध्दीस आले होते.

बंगाल, ओरिसा व पंचनद्यांचा भाग सोडला, तर इतरत्र जलदुर्गांना उचित अशी फारशी जागा नव्हती. दक्षिणेत मोठमोठ्या तलाव-सागरातून लहान, लहान जागा बांधल्या जात; परंतु त्या फक्त संपत्ती वगैरेच्या रक्षणार्थ समुद्रात जलदुर्ग बांधून परदेशीय आक्रमणांना तोंड देण्याची पंधराव्या शतकापर्यंत तेवढी निकड नव्हती; त्यामुळे महाराष्ट्रात गिरिदुर्गाची संख्या मोठी होती. तशी ती सतराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत जलदुर्गांची नव्हती. लहान, लहान जलदुर्ग पोर्तुगीजांनी समुद्रकिनाऱ्यावरील काही खाड्यांतील व खाड्यांच्या तोंडावरील बंदरात बांधले होते. त्यातील एक दोन सोडले, तर बाकीचे अगदी लहान म्हणजे चौकीवजा होते. पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी संबंध जडल्यानंतर समुद्रातील जलदुर्गांची आवश्यकता भासली. काही चांगले व राजकीयदृष्ट्या सामर्थ्यवान जलदुर्ग सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात व नंतर बांधले गेले. त्यापूर्वी महत्त्वाचे असे जलदुर्ग पूर्व-पश्चिम किनाऱ्यावर चारपाचच होते असे म्हटले तरी चालेल. सारांश, शिवकालापूर्वीची जलदुर्गांची वास्तू व नंतरची वास्तू यात बराच फरक आहे. पूर्वीच्या इतर जलदुर्गात राजकीय संरक्षणापेक्षा स्थानिक शत्रूपासून

बचाव करण्याकडे अधिक भर असे.

महाराष्ट्राचा सर्व प्रदेश डोंगरी आणि त्यातूनही सह्याद्रीच्या रांगेत लहान लहान ओढे, नद्या, जंगले व त्या आधाराने निर्धास्त राहणारे हिंस्र पशू इत्यादिक इतके विपुल होते की, पावसाळ्यात कोणतेही परस्य सैन्य या प्रदेशात तंबू राहुट्या बांधून दिवस काढू शकत नव्हते; त्यामुळे सर्व प्रदेशच सामान्यत: वर उल्लेखलेल्या वन अथवा धन्वन दुर्गापेक्षा अधिक सुरक्षित होता. तरीही स्थानिक पशू आदि शत्रूंपासून आपली गावठाणे सुरक्षित राखण्यासाठी तात्पुरती किंवा काटेरी झाडांची कुंपणे घालीत.

महाराष्ट्रात गिरिदुर्गाची संख्या फार मोठी होती. महाराष्ट्रातील बऱ्याच गिरिदुर्गांना वनदुर्गाचेही स्वरूप प्राप्त झालेले होते. प्रथम ज्या लोकांनी विंध्याचलाच्या दक्षिणेकडील भागात तपोवने केली. त्यांनी डोंगरात पाण्याच्या सोयीच्या व सुरक्षित जागी कोरीव लेणी, गुहा, ओवऱ्या वगैरे काढून रहिवास केला. देश प्रांतप्रमुखानी नंतर उपयुक्त जागी डोंगरावरील नैसर्गिक तटबंदीचा फायदा घेऊन व पाण्याच्या पुरवठ्याप्रमाणे गडावर वास केला व नंतर डोंगरावर कृत्रिम तटबंदी बांधून त्यांचा आधार घेतला. सारांश, बरेच गडकोट सतराव्या शतकाचे पूर्वीच बांधले गेले होते. त्यातील काही, डोंगराच्या आसपास व्यक्तीस योग्य अशी परिस्थिती निर्माण झाल्याने, ओसाड पडले होते व काही मोडकळीस आले होते. 'अभिलाषितार्थ चिंतामणी'तील माहिती जशी महाराष्ट्राला पूर्णपणे धरून आहे तशीच वरामिहिराची 'संहिते'तील पाणीशोधन वगैरे बाबतीत दिलेली माहिती दक्षिण हिंदुस्थानातील वस्तुस्थितीवरच आधारलेली आहे. त्यावरून असा कयास करण्यास हरकत नाही की, जे गडकोट पाण्याने सुसंपन्न व बांधकामाच्या दृष्टिने पूर्ण मजबूत आहेत. त्याची बांधणी इ. स.च्या पाचव्या शतकाच्या पूर्वीपासूनच होत आली आहे. जे काही किल्ले बहामनी अमदानीत किंवा त्यानंतरच्या मुसलमानी अमदानीत बांधले गेले त्याची शिल्प, 'इस्लामी संस्कृतीतून' इकडे घेतले असे नसून, स्थानिक करागिरांचाच अनुभव व परंपरेच्या ज्ञानातून उत्पन्न झालेले आहे. मालकाच्या इच्छेनुरूप काही आकार व सोयी करण्यात इस्लामी थाट असला, तरी मुख्य बांधकामातील तपशील पूर्वपरंपरेचाच आहे. बांधकामास लागणारा मालमसाला, दगडाची घडाई वगैरे चारपाच पदस्य लोक आणून करून घेणे अशा अजस्र इमारतीच्या बाबतीत शक्य होते.

सारांश, भारतातील इतर प्रांतांपेक्षा महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांची वास्तुपध्दती वेगळी असून ती बरीच बळकट व संरक्षणाच्या किंवा लढ्याच्यादृष्टीने बरीच प्रगत झाली होती यात शंका नाही. भुईकोट, गढी यासारखे नगरदुर्ग बांधण्याची परिस्थिती बरीच उशिरा निर्माण झाली असावी असे दिसते.

डोंगराच्या आसरा घेणारे लोक आपल्या आसपासच्या भागातील विषारी किडेकाटुक व पशू यांचा उपद्रव कमी करण्यासाठी दरवर्षी वाढलेल्या गवतास अग्नि देऊन त्याचा संहार करीत किंवा त्यास दूर पळवून लावीत. पावसाळ्यातील मर्यादित हालचालींना विघ्न होऊ नये म्हणून 'वणवा' पेटवून देणे व त्यासाठी योग्य ती काळजी गावकरी लोक घेत असत. त्याशिवाय हिंस्र पशू पळविण्यासाठी शेकोटी पेटवणे व आरडाओरड करून त्यास भिववून पळविणे हेही त्यांचे नित्यातील कार्य असे.

महाराष्ट्रातील बऱ्याच किल्ल्यांबाबत काही ना काही दंतकथा ऐकावयास मिळतात. विशेषत: या गडकोटाच्या वास्तुबाबत व इतिहासाबाबत बऱ्याच भाकडकथा जन्मास आलेल्या आहेत. यातील कित्येक तर किल्ल्यांवरील खास शिलालेखांशी पूर्णपणे विसंगत ठरतात. किल्ल्यांच्या आणि विशेषत: बुरुजांच्या बांधकामाबाबत आणि आतील देवदेवळांच्या प्रयोजनाबाबत अनेक दंतकथा आहेत.

क्वचित प्रसंगी दुसऱ्या कोठेतरी असल्या बांधकामाबाबत घडलेली गोष्ट आपल्याच गडाच्या बाबत घडली असा गैरसमज झालेलाही दिसतो. मुख्यत: गडकोटाच्या चुन्याच्या मिश्रणात जबरदस्तीने माणसांचे रक्त मिसळल्याच्या कथा बहुधा अवास्तवच ठरतात, मात्र एक गोष्ट कबूल करावी लागते आणि ती ही की, महाराष्ट्रात अनार्य लोकांच्या ज्या चालीरीती आर्यांनी उचलल्या त्यात देवदेवतांस व भुताखेतास आणि विशेषत: एखाद्या बांधकामाच्या प्रसंगी अडथळा आल्यास स्थानदेवतास किंवा उपदेवतास बोकड, रेडा, बैल आणि क्वचित प्रसंगी मनुष्यबळीही देण्याचे प्रकार प्रचलित होते; परंतु हा नरबळी सरसहा सर्वच गडांसाठी दिला गेला होता असे मानणे मात्र वास्तवतेला सोडून होईल. अवाढव्य, दुर्घट व अडचणीच्या जागी बांधकाम चालताना मनुष्य अपघाताने बळी पडणे शक्य आहे; परंतु हा नरबळी जबरदस्तीने दिला जात असे हे मानणे बरोबर होणार नाही.

गडदुर्गांची ही संख्या भारतात फार पुरातन काळापासून वाढत आलेली आहे आणि त्या वास्तुशास्त्राची प्रगतीही फार चांगल्या प्रकारे होत गेली आहे यात संशय नाही. विशेषत: पाणीशोधन, खडकातील खोदकाम, चुन्यातील बांधकाम, हे कोणत्याही देशातील बांधकामापेक्षा जास्त चिरायु, बरेच प्रगतिमान झालेले होते असे म्हटल्यास अतिशोयक्ती होणार नाही. आजही त्या वास्तूंच्या गुणांची वाखाणणी होत आहे हे विशेष आहे.

■■■

# २.२ शिवकाळातील किल्ल्यांची वैशिष्ट्ये

प्रतापगड, राजगड, सिंधुदुर्ग, रायगड असे शिवाजी महाराजांनी निश्चितपणे बांधलेले किल्ले आणि सिंहगड, पन्हाळा, जंजिरा, देवगिरी असे जुने किल्ले. यामध्ये तुलना केली तर काही वैशिष्ट्ये स्पष्टपणे नजरेत भारतात. त्यापैकी काही प्रमुख गोष्टी खालीलप्रमाणे–

१) डोंगरी किल्ल्याची प्रमुख व बाह्य तटबंदी शिवनिर्मित किल्ल्यांवर अगदी डोंगर माथ्याऐवजी पायथ्यापासून साधारणत: २/३ उंचीवर बांधलेली आढळते. किल्ल्याचा मुख्य दरवाजा अशाच ठिकाणी असतो.[३]

रायगडाचा मुख्य दरवाजा असणारी तटबंदी टकमक टोक व हिरकणी बुरुजादरम्यान खालपासून २/३ उंचीवर आहे.

राजगडाच्या माचांची तटबंदी आणि मध्यवर्ती बालेकिल्ला यामध्येही असाच डोंगरी उंचीचा फरक आहे.

प्रतापगडची माची आणि बालेकिल्ला यामध्येही उंचीचा फरक आहेच.

२) डोंगरी किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराकडे येणारी वाट डोंगर उजवीकडे ठेवूनच वर येते.

शिवकाळात किल्ले जिंकताना लढाई प्रामुख्याने ढाल–तलवार ही दोन साधने वापरूनच होत असे. बंदुका–धनुष्यबाण–भाले–तोफा यांचा वापर जरी होत असला तरीही किल्ल्याच्या मुख्य दरवाजापाशी होणारा हल्ला ढालतलवारीचा उपयोग करूनच होत असे.

किल्ल्याकडे येताना उजवीकडे डोंगर असेल व तेथील तटबंदीवर बसलेले सैनिक छोटे–मोठे दगड, जळते बोळे, बाण, भाले, बंदुकीच्या गोळ्या यांचा मारा करीत असतील तर ढालीसारखे संरक्षक कवच बरोबर विरुध्द बाजूला राहत असे.

किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे येणारी वाट नियोजनपूर्वक आखली तर त्याचाही फायदा उठवता येतो. शत्रूच्या अडचणीत भर टाकता येते.

असा इतका बारीक सारीक विचार दुर्गबांधणीत केलेला आढळतो. जुन्या सिंहगड, पन्हाळा, विशाळगड आदी किल्ल्यांवर नसलेला हा प्रकार रायगड, प्रतापगड आदी शिवनिर्मित किल्ल्यांवर आवर्जून दिसतो.

३) किल्ल्यांचं प्रत्यक्ष दार लपवलेलं असतं ते दर्शनी नसतं. प्रवेशद्वार नेमकं कुठे आहे ते खालून निश्चितपणे सांगता दाखवता येत नाही. [४]

४) प्रत्यक्ष दरवाज्याची रचना शिवनिर्मित दुर्गावर गोमुखी बांधणी असे.याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रायगडचा महादरवाजा. येणाऱ्या शत्रुसैनिकांच्या पाठीवर हल्ला करण्याच्या पुरेशा संधी यात मिळू शकतात. दोन बुरुजांच्या कवेत निर्माण झालेल्या चिंचोळ्या वाटेने आत शिरताना त्यांच्या अंगावर उकळते तेल किंवा पाणी ओतले तर भाजणे आणि निसरडी जमीन ही दोन अस्मानी संकटे शत्रूला नामोहरम करू शकतात.

प्रत्यक्ष दरवाज्यासमोर असणारे प्रांगण छोटे तर असतेच, पण शत्रूने इथवर हत्ती आणून दरवाज्यावर धडक देऊन दार फोडून आत येण्याचे ठरविले तर हत्तीला धडक देण्यासाठी थोडं मागे जावं लागतं. तेवढं मागे जाण्याएवढी जागाच त्या जागी उपलब्ध नाही.

दरवाजा बगलेत घेणारे दोन्ही बुरूज घडीव दगडांचे आणि असे चिरेबंदी बांधणीचे की त्यात बोटच काय पण नख रुतवायलाही जागा नाही. शिवाय वरून होणारा बंदुकीच्या गोळ्या, बाण, जळते बोळे, भाले यांचा त्रास चुकवायला अडोसाच नाही. संरक्षक दुर्गबांधणीचा हा सर्वोच्च आविष्कार असावा.

म्हणूनच एक शिवशाहीर म्हणतात, एक वेळ सीतेच्या हृदयात रावणाला स्थान मिळेल, पण या गोमुखी प्रवेशद्वार रचनेतून शत्रूचा सैनिकही आत येणं केवळ अशक्य.

म्हणूनच रायगडावरील सत्तांतर इथल्या मुख्य दरवाज्यातील लढाईत विजय मिळवून कधीही झालेलं नाही. वरच्याशिबंदीची सपशेल शरणागती किंवा तह यामुळेच हे सत्ताबदल झाले.

५) एवढं करूनही मुख्य दरवाजा पडलाच तरीही एका मागोमाग असणाऱ्या तटबंदीच्या जागा, मोर्चे, चौक्या आणि छातीवर येणारी पुढील वाट म्हणजे शत्रूचं मनोबल कमी करत जाणारी बिनतोड यंत्रणाच.

**६) कुलाबा – अलिबागचा पाणकोट (जि. रायगड)**

रायगड जिल्ह्याची राजधानी असणाऱ्या अलिबाग (श्रीबाग) शहराशेजारीच भरतीच्या वेळी जलदुर्ग बनणारा आणि ओहोटीच्या वेळी भुईकोटासारखा भासणारा वैशिष्ट्यपूर्ण किल्ला आहे. याच्या दोन्ही दरवाजावरील भरपूर व आगळी वेगळी शिल्पे आवर्जून पाहावीत अशी आहेत.

याचं मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कोणतेही सिमेटिंग मटेरियल न वापरता एकमेकावर नुसते ठेवलेले मोठमोठे चिरे. चिऱ्यांमधील दरजा न भरल्याने येणाऱ्या लाटांमधील पाणी आत शिरते व लाटांचा जोरच कमी होतो.

**७) खांदेरी – जि. रायगड**

जंजिरेकर सिद्दी अन् मुंबईकर इंग्रज हे सिंधुसागरी पाय रोवून बसलेले दोन वैरी. स्वराज्याच्या

स्वप्नाला त्यामुळे बाधा येत होती.

त्याची वारंवार होणारी हातमिळवणी ही तर फारच गैरसोयीची व गंभीर गोष्ट. त्याच्या सागरी संपर्कात थळ गावाजवळील खांदेरी बेटावर किल्ला उभारला तर अचूक उपयोग होईल हे शिवरायांनी ओळखलं होतं. इंग्रजांच्या वाढत्या विरोधाला तोंड देत त्यांनी खांदेरीचा जंजिरा उभारला, तटाबाहेर ओतलेल्या धोंड्याच्या राशींमुळे किल्ल्याशी गलबतच काय, पण होडीही लगट करु शकत नाही. हा दुर्गबांधणीचा प्रयोग आवर्जून पाहण्याजोगा आहे.

**८) कोथळीगड – पेठचा किल्ला – मिफतडुलफतह (जि. रायगड)**

कर्नाळ्याच्या सुळक्यासारखा सुळका असणारा हा किल्ला वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिथल्या खोदकामामुळे अखंड सुळक्यातून कोरून काढलेला दगडी जिना आहे. ह्या दुर्गवैशिष्ट्यासाठी तरी हा किल्ला आवर्जून पाहायलाच हवा. सुळक्याच्या माथ्यावर पाण्याची टाकी आहे. शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर हा किल्ला औरंगजेबाच्या सैन्याने मोठ्या कपटाने जिंकला.

**९) सिंधुदुर्ग – फोर्ट ऑगस्टस् (जि. सिंधुदुर्ग)**

शिवछत्रपतींची ही जणू सागरी राजधानीच. अठरा टोपीकरांचे उरावर अजिंक्य जागा शिवलंकाच निर्माण केली. या तत्कालीन उल्लेखावरून किल्ल्याचे महत्त्व कळून येते.

शिवाजी महाराजांच्या हातापायाचे ठसे चुन्यात उठवलेले आहेत. फांदी फुटलेले नारळाचे झाड. शिवाजी महाराजांचे त्यांच्याच मुलाने (राजारामाने) बांधलेले शिवराजेश्वराचे मंदिर व शिशाच्या रसात बसविलेले पायाचे दगड, किल्ल्याजवळ असणारे फेरुजिनस क्वार्टसाइट यापासून बनलेला जांभळट रंगाचा मोरयाचा धोंडा ही मुद्दाम नोंद घेऊन बघण्यासारखे आहे.

**१०) पद्‌मदुर्ग – कांसा किल्ला (जि. रायगड)**

सिद्दीच्या जंजिऱ्यापासून जवळच बांधून घेतलेला हा सागरातील बेटावरचा किल्ला लक्षात राहतो तो त्याच्या भक्कम बांधणीमुळे. कमळे–पद्मे कोरलेल्या या किल्ल्याच्या बांधणीत वापरलेला चुना एवढा भक्कम आहे की, गेल्या तीनशे वर्षात सतत लाटा आपटल्यामुळे तेथील दगड झिजले पण त्यातील चुना शाबूत आहे. ५

**११) राजमाची (जि. पुणे)**

सर्वसाधारणपणे डोंगरी किल्ल्याला एकच बालेकिल्ला असतो, पण उदेवाडी गाव कवेत घेणाऱ्या राजमाची किल्ल्याच्या तटबंदीत दोन शिखरांवर दोन बालेकिल्ले आहेत.

पश्चिमेकडील लहान मनरंजन तर पूर्वेकडचा अधिक उंच श्रीवर्धन. उदेवाडीजवळ असणारे प्राचीन शिवमंदिर, त्या शेजारचा शिलालेख असणारा मोठा तलाव आणि श्रीवर्धनवरील टाक्यात पडलेली भली थोरली लोखंडी लाट मुद्दाम पाहण्यासारखी आहे. राजमाचीच्या पोटात अतिप्राचीन अशी कोंडाणे लेणीही देखील पाहण्यासारखी आहेत.

**१३) नळदुर्ग (जि. धाराशीव / उस्मानाबाद)**

एक विस्तीर्ण भुईकोट. किल्ल्याशेजारून वाहणाऱ्या बोरी नदीच्या गडाच्या संरक्षणासाठी कल्पकतेने करून घेतलेला उपयोग आणि त्यासाठी उभारलेला जलमहाल खरोखर जाऊन पाहण्याजोगा आहे.

**१४) देवगिरी – दौलताबाद (जि. संभाजीनगर/औरंगाबाद)**

यादवांची राजधानी असणारा देवगिरी म्हणजे एक महाराष्ट्र वैभव. या बुलंद जागेचा मोह पडून दिल्लीच्या बादशहानं हिंदुस्थानची राजधानी दिल्लीहून येथे हलवली

भुईकोटाच्या एका बाजूला डोंगरी उंचवट्यावर उभारलेला डोंगरी किल्ला व तेथील भुयारी प्रवेश मार्ग,खंदक व  पाण्याची व्यवस्था आवर्जून बघण्यासारखी आहे.

**१५) शिवनेरी (जि. पुणे)**

१९ फेब्रुवारी १६३०, फाल्गुन वद्य ३, शके १५५१. शुक्रवार या दिवशीचा महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य इथे अवतरला. किल्ल्यावर असणारी सातवाहनांच्या कारकिर्दीत खांब सोडून कोरलेली टाकी, बहमनी काळातील  वास्तू, नाणे मावळातील डोंगर कोळ्यांच्या उठावाची कहाणी सांगणारा कोळी चौथरा एकामागोमाग असणाऱ्या सात दरवाज्यांची मालिका, उभ्या कड्यावरून खाली नेणारी चोरवाट , गडाच्या पोटात खोदलेली शे–दीडशे बौध्द लेणी असं सारं पाहण्यासारखं आहे.

**१६) हरिश्चंद्रगड (जि. नगर)**

ज्ञानेश्वरांचे समकालीन योगीराज चांगदेव यांच्या अस्तित्वाचे पुरावे देणारे येथील शिलालेख व त्यांच्या तत्त्वसार या ग्रंथात मिळणारे पुरावे, प्राचीन लेणी व गुहामंदिरे, नवव्या शतकातील झंझराजाने भीमा ते गोदावरी नद्यांच्या दरम्यान उगम पावणाऱ्या १० नद्यांच्या उगमस्थानी बांधलेल्या बारा शिवालयांच्या मालिकेतील श्री हरिश्चंद्रेश्वराचे शिल्प समृध्द मंदिर, आदिमानवाच्या पाऊलखुणा दाखवणारी येथील मायक्रोलियस हत्यारे, हे सारे पाहण्यासारखे आहे.

**१७) वनदुर्ग वासोटा उर्फ व्याघ्रगड (जि. सातारा)**

कोयना धरणामुळे निर्माण झालेल्या शिवसागराच्या पैलतीरी अफाट वनसागर पसरला आहे. तोच व्याघ्रगड उर्फ वासोटा. अस्वले, गवे, रानडुक्करं, अजगर, वानरं, हुप्पे असे प्राणी या ठिकाणी दिसतात.

२७ सप्टेंबर १६७९ रोजी ४ हंड्यांमध्ये भरलेलं २६,००० रुपयांचं भूमिगत धन शिवरायांना इथेच प्राप्त झाले.

■■■

# २.३ राज्याचे सार ते दुर्ग

संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग हे जाणणाऱ्या शिवाजी महाराजांनी मावळ प्रांतातील मावळ्यांच्या सहकार्याने सह्याद्रीचा आश्रय घेण्याचे ठरविले आणि तोही गिरिदुर्गाच्या रूपाने मुसलमानपूर्व काळातील काही राजसत्तांच्या राजधान्या म्हणजे गावं होती. त्यापैकी काही डोंगरावर, तर काही सपाट मैदानावर होती. उदाहरणार्थ, बदामीच्या चालुक्यांची राजधानी डोंगराजवळ असली तरी, ती डोंगरावर नव्हती, पण युद्धजन्य परिस्थिती किंवा एखाद्या नैसर्गिक आपत्तीत त्या डोंगराचा आश्रय घेता यावा म्हणून त्यांनी तेथे आश्रयस्थान मात्र बांधले होते. राष्ट्रकुटांची पहिली राजधानी 'मयूरखंडी' ही नाशिक जिल्ह्यातील मार्कंडा डोंगरावर होती असे म्हणतात. राष्ट्रकुटाची दुसरी राजधानी 'मालखंड' ही मात्र मैदानात होती. त्यानंतर चालुक्यानी आपली राजधानी कलपाणी (बिदरजवळची) येथे सपाट मैदानावर बसवलेली होती. चालुक्यानंतर आलेल्या कलचुरी सत्ताधीशांनी कल्याणी येथेच आपली राजधानी ठेवली होती. त्यांचा पराभव करणाऱ्या यादवांनी आपली राजधानी देवगिरी येथे उभारली होती. कोल्हापूरच्या शिलाहार राजानी आपली राजधानी प्रणालकदुर्ग म्हणजे पन्हाळगडावर बसविलेली होती. ६

मुसलमान काळात देखील बहमनी सुलतानांची राजधानी प्रथम कलबर्गे(गुलबर्गा) येथे होती आणि नंतर ती बिदर येथे नेण्यात आली. वरील दोन्ही शहरे सपाटीवर आहेत. बहमनीच्यानंतर महाराष्ट्र-कर्नाटक प्रांतात ज्या पाच शाह्या निर्माण झाल्या त्यात एक गोवळकोंड्याची कुतुबशाही जर सोडली, तर बहुतेक राजसत्तांच्या राजधान्या डोंगरावर स्थापन केल्या गेलेल्या दिसत नाहीत. उदाहरणार्थ विजापूरची आदिलशाही किंवा अचलापूरची इमादशाही. इतकंच नाही; तर खानदेशातील फरुखी सुलतानीच्या राजधान्या याळणेर व बुऱ्हाणपूर या सपाट मैदानावरच होत्या; परंतु शिवाजी महाराजांनी एकामागून एक स्थापन केलेल्या दोन्ही राजधान्या राजगड व रायगड या सह्याद्रीच्या गिरिशिखरावर होत्या हे विशेष होय.

शिवाजी महाराजांनी जेव्हा हिंदवी स्वराज्याची स्थापना केली तेव्हा राजधानी करावी असा एकही गड, कोट किंवा किल्ला म्हणावा इतका बळकट नव्हता. महाराजांनी मावळ्यांच्या मदतीने तोरणा किल्ला अचानक छापा टाकून ताब्यात घेतला. त्यावेळी तोरणा आदिलशाही किल्लेदाराच्या ताब्यात होता. निजामशाहीचा अस्त झाल्यावर शाहजी राजांनी विजापूरकर आदिलशहाची नोकरी स्वीकारली आणि आपल्या पुणे जहागिरीचा पोट मोकासा शिवाजी महाराजांना करून देऊन, त्यांना मातोश्री जिजाबाई यांच्याबरोबर पुण्याला रवाना केले होते. विजापूरकर आदिलशहानी शाहजी राजांना पुणे, इंदापूर, सुपे, बारामती वगैरे भागाची जहागीर जरी दिली असली तरी, त्या जहागिरीत येणारे किल्ले त्यांच्या ताब्यात दिलेले नव्हते. शाहजी राजांच्या जहागिरीतील किल्ले बादशहा या नात्याने मुहम्मद आदिलशहाच्या मनात आली असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मुख्य राज्य राज्यसत्तेचा प्रतिनिधी जो किल्लेदार व जहागिरदार यांचा एकमेकावर अंकुश ठेवण्यासाठी आदिलशहाने ही दक्षता घेतली असावी. त्याला छेद देत महाराजांनी तोरणागड काबीज करावा ही गोष्ट हिंदवी स्वराज्याच्या श्रीगणेशाचे द्योतक होते.

मरळ देशमुखांच्या कानद खोऱ्यातील उंच गिरिदुर्ग म्हणजे तोरणा. आदिलशहाचे या दुर्गाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात तो आला. महाराजांनी स्वत: किल्ला फिरून पाहिला आणि पडझड झालेल्या भागाची डागडुजी करण्याचे आदेश देऊन तोरण्याचा कायापालट करण्याचे योजिले. तटबंदीचे काम सुरू असताना त्यांना अपार धन मिळाले. महाराजांनी त्या धनाचा उपयोग स्वराज्यनिर्मितीसाठी, गड, कोट, दुर्गाच्या डागडुजीसाठी व दुर्ग उभारणीसाठी करण्याचे मनाशी पक्के केले.

हिंदवी स्वराज्याचा विचार मनाशी बाळगणाऱ्या शिवाजीमहाराजांची महत्त्वाकांक्षी नजर मग स्थिरावली ती तोरण्याच्या आग्नेयेला. तोरण्यापासून अवघ्या अडीच कोसावर (सुमारे ९.५ कि.मी. वर) 'शहामृग' नावाचा एक मोठा थोरला, डोंगर होता. त्याला 'मुरुंब देवाचा डोंगर' असेही म्हणत. खरंतर तोरण्यासारखाच तोही वेबसाऊ पडलेला गिरिदुर्ग होता. मुरुंबदेवाच्या डोंगरावर हिंदवी स्वराज्याची पहिली राजधानी स्थापन करण्याचा धाडसी निर्णय महाराजांनी घेतला. ७

शिवाजी महाराजांच्या आज्ञेने आबाजी सोनदेव व मोरोपंत पिंगळे यांच्या देखरेखेखाली नव्या गिरिदुर्गाचे बांधकाम सुरू झाले. एखाद्या आदर्श गिरिदुर्गाला आवश्यक असलेल्या बांधकामातील तरतुदी महाराजांनी त्यांना सांगितल्या. तीन दिशांना तीन भक्कम माच्या आणि त्याच्या मध्यभागी असणारा बेलाग बालेकिल्ला असे त्या नव्या गडाचे स्वरूप होते. शिवाजी महाराजांनी त्याचे नाव ठेवले 'राजगड' राजांचा गड अन् गडांचा राजा तो राजगड. वयाच्या सुमारे सतराव्या वर्षी हा धाडसी निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणला.

इ. स. १६५६च्या सुरुवातीला शिवाजी महाराजांनी जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्यावर स्वारी करून स्वराज्याची सरहद्द रुंदावली. त्यावेळी रायरी, सोनगड, चंद्रगड, मंगळगड उर्फ कांगोरीसारखे गिरिदुर्ग स्वराज्यात दाखल झाले. इतक्यावरच महाराज थांबले नाहीत तर त्यांनी नव्याने हाती आलेल्या जावळीच्या मुलखाच्या संरक्षणासाठी जावळीच्या अगदी जवळ पारघाटाच्या तोंडावर आणि रडतोंडी घाटाच्या नाकाडासमोर असलेल्या भोरण्याच्या डोंगराचे भौगोलिक महत्त्व जाणून तिथे नव्याने दुर्गबांधणी सुरू केली मोरोपंत पिंगळ्यांच्या देखरेखीत स्वराज्याचा आणखी एक गिरिदुर्ग आकार घेऊ लागला. तो बांधून झाल्यावर महाराजांनी त्याला नाव दिलं 'प्रतापगड'. शिवाजी महाराजांना उदयपूरच्या महाराणा प्रतापसिंह याच्याबद्दल नितांत आदर होता. असं म्हणतात की, 'जेव्हा शिवाजीमहाराज औरंगजेब बादशहाच्या भेटीला आग्रा येथे असता त्यांची भेट महाराणा प्रतापसिंहाचा नातू राजसिंह याच्याशी झाली होती. भेटीच्या प्रसंगी महाराजांनी राजसिंहाकडे राणा प्रतापचे चित्र मागितले होते आणि त्याप्रमाणे राजसिंहाने ते त्यांना दिले. शिवाजीमहाराजांपूर्वी अनेक वर्षेयाच राणा प्रतापने मुघल बादशहा अकबराविरुध्द बंड पुकारून गनिमी काव्याने प्रबळ मुघल सैन्याला हैराण केले होते. याशिवाय महाराजांनी कडतोजी गुजरला 'प्रतापराव' असा उमदा किताब दिला होता. नव्याने बांधलेल्या एका गडाला आणि आपल्या राज्याच्या सेनापतीला महाराणा प्रताप याचे नाव खुद्द शिवाजी महाराजांनी द्यावे, यातूनच त्यांना महाराणा प्रतापसिंहाबद्दल जो आदर वाटत होता, तो स्पष्ट होतो. याच प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवसैन्याने विजापुरी फौजेची कशी दाणादाण उडवून दिली होती, हे इतिहासात नमूद केले आहे. महाराजांवर आणि स्वराज्यावर बेतलेल्या पहिल्या मोठ्या संकटाचा मुकाबला प्रतापगडाच्या आश्रयाने केला गेला.

त्यानंतर महाराजांनी विजापूरच्या मुलखात मुसंडी मारून बराच मोठा मुलूख स्वराज्याला जोडला. सिद्दी जौहर उर्फ सलाबतखानाने पन्हाळगड जेव्हा वेढला तेव्हा महाराजांना विशाळगडाने आश्रय दिला. पन्हाळ्याच्या वेढ्यात महाराज अडकलेले असताना मुघल सरदार शायिस्तेखानाने स्वराज्यावर स्वतंत्र मोहीम उघडली. त्यात त्याने चाकणच्या संग्रामदुर्गाला वेढा घातला. तेव्हा फिरंगोनी नरसाळेने असलेल्या मोजक्या सैन्यानिशी गड तब्बल छपन्न दिवस झुंजवला. खरं तर मुघलांचा सेनासागर तो गड अवघ्या काही तासांमध्येच काबीज करू शकला असता, पण फिरंगोजीने त्यांना चिवट प्रतिकार करीत महिना दीड महिना रोखून धरले ही गोष्ट काही साधी नाही. चाकणचा संग्रामदुर्ग म्हणजे चौबुरुजी छोटेखानी गढीच, पण अवघ्या तीन-चारशे मावळ्यांनी संख्येने हजारो असलेल्या मुघल सैन्याला छपन्न दिवस झुंजवावे याचे आजही आश्चर्य वाटते.

पुढे शिवाजी महाराजांनी लाल महालात ठाण मांडून बसलेल्या शायिस्तेखानावर अचानक छापा टाकून त्याला मिर्जा राजा जयसिंग, दिलेरखान पठाणसारखा शूरवीर जेव्हा पुरंदरला भिडला तेव्हा मुरारबाजी देशपांडेसारख्या एकनिष्ठ सेवकाने प्राणपणाला लावून मुघलांशी झुंज मांडली आणि अखेरच्या श्वासापर्यंत पुरंदरचे रक्षण केले. मुरारबाजीची एकाकी लढत त्याची स्वामिनिष्ठा व स्वराज्यनिष्ठा स्पष्ट करते.

पुरंदरच्या लढाईनंतर महाराजांना मिर्झा राजा जयसिंहाशी तह करावा लागला आणि त्यानुसार स्वराज्यातले तेवीस किल्ले त्यांना मुघलांना द्यावे लागले. इतक्यावरच हे दुष्टचक्र संपले नाही, तर त्यानंतर महाराजांना युवराज संभाजी राजांसह आग्र्याला जावे लागले. तिथे महाराजांवर नजरकैदेचा प्रसंग ओढविला, पण त्यातूनही त्यांनी परिस्थितीवर मात करून स्वत:ची आणि आपल्या सहकाऱ्याची सुटका करून घेतली.

स्वराज्यात परत आल्यावर महाराजांनी पुरंदरच्या तहानुसार मुघलांना जे तेवीस किल्ले व मुलूख दिला होता, तो परत जिंकून घेण्यासाठी नवीन मोहीम आखली गेली. त्या मोहिमेचा श्रीगणेशा कोंढाणा उर्फ सिंहगड घेऊन झाला. हजारोंच्या सैन्याला हल्ला करूनही जे साध्य झाले नाही ते नरवीर तानाजी मालुसरेने अवघ्या पाचशे मावळ्यांसह करून दाखवले. शेवटच्या स्पंदापर्यंत स्वामिनिष्ठा मनात बाळगली.

सिंहगडानंतर कोंडाजी फर्जंदने अवघ्या साठ मावळ्यांच्या मदतीने पन्हाळगडासारखा आडवा पसरलेला महत्त्वाचा गड घ्यावा आणि तोही एका छाप्यात! ज्या सिद्दी जौहरला ५०,००० सैन्याचा वेढा घालूनही जे कार्य जमले नाही, ते कोंडाजीने अवघ्या ६० मावळ्यांच्या मदतीने केले.

उत्तर कोकणातील माहुलीचा किल्ला चिवटपणे झुंजवणारा मुघल किल्लेदार मनोहरदास गौड. त्याची तारांबळ उडवून देणारे शिवसैन्य आणि किल्लेदाराच्या बदलीमुळे उपलब्ध झालेल्या संधीचा अचूक फायदा उठवणारे शिवाजी महाराज व त्यांचे एकनिष्ठ मावळे या सर्वांच्या शौर्याची, गाथा एका गिरिदुर्गाशी निगडित आहे. कोकणातल्या धो धो कोसळणाऱ्या पावसात कर्नाळ्यासारख्या वनदुर्गाला वेढा घालून आणि प्रसंगी लाकडाच्या फळ्यांवर चिखल थापून संरक्षक भिंती पुढे करून शत्रूचा मारा अडवत तटाला बिलगणारा शिवाजी महाराजांचा अनामिक सेनानी तुलनेच्या पलीकडला म्हणावा लागेल. इतकंच नाही, तर खांदेरी बेटावर नव्या जलदुर्गाच्या बांधणीची जबाबदारी शिरावर घेऊन इंग्रजांना बाणेदार उत्तर देणारा मायनाक भंडारी काय किंवा दिलेरखानशी कणेरागडासाठी भांडणारा

दामाजी पांगारा ही सारी लोकं शिवाजी महाराजांशी एकनिष्ठ राहिली. स्वराज्य रक्षिण्यासाठी, वाढविण्यासाठी अविश्रांत झटणारी माणसं हीच खरी शिवाजी महाराजांची दौलत होती. सामान्यातल्या सामान्य माणसातला असामान्य गुण हेरून आणि त्याप्रमाणे त्याच्यावर कामगिरी सोपवून त्याच्याकडून असामान्य कामगिरी करून घेणारे शिवाजी महाराज फक्त थोर आणि महान इतपतच मर्यादित नाहीत, तर त्यांची महानता शब्दांच्या पलीकडची आहे आणि म्हणून हुकुमत पन्हा अमात्य रामचंद्र बावडेकर आपल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य- निर्मितीच्या कार्यातील गड, कोट व दुर्गाचे महत्त्व सांगताना नमूद करतात की, ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊन उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे ? याकरिता पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रची परिहार केले. हे राज्य तर तीर्थस्वरूप थोरले कैलासवासी स्वामी (शिवाजी महाराज) यांनी गडावरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासन न होय त्या त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेच जलदुर्ग बांधिले: त्यावरून आक्रमण करीत करीत झालेली अरिकंतापासून कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य संपविले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगर (गोवळकोंडा) सारखी महासंस्थाने आक्रमिली, संपूर्ण तीस बत्तीस वर्षेपर्यंत या राज्यांशी आणि (अतिशय) श्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होते ? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अविशिष्ट तरी राज्य राहिले. पुढे पूर्णवत करावयास आवकाश जाहला. ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणे आहे, त्यापेक्षा अधिकोत्तर साधनी स्वत: गड किल्ल्यांची उपेक्षा न करिता, परम सावधपणे असतील त्या गडकिल्ल्यांची यथायोग्य मजबुदी करावी. नूतन देश साधणे त्या देशात जी स्थळे असतील ती महतप्रयत्ने हस्तब (हस्तगत) करावी. ज्या देशात गडकोट नसतील त्या देशात आपले राज्याचे सरदे (सरहद्दी) पासून पुढे जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयी सेना ठेवून पुढील देश स्वशासन करावा. असे करीत करीत राज्य वाढवावे. गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी टिकात धरून राहवत नाही. फौजेविरहीत परमुलखी प्रवेश होणेच नाही. इतक्याचे कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे.

याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण असे पूर्ण चित्तात आणून कोणाचे भरवशावर न राहता आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा. कोणाचा विश्वास मानू नये.'' ८

■ ■ ■

# २.४ किल्ल्याची बांधणी

शिवकाळामध्ये संरक्षणाचा तसेच आक्रमणाचा विचार करता अशा दोन्ही बाबतीमध्ये यास विशेष महत्त्व होते. ज्या, ज्या वेळेस आक्रमण होत असत त्या, त्या वेळेस बरोबर असलेले सैन्य, साहित्य तसेच आक्रमणाचा मार्ग याचा विचार अगोदरच करीत असत. लढा जर दीर्घ काळ चालणार असेल तर वाटेवर असणारे आपल्या शत्रूचे किल्ले न घेता तसेच पुढे गेल्यास सैन्याचा पुरवठ्याचा मार्ग धोक्यात येण्याची दाट शक्यता असे. तेव्हा पुढे आक्रमण करण्याचे अगोदर सैन्याला ते किल्ले युद्ध शास्त्राचा विचार करुन वेढा घालून घ्यावे लागतील अथवा त्या किल्ल्यातील सैनिक पळू नयेत याकरता सैनिकांच्या तुकड्यांची व्यवस्था करावी लागेल.

प्रत्यक्ष आक्रमणाचेवेळी सैन्य, त्याची रचना, मार्ग, शिबंदी आदीचा विचार महत्त्वाचा ठरे. यामध्ये काही गफलत झाली तर सैन्याचे नुकसान होण्याचीच जास्त भिती असे. शत्रूचे आक्रमण रोखून धरणे अथवा त्याची गती मंद करणे हा खर तर संरक्षणाच्या बाबतीत किल्ल्यांचा मुख्य हेतू असतो. मोठ्या शहराभोवती तटबंदी तसेच किल्ला बांधण्याचा विचार प्रामुख्याने केला जात असे. खजिना तसेच रसद या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात येत असे. शत्रूची फौज अधिक जवळ आल्यास महत्त्वाच्या लोकांकरिता अशा प्रकारची जागा उपयोगी पडत असे. (किल्ले)

काही किल्ले जवळच्या दुसऱ्या किल्ल्यास शत्रूने वेढा घातला तर त्याच्यावर बाहेरुन हल्ला करणाऱ्या आपल्या तुकड्यांना तळ म्हणून उपयोगी पडावेत अशा हेतूने बांधले गेले असावेत. एखाद्या अति महत्त्वाच्या डोंगरी किल्ल्याजवळचे भागावर तोफा चढवता येण्यासारखी उपयुक्त जागा असली तर त्या ठिकाणी शत्रूस तोफा चढवून किल्ल्यावर मारा करता येऊ नये म्हणून त्या जागेवर तटबंदीची रचना करुन किल्ल्याची बांधणी करत असत. काही डोंगरी किल्ले अथवा गढी लहान आहेत अशा वेळेस त्या ठिकाणील शिबंदीचे प्रमाण अल्प असणार तरीपण शत्रूच्या पुरवठा मार्गाना धोका उत्पन्न करण्याकरता त्याचा उपयोग होत असेल, तर त्याचे प्रमाण कमीच असणार परंतु त्या ठिकाणच्या धान्य कोठारास अथवा खजिन्यास तसेच त्या ठिकाणी असलेल्या मातब्बराना स्थानिक बंडखोरांच्या अचानक घातलेल्या छाप्यातून संरक्षण मिळावे याकरता त्या ठिकाणी तटबंदी केली गेली असावी.

ज्यावेळेस परराज्यावर आक्रमण करायचे असेल त्यावेळेस सरहद्दीजवळील स्वत:चे किल्ले स्वत:च्या तुकडीकरता दारु गोळ्याची सुरक्षित कोठारे म्हणून माघार घेण्याचा प्रसंग उद्‌भवला तर आश्रयस्थान या करिता उपयोग होत असे. किल्ल्याची बांधणी मोठ्या किल्ल्यांचे (मैदानातील) तट साधारण १० ते २५ मीटर उंच व ५ ते १५ मीटर रुंद असत. अशा प्रकारे रुंद तटाची बांधणी करताना आतील बाहेरील बाजूस भिंती प्रथम बांधून घेत व मधील पोकळी डबराने दाबून भरुन मग त्यावर गिलावा करत. किल्ल्यामधील असलेल्या सैनिकांना तटावरुन गोळीबार करण्याकरता अडोसा मिळावा या हेतूने तटाच्या माथ्यावर बाहेरील बाजूला कठडा बांधीत असत तसेच गोळीबार करण्याकरता मधून फटी ठेवीत असत या फटीना जंग्या अथवा बाऱ्या म्हणत असत.

तटाच्या पायथ्यापासून काही अंतरावरची बाहेरील जागा तटाच्या कठड्यामधील जंग्यातून केलेल्या गोळीबाराच्या माऱ्यामध्ये येत नाहीत. ती जागाही माऱ्यामध्ये यावी म्हणून तटाच्या रेघेच्या बाहेर येतील अशा प्रकारे बुरुज बांधीत असत.

तटाच्या पायथ्याशी बाहेरील जागा बुरुजावरुन केलेल्या माऱ्यामध्ये येई. बुरुजावर जास्त जागा असल्याने मोठ्या तोफा बुरुजावर ठेवत. त्या तोफा सहजपणे फिरवता याव्या अशा प्रकारची व्यवस्था बुरुजावर केलेली असे. लहान तोफा व बंदुकही तटावर ठेवीत असत. काही किल्ल्यांना आतील तट व बाहेरील तट अशा प्रकारे रचना केलेली असे. त्यापैकी बाहेरील तट हा आतील तटापेक्षा उंचीने जरा कमी असे त्यामुळे बाहेरचा तट शत्रूचे ताब्यामध्ये गेला तर आतील तटावरुन बाहेरील तटावर मारा करणे सोप जात असे. बाहेरील तटाला शेरहाजी असे म्हणत. सामान्यत: किल्ल्याच्या प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूस लागुन बुरुज असत. किल्ल्यांमध्ये प्रवेश करण्याचा दरवाजा बाहेरुन तोफा, बंदुकींच्या माऱ्यामध्ये येऊ नये. याकरिता त्यास अडोसा देणारे बांधकाम केलेले असे. उदा. काही ठिकाणी प्रवेशमार्गास लागून असलेल्या एका बुरुजापासून तटाबाहेर तटास काटकोनात अशी दुहेरी एक भिंत बांधलेली असे या भिंतीच्या बाहेरील टोकाशी तिच्याशी काटकोन करुन म्हणजे तटास समांतर अशी दुसरी एक भिंत बांधलेली असे. दरवाज्यापर्यंत येण्यास ही भिंत व तट यांचे मधून येऊन काटकोनात वळावे लागे. काही ठिकाणी अशा दोन भिंती ऐवजी एकच वक्राकार भिंत बांधून दरवाजास अडोसा देत असत. काही ठिकाणी तटाच्या आतील अथवा बाहेरील बाजूस चौक तयार होत असे.

किल्ल्यामध्ये प्रवेश करण्यास एक दरवाजा तटामध्ये काढलेला असे किंवा तो तटाशी समांतर असलेल्या भिंतीत काढला तरी तटाचा दरवाजा समोर येणार नाही असा काढलेला असे.

**सारांश**

किल्ल्यामध्ये प्रवेश करण्याचा दरवाजा किल्ल्यास वेढा घालून बसलेल्या सैन्याच्या दृष्टिपथामध्ये येणार नाही व संपूर्ण प्रवेशमार्ग त्याच्या बाजूंना असलेल्या भिंतीवरून तसेच बुरुजावरुन केलेल्या माऱ्यामध्ये येईल अशा प्रकारे प्रवेशमार्गाची रचना केलेली असे. तटाच्या बाहेर किल्ल्याचे भोवती साधारण ५ ते ६ मीटर खोलीचा व साधारण १० ते ३० मीटर रुंदीचा खंदक केलेला असे. खंदकातील पाणी जिवंत झऱ्याचे असे अथवा जवळच्या एखाद्या नदीचे पात्रातून किंवा तळ्यातील घेऊन खंदकामध्ये सोडलेले असे. खंदकाचे बाहेरील काठावरील बाजू वर उचलून घेता येईल असा लाकडाचा तयार केलेला पूल खंदक ओलांडण्याकरता केलेला असे. अशा प्रकारच्या पूलाऐवजी काही ठिकाणी खंदकाचे काठापेक्षा खालचे पातळीवर पूल. बांधलेला असे व त्या पूलापर्यंत जाण्याकरता खंदकाच्या दोन्ही बाजूच्या काठावरून पायऱ्या केलेल्या असत.

अशा प्रकारच्या पूलापासून काही अंतरावर दोन्ही बाजूना खंदकामध्ये बांध घातलेले असत. या बांधाच्या मधील खंदकाचा भाग कोरडा असे.

जरुर पडेल तेव्हा या बांधामधील असलेल्या खिट्या काढून त्या भागातही पाणी सोडता येत असे व पूल पाण्याखाली बुडवून टाकीत असत.

काही किल्ल्यांच्या खंदकाच्या पलीकडे थोड्या अंतरावर भराव घालून किल्ल्याचे भोवती एक उंचवटा करत. या किल्ल्याच्या उंचवट्याच्या विरुद्ध बाजूकडील उतार हा त्या उताराची रेषा किल्ल्याचे दिशेने वाढवली तर ती तटावरील कठड्याचेही वरुन जाईल अशा प्रकारे केलेला असे त्यामुळे तोफा उंचवट्याचे पलीकडे असतील तर त्यांना किल्ल्यावर मारा करता येत नसे. खंदक व हा उंचवटा यामधील जमिनीच्या पट्याला मराठीमध्ये 'रेवणी' म्हणत असत.

किल्ल्यास वेढा पडल्यावर किल्ल्यामधील शिबंदीतील काही सैनिक रेवणीमध्ये बसून रेवणीच्या

भरावाच्या अडोशाने शत्रूवर गोळीबार करुन त्याना त्या ठिकाणाहून हुसकवून लावल्यानंतर शत्रूला आपल्या तोफा पुढे आणून किल्ल्यावर मारा करता येत असे.

जिथे शक्यता असेल त्या ठिकाणी डोंगरावर किल्ले बांधत असत. विशेषत: सह्याद्रीमध्ये (दक्षिण हिंदुस्थानात) असे अनेक डोंगरी किल्ले होते.

ज्याचे जवळपास अधिक उंच पठार नसेल व ज्याच्या सर्व बाजूनी उभा चढ असेल असे पठार डोंगरही किल्ला बांधण्याकरता निवडत असत. जरुर पडल्यास माथ्यापासून खाली काही अंतरापर्यंत त्याचा बाजू तासून कड्यासारख्या करत असत. अशा प्रकारच्या पठारावरील किल्ल्यास तटाची जरुरी नसे. वरुन गोळीबार करणाऱ्याना अडोसा मिळावा याकरता जरुर तिथे पठाराच्या कडेने एक कठडा बांधत असत. अधून मधून विशेषत: पठाराची जी टोके बाहेर आलेली वा आत आलेली असतील अशा टोकावर बुरुजही बांधीत असत. पायवाट ही किल्ल्यावरुन तसेच वाटेवरील दरवाजावरुन केलेल्या माऱ्यामध्ये येत असे.

किल्ल्यांचे मुख्य पठारावर एखादे टेकाड असेल तर त्या ठिकाणीही कठडा बांधत असत. ज्या ठिकाणाहून वर चढून येणे सोयीचे असेल तर त्या ठिकाणीही तटबंदी बांधत असत.

कोणत्याही किल्ल्यावर अशी दोन पातळीवर तटबंदी केलेली असेल तर त्यापैकी खालचे पातळीस माची असे म्हणत व वरच्या पातळीस बालेकिल्ला म्हणत असत.

खडकामध्ये खोदलेल्या भागामध्ये पावसाचे पाणी साठवले जात असे व त्याचा पाणीपुरवठा डोंगरी किल्ल्यांना करत असत.

डोंगरी किल्ला साधारण मोठ्या आकाराच्या पर्वताच्या माथ्यावर असल्याने तसेच त्याचा परिसर हा उंचसखल असल्याकारणाने त्याची सर्व बाजूने पक्की नाकेबंदी करणे हे वेढा घालणाऱ्या सैन्यास सहसा शक्य होत नसे. परंतु डोंगरी किल्ल्यांची एक अडचणही असे ती म्हणजे अशा प्रकारच्या किल्ल्याभोवती सहसा खंदक नसे. अचानक हल्ला होऊ नये याकरता त्याच्या भोवतालची जमीन उंच सखल असे. डोंगरी घळींनी व शिळांनी व्याप्त असे. रात्री लपत छपत किल्ल्याजवळ येऊन व कडा चढल्यावर तर असलेले काही सैनिक पाठवून त्यांनी सोडलेल्या दोरांच्या शिड्यावरुन अचानक वर चढून येणे शत्रूस शक्य होत नसे. अशा प्रकारचा अचानक हल्ला होऊ नये म्हणून किल्ल्याच्या परिसरामध्ये चौक्या बसवल्या जात असत त्यास मेटे असे म्हणत असत असे असले तरी चलाख शत्रू अशा मेटांच्या मधूनही रात्री किल्ल्याच्या रक्षणाकरता नेहमीच विशेषत: रात्री दक्ष राहणे जरुरीचे असे.


**तळ टीप**

१६७५ साली डॉ. फ्रायर जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्यावर गेला होता. त्याबाबत तो म्हणतो– नागमोडी मार्गावरील सात दरवाजांखेरीज या किल्ल्यास जाण्यास दुसरा मार्ग नाही. हे दरवाजे अतिशय मजबूत असून वर वर जाताना ते परस्परांच्या (म्हणजे खालचे दरवाजे वरच्या दरवाजांच्या) माऱ्यामध्ये येतात. १


बाहेरच्या बाजूने अतिशय मारक तोफा लावलेल्या असून दरवाजावरही चांगल्या तोफा आहेत.

(फ्रायर खंड १ पृष्ठ ३३३)

■ ■ ■




चित्ररेखाटन – श्रीकांत तापीकर




चित्ररेखाटन – श्रीकांत तापीकर

# २.५ आरमार आणि सागरी किल्ले

अ. शिवाजी महाराजांचे आरमार

ब. शिवाजी महाराजांचे जलदुर्ग

क. शिवाजी महाराजांचे नौसेनानी

ड. शिवकालीन युद्धनौका

## अ) शिवाजी महाराजांचे आरमार

### दौलत खान

शिवाजी महाराजांच्या १९ जानेवारी १६७५ या तारखेच्या पत्रात दौलतखानाचा उल्लेख आहे. अनेक इंग्रजी पत्रांमध्येही त्याचा उल्लेख आला आहे. त्यापैकी जुन्यातला जुना उल्लेख राजापूरहून मुंबईला पाठविण्यात आलेल्या ६ फेब्रुवारी १६७५ या तारखेच्या इंग्रजी पत्रात आहे. तिथे त्याला ""The General of Sevajee's sea forces Dolatt Cann" असे म्हटले आहे. इ. स. १६७७ मधील एका पोर्तुगीज पत्रात ''दुरतखानाचे आरमार घेऊन पेशवा दंडाच्या जवळपास आहे.'' अशा अर्थाचा उल्लेख आहे. त्यातील दुरतखान (Durat cany) म्हणजे दौलतखान. सभासद बखरीत दौलतखानाचा उल्लेख नाही, पण एक्याण्णव कलमी बखरीत आहे. १०

खांदेशीच्या मोहिमेतील त्याच्या कामगिरीचे उल्लेख आहेत. पुढे मुंबईहून सुरतेला पाठविण्यात आलेल्या ४ नोव्हेंबर १६८० या तारखेच्या इंग्रजी पत्रात, म्हणजे संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत, त्याचा उल्लेख आहे.

### मायनाक भंडारी

चार इंग्रजी पत्रांमधे त्याचा उल्लेख आहे. त्यापैकी सर्वात जुने पत्र ६ सप्टेंबर १६७९ या तारखेचे असून ते मुंबईहून सुरतला पाठविण्यात आलेले पत्र आहे. शिवाजी राजाचे १५० लोक ४ छोट्या तोफा मायनायक भंडारी याच्या हाताखाली खांदेरी बेटावर उतरल्याचे त्या पत्रात सांगितले आहे.

तिथे मायनाकाचा उल्लेख "mianayique, a Bandaareen of (the) Rajah's" असा आला आहे. इतर तीन इंग्रजी पत्रांमधील मायनाकाचे उल्लेख हेही खांदेरीच्या संदर्भातले आहेत. खांदेरीची नाकेबंदी करणाऱ्या इंग्रजी नाविक पथकाचा प्रमुख कॅप्टन रिचर्ड केंग्विन याने मुंबई कौन्सिलला पाठविलेल्या २६ नोव्हेंबर १६७९ या तारखेच्या पत्रात खांदेरीवर मायनाकाबरोबर त्याचा मुलगाही असल्याचा उल्लेख आहे. ही माहिती दौलतखानाच्या आरमारातून पळून जाऊन सिद्दीकडे गेलेल्या एका मनुष्याने दिली होती आणि सिद्दीकडून केंग्विनला कळली होती.

मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर लॉन चाइल्ड हा पूर्वी राजापूरला असताना त्याची मायनाकाशी ओळख झालेली होती आणि त्याने मायनाकाला देण्याकरता खांदेरीजवळील नाविक पथकाकडे एक पत्र दिले होते असा उल्लेख मुंबईहून सुरतेला पाठविण्यात आलेल्या २९ नोव्हेंबर १६७९ या तारखेच्या पत्रात आला आहे. तिथे मायनाकाचा उल्लेख "the soobedarr, one mynaque caperson" असा आला आहे. आधीच्या उल्लेखावरून तो उल्लेख मायनाक भंडारी याचाच आहे यात संशय नाही. जॉन चाइल्ड

जानेवारी १६७५ पासून डिसेंबर १६७६ पर्यंत राजापूर येथील इंग्रजी वखारीचा प्रमुख होता.

एकावन्न कलमी बखरीत शिवाजीचे आरमारी सरदार म्हणून ''दर्यासारंग व दौलतखान व मायाजी भाटकर'' यांचा उल्लेख आला आहे. ११

**ब) शिवाजी महाराजांचे जलदुर्ग– सिंधुदुर्ग**

सिंधुदुर्ग हा किल्ला मालवणच्या समोर, मुख्य भूमीपासून सुमारे १.५ कि.मी. अंतरावरील एका बेटावर बांधला आहे. तटाच्या कडेने त्याचा परिघ सुमारे तीन कि.मी. असून किल्ल्याचे क्षेत्रफळ सुमारे १९ हेक्टर्स (४८ एकर) आहे. सरासरी मानाने तटाची उंची सुमारे ९ मीटर्स आणि रुंदी सुमारे ३.५ मीटर्स आहे. तटाला ५२ बुरुज आहेत. बेटाचा आकार अनियमित आहे. किल्ल्याचा दरवाजा ईशान्य कोपऱ्यात असून तटाच्या वळणाने दरवाजा कुठे आहे ते बाहेरून चटकन लक्षात येत नाही. किल्ल्याच्या आत चार विहिरी आणि दोन टाकी आहेत.१२

सिंधुदुर्गाच्या दरवाजातून आत शिरल्यावर लगेच उजव्या बाजूस दोन छोट्या घुमट्या आहेत. त्यापैकी एका घुमटीत माणसाच्या उजव्या हाताच्या पंजाचा आणि दुसऱ्या घुमटीत माणसाच्या डाव्या तळपायाचा असे दोन ठसे चुन्यात उमटविले आहेत. ठसे आधी उमटविले आहेत आणि घुमट्या नंतर बांधल्या आहेत. हे उघडच आहे. हे ठसे शिवाजी महाराजांचे आहेत अशी दंतकथा आहे.

किल्ल्यात शिवाजी महाराजांचे म्हणून एक देऊळही आहे. तिच्यातील मूर्तीचे प्रा. ग. ह. खरे यांनी केलेले वर्णन असे आहे. ''यातील व्यक्ती डाव्या पायाची मांडी घालून व उजवी मांडी वर उचलून सन्मुख बसली आहे. हिच्या डोक्यावर साधारणत: कोळ्यासारखी टोपी घातली आहे. याला मिशा आहेत, पण दाढी व झुलपे नाहीत. गळ्यात मोत्याचा कंठा व दुपदरी मोतीमाला असून शिवाय जानवेही आहे. खांद्यावर केयूर, डाव्या दंडावर अंगद व मनगटात पिळाची कडी आहेत. कमरेस धोतर, पायात पिळाच्या साखळ्या आहेत.''

सारांश, शिवाजी महाराजांची जी विश्वसनीय चित्रे उपलब्ध आहेत असे मानण्याची दोन कारणे आहेत. एकतर हा किल्ला कोल्हापूरकरांकडे असता देवाच्या पूजेअर्चेसाठी सालोसाल काही द्रव्य खर्च पडल्याचे हिशोब आहेत. दुसरे असे की ग्रँड डफने त्याच्या मराठ्यांच्या इतिहासात यासंबंधी दिलेली माहिती अशी आहे: त्याच्या (म्हणजे शिवाजीच्या) शवास रायगड येथे अग्नी देण्यात आला. तिथे त्याच्या रक्षेवर उभारलेली एक समाधी होती. मालवणच्या किल्ल्यातील (म्हणजेच सिंधुदुर्गातील) एक इमारत त्याचे स्मृतिमंदिर (cenotaph) मानले जाते. ही इमारत शिवाजीने किल्ला बांधला तेव्हापासूनची आहे. रायगड पडल्यावर राजारामाने तिचे शिवाजीच्या स्मृतिमंदिरात रूपांतर केले. डफने लिहिलेला मराठ्यांचा इतिहास १८२६ मध्ये प्रथम प्रकाशित झाला. ते शिवाजी महाराजांचे मंदिर आहे अशी समजूत तत्पूर्वीपासून रूढ आहे.

शिवाजी महाराजांना त्यांच्या हयातीतच हिंदू लोक परमेश्वराचा अवतार मानू लागले होते. मराठ्यांच्या राज्यात शिवकालानंतरही राज्यकर्त्यांना शिवाजी महाराजांविषयी अत्यंत पूज्यबुद्धी असे. तेव्हा त्यांच्या मूर्तीला देवाचे रूप दिले गेले यात काही आश्चर्य नाही.

सिंधुदुर्ग किल्ल्याचा उपाध्याय दादंभट बिन पिलंभट याला सिंधुदुर्गाच्या किल्लेदाराने दिलेल्या १६ रजला शहूर सन इहिदेरे अशरीन मया अलफ (म्हणजे २ मे १७२१) या तारखेच्या एका पत्राची नक्कल उपलब्ध आहे. तिच्यात दादंभटाने जी हकीकत उद्धृत केली आहे तिचा गोषवारा असा आहे.

शिवाजी महाराज बसरुरच्या स्वारीकरता आरमारासह मालवण येथे आले तेव्हा त्यांना तिथूनच जवळ असलेले एक बेट दिसले. बरोबर आलेले कृष्ण सावंत देसाई व मानजी प्रभू देसाई यांनी त्या बेटाचे नाव कुरटे असे असल्याचे सांगितले. तेव्हा महाराजांनी स्वत: बेटावर येऊन पाहणी केली. तिथे किल्ला बांधण्याचा हुकूम दिला आणि मग ते आरमारासह बसरुरच्या स्वारीवर गेले. कुरटे बेटावर किल्ला बांधावयाचा मुहूर्त करताना महाराजांच्या आज्ञेवरून दादंभट आणि त्याचा मामा जानभट अभ्यंकर या मालवणच्या उपध्यायांना धरून आणून त्यांच्याकरवी १४ जमादिलावल, शुहूर सन खमस सितैन (अलफ), मार्गशीर्ष वद्य २ या दिवशी किल्ला बांधण्याचा मुहूर्त केला आणि त्याला सिंधुदुर्ग असे नाव ठेवले. तेव्हापासून दादंभट त्या किल्ल्याचे व किल्ल्यातील शिबंदीचे उपाध्यायपण करीत आला.

दादंभटाच्या या निवेदनाला किल्ल्याचे तट सरनौबत, नाईकवाडी इत्यादीनीही दुजोरा दिला असेही उपर्युक्त पत्रात म्हटले आहे.

**चित्रगुप्त बखरीत दिलेली हकिकत थोडक्यात अशी आहे :**

जंजिऱ्याकरता बेट पाहिल्यावर शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून तानाजी, मानाजी, गंगाजी व सावजी कोळी बेटावर जाऊन बेट पाहून आले. त्यानंतर शिवाजी महाराजांनी त्यावर किल्ला बांधला. पाच खंडी शिसे आणून किल्ल्याचा पाया घातला. गोवेकर फिरंग्यांना हुकूम करून शंभर फिरंगी कारागीर किल्ल्याच्या कामाकरिता आणविले. किल्ला बांधावयाच्या खर्चाकरता ''कोटी होनांचे उदक महाराजांनी सोडले.'' तिसऱ्या वर्षी किल्ला तयार झाला तेव्हा महाराज स्वत: तिथे आले आणि त्यांनी किल्ल्याचे नाव सिंधुदुर्ग ठेवले.

**विजयदुर्ग**

विजयदुर्ग किल्ला सिंधुदुर्ग जिल्ह्यात नागोठण नदीच्या मुखाशी दक्षिण काठावर आहे. तिथे डोंगराची एक सोंड समुद्रात शिरली असून तिच्यावर हा किल्ला बांधला असल्यामुळे त्याच्या फक्त एका बाजूस जमीन आहे आणि तीन बाजूंना पाणी आहे. किल्ल्याचे आतील क्षेत्रफळ सुमारे ८ हेक्टर (२० कि.मी.) आहे. तटाला २७ बुरूज आहेत. हा किल्ला गिर्ये या गावाजवळ असल्याने त्याला घेरिया असेही नाव पडले होते.

विजयदुर्गाच्या पूर्वेस ३० कि.मी. वर खारेपाटण नावाचे गाव आहे. रत्नागिरी गॅझेटिअरमध्ये खारेपाटणची जी माहिती दिली आहे, तिचा गोषवारा असा आहे. नागोठण्याची नदी सह्याद्रीत उगम पावते आणि आग्नेयेकडे सुमारे २५ कि.मी. वर खारेपाटणपर्यंत येते. इथे तिचे खाडीत रूपांतर होते. या खाडीत गोठण्यापर्यंत मध्यम आकाराच्या नौका येऊ शकतात आणि खारेपाटणपर्यंत लहान नौका येऊ शकतात. नदीला तिच्या मुखापाशी विजयदुर्गाची खाडी म्हणतात आणि वरच्या बाजूस वागोळजाची नदी म्हणतात. खाडीच्या मुखाजवळ तिच्या दक्षिण बाजूस आत घुसलेल्या डोंगरामुळे जहाजांना नैऋत्य मान्सूनपासून संरक्षण मिळते. हा डोंगर खाडीपासून सुमारे तीस मीटर उंच आहे. त्याच्या माथ्यावर विजयदुर्ग किल्ला आहे. खारेपाटणपाशीही एका टेकडीवर सुमारे एक एकर क्षेत्रफळाचा किल्ला होता. तो १८५० मध्ये पाडून टाकण्यात आला. खारेपाटण जरी समुद्रकिनाऱ्यापासून आत असले तरी विजयदुर्गच्या खाडीच्या मुखाशी असलेल्या बंदरालाही शिवकाळात खारेपाटण असेच म्हणत असत.

तावेर्निए हा फ्रेंच जवाहिऱ्या दोनदा गोव्याला गेला, एकदा इ.स. १६४१ मध्ये आणि एकदा इ.स. १६४८ मध्ये. या प्रवासाच्या त्याच्या हकिकतीत खारेपाटणचा उल्लेख येतो तो असा : ''विजापूरच्या

बादशहाच्या राज्यात राजापूर, दाभोळ आणि खारेपाटण ही तीन चांगली बंदरे आहेत. त्यापैकी खारेपाटण हे सर्वात उत्कृष्ठ आहे. तिथे समुद्र डोंगराच्या पायथ्याशी आहे आणि तिथे, किनाऱ्यापासून जवळच, पाण्याची खोली १४ ते १५ फॅदम आहे. डोंगराच्या माथ्यावर किल्ला असून त्याला पाण्याचा नैसर्गिक पुरवठा आहे. या किल्ल्यावर जिथून मारा करता येईल असे त्याच्यापेक्षा उंच ठिकाण जवळ नाही आणि तो निसर्गत:च अभेद्य आहे तरीदेखील बादशहाचे पोर्तुगीजांशी शांततेचे संबंध असल्याने, त्याने तो मोकळा टाकला आहे.''

**तावेर्निएच्या वृत्तान्तात**

खारेपाटण बंदराजवळच्या ज्या किल्ल्याचा उल्लेख आहे तो किल्ला म्हणजे विजयदुर्ग असे तावेर्निएने केलेल्या वर्णनावरून दिसते. हा दुर्लक्षित व वेवासाऊ किल्ला ताब्यात आल्यावर शिवाजी महाराजांनी त्याची दुरुस्ती केली असावी आणि कदाचित त्यात वाढही केली असावी. शिवाजी महाराजांच्या एका जाबित्यात शुहूर सन इसने (सबैन अलफ) या वर्षाकरता इ.स. (१६७१-७२) निरनिराळ्या किल्ल्यांवर बांधकाम करण्यासाठी करावयाच्या खर्चाचा अर्थसंकल्प दिला आहे. त्यात सिंधुदुर्ग, विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग या किल्ल्यांवरील बांधकामाकरता प्रत्येकी १०,००० होनांची तरतूद केली आहे.

विजयदुर्ग किल्ल्याची इ. स. १८३६ मध्ये लिहिलेली एक हकिकत उपलब्ध आहे. तो किल्ला केव्हा बांधला, बांधण्यास खर्च किती आला इत्यादी माहिती डिसेंबर १८३५ मध्ये इंग्रज सरकारने मागितल्या वरून आनंदराव रामाजी आनालेकर शिरस्तेदार याने तेथे जाऊन रामभट बिन संभूभट लळीत ज्योतिषी व उपाध्ये, मौजे गिरे इत्यादी पाचजणांकडून ही हकिकत लिहून घेतली आहे. हा किल्ला शके १५७५, विजय संवत्सर या वर्षी (२० मार्च १६५३ ते ८ मार्च १६५४) शिवाजी महाराजांनी बांधला आणि संवत्सराच्या नावावरून त्याला विजयदुर्ग नाव ठेवले असे त्या हकिकतीत म्हटले आहे, पण तिच्यातील वर्ष नक्कीच चुकले आहे. इ. स. १६५३-५४ मध्ये शिवाजी महाराजांचा अंमल कोकणात नव्हता. तो किल्ला विजय संवत्सरात बांधला अशी समजूत किल्ल्याच्या नावावरून प्रचलित झाली असावी.

**सुवर्णदुर्ग**

हा किल्ला हर्णेच्या किंचित उत्तरेस भूमीपासून सुमारे अर्ध्या किलोमीटरवर असलेल्या एका बेटावर बांधलेला आहे. सभोवती उंच व मजबूत भिंती असून आतील क्षेत्रफळ सुमारे तीन हेक्टर्स (आठ एकर) आहे. किल्ल्याला अनेक बुरूज. आणि भरतीच्या पाण्याच्या किंचित वरच्या पातळीवर एक दिंडा आहे. किल्ल्यात पाण्याची अनेक टाकी आहेत.

**पद्मदुर्ग**

हा किल्ला राजपुरीच्या खाडीच्या तोंडात मुख्य भूमीपासून १.५ कि.मी. वर आणि जंजिऱ्याच्या वायव्येस सुमारे ३ कि.मी. वर असलेल्या, कांसा नावाच्या छोट्या बेटावर बांधला आहे. सभोवताली पाण्याची खोली सुमारे ३.५ फॅदम आहे. तटाला सहा बुरूज असून दर दोन बुरुजांमध्ये सुमारे १८ मीटर अंतर आहे. बेटात पाण्याची टाकी आहेत. ती पावसाळ्यात भरतात. पद्मदुर्ग शिवाजी महाराजांनी बांधल्याचा उल्लेख त्यांच्या स्वत:च्याच पत्रात आहे.

**कुलाबा**

कुलाबा किल्ला रायगड जिल्ह्यात अलीबागजवळ मुख्य भूमीपासून समुद्रात सुमारे पाच कि.मी. अंतरावर असलेल्या खडकावर बांधला आहे. खडकाची उत्तर-दक्षिण कमाल लांबी सुमारे २७५ मीटर्स आणि पूर्व-पश्चिम कमाल रुंदी सुमारे १०५ मीटर्स आहे.

तटाची उंची बाहेरून सुमारे ९ मीटर आहे. तटात १७ बुरूज आहेत. मुख्य दरवाजा ईशान्येला आहे आणि एक लहान दरवाजा दक्षिणेला आहे. किल्ल्याची तटाच्या आतील लांबी सुमारे २४३ मीटर्र व रुंदी सुमारे ९१ मीटर आहे. किल्ल्यात ३५ x ३२ मीटर्सचे पाण्याचे मोठे टाके आहे. या किल्ल्याचे एक वैशिष्ट्य असे आहे की त्याचा तट मोठे मोठे शिलाखंड चुन्याशिवाय नुसते एकमेकावर रचून तयार केला आहे.

विजयदुर्ग आणि सर्जाकोट यांना जोडणारा एक सेतू मोठ्या शिलाखंडांनी तयार केला आहे.

कुलाबा किल्ला शिवाजीने बांधल्याचा उल्लेख खाफीखानाने त्याच्या मुन्तखबुल्लबाब या ग्रंथात केला आहे. शुहूर सनसित समानीन अलफ (म्हणजे इ.स. १६८५-८६) मधील एका मराठी पत्रात कुलाबा किल्ल्याचा उल्लेख आहे. हा आता माझ्या हाताशी असलेला त्या किल्ल्याचा जुन्यातला जुना उल्लेख आहे.

**क) शिवाजी महाराजांचे नौसेनानी**

शिवाजी महाराजांचे दर्यासारंग, दौलतखान आणि मायनाक भंडारी हे तीन नौसेनानी ज्ञात आहेत. सभासद बखरीत शिवाजी महाराजांचे 'आरमारी सरदार' म्हणून 'इब्राहम खान', दर्यासारंग व मायनाईक अशी तीन नावे दिली आहेत. दौलतखानाचे नाव मात्र दिलेले नाही. इब्राहमखान या नावाचा कोणी अधिकारी शिवाजी महाराजांच्या आरमारात होता असे इतर कोणत्याच शिवकालीन साधनात म्हटलेले नाही. बहुधा सभासदाने दौलतखानाऐवजी चुकून 'इब्राइमखान' म्हटले असावे. दर्यासारंग, दौलतखान व मायनाक भंडारी यांच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. समकालीन साधनात त्यांचे जे उल्लेख येतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

**दर्यासारंग**

दर्यासारंगाचा जुन्यातला जुना उल्लेख वेंगुर्ला येथील डच वखारीचा प्रमुख लेनाटर्स याने पौर्वात्य देशांमधील डच वसाहतींच्या गव्हर्नर जनरलला पाठविलेल्या २२ जानेवारी १६६५ (नवी पद्धत) या तारखेच्या पत्रात आला आहे आणि तो ऑक्टोबर १६६४ मधील व त्यानंतरच्या प्रसंगाविषयी आहे.

दर्यासारंगाचा उल्लेख निदान पाच इंग्रजी पत्रांमध्ये आला आहे. त्यापैकी जुन्यातला जुना उल्लेख स्वालीहून पाठविण्यात आलेल्या १ नोव्हेंबर १६६७ या तारखेच्या पत्रात आहे.

मुंबईहून सुरतेस पाठविण्यात आलेल्या २१ नाव्हेंबर १६७० या तारखेच्या पत्रात शिवाजीच्या ''या आरमाराचा नौसेनानी वेंटाजी सारंगी (ventagee sarungee) असून त्याला सामान्यत: दर्यासारंग (durrea sarungee) म्हणतात.'' आणि ''त्याच्याशी गेली ७-८ वर्षे पत्रव्यवहार आहे.'' असे म्हटले आहे.

यावरून दर्यासारंग निदान १६६३ पासून शिवाजी महाराजांच्या नोकरीत असला पाहिजे. त्याच्या नावाविषयीची त्या पत्रातील माहिती बरोबर असेल तर त्याचे मूळचे नाव वेंटाजी दर्यासारंग असे असून दर्यासारंग हा त्याचा किताब होता किंवा ते त्याचे टोपणनाव होते असे म्हणता येईल. दर्यासारंग हे पद

असण्याची शक्यता नाही.

शिवाजी महाराजांनी प्रभावळी सुभ्याचा सुभेदार शिवाजी विनायक याला पाठविलेल्या १९ जानेवारी १६७५ या तारखेच्या पत्रात ‘दौलतखान व दर्यासारंग’ या त्यांच्या आरमारी अधिकाऱ्यांचा उल्लेख आहे. त्यातील दौलतखान हे नक्कीच पद नाही; ते नाव आहे किंवा कदाचित तो किताब असेल. तेव्हा दुसऱ्या अधिकाऱ्याचा उल्लेखही त्याच्या नावाने किंवा फार तर किताबाने आला असला पाहिजे असे मानणे वाजवी आहे. शिवाजी महाराजांच्या पत्राच्या पोटात जेव्हा एखाद्याचा उल्लेख येतो तेव्हा तो त्याच्या केवळ पदाने येत नाही; केवळ नावाने येतो किंवा नावाने आणि पदाने येतो. उदाहरणार्थ वर नमूद केलेल्या पत्रात ‘मोरोपंत पेशवे’ असा उल्लेख आहे. नुसता पेशवे असा नाही. मराठ्यांच्या आरमारात शिवकाळात किंवा त्यानंतर – दर्यासारंग असे पद असल्याचा उल्लेख कधीच आलेला नाही.

शिवाजी महाराजांनी आरमार तयार केले आणि त्यावर ‘‘दर्यासारंग म्हणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणोन भंडारी सुभेदार’’ यांची नेमणूक केली असे सभासद बखरीत म्हटले आहे. दर्यासारंग मुसलमान होता ही सभासदाने दिलेली माहिती विश्वसनीय समजण्यास हरकत नाही. वर नमूद केलेल्या इंग्रजी पत्रात त्याचे नाव वेंटाजी असे दिले आहे. ते नाव मुसलमानी वाटत नाही; पण शिवकाळात काही मुसलमानांची अशी नावे असल्याची उदाहरणे आहेत.

सारंग हे आडनावही त्या काळात तरी मुसलमानांमध्ये होते. अर्थात, अशी नावे एतद्देशीय मुसलमानांमध्ये असतील; अरब, तुर्क, अफगाण यासारख्या परदेशी मुसलमानांमध्ये अशी नावे असण्याची शक्यता नाही.

‘‘दर्यासारंग आणि त्याचा मुलगा यांना (शिवाजी) राजाच्या हुकमावरून कैद करण्यात आले आहे आणि त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.’’ असा उल्लेख राजापूरहून सुरतला पाठविण्यात आलेल्या ६ नोव्हेंबर १६७८ या तारखेच्या इंग्रजी पत्रात आला आहे. त्यांना का कैद केले आणि त्यांचे पुढे काय झाले याविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही. दर्यासारंगाचा उल्लेख पुन्हा कधीही येत नाही एवढे मात्र सांगता येते.

### ड) शिवकालीन युध्दनौका

शिवकालीन युद्धनौका या संज्ञेने शिवकालात भारताच्या किनाऱ्याजवळच्या समुद्रात वापरल्या जाणाऱ्या युद्धनौका अभिप्रेत आहेत. युरोपात प्रत्येकी १०० तोफा असलेल्या युद्धनौकाही वापरल्या जात. तेवढ्या मोठ्या युद्धनौका भारताच्या किनाऱ्याजवळीच्या समुद्रात वापरल्या जात नव्हत्या.

शिवाजी महाराज आणि सिद्दी या दोघांच्याही आरमारांमध्ये गलबत आणि गुराब या दोन प्रकारच्या युध्दनौका प्रामुख्याने वापरल्या जात.

गलबत

गलबताविषयीची माहिती : शुहूर सन ११९५ (२४ मे १७९४ ते १७ मे १७९५) मधील एका मराठी कागदात एक गलबत बांधण्याच्या खर्चाचा अंदाज ७.८५२ रुपये व चार आणे एवढा दिला आहे. शिवकालातही हा खर्च निदान पाच ते सहा हजार रुपये तरी असेल.

**गुराब**

गुराब हा मुळातला अरबी शब्द आहे. एक प्रकारच्या जहाजाला गुराब म्हणतात.

गुराब गलबतापेक्षा मोठी, साधारण १५० ते ३०० टनी असे. ती वल्ह्यानी चालविली जात नसे;

केवळ शिडांनी चालविली जाई. गुराबेवर सामान्यत: दोन आणि क्वचित तीन डोल काठ्या असत आणि प्रत्येक डोलकाठीवर एकावर एक अशी दोन चौरस शिडे असत. त्याशिवाय एक लहान त्रिकोणी शीडही असे.

गुराबेवर प्रत्येक बाजूस, जहाजाच्या लांबीशी काटकोनात, सामान्यत: पाच ते सात व दुसऱ्या बाजूला तेवढ्याच आणि नाळेवर व पिछाडीस एक-दोन, अशा एकंदर सुमारे १२ ते १८ तोफा असत.

बाजूच्या तोफा सामन्यत: सहा ते नऊ पाउंडर, म्हणजे सहा ते नऊ पौंड वजनाचा गोळा फेकणाऱ्या असत. गुराबेवर सुमारे ५० दर्यावर्दी आणि ६० सैनिक असत.

शुहूर सन ११९५ (२४ मे १७९४ ते २३ मे १७९५) मधील एका मराठी कागदात एक गुराब बांधण्याच्या खर्चाचा अंदाज ३३१५७ रुपये दिला आहे. शिवकालातही हा खर्च निदान २५ ते ३० हजार रुपये तरी असेल.

■ ■ ■

२.६

दुर्ग संपदेचा सगळ्यात मोठा उपयोग शिवाजी महाराजांनी केला. सह्याद्रीच्या आधारे आपली स्वराज्याची संकल्पना त्यांनी अस्तित्वात आणली. साल्हेरपासून जिंजीपर्यंत २६० किल्ले ताब्यात आणून स्वराज्य शाश्वत केले.

आजच्या तरुण पिढीला महाराष्ट्रातील किल्ल्यांची कल्पना यावी व किल्ल्याविषयी अभ्यासक वृत्ती वाढावी याकरता किल्ल्यांची यादी किल्ल्यांचे वर्गीकरणासह देणे संशोधकास योग्य वाटते.

आज्ञापत्राचे कर्तेअमात्य म्हणतात. ज्यास राज्य पाहिजे गडकोट हेच राज्य. गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण.

महाराष्ट्रातील किल्ल्यांचे वर्गीकरण

| | जलदुर्ग | किनारी | गिरीदुर्ग | वनदुर्ग | स्थलदुर्ग | गढी | सराई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) कोकण | १० | ३९ | ६७ | १८ | - | ०१ | - | १३७ |
| २) प. महाराष्ट्र | - | - | १२७ | २० | २६ | ११ | ०१ | १८७ |
| ३) विदर्भ | - | - | ०३ | ११ | २४ | ०९ | ०१ | ४८ |
| ४) मराठवाडा | - | - | १० | २ | ०९ | - | ०२ | २३ |
| एकुण | १० | ३९ | २०७ | ५१ | ५९ | २१ | ०४ | ३९१ |

किल्ल्यांची जिल्हावार यादी पुढील पानावर दिलेली आहे.

■ ■ ■

किल्ल्यांची यादी याबाबत मागील पानावर संशोधकाने आपला हेतू स्पष्ट केला आहे व किल्ल्याचे वर्गीकरणही केले आहे

## २.६ महाराष्ट्रातील किल्ल्यांची यादी

## कोकण विभाग

### ०१. ठाणे जिल्हा

| किल्ला क्र | किल्ल्याचे नाव | तालुक्याचे नाव. |
|---|---|---|
| १-१ | बल्लाळगड | ता. तलासरी |
| १-२ | डहाणू | ता. डहाणू |
| १-३ | गंभीरगड | ता. डहाण |
| १-४ | सेगवा | ता. डहाण |
| १-५ | तारापूर | ता. पालघर |
| १-६ | आसावा | ता. पालघर |
| १-७ | अशेरी | ता. पालघर |
| १-८ | भूपतगड | ता. जव्हार |
| १-९ | काळदुर्ग | ता. पालघर |
| १-१० | तांदुळवाडी | ता. पालघर |
| १-११ | शिरगाव | ता. पालघर |
| १-१२ | माहीम | ता. पालघर |
| १-१३ | केळवे | ता. पालघर |
| १-१४ | पाणकोट | ता. पालघर |
| १-१५ | भवानगड | ता. पालघर |
| १-१६ | टकमक | ता. पालघर |
| १-१७ | कोहोज | ता. वाडा |
| १-१८ | बळवंतगड | ता. शहापूर |
| १-१९ | अर्नाळा | ता. वसई |
| १-२० | वज्रगड | ता. वसइ |
| १-२१ | जीवदानी | ता. वसइ |
| १-२२ | कामनदुर्ग | ता. वसइ |
| १-२३ | गुमतारा | ता. भिवंडी |
| १-२४ | पळसदुर्ग | ता. शहापूर |
| १-२५ | माहुली | ता. शहापूर |
| १-२६ | भंडारदुर्ग | ता. शहापूर |

| | | |
|---|---|---|
| १-२७ | वसई | ता. वसई |
| १-२८ | धारावी | ता. ठाणे |
| १-२९ | घोडबंदर | ता. ठाणे |
| १-३० | बेलापूर | ता. ठाणे |
| १-३१ | दुर्गाडी | ता. कल्याण |
| १-३२ | मलंगगड | ता. कल्याण |
| १-३३ | चंदेरी | ता. उल्हासनगर |
| १-३४ | सिद्धगड | ता. मुरबाड |
| १-३५ | गोरखगड | ता. मुरबाड |
| १-३६ | भैरवगड (मोरोशी) | ता. मुरबाड |
| **०२.** | **मुंबई जिल्हा** | |
| २-१ | काळा किल्ला | धारावी |
| २-२ | शीव | सायन |
| २-३ | माहीम | माहीम |
| २-४ | वरळी | वरळी |
| २-५ | शिवडी | शिवडी |
| २-६ | मुंबई किल्ला (फोर्ट) | फोर्ट |
| **०३.** | **रायगड जिल्हा** | |
| ३-१ | पांडवगड | ता. पनवेल |
| ३-२ | प्रबळगड | ता. पनवेल |
| ३-३ | इरसालगड | ता. पनवेल |
| ३-४ | कर्नाळा | ता. पनवेल |
| ३-५ | माणिकगड | ता. पनवेल |
| ३-६ | पेब | ता. कर्जत |
| ३-७ | पदरगड | ता. कर्जत |
| ३-८ | कोथळीगड | ता. कर्जत |
| ३-९ | भिवगड | ता. कर्जत |
| ३-१० | ढाक | ता. कर्जत |
| ३-११ | सोनगिरी | ता. कर्जत |
| ३-१२ | घारापुरी | ता. उरण |
| ३-१३ | द्रोणागिरी | ता. उरण |
| ३-१४ | सांकशी | ता. पेण |
| ३-१५ | रतनगड | ता. पेण |

| | | |
|---|---|---|
| ३-१६ | मिरगड | ता. पेण |
| ३-१७ | खांदेरी | ता. अलिबाग |
| ३-१८ | उंदेरी | ता. अलिबाग |
| ३-१९ | थळ | ता. अलिबाग |
| ३-२० | कुलाबा | ता. अलिबाग |
| ३-२१ | सर्जेकोट | ता. अलिबाग |
| ३-२२ | रामदरणे | ता. अलिबाग |
| ३-२३ | सागरगड | ता. अलिबाग |
| ३-२४ | रेवदांडा | ता. अलिबाग |
| ३-२५ | कोरलाई | ता. मुरुड |
| ३-२६ | सामराजगड | ता. मुरुड |
| ३-२७ | कासा | ता. मुरुड |
| ३-२८ | जंजिरा | ता. मुरुड |
| ३-२९ | मृगगड | ता. सुधागड |
| ३-३० | सरसगड | ता. सुधागड |
| ३-३१ | सुधागड | ता. सुधागड |
| ३-३२ | अवचितगड | ता. रोहे |
| ३-३३ | सूरगड | ता. रोह |
| ३-३४ | बिरवाडी | ता. रोह |
| ३-३५ | घोसाळगड | ता. रोह |
| ३-३६ | तळागड | ता. तळ |
| ३-३७ | कुर्डुगड | ता. माणगाव |
| ३-३८ | मानगड | ता. माणगाव |
| ३-३९ | पन्हाळे दुर्ग | ता. माणगाव |
| ३-४० | रायगड | ता. महाड |
| ३-४१ | लिंगाणा | ता. महाड |
| ३-४२ | सोनगड | ता. महाड |
| ३-४३ | चांभारगड | ता. महाड |
| ३-४४ | मंगळगड | ता. महाड |
| ३-४५ | चंद्रगड | ता. महाड |
| ३-४६ | मदगड | ता. श्रीवर्धन |
| ३-४७ | कोंढवी | ता. पोलादपूर |
| **०४.** | **रत्नागिरी जिल्हा** | |
| ४-१ | हिम्मतगड | ता. मंडणगड |

| | | |
|---|---|---|
| ४-२ | मंडणगड | ता. मंडणगड |
| ४-३ | गोवागड | ता. दापोली |
| ४-४ | फत्तेदुर्ग | ता. दापोली |
| ४-५ | कनकदुर्ग | ता. दापोली |
| ४-६ | सुवर्णदुर्ग | ता. दापोली |
| ४-७ | पालगड | ता. दापोली |
| ४-८ | पद्मनाभदुर्ग | ता. दापोली |
| ४-९ | महीपतगड | ता. खेड |
| ४-१० | सुमारगड | ता. खेड |
| ४-११ | रसाळगड | ता. खेड |
| ४-१२ | गोवळकोट | ता. चिपळूण |
| ४-१३ | बारवाई | ता. चिपळूण |
| ४-१४ | कोळकेवाडी | ता. चिपळूण |
| ४-१५ | अंजनवेल | ता. चिपळूण |
| ४-१६ | विजयगड | ता. गुहागर |
| ४-१७ | जयगड | ता. रत्नागिरी |
| ४-१८ | रत्नागिरी | ता. रत्नागिरी |
| ४-१९ | पूर्णगड | ता. रत्नागिरी |
| ४-२० | साठवली | ता. लांजा |
| ४-२१ | भवानीगड | ता. संगमेश्वर |
| ४-२२ | महीमतगड | ता. संगमेश्वर |
| ४-२३ | आंबोळगड | ता. राजापूर |
| ४-२४ | यशवंतगड (नाटे) | ता. राजापूर |
| **०५.** | **सिंधुदुर्ग जिल्हा** | |
| ५-१ | विजयदुर्ग | ता. देवगड |
| ५-२ | देवगड | ता. देवगड |
| ५-३ | सदानंदगड | ता. देवगड |
| ५-४ | रामगड | ता. मालवण |
| ५-५ | भगवंतगड | ता. मालवण |
| ५-६ | भरतगड | ता. मालवण |
| ५-७ | सिद्धगड | ता. मालवण |
| ५-८ | वेताळगड | ता. मालवण |

| | | |
|---|---|---|
| ५-९ | सर्जेकोट | ता. मालवण |
| ५-१० | राजकोट | ता. मालवण |
| ५-११ | पद्मगड | ता. मालवण |
| ५-१२ | सिंधुदुर्ग | ता. मालवण |
| ५-१३ | निवती | ता. वेंगुर्ले |
| ५-१४ | यशवंतगड | ता. वेंगुल |
| ५-१५ | खारेपाटण | ता. कणकवली |
| ५-१६ | भैरवगड (नरडवे) | ता. कणकवली |
| ५-१७ | सोनगड (घोटगे) | ता. कणकवली |
| ५-१८ | मनोहरगड | ता. कुडाळ |
| ५-१९ | मनसंतोषगड | ता. कुडाळ |
| ५-२० | नारायणगड | ता. कुडाळ |
| ५-२१ | महादेवगड | ता. सावंतवाडी |
| ५-२२ | हनुमंतगड | ता. दोडामार्ग |

**(०२) पश्चिम महाराष्ट्र विभाग**

| | | |
|---|---|---|
| ०६. | नंदूरबार जिल्हा | |
| ६-१ | धडगाव | ता. धडगाव |
| ६-२ | फत्तेपूर | ता. नंदूरबार |
| ६-३ | सुलतानपूर | ता. शहादा |
| ६-४ | मंदाने | ता. शहादा |
| ६-५ | जयनगर | ता. शहादा |
| ६-६ | कोंढवळ | ता. शहादा |
| ६-७ | नंदूरबार | ता. नंदूरबार |
| ६-८ | नारायणपूर | ता. नंदूरबार |
| ०७. | धुळे जिल्हा | |
| ७-१ | रायकोट | ता. साक्री |
| ७-२ | भामेर | ता. साक्री |
| ७-३ | थाळनेर | ता. शिरपूर |
| ७-४ | सोनगीर | ता. धुळे |
| ७-५ | लळींग | ता. धुळ |
| **०८.** | **जळगाव जिल्हा** | |
| ८-१ | लासूर | ता. चोपडा |

| | | |
|---|---|---|
| ८–२ | चौगाव | ता. चोपडा |
| ८–३ | पाल | ता. रावेर |
| ८–४ | रसलपूर | ता. रावेर |
| ८–५ | अमळनेर | ता. अमळनेर |
| ८–६ | पारोळा | ता. पारोळा |
| ८–७ | नशिराबाद | ता. जळगाव |
| ८–८ | वरखेडा | ता. भुसावळ |
| ८–९ | तोंडापूर | ता. जामनेर |
| ८–१० | कन्हेरगड | ता. चाळीसगाव |
| **०९.** | **नाशिक जिल्हा** | |
| ९–१ | रतनगड | ता. सटाणे |
| ९–२ | पिसोळगड | ता. सटाण |
| ९–३ | देरमाळ | ता. सटाण |
| ९–४ | साल्हेर | ता. सटाण |
| ९–५ | सालोटा | ता. सटाण |
| ९–६ | हारगड | ता. सटाण |
| ९–७ | मुल्हेर | ता. सटाण |
| ९–८ | मोरागड | ता. सटाण |
| ९–९ | भिलाई | ता. सटाणे |
| ९–१० | चौल्हेर | ता. सटाण |
| ९–११ | बिष्टा | ता. सटाण |
| ९–१२ | कऱ्हेगड | ता. सटाण |
| ९–१३ | दुंधागड | ता. सटाण |
| ९–१४ | अजमेर | ता. सटाण |
| ९–१५ | हातगड | ता. सुरगणा |
| ९–१६ | कंडाणा | ता. कळवण |
| ९–१७ | प्रेमगिरी | ता. कळवण |
| ९–१८ | अचला | ता. कळवण |
| ९–१९ | अहिवंत | ता. कळवण |
| ९–२० | मार्कंड्या | ता. कळवण |
| ९–२१ | रवळा | ता. कळवण |

| | | |
|---|---|---|
| ९-२२ | जवळा | ता. कळवण |
| ९-२३ | कन्हेरगड | ता. कळवण |
| ९-२४ | धोडप | ता. कळवण |
| ९-२५ | कांचन | ता. कळवण |
| ९-२६ | गाळणा | ता. मालेगाव |
| ९-२७ | कंक्राळा | ता. मालेगाव |
| ९-२८ | मालेगाव | ता. मालेगाव |
| **०९.** | **नाशिक जिल्हा (ब)** | |
| ९-२९ | सोनगिरी | ता. पेठ |
| ९-३० | खैराई | ता. पेठ |
| ९-३१ | देहेर | ता. दिंडोरी |
| ९-३२ | रामसेज | ता. दिंडोरी |
| ९-३३ | कोळदेहेर | ता. चांदवड |
| ९-३४ | राजदेहेर | ता. चांदवड |
| ९-३५ | इंद्राई | ता. चांदवड |
| ९-३६ | चांदवड | ता. चांदवड |
| ९-३७ | मेसणा | ता. चांदवड |
| ९-३८ | कात्रा | ता. येवला |
| ९-३९ | अणकाई | ता. येवला |
| ९-४० | टणकाई | ता. येवला |
| ९-४१ | माणिकपुंज | ता. नांदगाव |
| ९-४२ | ढेरी | ता. नांदगाव |
| ९-४३ | वाघेरा | ता. त्र्यंबकेश्वर |
| ९-४४ | भास्करगड | ता. त्र्यंबकेश्वर |
| ९-४५ | हर्षगड | ता. त्र्यंबकेश्वर |
| ९-४६ | श्रीगड | ता. त्र्यंबकेश्वर |
| ९-४७ | अंजनेरी | ता. नाशिक |
| ९-४८ | रांजणगिरी | ता. नाशिक |
| ९-४९ | गडगडा | ता. नाशिक |
| ९-५० | कावजई | ता. इगतपुरी |
| ९-५१ | त्रिंगलवाडी | ता. इगतपुरी |

| | | |
|---|---|---|
| ९-५२ | मोरधन | ता. इगतपुरी |
| ९-५३ | औंढा | ता. सिन्नर |
| ९-५४ | आड | ता. सिन्नर |
| ९-५५ | डुबेरा | ता. सिन्नर |
| ९-५६ | पर्वतगड | ता. सिन्नर |
| ९-५७ | सोनगड | ता. सिन्नर |
| **१०.** | **अहमदनगर जिल्हा** | |
| १०-१ | पट्टा | ता. अकोले |
| १०-२ | बितल | ता. अकोले |
| १०-३ | कुलंगगड | ता. अकोल |
| १०-४ | मदनगड | ता. अकोल |
| १०-५ | अलंगगड | ता. अकोल |
| १०-६ | रतनगड | ता. अकोल |
| १०-७ | कलाडगड | ता. अकोल |
| १०-८ | भैरवगड (शिरपुंजे) | ता. अकोल |
| १०-९ | पाबरगड | ता. अकोल |
| १०-१० | हरिश्चंद्रगड | ता. अकोल |
| १०-११ | भैरवगड (कोथळे) | ता. अकोल |
| १०-१२ | कुंजरगड | ता. अकोल |
| १०-१३ | पेमगिरी | ता. संगमनेर |
| १०-१४ | पळशी | ता. पारनेर |
| १०-१५ | जामगाव | ता. पारनेर |
| १०-१६ | बहादूरगड | ता. श्रीगोंद |
| १०-१७ | खर्डा | ता. जामखेड |
| **११.** | **पुणे जिल्हा** | |
| ११-१ | सिंदोळा | ता. जुन्नर |
| ११-२ | जुन्नर | ता. जुन्नर |
| ११-३ | हडसर | ता. जुन्नर |
| ११-४ | निमगिरी | ता. जुन्नर |
| ११-५ | जीवधन | ता. जुन्नर |
| ११-६ | चावंड | ता. जुन्नर |

| | | |
|---|---|---|
| ११-७ | शिवनेरी | ता. जुन्नर |
| ११-८ | नारायणगड | ता. जुन्नर |
| ११-९ | भोरगिरी | ता. खेड |
| ११-१० | चाकण | ता. खेड |
| ११-११ | राजमाची | ता. मावळ |
| ११-१२ | इंदूरी | ता. मावळ |
| ११-१३ | विसापूर | ता. मावळ |
| ११-१४ | लोहगड | ता. मावळ |
| ११-१५ | अणघाई | ता. मावळ |
| ११-१६ | मोरगिरी | ता. मावळ |
| ११-१७ | तुंग | ता. मावळ |
| ११-१८ | तिकोणा | ता. मावळ |
| ११-१९ | कोरीगड | ता. मुळशी |
| ११-२० | घनगड | ता. मुळशी |
| ११-२१ | कैलासगड | ता. मुळशी |
| ११-२२ | सिंहगड | ता. हवेली |
| ११-२३ | सोनोरी | ता. पुरंदर |
| ११-२४ | दौलतमंगळ | ता. पुरंदर |
| ११-२५ | पुरंदर | ता. पुरंदर |
| ११-२६ | वज्रगड | ता. पुरंदर |
| ११-२७ | तोरणा | ता. वेल्हे |
| ११-२८ | राजगड | ता. वेल्ह |
| ११-२९ | कावळा | ता. भोर |
| ११-३० | रोहिडा | ता. भोर |
| **१२.** | **सातारा जिल्हा** | |
| १२-१ | पांडवगड | ता. वाई |
| १२-२ | केंजळगड | ता. वाइ |
| १२-३ | कमळगड | ता. वाई |
| १२-४ | वैराटगड | ता. वाइ |
| १२-५ | चंदनगड | ता. वाई |
| १२-६ | वंदनगड | ता. वाइ |

| | | |
|---|---|---|
| १२-७ | नांदगिरी | ता. कोरेगाव |
| १२-८ | वर्धनगड | ता. खटाव |
| १२-९ | भूषणगड | ता. खटाव |
| १२-१० | महीमानगड | ता. माण |
| १२-११ | ताथवडा | ता. फलटण |
| १२-१२ | वारूगड | ता. फलटण |
| १२-१३ | प्रतापगड | ता. महाबळेश्वर |
| १२-१४ | मकरंदगड | ता. जावळी |
| १२-१५ | महीमंडणगड | ता. जावळी |
| १२-१६ | वासोटा | ता. जावळी |
| १२-१७ | सज्जनगड | ता. सातारा |
| १२-१८ | अजिंक्यतारा | ता. सातारा |
| १२-१९ | जंगली जयगड | ता. पाटण |
| १२-२० | दातेगड | ता. पाटण |
| १२-२१ | बहिरवगड | ता. पाटण |
| १२-२२ | गुणवंतगड | ता. पाटण |
| १२-२३ | वसंतगड | ता. कऱ्हाड |
| १२-२४ | सदाशिवगड | ता. कऱ्हाड |
| **१३.** | **सांगली जिल्हा** | |
| १३-१ | प्रचीतगड | ता. शिराळा |
| १३-२ | शिराळा | ता. शिराळा |
| १३-३ | मच्छिंद्रगड | ता. वाळवा |
| १३-४ | विलासगड | ता. वाळवा |
| १३-५ | बहादूरवाडी | ता. वाळवा |
| १३-६ | बागणी | ता. वाळवा |
| १३-७ | गणेशदुर्ग | ता. सांगली |
| १३-८ | मिरज | ता. मिरज |
| १३-९ | कोळदुर्ग | ता. खानापूर |
| १३-१० | भूपालगड | ता. खानापूर |
| १३-११ | जुना पन्हाळा | ता. मिरज |
| १३-१२ | रामदुर्ग | ता. जत |

## १४. कोल्हापूर जिल्हा

| | | |
|---|---|---|
| १४-१ | विशाळगड | ता. शाहूवाडी |
| १४-२ | पावनगड | ता. पन्हाळा |
| १४-३ | पन्हाळा | ता. पन्हाळा |
| १४-४ | मुडागड | ता. पन्हाळा |
| १४-५ | गगनगड | ता. बावडा |
| १४-६ | शिवगड | ता. राधानगरी |
| १४-७ | रांगणा | ता. भूदरगड |
| १४-८ | भूदरगड | ता. भूदरगड |
| १४-९ | सामानगड | ता. गडहिंग्लज |
| १४-१० | गंधर्वगड | ता. चंदगड |
| १४-११ | महीपालगड | ता. चंदगड |
| १४-१२ | कालानंदीगड | ता. चंदगड |
| १४-१३ | पारगड | ता. चंदगड |

## १५. सोलापूर जिल्हा – नकाशा

| | | |
|---|---|---|
| १५-१ | करमाळा | ता. करमाळा |
| १५-२ | माढा | ता. माढा |
| १५-३ | मोहोळ | ता. मोहोळ |
| १५-४ | अकलूज | ता. माळशिरस |
| १५-५ | पिलीव | ता. माळशिरस |
| १५-६ | सांगोला | ता. सांगोला |
| १५-७ | मंगळवेढे | ता. मंगळवेढ |
| १५-८ | माचणूर | ता. मंगळवेढ |
| १५-९ | सोलापूर | ता. सोलापूर |

## (३) विदर्भ विभाग

## १६. बुलढाणा जिल्हा

| | | |
|---|---|---|
| १६-१ | मैलगड | जळगाव (जामोद) |
| १६-२ | मलकापूर | ता. मलकापूर |
| १६-३ | खामगाव | ता. खामगाव |
| १६-४ | गोंधनपूर | ता. खामगाव |
| १६-५ | रोहिणखेड | ता. मोताळा |

| | | |
|---|---|---|
| १६–६ | सिंदखेड राजा | ता. सिंदखेड राजा |
| १६–७ | देऊळगाव राजा | ता. देऊळगाव राजा |
| १७. | अकोला जिल्हा | |
| १७–१ | भैरवगड (वारी) | ता. तेल्हास |
| १७–२ | नरनाळा | ता. अकोट |
| १७–३ | बाळापूर | ता. बाळापूर |
| १७–४ | अकोला | ता. अकोला |
| १८. | अमरावती जिल्हा | |
| १८–१ | आमनेर | ता. धारणी |
| १८–२ | गाविलगड | ता. मेळघाट |
| १८–३ | अचलपूर | ता. अचलपूर |

**१९. यवतमाळ जिल्हा**

| | | |
|---|---|---|
| १९–१ | कळंब | ता. कळंब |
| १९–२ | दुर्ग | ता. कळंब |
| १९–३ | रावेरी | ता. राळेगाव |
| १९–४ | कायर | ता. वणी |
| **२०.** | **वर्धा जिल्हा** | |
| २०–१ | अंजी (मोठी) | ता. वर्धा |
| २०–२ | पवनार | ता. पवनार |
| २०–३ | हिंगणी | ता. सेलू |
| २०–४ | केळझर | ता. सेल |
| २०–५ | नाचणगाव | ता. देवळी |
| २०–६ | सोनेगाव (आबाजी) | ता. देवळी |
| २०–७ | अल्लीपूर | ता. हिंगणघाट |
| **२१.** | **नागपूर जिल्हा** | |
| २१–१ | भिवगड (कुँआरा) | ता. पारशिवणी |
| २१–२ | रामटेक | ता. रामटेक |
| २१–३ | नगरधन | ता. रामटेक |

| | | |
|---|---|---|
| २१–४ | जलालखेडा | ता. काटोळ |
| २१–५ | आडम | ता. उमरेड |
| २१–६ | उमरेड | ता. उमरेड |
| २१–७ | भिवापूर | ता. भिवापूर |

**२२. चंद्रपूर जिल्हा**

| | | |
|---|---|---|
| २२–१ | चिमूर | ता. चिमूर |
| २२–२ | शेगाव | ता. वरोड |
| २२–३ | भांदक | ता. भद्रावती |
| २२–४ | चंद्रपूर | ता. चंद्रपूर |
| २२–५ | बल्लारपूर | ता. चंद्रपूर |
| २२–६ | माणिकगड | ता. गडचांदूर |
| **२३.** | **भंडारा जिल्हा** | |
| २३–१ | चांदपूर | ता. तुमसर |
| २३–२ | अंबागड | ता. तुमसर |
| २३–३ | सानगडी | ता. साकोली |
| २३–४ | पवनी | ता. पवनी |
| २४. | गोंदिया जिल्हा | |
| २४–१ | कामठा | ता. गोंदिया |
| २४–२ | कचारगड | ता. सालेकसा |
| २४–३ | प्रतापगड | ता. अर्जुनी मोरगाव |
| **२५.** | **गडचिरोली जिल्हा** | |
| २५–१ | वैरागड | ता. आरमोरी |
| २५–२ | टिपागड | ता. मुरुमगड |
| २५–३ | सूरजागड | ता. एटापल्ली |

## (४) मराठवाडा विभाग

| | | |
|---|---|---|
| **२६.** | **औरंगाबाद जिल्हा** | |
| २६–१ | फर्दापूर सराई | ता. सोयगाव |
| २६–२ | वेताळवाडी | ता. सोयगाव |
| २६–३ | वैशागड | ता. सोयगाव |

| | | |
|---|---|---|
| २६-४ | सुतोंडा | ता. सोयगाव |
| २६-५ | अजिंठा सराई | ता. सिल्लोड |
| २६-६ | अजिंठा | ता. सिल्लोड |
| २६-७ | अंतूर | ता. कन्नड |
| २६-८ | पेडका | ता. कन्नड |
| २६-९ | लहुगड | ता. फुलंद्री |
| २६-१० | देवगिरी | ता. औरंगाबाद |
| २६-११ | भांगशी | ता. औरंगाबाद |
| **२७.** | **जालना जिल्हा** | |
| २७-१ | रोहिलगड | ता. अंबड |
| **२८.** | **परभणी जिल्हा** | |
| २८-१ | जिंतूर | ता. जिंतूर |
| २८-२ | पाथरी | ता. पाथरी |
| **२९.** | **नांदेड जिल्हा** | |
| २९-१ | माहूर | ता. किनवट |
| २९-२ | नांदेड | ता. नांदेड |
| २९-३ | कंधार | ता. कंधार |
| **३०.** | **बीड जिल्हा** | |
| ३०-१ | धारुर | ता. धारुर |
| ३०-२ | धर्मापुरी | ता. आंबेजोगाई |
| **३१.** | **उस्मानाबाद जिल्हा** | |
| ३१-१ | परांडा | ता. परांडा |
| ३१-२ | नळदुर्ग | ता. तुळजापूर |
| **३२.** | **लातूर जिल्हा** | |
| ३२-१ | औसा | ता. औसा |
| ३२-२ | उदगीर | ता. उदगीर |

■■■

## टीपा स्पष्टीकरण (प्रकरण –२ )


१) War in ancinent India V.R. Ramchandra Dikshitor maelars 1948 Page 250

२) कौटिलीय अर्थशास्त्र संपादक ज.स.करंदीकर व बा.रा.हिवरगावकर प्रकाशक ग.द.मुळे कर्जत भाग १ व २ – १९२७

३) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन १९९१ पृष्ठ क्र. ७५

४) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन १९९१ पृष्ठ क्र.७९

५) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन १९९१ पृष्ठ क्र. १४५

६) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.११

७) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.१३

८) आज्ञापत्र

९) श्री राजा शिवछत्रपती गं.भा. मेहेंदळे भाग१ डायमंड प्रकाशन पृष्ठ क्र.४२४

१०) श्री राजा शिवछत्रपती गं.भा. मेहेंदळे भाग १ डायमंड प्रकाशन पृष्ठ क्र. ४२७

११) शिवाजी महाराजांचे आरमार गं.भा. मेहेंदळे/संतोष शिंत्रे परममित्र पब्लिकेशन २०१० पृष्ठ क्र.१६६

१२) गड किल्ले महाराष्ट्राचे प्रमोद मा. मांडे प्रफुल्लता प्रकाशन २००८ पृष्ठ क्र. ४२७.

# प्रकरण ३

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्रातील गड किल्ल्यांचे वास्तुशास्त्र संदर्भ व महत्व** | **६७–१०९** |
| ३.१ | किल्ल्यांची परिभाषा (मराठी) | ६७–७२ |
| ३.२ | किल्ल्यांची परिभाषा (इंग्रजी) | ७३–७५ |
| ३.३ | महत्त्वाच्या दुर्गसंज्ञा | ७६–७९ |
| ३.४ | दुर्ग वर्ग : | ८०–८६ |
| ३.५ | शिवकालीन गड दुर्गांचे वास्तुशास्त्र | ८७–९४ |
| ३.६ | किल्ल्यांच्या बांधणीचे प्राचीन संदर्भ | ९५–१०१ |
| ३.७ | शिवशाहीतील किल्ल्यांचे महत्त्व | १०२–१०९ |

# ३.१ किल्ल्यांची परिभाषा (मराठी)

किल्ल्यांची एक विशिष्ट परिभाषा आहे. किल्ल्यांसंबंधी आपण काही लिहू, लागलो की हे शब्द सर्वसामान्य व्यवहारामध्ये येत नसल्याने त्या शब्दांचे नेमके अर्थ कोणते ? असा प्रश्न पडतो. तट, बुरूज, माची, महादरवाजा अशा प्रकारचे काही शब्द आहेत, पण ते अपवादात्मक. आपण बारकाईने अशा गोष्टींचा विचार करत असताना किल्ल्यांच्या या मराठी परिभाषेचा उपयोग आपल्याला निश्चितपणे होतो.१

**अर्क: अरक किल्ला –** सर्वसाधारणपणे भुईकोट किल्ल्यातील बालेकिल्ला. औरंगाबाद (संभाजीनगर) (खडकी) शहरामध्ये असा अर्क किल्ला आहे.

**अर्गळा/अडसर –** दार बंद केल्यावर आतील बाजूने एक आडवे लाकूड लावून तो दरवाजा बाहेरून उघडता येणार नाही याची केलेली व्यवस्था. हा अडसर दरवाज्याच्या एका बाजूला पूर्णपणे आत सरकवून ठेवता येतो. पुण्यातील शनिवारवाड्यामध्ये हा अडसर किंवा अर्गळा अजूनही उत्तम अवस्थेत पाहावयास मिळतो.

**अधित्यका/बालेकिल्ला –** सर्वसामान्यपणे एखाद्या डोंगराला तटबंदीचे वेष्टण चढवले की तो होतो डोंगरी किल्ला. त्या तटबंदीच्या आतमध्ये एखादा उंचवटा अथवा टेकडीचा समावेश असेल व त्याला आणखी वेगळी तटबंदी बांधून, हा किल्ल्यातील किल्ला अधिक भक्कम केलेला आढळतो.

राजगडचा बालेकिल्ला निश्चित पहाण्यासारखा आहे. प्रतापगड व रायगड या किल्ल्यांवरही बालेकिल्ला आहे.

सिंहगड व शिवनेरी अशा प्रकारची उंचवट्याची जागा असूनदेखील वेगळे बांधकाम केलेले नाही. म्हणून त्या ठिकाणी बालेकिल्ला अस्तित्वात नाही.

डोंगरी किल्ल्यात असतो तो बालेकिल्ला. भुईकोटातील बालेकिल्ल्याला अर्क असे म्हणतात.

**अंबरखाना/धान्यकोठी –** किल्ल्यावर धान्य साठवण्यास ज्या इमारतीची बांधणी अथवा वापर केला जातो. त्यांना अंबरखाना अथवा धान्यकोठी म्हणतात.

पन्हाळगडावरील गंगा, यमुना व सरस्वती या धान्यकोठ्या प्रसिध्द आहेत.

रायगडावर राजवाडा आणि भांडारगृहे (सध्या यांना या नावाने ओळखले जाते.) यामधून जाणाऱ्या रस्त्याच्या (ज्याच्या टोकांना पालखी दरवाजा आणि मेणा दरवाजा आहेत) पूर्वेस वेगळे बांधकाम केलेली तीन धान्य कोठारे अथवा पेव आहेत. त्यात वरच्या बाजूने पोती सोडण्याची व्यवस्था आहे. फक्त एका धान्य कोठारास खालून वेगळा दरवाजा आहे. आतमध्ये ओल येऊ नये म्हणून इतर इमारतीपासून सुटावलेली, तळामध्ये भिंतीची बांधणी पूर्ण दगडी आहे.

बऱ्याच वेळेस धान्यकोठार व दारुकोठार यामध्ये गोंधळ होतो. दारु कोठारे एका टोकास मुख्य वस्तीपासून दूर आणि जास्त जाड भिंत असणारी असतात. (उदा. रायगड, सिंहगड)

धान्यकोठोर मुख्य वस्तीजवळ असू शकतात. (उदा. पन्हाळगड, रायगड, राजगड)

अलंगा/तटाजवळील पहाऱ्याची जागा – सर्व किल्ल्यांवर पहारेकरी गस्त घालीत असत. ही गस्त घालताना त्यांना एक विशिष्ट जागा अथवा अलंगा नेमून दिलेला आहे.

रायगडाच्या चारही बाजूंना अशा तऱ्हेचे अलंगे आजही पाहता येतात.

**अब्दुर्ग – पाणकोट –**

ज्याच्या सर्व बाजूंनी पाण्याचा वेढा असल्यामुळे जो दुर्लक्ष्य व जिंकण्यास अवघड होतो. नदीच्या पात्रात नदी दुभंगल्यामुळे तयार झालेल्या बेटावर (उदा. श्रीरंगपट्टण) अथवा समुद्रातील एखाद्या बेटावर (उदा. जंजिरा, अर्नाळा, सिंधुदुर्ग) असणारे किल्ले अब्दुर्ग अथवा पाणकोट मानले जातात.

**ओटा – चौथरा –**

दगड किंवा विटांनी बांधलेला भाग. त्या जोत्यावर घरे, मंदिरे बांधली जात असत.

**उपत्थळा – माची –**

डोंगरी किल्ल्यात बालेकिल्ल्याच्या खाली असणाऱ्या डोंगर पठारावरील अथवा डोंगरसोंडा वरील तटबंदीयुक्त जागा. राजगडावरील पद्मावती माची, सुवेळा माची, संजीवनी माची अथवा बुधला माची ही माचीची उत्तम उदाहरणे आहेत.

**कोट – तटबंदी –**

इतर भागापासून किल्ल्याचा संरक्षित परिसर वेगळा करणारी भिंत म्हणजे कोट. हा कोट चिखल – माती, कच्च्या विटा, पक्क्या भाजक्या विटा अथवा दगडी असे.

**किल्ला –** किल्ल्याच्या अर्थाचे कोट, गिरी, दुर्ग, कोट असे शब्द वापरात आहेत. किल्ला हे मुख्यत: एक लढाऊ ठिकाण असे.

**देश –** स्थल – कालपरत्वे व आवश्यकतेनुसार मुळात दुर्गम व मोक्याच्या जागी छोटे, मध्यम अथवा मोठे किल्ले बांधले जात असत.

**कडेलोट–** स्वराज्याशी बेईमानी करणाऱ्या अथवा गंभीर गुन्हे करणाऱ्या अपराध्याला डोंगरी किल्ल्याच्या उंच व सरळ तुटलेल्या कड्याच्या टोकावरून खाली ढकलून दिले जाई. बहुतेक वेळा हात पाय बांधून पोत्यात घालून कडेलोट केला जाई. शिवनेरी किल्ल्याच्या उत्तर टोकाला किंवा रायगडच्या टकमक टोकाला कडेलोटाची जागा मानले जाते.

**कडा –** डोंगरी किल्ल्याचा चहूबाजूंना वर चढण्यास कठीण असा नैसर्गिक अवघड भाग विशेषत: सिंहगडावरील डोणगिरीचा कडा किंवा तानाजीचा कडा प्रसिध्द आहे.

**कर्दमदुर्ग –** भरपूर चिखल अथवा दलदल असणाऱ्या भूभागात एखादा किल्ला उभारला तर त्याला कर्दम दुर्ग म्हणतात.

**खंदक –** परिखा – किल्ल्याच्या भोवती तटबंदीच्या बाहेर उथळ अथवा खोल, रुंद अथवा अरुंद असा चर खणलेला असतो. कधी त्यात पाणी साठवलेले असते. तर कधी काटेरी झुडपे.

देवगिरी भोवतालचा खंदक प्रसिद्ध आहे. अंजनवेल, आग्वाद, जयगड, निवती या ठिकाणीही खंदक आहेत.

पुण्याजवळील चाकणच्या संग्रामदुर्गाभोवती असणारा खंदक हा भुईकोट किल्ल्याभोवती आवश्यक ठरणाऱ्या संरक्षक कवचाचे एक उत्कृष्ठ उदाहरण होय.

**खलबतखाना –** गुप्त गोष्टी बोलण्यासाठी अथवा एखादी योजना जवळच्या अथवा संबंधित मंडळींना समजावून सांगण्याची जागा.

**खिळ –** दरवाज्यावर काही टोकदार खिळे बसवलेले आढळतात. हत्तीने धडका देऊन दरवाजा

फोडू नये याकरता हत्तीच्या डोक्याचे उंचीचेवर अशा प्रकारचे खिळे ठोकलेले आढळतात.

**गढी –** लहान भुईकोट

गड – किल्ला

**गोमुखी –** शिवाजी महाराजांनी त्यांच्या दुर्गबांधणीत लपवलेल्या प्रवेशदारांसाठी वापरलेली एक विशिष्ठ तऱ्हेची बांधणी.

येणाऱ्या माणसाच्या पाठीकडून हल्ला करण्याची दोन तीन वेळा मिळणारी संधी. प्रत्यक्ष दारासमोर जाईपर्यंत दार न दिसणे, दारासमोर अरुंद जागा व चिंचोळा प्रवेशमार्ग अशी या गोमुखी प्रवेशद्वाराची रचना करण्यात येई.

पूर्वी जप करण्यासाठी वापरली जाणारी गोमुखी ह्या कापडी पिशवीत हात घालून जपमाळेतील मणी ओढत असत त्यावरून गोमुखी बांधणी हा शब्दप्रयोग रूढ झाला.

**गिरिदुर्ग –** डोंगरी किल्ला

एखाद्या डोंगराच्या माथ्यावर तट बुरुजांचे वेष्टण घातले की तो डोंगरी किल्ला होतो.

किल्ल्यातील किल्ल्याला बालेकिल्ला म्हणतात. बालेकिल्ल्याच्या खालच्या बाजूस तटबंदीयुक्त ठिकाणे असतात त्या माच्या.

त्याचेच खाली साधारण अर्धी चढण चढून गेल्यावर तटबंदीविरहित पण मोक्याच्या जागी पहारे करणाऱ्या वस्तीच्या जागा असतात त्यांना मेट असे म्हणतात.

पुण्याजवळील प्रसिध्द किल्ला सिंहगड यावर पुणे बाजूकडून चढून जाताना अशा प्रकारचे मेट लागते.

गिरिदुर्गांच्या आजूबाजूकडील वाड्या–पाड्या–वस्ती–गाव यांना घेरा असे म्हटले जाते.

आदर्श डोंगरी किल्ल्यास घेरा, मेट, माची, बालेकिल्ला असे टप्पे आढळतात. भुईकोट किंवा पाणकोटात अशा प्रकारचे टप्पे नसतात.

गडाच्या संरक्षणाची कडेकोट तयारी असेल तर वरील चारही टप्प्यांवर प्रखर प्रतिकार होतो.

जसवंतसिंहाने एक मेट ताब्यामध्ये घेऊन देखील सिंहगड हा किल्ला त्यास जिंकला आला नाही.

गिरिदुर्ग हा इतर किल्ल्यांच्या तुलनेत वरच्या दर्जाचा किल्ला मानला जातो.

**गव्हरदुर्ग –** गुहेचा उपयोग किल्ल्यासारखा करून केलेली जागा

**गावकोट –** पूर्ण गावास तटबंदी बांधून संरक्षणक्षम करणे.

गंडभेरुंड – द्विमुखी गरुड

**गूढ प्रवेश मार्ग –** जीवधन (नाणेघाटाजवळ) किंवा देवगिरी अशा सारख्या किल्ल्यांवर अंधारी बोगद्यांमधून प्रवेशमार्ग आहे.

देवगिरी किल्ल्यावरील फसवा भुयारी मार्ग निश्चित वेगळा आहे. अशा प्रकरच्या मार्गांना गूढ प्रवेश मार्ग असे म्हटले जाते.

**घेरा–** हा शब्द काही महत्त्वाच्या अथवा मध्यम विस्ताराच्या किल्ल्यासंदर्भात वापरला जातो. गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या खेडेगावासह.

घेरा केंजळगड, घेरा सुधागड, घेरा सिंहगड असे उल्लेख आढळतात. आदर्श डोंगरी किल्ल्यांसंदर्भात किल्ल्याचा चढ ज्या ठिकाणाहून सुरू होतो तो घेरा.

**चौकी –** किल्ल्याकडे जाण्या–येण्याच्या मार्गावर नजर ठेवता येईल अशा ठिकाणी खास पहारे अथवा चौक्या उभारल्या जात असत.

**जंग्या –** तटबंदीमधून बाण व बंदुकीच्या गोळ्यांचा मारा करण्यासाठी जी भोके, छिद्रे, ठेवलेल्या असतात त्यांना जंग्या म्हणतात.

**जिभी –** दारासमोरील आडोसा

दर्शनी दार असणाऱ्या किल्ल्याच्या प्रमुख दारासमोर एखादा आडोसा निर्माण केलेला आढळतो. त्यामुळे दाराला जास्त संरक्षण मिळते. ह्याचा आकार, विस्तार व उंची वेगळे असू शकते.

**जंजिरा –** पाणकोट - जलदुर्ग

जंजिरा म्हणजे बेटावरील किल्ला.

**जोडकिल्ले –** एकाच डोंगराच्या दोन शिखरांना तटबंदी केल्याने जोडकिल्ले तयार होतात.

उदा. चंदन–वंदन–अंकाई–टंकाई आदी.

**जंगली किल्ला –** वनदुर्ग

जंगलातील बेसुमार झाडीमुळे अधिक संरक्षित बनलेले ठिकाण म्हणजे वनदुर्ग.

जावळीचे जंगल शिवकाळात प्रसिद्ध होते. आजही वासोटा उर्फ व्याघ्रगड हा किल्ला त्याची आठवण करून देतो.

**जकीरा –** संग्रह

गडावर वेळोवेळी लागणाऱ्या विविध वस्तूंचा केलेला संग्रह म्हणजे जकीरा.

**झाडी –** कलादर्ग्याची झाडी

गडावरचे मार्ग सुगम नसावेत. सुगम असले तरी ते मोडून त्यावर झाडी वाढवून आणखीकडे परके फौजेस जाता कठीण ऐसे मार्ग घालावे. याविरहित वलिकुबलीय चोरवाटा ठेवाव्यात. त्या सर्वकाळ चालो देऊ नयेत.

गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी, ते झाडी प्रयत्ने वाढवावी. त्यामध्ये एक काठी तेही तोडू न द्यावी. बलकबुलीस (अडचणीच्या वेळी) त्या झाडीमध्ये हशम बंदुकी घालावया कारणे जागा असो द्यावी.

आजही राजगड, लोहगड, विसापूर, हरिश्चंद्रगड अशा गडांवर विपुल झाडी आहे.

**तट –** किल्ला उभारणीकरता बांधलेली भिंत.

हा तट दगड–विटा–माती–लाकूड अशा गोष्टींचा वापर करून बांधलेला आपणास आढळतो.

तटावरून व्यवस्थित फिरता येण्याएवढा हा तट रुंद असतो. भुईकोटास सर्व बाजूंनी तट असणे आवश्यक ठरते.

उदा. संग्रामदुर्ग (चाकणचा किल्ला)

डोंगरी किल्ल्यांच्या आवश्यकतेनुसार तट उभारलेला असतो. (उदा. रायगड)

**तारत्खाना –** शौचकूप - संडास

तटावर असणाऱ्या गस्तीसाठी नेमलेल्यास पहारेकऱ्यांना निसर्गविधीसाठी पहाऱ्याची जागा सोडून जावे लागू नये व गडावर स्वच्छता रहावी याकरता तटोतटी संडासांची सोय केलेली आढळते.

(उदा. राजगड, सिंधुदुर्ग, रायगड)

**दारूखाना –** अंबरखाना – दारू कोठार

गडाच्या संरक्षणासाठी मुख्य वस्तीपासून दूर पण मजबूत भिंतींच्या बांधकामाची इमारत दारूगोळ्याचा साठा करण्यासाठी बांधलेली असे.

गडावरील इमारत अग्नी, उंदीर, किडा, मुंगी, वाळवी यांचा उपद्रव न बाधे अशा भुईस दगडाची छावणी (बांधणी) करून गच्ची बांधावी. (पक्की करावी) ज्या किल्ल्यास काळा खडक दरजेविरहित असेल तसे ठिकाणी ते कड्यास टाकी करावी. स्वरूप मात्र दरज असेल, तरी गच्च लावून पाझर न फुटे असे करावे. गळ्यास अरेना अशी भुई असेल तेथे गच्ची घरे करून थोर, थोर काचेचे मर्तबान् (बरणी), झोलमाठ (मोठा माठ), मडकी आणून त्यास मजबूत बसवा (तिवई) (अडणी) करून साठवावे.

दारुखाना घराजवळ घराचे परिघाखाली नसावा, सदरपासून सुमारास जागा बांधून भोवते भोवते निरगुंडी आदिकरून झाडाचे दाट कुसू घालून बांधावे, त्यास तळघर करावे. तळघरात गच्च (चुनेगच्ची) करावा. त्यात माच (धडवंची) घालून त्यावर दारूचे बस्ते (थैल्या) मडकी ठेवावी. बाण, होके आदीकरून मध्यघरात ठेवावे. सर्दी पावो न द्यावी. आठ–पंधरा दिवसात हवालदाराने येऊन दारू, बाण, होके आदीकरून बाहेर काढून उष्ण देऊन मागुती मुद्रा करून ठेवीत जावे. दारूखान्यास नेहमी राखणेस लोक ठेवावे. त्यांनी रात्रंदिवस पहाऱ्याप्रमाणे जागत जावे. परवानगीविरहित आसपास मनुष्य येऊ न द्यावे. अशी दारूखान्याबाबतची शिस्त शिवकालात होती.

**देवडी –** दरवाज्यालगतच पहारेकऱ्यांच्या बसण्याच्या पहाऱ्याच्या जागा म्हणजे देवडी.

तोरणा, राजगड, रायगड आदी किल्ल्यांवर अशा देवड्या आहेत.

**दुर्गद्वार शिल्पे –** किल्ल्यांच्या दारावर असणारी अथवा कोरीव कामे.

**धमधमा –** लढाईच्या वेळेस किल्ल्यावर अचूक मारा करण्यासाठी लाकडी मचाण बांधून त्यावरून मारा केला जाई. या लाकडी बांधकामांना धमधमा असे म्हणत. (लाकडी मचाण)

**नाळ –** राजगडाची संजीवनी माची म्हणजे शिवाजी महाराजांच्या दुर्गबांधणीचा अप्रतिम प्रयत्न. ही दुहेरी गडाच्या अभेद्यतेत भर घालते.

तटावर तोफगोळे अथवा सुरुंगामुळे भगदाड पडले तर, त्या तटाच्या आतमध्ये आणखी बांधकाम व तटांमध्ये बोळासारख्या उंच जागेतून येणारे शत्रूसैन्य वेचून मारता येईल अशी वेगळी संरक्षण व्यवस्था.

राजगडाचा संजीवनी माची हा भाग त्यामानाने सुगम होय. तेथून प्रवेश करणे, अशक्य व्हावे म्हणून योजना केलेला हा उपाय.

**नगारखाना –** गडाच्या मुख्य दरवाज्यावर, महत्त्वाच्या मंदिरासमोर अथवा राजसभेसमोर नगारा वाजवण्यासाठी बांधलेली वेगळी इमारत. रायगड, जंजिरा, सिंधुदुर्ग या किल्ल्यांवर अशा प्रकारची जागा आहे.

**परकोट –** पडकोट – जादा तटबंदी

**पाणकोट –** जलदुर्ग – पाणकिल्ला – जंजिरा

**फांजी –** तटाचा माथा.

पहाऱ्याकरता गस्त घालताना यावरून फिरता येते.

**बुरूज :** चौकोनी बुरूज प्रामुख्याने पाश्चात्त्य किल्ल्यांमध्ये आढळतात, तर गोल बुरूज एतद्देशीय किल्ल्यांमध्ये आढळतात.

सरळसोट, खाली व वर घेर सारखा असणारे चौकोनी बुरूज इंग्लिश किल्ल्यांमध्ये तर वरच्या बाजूस कमी आणि खालच्या बाजूस अधिक मोजमापांचे असल्यामुळे किंचित ढाळ असणारे तट व चौकोनी बुरूज हे पोर्तुगीज किल्ल्यांचे वैशिष्ट्य आहे.

शस्त्राची फेक जितकी अधिक तेवढे दोन बुरुजांमधील अंतर अधिक.

तटाला लगटू पाहणाऱ्या सैनिकांवर तटापासून पुढे आलेल्या बुरुजांमधून मारा करणे अधिक सोयीस्कर ठरते.

पोर्तुगीजांच्या बुरुजावर एका विशिष्ट तऱ्हेचे बांधकाम आढळते. एखाद्या कॅपसूलसारखे हे बांधकाम असते.

त्यामुळे स्वत: लपून अनेक दिशांना बाण वा बंदुकीच्या गोळ्यांचा मारा सहज करता येतो.

यालाच बार्टीझन असे म्हणतात.

**रेवणी – खंदक व तट यामधील जागा**

**वनदुर्ग –** दाट जंगलातील किल्ला.

**शिबंदीची घरटी –** सैनिकांना राहण्यासाठी उभारलेली तात्पुरती अथवा कायम स्वरूपाची. निवाऱ्याची घरे अथवा जागा म्हणजे शिवंदीची घरटी.

**सदर –** किल्ल्यावर भेटीसाठी येण्याची जागा.

**सुलतानढवा –** किल्ला जिंकण्यासाठी शत्रूच्या सैन्याने अचानक चढवलेला जोरदार हल्ला.

**हवालदार –** किल्लेदार, किल्ल्याचा सर्वोच्च अधिकारी.

याच्या ताब्यात किल्ल्याचा दैनंदिन व आपत्तीचे प्रसंगी सर्व निर्णय घेण्याचा अधिकार असे.

■■■

# ३.२ किल्ल्यांची परिभाषा (इंग्रजी)

**Approaches ॲप्रोचेस –** किल्ल्याकडे येणारे मार्ग.

**Bailey (बेली) –** The wall surrounding an outer court of castle - किल्ल्याबाहेरील संरक्षणात्मक तटबंदी

**Barbican (बार्बिकन) –** An outwork of a fortified place as a castle - एक प्रकारची गढी, सुरक्षित तटबंदी केलेले ठिकाण.

**Bartizan बार्टिझन –** A small overhanging turret on a wall or tower - बुरूज किंवा तटबंदीवर विशिष्ट तऱ्हेने बाहेर डोकावणारे बांधकाम.

**Bastion (बॅस्टिअन) –** Fort, a projecting portion of a rampart or fortification that forms an irregular pentagoan attached at the base to the main works.

**A fortified place - बुरूज –** टेहळणीसाठी उभारलेला सुटा बुरूज.

**Campaign (कॅम्पेन) –** A military operation for a specific purpose.

Any systematic course of aggressive activities for some special purpose = लष्करी हालचाल, मोहीम.

**Cannon (कॅनन) –** (1) A Fortified residence (2) The chief part of the fortification of a medieval city. (3) The strongly fortified permanently garrisoned stronghold

गढी, किल्ला, वस्तीमधील गढी

**Cistern (सिस्टर्न) –** A reservoir or tank tor storing water or other liqual = हौद, साठवणीची जागा, टाके

**Citadel (सिटॅडेल) –**

1) A fortress for commanding or defending a city
2) Any strongly fortified place.

शहरामधील गढी, किल्ल्यामधील किल्ला, बालेकिल्ला. २

**Corbels (कॉर्बेल्स) A bracket –** आधारासाठी ठोकलेले तिरके लाकूड अथवा बसवलेला दगड.

**Curtain wall (कर्टन वॉल) –** The part of a wall rampart connecting two bastions, towers or the like - तटबंदी

**Darwaza (दरवाजा) –** दरवाजा

**Ditch (डिच) –** (1) A long narrow, excavation made in the ground by digging, as for protection (2) a trench - खंदक

**Donson (डंजन) –** The inner tower, keep or strong hold of a castle - अगदी आतील सुरक्षित बांधकाम.

**Dungeon (डंगन) –** पहा Donjon - अंधार कोठडी

**Door (डोअर) –** दरवाजा, प्रवेशद्वार

**Fountain (फाऊंटन) –** कारंजे

**Fort (फोर्ट) –** A strong or fortified place occupied by troops is usually surrounded by walls, ditehes and other defensive works.

**Fortification (फोर्टिफिकेशन) –** A military work construted for the purpose of strengthening a position - किल्ले बांधणी, दुर्गरचना

**Fortress (फोट्रेस) –** A large fortified place (2) A fort (3) A group of forts = किल्ला, दुर्ग, गड

**Gallery (गॅलरी) –** An uderground or covered passage to another part of a fortifiel position - भुयार, भुयारी मार्ग

**Garrison (गॅरीसन) –** शिबंदी

**Gate house (गेट हाऊस) –** A house over or at a gate = पहारेकऱ्यांच्या देवड्या, ओवऱ्या

**Gateways (गेटवेज) –** A passage or entrance that may be closed by a gate - प्रवेशमार्ग, प्रवेशद्वार

**Glacis (ग्लेसिस) –** (1) A gentle slope (2) A bank of earth in front of a fortification - जिभी

**Gorge (गॉर्ज) –** (1) A narrow cleft with steep. rocky walls (2) The rear entrance or a part of bastion or similar outwork - (१) दरी (२) बुरुजात जाण्याचा आतील मार्ग.

**Guardrooms (गार्डरुम्स) –** A room used by guards during the period, in which they are on duty - पहारेकऱ्यांच्या देवड्या, पहाऱ्याच्या जागा.

**Guns (गन्स) –** तोफा

**Hoods over the loopholcs हुडस् ओव्हर द लूपहोल्स –** जंग्यांवरील आच्छादन

**Iron spikes आयर्न स्पाइक्स –** दरवाजावर ठोकलेले अणकुचीदार खिळे, सुळे

Keep - Donion (2) Dungeon (3) Strongbold - किल्ला, किल्ल्यातील संरक्षक बांधकाम

Killa किल्ला – किल्ला

**Lake लेक –** तलाव

**Machicolation (मॅकिकोलेशन) –** An opening in the floor of a projecting gallery or parapet

through which missiles, molten lead etc might be cast upon an enemy beneath

**Manor (मनोर)** – गढी

**Mansion (मॅन्शन)** – गढी

**Mantlet (मॅन्टलेट)** – A movable shelter, as one formerly used by besiegers when storming a fortress or city (2) Any of Various bulletproof shelters or screens - शत्रूवर हल्ला करताना निर्माण केलेला व हलवता येण्याजोगा तात्पुरता आडोसा.

**Moat (मोट)** – A deep, wide trench usually filled with water surrounding a fortified place - खंदक

**Outwork (आऊट वर्क)** – A minor defence lying outside the principal fortification limits - किल्ल्याबाहेरचे संरक्षक बांधकाम.

**Rampart (रॅम्पॉर्ट)** – A broad elevation or mound of earth raised as a fortification around of earth raised as a fortification around the place and usually eapped with a stone or earth paraapet

जमिनीवर असणाऱ्या उंचवट्यावर किंवा असा उंचवटा तयार करून त्यावर उभारलेली गढी.

**Reservior (रिझर्व्हायर)** – मोठा तलाव

**Scarp (स्कार्प)** (1) escarp (2) steep slope = उभा कडा, कातळमाथा.

**Siege (सीज)** – The act or process of surrounding and attacking a fortified place in such a way as to isolate it from help and supplies.

There by making capture possible - वेढा घालून हल्ला करणे.

**Silos (सिलेस)** – धान्यकोठार, कोठी, अंबरखाना

**Strong hold (स्टॉग होल्ड)** – 1) A well fortified place (2) A Fortress - किल्ला, कोट, मोठी गढी.

■■■

# ३.३ महत्त्वाच्या दुर्ग संज्ञा

**घेरा :** एखाद्या दुर्गाच्या प्रत्यक्ष सत्तेखाली येणारा आणि त्या दुर्गाच्या परिघात असणारा चहूबाजूचा प्रदेश म्हणजे त्या दुर्गाचा घेरा. यामध्ये दुर्गाच्या आसपासच्या छोट्या वाड्या, गावे यांचा समावेश होतो.३

**मेट :** एखाद्या दुर्गावर जाण्यासाठी अनेक वाटा, पायवाटा व चोरवाटा असतात. त्या वाटांनी शत्रूचे गुप्तहेर, दुर्गाच्या घेऱ्यात जंगलतोड करण्याच्या उद्देशाने घुसलेली परकी माणसे किंवा घेऱ्यातील गस्ती चुकवून आडमार्गाने गडात प्रवेश करणारे फितुर यांना हटकण्यासाठी आणि प्रसंगी युध्द करून त्यांची घुसखोरी रोखण्यासाठी डोंगरउतारावरच्या सोंडांवर साधारण डोंगराच्या मध्यभागी कायमस्वरूपी घरे बांधून तिथे पहारे व पहारेकरी तैनात केलेले असत. त्या चौकी नाक्याला मेट असे म्हणत. या मेटांवरून रात्रंदिवस पहारे देऊन दुर्गाच्या घेऱ्याची टेहळणी करणे. शत्रूची गडावर होणारी संभाव्य घुसखोरी रोखणे, दुर्गाच्या दिशेने येणाऱ्या शत्रुसैन्याची आगाऊ बातमी दुर्गांवर नेऊन पोचवणे ही मेट सांभाळणाऱ्या मेटकऱ्यांची मुख्य कामे होती. त्यासाठी त्यांना दोन प्रकारे पहारे द्यावे लागत. एक चल व दुसरा स्थिर. चल पहारे दुर्गाच्या घेऱ्यातून गस्तीच्या स्वरूपात दिले जायचे, तर स्थिर पहारे दुर्गाच्या पायथ्यापासून मेटांकडे येणाऱ्या पायवाटांवर असायचे. या दोन्ही प्रकारच्या पहाऱ्यांसाठी कोळी, बेरड, परवारी, रामोशी इत्यादी जमातीचे लोक नेमले जायचे. सध्या वासोटा उर्फ व्याघ्रगडाच्या एका मेटाचे रूपांतर छोट्या गावात होऊन त्याचे नाव 'मेट इंदवली' असे पडले आहे.

**माची :** गिरिदुर्गांमध्ये डोंगरउतारावर परंतु मधेच सपाट असलेल्या जागेला माची असे म्हणतात.

रूढार्थाने गिरिदुर्गातील थोड्या कमी उंचीचा सपाट असलेल्या दुर्गाशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या दुर्गाचाच एक भाग आहे. त्यामुळे माची बहुतांशी गिरिदुर्गामध्ये आढळून येते, पण ती प्रत्येक गिरिदुर्गात असतेच असे नाही. उदाहरणार्थ, राजगडाला सुवेका, संजीवनी व पद्मावती अशा तीन माच्या परंतु केंजळगड, कोरीगड, रोहिडा या गिरिदुर्गाना माच्या नाहीत. माची हा देखील दुर्गाचाच एक भाग असल्याने तो देखील तट-बुरुजांची संरक्षक भिंत बांधून सुरक्षित केलेला असतो.

**अर किल्ला किंवा अरक किल्ला :** स्थलदुर्ग किंवा भुईकोट प्रकारच्या गडांमध्ये आढळणारा आतील छोट्या आकाराचा किल्ला म्हणजे अर किल्ला. याचा फार्सी कागदपत्रांमधून किल्ले अर असा अनेकदा उल्लेख येतो. विजापूर व औरंगाबाद येथील अर किल्ले आजही अस्तित्वात आहेत. त्यामुळे अर किल्ला किंवा किल्ले अर ही दुर्गसंज्ञा फक्त स्थलदुर्गाच्या बाबतीतच येऊ शकते. जलदुर्ग किंवा गिरिदुर्गाबद्दल नाही.

**बालेकिल्ला :** एखाद्या दुर्गाच्या सपाटीवर मध्येच जर एखादा उंचवटा किंवा उंच टेकडी असेल, तर त्या भागाभोवती तट - बुरुजांची संरक्षक भिंत बांधून तो भाग अभेद्य करतात. दुर्गाच्या अशा उंचावरील भागाला बालेकिल्ला असे म्हणतात. हा फार्सी शब्द असून बाला-इ-किल्ला याचा अर्थ किल्ल्याचे उंच शिखर असा होतो. (बाला म्हणजे उंचावरचा) माचीप्रमाणेच प्रत्येक गिरिदुर्गाला बालेकिल्ला असतोच असे नाही. राजगड, पुरंदर, साल्हेर, जिंजी वगैरे गिरिदुर्गांना बालेकिल्ले आहेत, पण चंद्रगड, मंगळगड, सुधागड यांना बालेकिल्ले नाहीत.

**तटबंदी :** दुर्गाच्या संरक्षक भिंतीतील बुरुजांना जोडणारी भरभक्कम भिंत म्हणजे तटबंदी. याच्या बांधणीशिवाय एखादा दुर्ग बांधून झाला असे म्हणताच येत नाही. काही वेळा तटबंदीचा आकार आवश्यकतेनुसार व भौगोलिक परिस्थितीनुसार अर्धवर्तुळाकार बांधला जातो, पण तो बुरूज नसतो हे महत्त्वाचे. दुर्गाच्या तटबंदीच्या प्रत्येक भागाला काही विशिष्ट नावे दिलेली आहेत.

**चर्या :** तटबंदीच्या माथ्यावर बांधलेल्या भक्कम बांधकामाला चर्या किंवा कंगोरा असे म्हणतात. काही दुर्गबांधणीत त्या लांबून पाहिल्यावर एखाद्या उमललेल्या कमळाच्या पाकळ्यांसारख्या दिसतात.

**फांजी :** तटबंदीच्या माथ्यावर केलेल्या संरक्षणात्मक बांधकामाला फांजी असे म्हणतात. त्यात चर्याचाही समावेश होतो.

**जंग्या :** तटबंदीत असलेल्या चर्यामध्ये व फांजीमध्ये बंदुकीच्या गोळ्या सोडण्यासाठी, धनुष्य बाणाने शत्रुसैन्याचा वेध घेण्यासाठी आणि युध्दप्रसंगी त्या तटबंदीकडे येणाऱ्या शत्रुसैन्यावर नजर ठेवून त्याप्रमाणे दुर्गावरून हल्ल्याची दिशा निश्चित करण्यासाठी तटबंदीत पाडलेले व दुर्गाबाहेरच्या बाजूला उतरत गेलेले चौकोनी आकाराचे छोटे गाळे म्हणजे जंग्या. या तटबंदीप्रमाणेच बुरुजात देखील असतात. फांजीच्या आश्रयाला राहून दुर्गातील सैनिक शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करून घेत आणि जंग्यावाटे बंदुकीच्या गोळ्या सोडून शत्रूचे आक्रमण रोखण्यासाठी प्रयत्न करीत.

**लादणी :** तटबंदीवरून गस्त घालण्यासाठी किंवा सज्जा चालत जाण्यासाठी फांजीच्या काटकोनात असलेल्या फरसबंदी मार्गाला लादणी असे म्हणतात. कधी कधी ती इतकी रुंद असते की एका वेळेस चार पाच लोक त्यावरून सहज चालत जाऊ शकतील, तर ती कधी इतकी अरुंद असते की एका वेळेस एकच माणूस त्यावरून कसाबसा चालत जाऊ शकेल.

**आगळा :** दुर्गाच्या दरवाज्याच्या पाठीमागच्या बाजूस कडीसारखे आडवे घातलेले लांब-रुंद लाकूड किंवा एखाद्या झाडाचे खोड त्याला आगळा असे म्हणतात. शत्रुसैन्याने दुर्गाचा दरवाजा धडका मारून तो सहजासहजी उघडला जाऊ नये म्हणून घातलेला अडसर म्हणजे अर्गळा. हा फक्त लाकडाचाच असायचा.

**जिभी :** दरवाज्या बाहेरून दुर्गाच्या आत काय चालले आहे ते दिसू नये म्हणून दरवाजासमोर काही अंतरावर आडवी बांधलेली संरक्षणात्मक भिंत म्हणजे जिभी. बहुतांशी वेळा ती चंद्रकोरीच्या आकाराची असते आणि तिच्या दोन्ही टोकांना अर्धवर्तुळाकार बुरूज बांधलेले असतात.

**खंदक :** स्थलदुर्ग सपाटीवर असल्यामुळे शत्रुसैन्य तटबंदीला थेट भिडू नये म्हणून तटबंदीच्या बाहेर लांब, रुंद व खोल असा चर खणतात आणि त्यात पाणी सोडतात. ह्या चराला खंदक म्हणतात.

अशा प्रकारचे खंदक औसा, उदगीर, नळदुर्ग या स्थलदुर्गामध्ये, तर जयगड, देवगड, विजयगड सारख्या सागरी दुर्गामध्ये देखील इतकंच नाही, तर जिंजीच्या राजगिरी नामक बालेकिल्ल्यावर खोलच खंदक खणलेला आहे !! खंदक पूर्वी पाण्याने भरलेला असल्यामुळे तो पार करण्यासाठी त्यावर सहजतेने काढता-घालता घेण्यासारखा छोट्या पुलाची योजना केलेली असे. हा पूल सर्वसाधारणपणे लाकडाचा तयार करीत. अशा प्रकारचा पूल उचलता व खाली ठेवता यावा म्हणून पुलाच्या रुंदीच्या अंदाजाने पुलासमोरच्या तटबंदीत दोन मोठ्या कप्प्या (pullies) बसवलेल्या असत. पुलाला बांधलेला दोर त्या कप्प्यांशी अशा पध्दतीने निगडित केलेला असे की, तो पूल त्या कप्प्यांवरील दोराच्या मदतीने ओढला जाऊन बाहेरच्या लोकांना दुर्गात जाणे अशक्य व्हावे. हा उद्देश असावा.

**रेवणी :** खंदकाच्या बाहेर थोड्या अंतरावर भराव घालून दुर्गाभोवती एक उंचवटा तयार करीत. या उंचवट्याचा दुर्गाच्या विरुध्द बाजूकडील उतार हा त्या उताराची रेषा जर दुर्गांच्या दिशेने वाढवीत नेली तर ती तटबंदीच्या फांजीवरून जाईल अशा प्रकारे मुद्दाम बांधत. त्यामुळे तोफा उंचवट्याच्या पलीकडे असतील तर त्यांना तिथून दुर्गावर मारा करता येत नसे. खंदक आणि हा उंचवटा यांच्या दरम्यान असलेल्या सपाटीच्या भागाला आणि उंचवट्यालाही रेवणी असे म्हणत. एखाद्या स्थलदुर्गाला शत्रुसैन्याचा वेढा पडला की दुर्गातील सैन्यात असलेले काही सैनिक रेवणीत बसून रेवणीच्या भरावाच्या आडोशाने शत्रुसैन्यावर छोट्या तोफांचा मारा व बंदुकांचा गोळीबार करीत. शत्रूसैन्याला त्यांना रेवणीतून घालवून दिल्याशिवाय तोफा पुढे आणता येत नसत. एकदा का रेवणीतून सैनिकांना घालवून दिले की मग शत्रुसैन्याच्या तोफा पुढे आणल्या जात आणि मगच दुर्गांच्या तट–बुरुजांवर तोफांचा मारा करण्यात येई.

**अलंगा :** दुर्गावर तैनात केलेल्या सैन्यातील लोकांसाठी बांधलेल्या धरांना अलंगा असे म्हणत. एक अलंग आणि अनेक अलंगा. या अलंगा कायम पहारा करणाऱ्या सैनिकांसाठी तटबंदीजवळ; परंतु तटबंदीच्या आत बांधलेल्या असत.

**कारखाना :** दुर्गावर नेहमी लागणाऱ्या वस्तूंचे निरनिराळे विभाग करून त्या साठविण्यासाठी बांधलेल्या इमारतींना कारखाना असे म्हणत. उदाहरणार्थ चुडी, मशाली, तेल, जळाऊ लाकूड, पानभारे, तोफा–बंदुकांची दारू, तोफगोळे, धान्य इत्यादी वस्तू दुर्गावर साठविल्या जात असत. पुरंदर व रायगड येथे अठरा कारखाने होते असं म्हणतात.

**अंबारखाना :** धान्य साठविण्याच्या दुर्गांवरील इमारतीला अंबारखाना असे म्हणत. तटबंदीच्या आत व दुर्गांवरील मनुष्यवस्तीच्या जवळ प्रशस्त जागेत बांधलेले बंदिस्त घर म्हणजे अंबारखाना, पन्हाळगड व जिंजीच्या गिरिदुर्गांवरील अंबारखाने पहाण्याजोगे आहेत.

**दारूखाना :** तोफा–बंदुकांच्यासाठी लागणारी दारू, तोफ गोळे वगैरे युध्दोपयोगी साहित्य साठविण्याच्या जागेला दारूरखाना किंवा दारूकोठार असे म्हणत.

ते दुर्गावर असलेल्या मनुष्यवस्तीपासून दूर, दुर्गाच्या एका टोकाला बांधीत आणि युध्दजन्य परिस्थितीत आवश्यकतेनुसार दारूगोळा आणून तटबंदी किंवा बुरुजालगत बंदिस्त खोलीत ठेवीत. अनेकदा अशा छोट्या खोल्यांमधील दारूगोळ्याच्या संग्रहाला देखील दारूकोठार म्हणत. मुख्य दारूकोठार व तटबंदीजवळचे दारू कोठार यात संग्रह जरी एकाच जिनसाचा असला तरी त्यांच्या आकारातील फरक महत्त्वाचा आहे. मोठे किंवा मुख्य आणि लहान किंवा छोटे दारूकोठार असा त्यात फरक करता येईल. मिर्झा राजा जयसिंग व दिलेरखान यांनी जेव्हा वज्रगड घेऊन पुरंदरच्या माचीवर हल्ला केला होता तेव्हा माचीवरील तटबंदीतील दारू कोठाराचा मोठा स्फोट होऊन त्यात मराठ्यांचीच हानी झाली होती.

**सदर :** दुर्गाचा कारभार ज्या कचेरीतून चालत असे, त्या जागेला सदर म्हणतात.

**देवडी :** दुर्गाच्या दरवाज्याबाहेर दोन्ही बाजूला पहारेकऱ्यांना बसण्यासाठी केलेल्या चौथऱ्यावजा जागेस देवडी म्हणत.

**पडकोट :** कोट म्हणजे एखाद्या दुर्गाचा तट आणि त्यावरून पडकोट म्हणजे कोटाच्या आतील दुसरा कोट. याला मेढेकोट असेही म्हणतात. वज्रगडाचा पडकोट उत्तम आहे.

**रणमंडल :** सर्वसाधारणपणे एखाद्या दुर्गाच्या मुख्य प्रवेशमार्गाच्या दोन्ही बाजूंना लागून अर्धवर्तुळाकार बुरूज बांधलेले असत. उदाहरणार्थ रायगडाचा महादरवाजा, तोरण्याचा कोठी दरवाजा; परंतु स्थलदुर्गात मुख्य प्रवेशद्वार भरभक्कम बांधणीच्या दोन बुरुजांमध्ये बांधलेले असते आणि तो दरवाजा बाहेरून तोफा बंदुकांच्या माऱ्यात येउ नये म्हणून त्याच्या संरक्षणार्थ आडोसा देणारे तट बुरूजयुक्त बांधकाम केलेले असते त्याला रणमंडल असे म्हणतात. अनेक वेळा जिभीचा वापर मोठ्या कल्पकतेने करून स्थलदुर्गाच्या मुख्य दरवाजाचे संरक्षण केलेले आढळते.

**उदाहरणार्थ :** अनेक दुर्गांवर मुख्य प्रवेशमार्गावर असलेल्या एका बुरुजापासून तटबंदीबाहेर, तटबंदीला काटकोनात अशी एक भिंत बांधत. या भिंतीच्या बाहेरील टोकापाशी काटकोनात अशी एक भिंत बांधत. या भिंतीच्या बाहेरील टोकापाशी तिच्याशी काटकोन करून किंवा तटबंदीला समांतर अशी दुसरी एक भिंत बांधत. त्यामुळे शत्रुसैन्याला दुर्गाच्या मुख्य दरवाजापर्यंत येण्यासाठी ही संरक्षक भिंत किंवा जिभी आणि तटबंदी यांच्यामधून येऊन काटकोनात वळावेच लागे. काही स्थलदुर्गावर काटकोनात दोन भिंती बांधण्याऐवजी एकच वक्राकार भिंत बांधून दुर्गाच्या मुख्य दरवाजाला संरक्षण दिलेले आढळते. काही स्थलदुर्गाच्या बांधणीत तटबंदीच्या आतील किंवा बाहेरील बाजूस तटबंदीशी काटकोन करून दोन भिंती बांधत आणि त्या दोन भिंतींना जोडणारी किंवा तटबंदीला समांतर असणारी अशी आणखी एक भिंत बांधून काढत. त्यामुळे तटबंदी व बांधून काढलेल्या दोन भिंती मिळून तटबंदीच्या आत किंवा बाहेर एक चौक तयार होत असे. यात स्थलदुर्गाच्या मुख्य दरवाजाची जागा फार महत्त्वाची मानली जाई. दुर्गात प्रवेश करण्यासाठी मुख्य प्रवेशमार्गावर कधी तीन-चार तर कधी सहा-सात दरवाजे बांधत आणि दुसरा तटबंदिशी काटकोन करून बांधलेल्या संरक्षक भिंतीत (जिभीत) किंवा तो तटबंदीशी समांतर असलेल्या संरक्षक भिंतीत बांधून तटबंदीतील दरवाजासमोर येणार नाही याची काळजी घेत असत त्यामुळे स्थलदुर्गात प्रवेश करणाऱ्या शत्रुसैन्याला दुर्गाचा मुख्य दरवाजा नेमका कुठे आहे ते कळू नये हा जिभीचा कल्पकतेने वापर करून बांधलेल्या रणमंडलाचा मुख्य हेतू असायचा. एकदा का शत्रुसैन्य आत घुसले की संपूर्ण प्रवेश मार्ग त्याच्या बाजूंवर असलेल्या संरक्षक भिंतीवरून, लगतच्या बुरुजांवरून आणि तटबंदीवरून माऱ्याखाली येत असे.

रणमंडलाची रचना महाराष्ट्रातील अनेक दुर्गामध्ये दिसून येते. त्यात परिंडा, औसा, उदगीर, नळदुर्ग यांच्यासारखे स्थलदुर्ग आहेत. अलिबागचा पाणकोट, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग यांच्यासारखे जलदुर्ग आहेत. रायगड, तोरणा, सुधागड यासारखे गिरिदुर्ग आहेत.

**कडेलोट :** गुन्हेगार लोकांना गिरिदुर्गाच्या एखाद्या कड्यावरून खाली दरीत लोटण्याच्या शिक्षेच्या प्रकाराला कडेलोट असे म्हणत. त्यासाठी रायगडचे टकमक टोक प्रसिध्द होते.

**गुसलखाना :** याचा फार्सीत मूळ अर्थ स्नानगृह असा जरी होत असला तरी दुर्गसंज्ञेत याचा अर्थ राजा आपल्या विश्वासू लोकांबरोबर ज्या जागेत किंवा एखाद्या बंदिस्त खोलीत गुप्तपणे सल्लामसलत करतो. त्या जागेला किंवा वास्तूला गुसलखाना किंवा खलबतखाना असे म्हणत.

■■■

# ३.४. दुर्गवर्ग:

दुर्ग किल्लेति विज्ञेयं गिरिदुर्गो गड: स्मृत: ।
प्राकार: कोट इत्युक्तो जंजीरा द्वीप उच्यते ।।१।।
भृगुपात: कडेलोट: कडा तु भृगुनामक: ।
दन्तको गडकोन: स्यात् बुरुज: कोट्टगुल्मकम् ।।२।।
उपत्यका तु माची स्यात बालेकिल्ला त्वधित्यका।
प्राकारवेदिका फांजि: परिखा खंदक: स्मृत: ।।३।।
रेवणी नाम परिखावलयं परिभाषितम् ।
पडकोटस्तथा सद्भि: प्राकारवलयं स्मृतम् ।।४।।
जंग्या प्राकाररन्ध्राणि चर्या प्राकारफालिका ।
जीभिर्हस्तिनखाख्या स्यात् अगळा त्वर्गळा मता ।।५।।
वेढा परिधिनामा स्यात् मोर्चा स्यादुपसर्पणम् ।।
अलंग परिरक्षा स्यात् मेट: स्यादुपरक्षणम् ।।६।।
स्यात्साहसाधिरोहस्तु सुलतानढवाभिध्: ।
मगबिंवी नाम विज्ञैरश्मयन्त्रमुदाहृतम् ।।७।।
धमधमा प्रतिगुल्म: स्यात् सुरंगं विवरं स्मृतम् ।
या माटनं तु गस्ती स्यात् गस्तिर्यामिक उच्यते ।।८।।
घांटगस्ती तथा घंटायामिक: परिभाषित: ।
सामग्री नाम सामानं जकीरा संग्रह: स्मृत: ।।९।।
अंबारखाना धान्यकोशो गल्ला धान्यमितीरितम् ।
कारखाना तु संभारगृहमाहुर्मनीषिण: ।।१०।।
संभारलेखक: कारखानीस: परिकीर्तित: ।
हवालदारस्तत्र मुद्राधिकारी परिभाषित: ।।११।।
ज्ञेय: प्राकारपालस्तु तटसनौबत नामक: ।
इमारति हवालदार: भवेत् शिल्पाधिकारिक: ।।१२।।
गौंडा तु भित्तिशिल्पी स्यात् पलगंडस्तु बेलदार ।
गिलावा लेप नामा स्यात् शिल्पकार्यमिमारति: ।।१३।।
संगत्रासस्त्वश्मभेत्ता खंबीरश्चूर्णकर्दम: ।
गडकरी स्यात्पाषाणवाहकोऽथेष्टिका इटा ।।१४।।
कौल तु कर्पूराणि स्युश्चिरे तु घटितोपल: ।
अश्मकूपस्तु टांके स्यात् निर्झरस्तु झरा भवेत् ।।१५।।
दिवाणवाडा स्यात् राजमंदिरं सदर: सभा ।
कुमारसदर खानजादेवाडा इति स्मृतम् ।।१६।।

मन्त्रस्थानं गुसुलखाना चतुष्क चौक नामकम् ।
हरंमहाल: शुद्धान्त: कक्ष्या बंक इतीरित: ।।१७।।
देहली देव्हडी नाम्नी स्यात् दरवाजा तु तोरणम् ।
झरोके स्युर्गवाक्षणि माडी स्यादुपकारिका ।।१८।।
चन्द्रशाला नाम सज्जा सोपानं पायरी भवेत् ।
बलांगरेज इत्येतत् वलीकम् नाम संस्मृतम् ।।१९।।
कारंजे जलसूत्रं स्यादुत्सो धबधबा स्मृत: ।
पनाळी तु प्रणाल: स्यात् चौकटी द्वारबंधिका ।।२०।।
झडपा तु कपाटं स्यादुंबरा स्यादलिन्दक: ।
कुलूपं लोहपाश: स्यात्कुञ्चिका तु किली स्मृता ।।२१।।
वातायनं सुलाख: स्यात्कुड्यनीडं तु मेहराब ।
वेदिका नाम चौत्रा स्यात् मैदानं तु प्रशस्तुभू: ।।२२।।
भवेदुपवं बागो रस्ता रथ्या प्रकीर्तिता ।
क्रीडावनं खासबाग: क्रीडास्थानं हवा स्मृतम् ।।२३।।
तारत्खाना मलस्थानं पागी मलहर: स्मृत: ।
कुदळीर्नाम कुद्दाल: पावडे स्यात् खनित्रकम् ।।२४।।
कुऱ्हाडी तु कुठार: स्यात् कोयता छेदक: स्मृत: ।
असिदस्तु भवेत्तेषा क्रकच: करवत: स्मृत: ।।२५।।
इळा दात्रं पहारस्तु फाल: खुर्पेतुणक्षुरम् ।
नि: श्रेणिस्तु शिडी चढणा ज्ञेयं आरोहणं बुधै: ।।२६।।
।। इति श्रीशिवछत्रपती राजव्यवहारकोशे दुर्गवर्ग: सप्तम: ।।

शिवाजी महाराजांच्या आज्ञेनुसार लिहिला गेलेला पहिला मराठी शब्दकोश म्हणजे राजव्यवहाराकोश हा शब्दकोश एकूण आठ नावानी ओळखला जातो.

१) राजव्यवहार कोश २) राज्यव्यवहार कोश ३) राजकोश ४) राजकोशनिधन्टु ५) व्यवहार कोश ६) शिवराज कोश ७) शिवरात्रपती राजकोश ८) शिवछत्रपती राजव्यवहारकोश

राजव्यवहारातील आपल्या मातृभाषेचे स्वरुप अधिक शुद्ध असावे असा जाणीवपूर्वक प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला. हे महत्त्वपूर्ण काम शिवाजी महाराजांनी रघुनाथ पंत हणमंते यांचेवर सोपवले. हे एक थोर मुत्सद्दी व प्रशासक होते.

राजव्यवहारातील नेहमी येणाऱ्या फार्सी व दख्खनी उर्दूतील शब्दांच्या ऐवजी संस्कृत पर्याय वापरुन त्याचे मराठीकरण केले. या कोशातील सातवे प्रकरण किल्ल्यांसंबंधी आहे.

२६ श्लोकांच्या अध्यापासून ९३ दुर्गसंज्ञाचा उलगडा होतो. त्याचे स्वरुप लक्षात येण्याकरता तीन भागात विभागले आहेत. प्रथम शिवकाळात प्रचलित असलेला दख्खनी यावनी शब्द, त्यानंतर त्याचा राजव्यवहारातील संस्कृत भाषेतील शब्द व शेवटी मराठी भाषेतील अर्थ. शिवकाळातील शब्द कोणत्या भाषेतून आला आहे त्या भाषेचे नाव पहिल्या विभागात त्या, त्या शब्दाच्या पुढे कंसात दिलेले आहे.

■■■

# राज व्यवहार कोशातील अर्थ

| | दख्खनी यावनी | संस्कृत | अर्थ |
|---|---|---|---|
| १. | अगळा (मराठी) | अर्गला | दरवाजाची कडी, अडसर |
| २. | अलंग (फार्सी) | परिरक्षा | सैनिकांची घरे, झोपड्या |
| ३. | इटा (मराठी) | इष्टिका | बांधकामासाठी वापरण्याच्या विटा |
| ४. | इमारती (अरबी) | शिल्पकार्यम | बांधकाम, गृहरचनाकार्य |
| ५. | इमारती हवालदार (अरबी, फार्सी) | शिल्पाधिकारिका | बांधकामावरील अधिकारी |
| ६. | इका (मराठी) | दात्रम | एक प्रकारचे हत्यार, विळा |
| ७. | उंबरठा (मराठी) | अलिन्दका: | उंबरठा, ओटा |
| ८. | अंबारखाना (फार्सी) | धान्यकोश: | गडावरील धान्यकोठार |
| ९. | कडा (मराठी) | भृगु: | डोंगराचा कडा |
| १०. | कडेलोट (मराठी) | भृगुपात: | डोंगराच्या कड्यावरून दरीत ढकलून देण्याची शिक्षा |
| ११. | करवत (मराठी) | क्रकच: | करवत नावाचे लाकूड कापण्याचे साधन |
| १२. | कारखाना (फार्सी) | संभारगृहम | किल्ल्यावर असलेले उपयुक्त सामग्रीचे कोठार |
| १३. | कारखानीस (फार्सी) | संभारलेखक | सामग्रीच्या कोठाराचा हिशेब लिहिणारा अधिकारी |
| १४. | कारखाना हवालदार (फार्सी) | मुद्राधिकारी | सामग्री कोठारावरील अधिकारी किल्लेदार |
| १५. | कारंजे (फार्सी) | जलसूत्रम | पाण्याचे कारंजे |
| १६. | किली (फार्सी) | कुचिका | कुलूप उघडण्याचे साधन |
| १७. | किल्ला (अर्बी) | दुर्ग: | किल्ला ४ |
| १८. | कोट (हिंदी) | प्राकार: | किल्ल्याची भिंत, तट |
| १९. | कुलूप (अर्बी) | लोहपाश: | कुलूप (मूळ शब्द कुफल) |
| २०. | कुऱ्हाडी (मराठी) | कुठार: | लाकूड फोडण्याचे एक साधन कुऱ्हाड |
| २१. | कुदळी (मराठी) | कुद्दाल | जमीन खणण्याचे एक हत्यार कुदळ |

| | | | |
|---|---|---|---|
| २२. | कोयता (मराठी) | छेदक: | लाकूड, झाड इ. तोडण्याचे एक हत्यार |
| २३. | कौल (मराठी) | कर्परांणि | घराच्या छपरावर शाकारण्याच्या भाजलेल्या मातीच्या खापऱ्या, नळे, कौले |
| २४. | खानजादेवाडा फार्सी+मराठी | कुमारसदनम् | राजपुत्राचे निवासस्थान, दासीपुत्राचे निवासस्थान |
| २५. | खासबाग (फार्सी) | क्रीडावनम | क्रीडेसाठी निर्मिलेली बाग |
| २६. | खुर्पे(मराठी) | तृणधुर: | खुरटे गवत कापून काढण्याचे हत्यार. खुर्पे |
| २७. | खंदक (अर्बी) | परिखा | किल्ल्याच्या तटाबाहेर संरक्षणासाठी खणलेला खोल चर. यात सामान्यत: पाणी असे. पाण्याऐवजी पाला, पाचोळा, गवत, लाकूड इ. सुध्दा या चरात भरून ठेवीत आणि शत्रू तिथवर येणार असा अंदाज आल्यास ते पेटवून देत.५ |
| २८. | खंबीर (मराठी) | चूर्णकर्दम: | बांधकामासाठी वापरण्याचा घाणीत मळलेला चुना |
| २९. | गड (मराठी) | गिरिदुर्ग: | डोंगरी किल्ला |
| ३०. | गडकोन (मराठी) | दन्तक: | डोंगराच्या उतरणीवरून पुढे डोकावणाऱ्या प्रचंड शिळा |
| ३१. | गडेकरी (मराठी) | पाषाणवाहक: | बांधकामासाठी लागणारे दगड वाहून नेणारा सेवक |
| ३२. | गल्ला (अर्बी) | धान्यम | किल्ल्यावर साठवून ठेवलेले धान्य |
| ३३. | गस्ति (फाका) | यामिक: | रात्रीच्यावेळी किल्ल्याच्या संरक्षणासाठी ठेवलेला जागृत पहारा |
| ३४. | गस्ती (फार्सी) | यामाटनम् | रात्रीच्या वेळी किल्ल्याच्या संरक्षणासाठी सैनिकांचे आत बाहेर फिरणे |
| ३५. | गिलावा (फार्सी) | लेप: | भिंतीवर द्यावयाचा चुन्याचा लेप |
| ३६. | गुसलखाना (फार्सी) | मन्त्रस्थानम् | गुप्त सल्लामसलत करण्याचे किल्ल्यावरील स्थान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७. | गौंडा (हिंदी) | भित्तिशिल्पी | भिंत बांधणारा कारागीर – गवंडी |
| ३८. | घाटगस्ती (मराठी+फार्सी) | घंटामामिक | घाटरस्त्यावरून ठेवलेला पहारा |
| ३९. | चढणा (मराठी) | आरोहगम | किल्ल्यावर चढणे |
| ४०. | चर्या (हिंदी) | प्रकार फालिका | तटाच्या फळ्या (?) |
| ४१. | चिरे (मराठी) | घटितोपल: | बांधकामासाठी सर्व बाजूंनी तासून घडविलेला दगड |
| ४२. | चौक (अर्बी) | चतुएष्कम | १) चौसोपी घराच्या मधले अंगण<br>२) चौकोनी तलाव |
| ४३. | चौकटी (मका) | द्वारबंधिका | दरवाज्याची चौकट |
| ४४. | चौत्रा (फार्सी) | वेदिका | चौथरा |
| ४५. | जकीरा (अर्बी) | संग्रह: | कोठार सामग्रीचा साठा |
| ४६. | जीभि (मराठी) | हस्तिनखा | किल्ल्याच्या प्रवेशद्वारापुढे बांधलेली भिंत. या भिंतीमुळे शत्रूला आत शिरणे अवघड होत असे. |
| ४७. | जंग्या (हिंदी) | प्रकारन्सणि | किल्ल्याच्या तटाला तोफांच्या व बंदुकांच्या माऱ्यासाठी ठेवलेल्या भोकांच्या विशिष्ट रचनेमुळे बंदुकीचा मारा कोन बदलून करता येतो. |
| ४८. | जंजिरा (अर्बी) | द्वीप | जलदुर्ग, पाणकिल्ला ६ |
| ४९. | झडपा (मराठी) | कपाटम | दरवाज्याची झडपे |
| ५०. | झरा (मराठी) | निर्झर: | किल्ल्याच्या डोंगरावरून वाहणारा झरा |
| ५१. | टाके (मराठी) | अश्रकूप: | दगडांनी बांधलेले किंवा कातळात किल्ल्यावरील पाण्याचे टाके |
| ५२. | झरोके (हिंदी) | गवाअणि | हवा व उजेड येण्यासाठी भिंतीला ठेवलेली भोके, झरोके |
| ५३. | तट सरनौबत | प्रकार पाल: | किल्ल्यावरील सैन्याचा प्रमुख |
| ५४. | तारत्खाना (फार्सी) | मलस्यानम | किल्ल्यावरील संडास, शौचकूप |
| ५५. | तेषा (फार्सी) | असिद: | एक प्रकारचे शस्त्र |
| ५६. | दरवाजा (फार्सी) | तोरणम | किल्ल्याचा मुख्य दरवाजा |

| | | | |
|---|---|---|---|
| ५७. | दिवाणवाडा (फाम) | राजमन्दिरम | राजाचे किल्ल्यावरील घर |
| ५८. | देव्हडी (मराठी) | देहली | देवडी |
| ५९. | धबधबा (फार्सी) | उत्स: | किल्ल्याच्या डोंगरावरील पाणलोट, धबधबा |
| ६०. | धमधमा (फार्सी) | प्रतिगुल्म: | तोफा चढवण्याचा उंचवटा |
| ६१. | पडकोट (मराठी) | प्राकारवलयम | पडकोट, तटाचे वळण |
| ६२. | पनाळी (मराठी) | प्रणाल: | पाणी वाहून नेण्याची खोलगट वाट पन्हाळ |
| ६३. | पहार (मराठी) | फाल: | पहार नावाचे खणण्याचे हत्यार |
| ६४. | पागी (फार्सी) | मलहर: | मैला वाहून नेणारा भंगी मूळ शब्द = पाकी |
| ६५. | पायरी (मराठी) | सोपानम | जिना |
| ६६. | पावडे (मराठी) | खनित्रकम | फावडे, खोरे |
| ६७. | फांजी (हि) | प्रकारवेदिका | तटाचा पृष्ठभाग |
| ६८. | बाग (फार्सी) | उपवनम | बाग, उद्यान |
| ६९. | बालगरेज (फार्सी) | वलीकम | वळचण, छपराचा पुढे आलेला भाग व भिंत यामधील जागा |
| ७०. | बालेकिल्ला (फार्सी) | उपत्यका | पहाडी किल्ल्याचा उंच सपाटीवरील पोट किल्ला. उंच जागीचा किल्ला |
| ७१. | बुरूज (अर्बी) | कोट्टगुल्मकम | किल्ल्याच्या तटाचा एक विशिष्ट भाग, बुरूज |
| ७२. | बेलदार (फार्सी) | पलगंड: | दगड तासणारा कारागीर, पाथरवट |
| ७३. | बंक (का) | कक्षा | ओसरी, पहाऱ्याची जागा |
| ७४. | मगर्बिवी | अश्मियत्रम | दगड फेकून मारण्याचे यंत्र. हे यंत्र अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात त्याला मग्रबी– 'पश्चिमेकडून आलेले' अशा अर्थी नाव पडले. |
| ७५. | माची (मराठी) | उपत्यका | सपाट पृष्ठभाग असलेला डोंगराचा फाटा किंवा सोंड. किल्ल्याच्या संरक्षणाच्या दृष्टीने माचीला महत्त्व होते. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६. | माडी (मराठी) | उपकारिका | माडी, उपरमाडी |
| ७७. | मेट (मराठी) | उपरअणम | पहारा, गस्त |
| ७८. | मेहराब (अर्बी) | कुडपनिडम | भिंतीतील कोनाडा |
| ७९. | मैदान (अर्बी) | प्रशस्तभू: | सपाट मोकळी जागा, मैदान |
| ८०. | मोर्चा (फार्सी) | उपसर्पणम | शत्रूच्या दिशेने कूच करणे |
| ८१. | रस्ता (फार्सी) | रस्या | रस्ता, मार्ग |
| ८२. | रेवणी (हिंदी) | परिखावलायम | मुख्यदारावरील खंदकापलीकडचा बुरूज ७ |
| ८३. | वेढा (मराठी) | परिघि: | किल्ल्याला दिलेला सैन्याचा वेढा |
| ८४. | शिडी (मराठी) | नि:श्रेणी | शिडी, निशीण |
| ८५. | सज्जा (मराठी) | चंद्रशाला | माडीचा हवेत तरंगणारा भाग |
| ८६. | सदर (अर्बी) | सभा | किल्ल्यावरील राजसभा |
| ८७. | सामान (फार्सी) | सामग्री | उपयुक्त वस्तू |
| ८८. | सुरुंग (मराठी) | विवरम | सुरुंग, किल्ल्याच्या तटाला पाडलेले भोक, भुयार |
| ८९. | सुलतानढवा (फा+अ) | साहसाधिसेह: | सर्व सैन्याने शत्रूवर निकराने हल्ला चढवणे, एल्गार. राजपुतांच्या केसरियासारखा हल्ल्याचा प्रकार (ढवा म्हणजे धक्का. सुलतानी धक्का) |
| ९०. | सुलाख (फार्सी) | वातायनम | बारा, उजेड येण्यासाठी भिंतीला ठेवलेली खिडकी |
| ९१. | संगत्रास (फार्सी) | अश्मत्रेत्ता | बांधकामाचे दगड तासणारा |
| ९२. | हरमहाल (अर्बी) | शुध्दान्त: | राजाच्या बायकोनी राहण्याचा महाल. अन्त:पुर, राणीवसा |
| ९३. | हवा (अर्बी) | क्रीडास्थानम् | खेळण्याची जागा |

■ ■ ■

## ३.५ शिवकालीन गड दुर्गांचे वास्तुशास्त्र

सतराव्या शतकाच्या सुरवातीला पुणे मावळ भागात परकीय मुसलमानी रियासतीविरुद्ध बंड उभारून स्वराज्याची भावना स्थानिक समाजात विशेषत्वाने जागृत होऊ लागली होती. परंतु सह्याद्रीतील गडदुर्गांची कित्येक वर्षे आबाळ होत राहिल्याने ते तितक्या चांगल्या स्थितीत राहिलेले नव्हते. लोकांना मात्र सुरक्षिततेसाठी त्यांची गरज भासू लागली होती.

अकराव्या बाराव्या शतकानंतरच्या काळात या गडदुर्गांच्या वास्तूच्या बाबतीत बरीच प्रगीतीही झाली होती. भाषेचे व्याकरण ती भाषा प्रगल्भ व बोलीभाषेत बरीच रूढ झाली होती. तसेच कलाहुन्नरांचेही शास्त्र अनुभवपूर्ण प्रगती झाली की निर्माण होते. कलेची प्रगती चालू राहते; परंतु अनुभवाने कलेतील मूलग्राही तत्त्वे निर्मित होण्यास काही काळ लागतो आणि विशेषत: परिणामांचे परीक्षण होण्याइतका काळ लोटल्याखेरीज कलेच्या शक्तिसामर्थ्याची किंवा कौशल्याची आदर्शनीय अशी स्थिती लोकास पटत नाही. सोळाव्या शतकाच्या अखेरपर्यंत गडदुर्गांच्या वास्तूच्या बांधकामातील कौशल्य, सुलभता व भक्कमता या बाबतीत सामान्यत: बरे आडाखे बांधले गेले होते. इतकेच नव्हे तर गडदुर्गांच्या बलाबलाचा विचार पुष्कळच दृढ झाला होता.

''राजव्यवहार कोशामध्ये'' 'दुर्गवर्ग' म्हणून एक स्वतंत्र २६ श्लोकांचे प्रकरण आहे. त्यात आलेल्या तत्कालीन म्हणजे सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात रूढ असलेल्या परिभाषेवरून त्या काळच्या गिरिदुर्गांचे स्थूलमानाने वास्तु बाबतचे जनमताचे चित्र रेखाटता येते.८

त्या प्रकरणातील परिभाषेचा आशय असा: ''गिरिदुर्गांना 'गड' व इतर दुर्गांना 'किल्ला' असे म्हणतात. द्वीपदुर्गांना 'जंजिरा' व नुसताच तटांकित गढीसारखा तटसंरक्षित भाग असेल त्याला 'कोट' असे संबोधीत असत. गडांच्या डोंगराच्या बाजूस 'कडे' तुटलेले असत वर 'शिखरे' असत. त्यासभोवती 'तट' व तटाला विशिष्ट जागी 'बुरूज' बांधीत असत. गडांच्या पायथ्याला 'माची'चे डोंगर असत व तेथे परचक्राच्या परिहारार्थ तोंड देता यावे म्हणून माचीचा बंदोबस्त करीत व गडांत एक 'बालेकिल्ला' ही बांधीत असत. इतर दुर्ग व 'भुईकोट' ही बांधीत असत.

खंदक जेथे वलयाकार असे तेथे त्याला 'रेवणी' असे म्हणत. तटाच्या पृष्ठभागावर एक 'पडकोट' म्हणजे भिंत बांधीत असत. तटाभोवती टेहळणी करण्यासही सुरक्षिततेच्या दृष्टीने सोईची असे. कारण त्या तटाच्या भिंतीत जी भोके ठेवलेली असत आणि ज्यांना 'जंग्या' म्हणत त्यातून थेट पायथ्यापर्यंतच्या हालचालीवर गुप्तपणे लक्ष ठेवणे शक्य होत असे. गस्तीच्या सोयीसाठी 'फालिका' म्हणजे 'चर्या' ही असत. गडाला 'दरवाजे' असत. मुख्यत: दरवाज्याच्या माडीवर एक 'देवडी' व तेथून बाहेर पाहता येण्यासाठी तिला 'झरोखे' असत. त्या देवडीवर जाण्यासाठी एक 'जिना' ठेवीत व देवडीवरील छपरावर 'सज्जा' किंवा देवडीला 'गच्ची' बांधीत. दारांच्या 'चौकटी' व 'दारे' ही फार मजबूत व न किडणाऱ्या लाकडाची असत.

मुख्य दाराच्या 'उंबऱ्या'च्या बाहेर एक चांगला 'ओटा' बांधीत व त्या ओट्याचा उपयोग बाहेरील देवडीसाठी करीत. दाराला आत भक्कम 'अर्गळा' व बाहेर व आत 'कुलप' लावीत. देवडी व तटातील पावसाचे पाणी बाहेर जाण्यासाठी लहान लहान 'गटारे' किंवा 'नळ' टाकीत. दरवाजाच्या आत एखादे

'कारंजे' व मोठे उघडे 'मैदान' किंवा 'चबुतरा' राखीत, खास 'बागा' ही लावीत, गडकिल्ल्यात हरएक लढाऊ वस्तूंचा संग्रह म्हणजे 'जकीरा' असे व जीवनोपयोगी आवश्यक सामुग्रीचा भरपूर 'साठा' ठेवीत. हा साठा किमान एक दोन वर्षे गडावरील सर्व लोकांस भरपुर प्रमाणात मिळेल इतका शिल्लक ठेवला जाई. त्यासाठी गडावर एक 'अंबरखाना' म्हणजे धान्याचे कोठार असे व हे धान्य किंवा 'गल्ला' गडावरील व गडावर अवलंबून असणाऱ्या लोकांस भरपूर होईल असाच संग्रहीत केला जाई. त्याशिवाय एक 'कारखाना' बांधला जात असे. त्यामध्ये युध्दसामुग्री असे. शत्रूला केव्हा 'हल्ला' चढवील व राक्षसी साहस करून 'सुलतानढवा' करील व केव्हा गुपचुपपणे तटाला 'सुरुंग' लावून किल्ला उडवून देऊन चढाई करण्याचा प्रसंग गुदरवील हे सांगता येण्यासारखे नसे. सुरुंग लावताच त्या जागेच्या आतील बाजू खणून त्यात पाणी सोडून ते सुरुंग निकामी करणे हेच एक महत्त्वाचे बचावाचे साधन होते. गडाच्या वसुलीचा व खर्चाचा हिशोब ठेवणारा 'कारखानीस' आवश्यक असे आणि गडाची सर्व व्यवस्था पाहण्यासाठी एका गडाला मुद्राधिकारी 'हवालदार' नेमीत. त्याप्रमाणे किल्ल्याच्या व तटाच्या संरक्षणार्थ एक 'तटसरनौबत' व गडाच्या डागडुजीसाठी 'इमारती हवालदार', 'गवंडी', 'बेलदार' वगैरे कारागीर नोकरीत ठेवावे लागत असत. सर्व इमारती मजबूत राखण्यासाठी ते चिखलाचा व चुन्याचा गिलावा तयार करून डागडुजी करीत.

कुदळी, फावडी, कुऱ्हाडी, कोयते, कर्वती, इळे, पहारी, खुर्पी, लाकडी व दोरीच्या शिड्या वगैरे सामानाचा भरपूर संग्रह ठेवून दैवी व मानुषी आपत्तींना तोंड देण्याची जय्यत तयारी सारखी राखावी लागे. 'गडकरी' म्हणजे गडाच्या प्राकारात पायथ्याशी शेती करून राहणारे लोक. त्यांना दगड, विटा, कौल, चिरे वगैरे वाहण्याचे काम करावे लागे. गडामध्ये जिवंत 'झरे' असत. त्यासाठी खडकात 'टाकी' खोदीत असत. मोठमोठ्या गडांवर तर 'दिवाणवाडा' 'सदर' 'खानजादेवाडा' किंवा 'युवराजाचा वाडा' किंवा 'मंत्रस्थान' म्हणजे खलबत करण्याची गुप्त जागा असे. सर्वत्र स्वच्छता पाळणे प्राप्तच असे. त्यामुळे गडात 'तारत्खाना' म्हणजे 'शौचगृह' व त्यासाठी 'भंगी' ही असत.

शिस्त पाळण्याची तेथे खरी कसोटी असे. ती कसोशीने पाळली जाऊन हरएक धनसंपत्ती व दाणागोटा यांचे साठे व्यवस्थित व सुरक्षित राखण्याचे काम या मोठ्या दुर्गात विशेषच करावे लागे. शिवाय सभोवताली शेतसारा व इतर करवसुली या अधिकाऱ्यांकडे असल्याने गडात बरेच इतर नोकरही असत आणि या दृष्टीने किल्ल्याची आणि किल्ल्यामधील बांधकामाची योजना करीत असत. शहरकोटात तर 'चतुरंग' सेनेचीही सोय करावी लागे.

रघुनाथपंत हणमंतेंच्या या परिभाषा अर्थबोधावरून तत्कालीन गडकोट दुर्गाचा कार्यविस्तार व त्यात आवश्यक अशा वास्तु कोणत्या होत्या याची कल्पना येते. हा उल्लेख सतराव्या शतकाच्या ऐन मध्यकालाचा असल्याने तो गडकिल्ल्यांच्या वास्तु तयार करणारे व त्या दुरुस्त ठेवणारे कारागीर वंशपरंपरागत अनुभवी लोक असत. ते आपआपल्या कामामध्ये तरबेज असत. मात्र यांचे हे धंदेशिक्षण पुस्तकी नसे. कारण त्या काळी एखादा हस्तलिखित ग्रंथ उपलब्ध होणे व तो उपयोगासाठी नकलून ठेवणे वगैरे काम तत्कालीन परिस्थितीत पुष्कळ खर्चाचे व अनेक अडचणींचे असे. त्यामुळे हे सर्व कारागीर आपआपल्या धंद्यातील ज्ञान व कसब आपल्या वडील माणसांच्या हाताखाली लहानपणापासून राबून अनुभवाने व त्यांच्या मार्गदर्शनाने मिळवीत व चांगले तयार होत. धंद्याबाबतच्या मोजमापांची कोष्टके व आडाखे ते वंशपरंपरागत पाठांतरातून होत. परंतु राजे व राज्याध्याधिकारी यांना

मात्र सर्वच कारभाराची सूत्रे व तत्त्वे समजून घेणे आवश्यक असे आणि त्यामुळे त्यांना या सर्व विद्यांचे ज्ञान ग्रंथावरून प्राप्त करून घ्यावे लागे. शिवाजी महाराजांनी या सर्व बाबतीमध्ये उत्तम ज्ञान संपादले होते. हे तत्कालीन पत्रव्यवहारावरून स्पष्ट होते. त्यांनी आपल्या वडील मुलाला म्हणजे संभाजी महाराजांना जे शिक्षण दिले होते त्यातील सूत्रांच्या नोंदी संभाजी महाराजांनी आपल्या 'बुध भूषणम्' या ग्रंथामध्ये केलेल्या आहेत. या ग्रंथामधील 'राजनीती' प्रकरणात त्यांनी दुर्गाच्या विषयीची माहिती दिली आहे. त्यामधील आशय असा: तटाच्या आधाराने एक योध्दा शंभरांशी आणि शंभर योध्दे दहा हजारांशी तोंड देऊ शकतात, म्हणून राजाने नेहमी दुर्गाचा आश्रय करावा. धान्वदुर्ग, महीदुर्ग, नरदुर्ग, वार्क्ष, अंबदुर्ग व गिरीदुर्ग असे दुर्गाचे सहा प्रकार आहेत. परंतु सर्वांमध्ये गिरीदुर्गच श्रेष्ठ होय.९

त्याच्याच साह्याने धनवित्ताचे उत्तम प्रकारे संरक्षण करता येते. त्यातल्या त्यात ज्या गडामध्ये उंच पर्वताची शिखरे आहेत व सभोवती खडक किंवा कडे तुटलेले असून तटही आहेत तो गड उत्तम. शिवाय अशा गडाला भक्कम बुरूज व इतके मोठे दरवाजे असावेत की राजा ध्वजपताकांसह हत्तीवरून सहज आतमध्ये शिरू शकेल.''

मजबूत किल्ल्यामध्ये राजाने आपले मंदिर मध्यभागी व विपुल जलवृक्षांनी परिवेष्ठित असे बांधावे आणि आपल्या सर्व संपत्तीचे संरक्षण करून सुखी रहावे. गडामधील राजमंदिरापासून चार दिशास चार रस्ते बांधावेत. एका रस्त्याला देवभाग, दुसऱ्याला राजभाग, तिसऱ्याला धर्माधिकरणविभाग व चवथ्याला गोपुरविभाग समजावे.

गड लांबोडा, तिकोनी, यवमध्याकृति, अर्धचंद्राकार किंवा वज्राकार असावेत. परंतु अर्धचंद्राकार गड फक्त नदीच्याच काठावर बांधावा, इतरत्र नाही. गडात कोशगृह, गजशाला, अश्वशाला, आणि गोशाला, आयुधागार, पाकशाला, होमशाला, धर्मकर्मशाला किंवा होमशाला, तशीच पुरोहित, मंत्री, ज्योतिषी, वैद्य वगैरे करिताही घरे कशी व कोठे बांधावीत याचे वर्णन आले आहे. या गोगजाश्वशाला स्वच्छ राखण्याची कोशीश केली पाहिजे म्हणून सारथी, योध्दे, शिल्पी, मंत्री व काल जाणणारे, पशुवैद्य वगैरेंची गडात राहण्याची युक्त सोय केली पाहिजे. त्याचप्रमाणे कुलशीलवान असे, विप्र आदि लोकांसही गडात राखावेत. परंतु जितके आवश्यक तितक्यांनाच गडामध्ये जागा द्यावी.

सारांश या 'बुधभूषणा'तील माहितीत गडाची व्यवस्था कशी राखावी याचाच संक्षेपाने ऊहापोह केला आहे.

''दुर्गाची शक्ती त्यातील संपत्तिसंग्रहावर अवलंबून असते. म्हणून ही विविध संपत्ती कोणती याचाही माहिती आलेली आहे. दुर्गांच्या रक्षणार्थ युध्दसामुग्री भरपूर असावी. या युध्दसाहित्यात निरनिराळ्या अस्त्रसंग्रहांचा मुख्यत्वाने विचार करावा. गुप्तपणे आयुधांच्या संग्रहात चांगली धनुष्ये, बाण, धोपणी म्हणजे गोफणी, खडगे, चिलखते, कणप, त्रिशूल, पट्टे, प्रास, परशू, चक्रे, वर्मासह तपण, कुऱ्हाडी, दोर, वेत्र वगैरे असावीत. कारागीर व शिल्पकार यांचा चांगला संचय, वाद्ये व औषधी, विपुल गवत व सर्पण, गूळ, सर्व तऱ्हेची तेले, दूध यांचा साठा, त्याप्रमाणे चरबी, मज्जा, स्नायू, हाडे, चामडे आणि कापड, ताग, राळ, भूर्ब, लाख, लाखेचे रंग, टाकणखार; इतकेच नाही तर अडीअडचणीस जरूर लागणाऱ्या सर्व वस्तूंचा संग्रह असू द्यावा.

विशेषत: रत्ने, लोखंड, सर्व प्रकारची धान्ये, म्हणजे सातु, गूळ, गहू, कोद्रू, मूग, उडिद, हरभरे, तीळ वगैरे; सर्व प्रकारचे गवत, माती, शेण, मातीचे डेरे, साठविलेले असावेत. विषारी साप, सिंह, भुंगे,

हिंस्त्र पक्षी हेही निरनिराळ्या जागी बाळगावेत. तसेच विषाचे शमन करणारे लोक व भूतपिशाच्चाचे उच्चाटण करणारे मांत्रिक गडात असू द्यावेत. मात्र भित्रे, रागीट, उन्मत्त, अवमान करणारे, द्वाड नोकर, पापमार्गाकडे प्रवृत्ती असलेले अशा अनिष्ट माणसांना गडात चुकूनसुध्दा थारा देऊ नये. शत्रु संकटसमयी सभोवताली व्यापारी व धनिक वगैरे लोकांची धनसंपत्ती गडात राखावी.

सारांश, युध्दार्थ व जीवनार्थ आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तूंची तरतूद करून ठेवावी अशी त्यावेळची सुज्ञांची शिकवण होती. म्हणूनच या सर्व कार्याकरता जो दुर्गाध्यक्ष म्हणजे दुर्गांचा अधिकारी किंवा हवालदार नेमावयाचा तो शत्रूस हार न जाणारा, शूर, मितभाषी, कुलशीलवान, सर्व कामे करण्यास सतत तयार असलेला असावा. अशा गडात राजाला सुखात राहता येते.

''बुधभूषणातील'' ही माहिती सामान्य गडकोटातील लोकांच्या गरजांचे स्वरूप जाणण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. गडकोटातील वास्तूत कोणत्या गोष्टींचा समावेश करणे प्राप्त असते याचाही बोध घेण्यासारखा आहे.

सोळाव्या शतकात दक्षिणेत 'आकाश भैरव कल्प' या नावाचा एक ग्रंथ लिहिला गेला. त्या ग्रंथाचे हस्तलिखित अपूर्णावस्थेतच मिळालेले आहे. त्या ग्रंथाच्या सात प्रती उपलब्ध आहेत, तरीपण त्या अपूर्णच आहेत.

ह्या सर्व तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात सापडल्या असून त्याची एक नक्कल बनवून आणून भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये संग्रहित केलेली आहे.

त्याच प्रतीचा या ठिकाणी उपयोग करण्यात येत आहे. या हस्तलिखितातील पहिल्या वीस पटलात साम्राज्य लक्ष्मीमहात्म्यपूजा, महाशांती वगैरे विषय आलेले आहेत. एकवीस ते सत्ताविसाव्या पटलामध्ये अष्टविध गिरिदुर्गाची माहिती आहे.

अठ्ठावीस ते पस्तीस पटलापर्यंत पुरंदरनिर्मितीबाबत विचार आहे. छत्तीस ते त्र्याऐंशी पटलामध्ये तीर्थव्रतांच्या तपशीलांनी माहिती आलेली आहे.

चौऱ्याऐंशी ते एकशे चार पटलात राज्याभिषेक व एकशे पाच ते एकशे दहा पटलात शांति-स्वप्न-लक्ष्मण वगैरेची चर्चा आहे. एकशे अकरा ते एकशे एकवीस या पटलात राजनीती व युद्धोपयोगी माहिती दिली असून त्यानंतर एकशेपस्तीस पटलापर्यंत राजाचे दैनंदिन आचार व त्यास युक्त असे कालमुहूर्त यांचा विचार सांगितला आहे; यापुढील मजकूर गहाळ. या हस्तलिखिताची एकंदर ५३६ पाने उपलब्ध आहेत व मूळ सरस्वती महालमधील पोथीची १३२ पाने मिळाली असून या पोथीचा परिचय कै.डॉ. पी.के. गोडे यांनी इ.स. १९३८ मध्ये करून दिलेला आहे. हा कवी विजयनगरच्या राजाचा आश्रित होता. याचा काल सोळाव्या शतकातील असल्याने तो सतराव्या शतकाच्या सुरवातीची गडदुर्गाच्या वास्तुपध्दतीची ओळख करून देतो.

कृष्णदेवराच्या कारकिर्दीतील लाला लक्ष्मीधराने आपल्या 'देवज्ञ विलासात' दुर्गांचे आठ प्रकार मानले आहेत. तो लिहितो : ''प्रथमं गिरिदुर्गच वनदुर्ग द्वितीयकम् । तृतीयं गव्हरं दुर्ग जलदुर्ग चतुर्थकम् ।। पंचमं कर्दमं दुर्ग षष्ठं स्यान्मिश्रकं तया । सप्तमं ग्रामदुर्ग स्यात् कोष्टदुर्ग तथाष्टकम् ।।''

''आकाशभैरवकल्पात'' अगदी याच शब्दांत या दुर्गाच्या आठ प्रकारांचे वर्णन आलेले आहे. आपल्या व राज्याच्या रक्षणाचे सामर्थ्यवान साधन म्हणूनच राजे, सम्राट वगैरे दुर्ग बांधून त्यांचा आश्रय घेतात.

या दुर्गांचे आठ प्रकार मानले जातात : १) गिरिदुर्ग २) वनदुर्ग ३) वार्ध्य म्हणजे गुहा किंवा निबिड अरण्यातील दुर्ग ४) जलदुर्ग ५) चिखलातील मातीत बांधलेला म्हणजे पंकदुर्ग ६) नाभच्या आबरासारखा वाळवंटातील किंवा ओसाड मैदानातील नाभी किंवा मिश्र दुर्ग ७) नरदुर्ग आणि ८) कोष्टदुर्ग. कठीण चढ असलेल्या, शिखरावर रुंद पठार असलेल्या, जिवंत विपुल पाण्याची टाकी असून वरखाली तटाने परिवेष्ठित असलेल्या, डोंगरी किल्ल्याला गिरिदुर्ग असे म्हणतात. या गिरिदुर्गात आठ प्रकार आहेत.

१) भद्र

२) अतिभद्र

३) चंद्र

४) अर्धचंद्र

५) नाभ

६) सुनाभ

७) रचिर

८) वर्धमान

हे उपभेद जाणण्याचे साधन म्हणजे त्यांचा आकार व बलाबल होय.

१) जो गड वर्तुळाकार, स्निग्ध, उंच शिखरावरील सपाट पठारावर असून, ज्या गडात जिवंत पाण्याची विपुलता आहे त्याला भद्रदुर्ग असे म्हणतात. अशा दुर्गावर राजा आपल्या गजावर बसूनही ध्वज पताकासह सहज जाऊ शकतो.

२) ज्या पर्वताचे टोक किंवा शिखर प्रमाणबद्ध अतिउन्नत, चौकोनी व वरील शिखर विस्तीर्ण असून त्यावर जो जिवंत पाण्याने समृध्द असा किल्ला असतो त्याला अतिभद्र असे संबोधतात.

३) ज्या डोंगराचा पायथा दंडासारखा लांबलचक, चढण्यास दुर्घट, शिखर विशाल व चंद्राकार असते आणि वर जिवंत पाण्याचा साठा मुबलक असतो त्या किल्ल्याला चंद्रदुर्ग अशी संज्ञा आहे.

४) ज्याचा पायथा व शिखर सारखीच चंद्राकृती आहेत व जो फार लहान व फार उंचही नाही, परंतु ज्यावर उत्तम पाण्याचा साठा भरपूर आहे त्याला अर्धचंद्रदुर्ग असे म्हणतात.

५) ज्याचा पायथा अकुंचित व वर आस्ते आस्ते मोठा होत गेला आहे अशा डोंगरावर जो कंज कीर्णकार कर्णिकाराच्या कमळाप्रमाणे दिसणाऱ्या फुलासारखा दिसतो. त्या दुर्गास नाभदुर्ग संबोधण्यात येते.

६) पायथ्यास रुंद व क्रमाक्रमाने शिखरापर्यंत अरुंद होत गेला आहे अशा पर्वतावरील किल्ल्यास सुनाभदुर्ग असे म्हणतात.

७) जो पूर्ण उंच व विपुल जिवंत पाण्याने समृध्द आहे आणि पायथ्यापासून शिखरापर्यंत वर जाण्याकरता लहान मोठ्या पायऱ्या बांधल्या आहेत. त्याला रुचिरदुर्ग असे नाव आहे.

८) जो अर्दलाकार डोंगरावर बसविला आहे त्या किल्ल्याला वर्धमानदुर्ग असे म्हणतात.

सामान्यत: गडांच्या आकारावरून आणि त्यांच्या विशिष्ट परिस्थिती व बांधणीवरून त्यांचे प्रकार कल्पिण्यात आले आहेत. गडदुर्गाचा भर निसर्गाच्या बळाचा शक्य तेवढा अधिक फायदा घेण्याकडे

आहे. त्यामुळे साहजिकच उभे कडे तुटलेल्या उंच शिखरावरील गिरिदुर्गांना श्रेष्ठ मानण्यात आले होते. सपाट प्रदेशापेक्षा डोंगरदरीच्या प्रदेशात या गडदुर्गांच्या वास्तूत विविधता येणे साहजिकच होते.

गडदुर्गांच्या बाबतीत कोट किंवा तटांना अधिक महत्त्व असते.

त्या तटांच्या बांधकामातील रचनेवर आणि योजनेवरच गडदुर्गांचे सामर्थ्य अवलंबून असते. गड बांधताना बांधवणाराला अपेक्षित परचक्रांची किंवा शत्रूंची जितकी भीती वाटत असे तितक्या प्रमाणात त्यांनी ते किल्ले कार्यक्षम म्हणजे दुर्जेय करण्याचे प्रयत्न केले होते. परिस्थित्यनुरूप त्यामध्ये शक्य ते फेरफार करून नवीन संकटास तोंड देण्यासाठी कोठे कोठे सुधारणाही केल्या गेल्या, परंतु ह्या सर्व सुधारणा मर्यादित स्वरूपाच्या राहाणे स्वाभाविक होते. तटाच्या बाबतीत तर डागडुजी व बुरूज, द्वारे यांची दुरुस्ती नेहमीच करावी लागे. कारण कोष्ट, कोट किंवा दुर्गाच्या 'साली' लाच प्रतिकारशक्तीत मुख्य स्थान होते. ही साल आठ प्रकारची असते असे शिल्पशास्त्रविशारदांनी सांगितले आहे. हा तट आठ प्रकारचा असू शकतो. चौकोनी, आयत किंवा लांबट चौकोनी व पद्म किंवा कमलाकार, वर्तुळाकार, दीर्घ वर्तुळाकार, पंचकोनी, षटकोनी, अष्टकोनी या सामान्य आकाराहून निरनिराळ्या आकाराचे कोटही चांगले शिल्पकार बांधतात. शुभमुहूर्तावर आणि शिल्पकारांना बक्षिसे देऊन राजा पाषाणाच्या तोडी, विटा किंवा मळलेली माती यांच्या साहाय्याने तटाचे काम सुमुहूर्ताने सुरू करितो. येथे फलज्योतिष आणि विविधप्रयोगाची चिकित्सा करण्याचे कारण नाही. या बांधकामाची उंची, लांबी, रुंदी वगैरेची मोजमापे दुर्गाचा ज्या तऱ्हेने उपयोग करावयाचा असतो त्या अनुसंधानाने मुक्रर केली जातात.

**ह्या मोजमापांचे ''आकाशभैरवकल्पा''तील कोष्टक अशा प्रकारे–**

आठ 'यवमध्य' जाडीचे अंतर म्हणजे एक अंगुली किंवा बोट, चोवीस बोटांचा एक हात, चार हात म्हणजे एक धनु, चार धनूंचा एक दंड, या मापाने आठशे दंड किमान लांबीचा तट उत्तम; सहाशे दंड लांबीचा मध्यम आणि चारशे दंड लांबीचा कनिष्ठ मानला जातो. या तटास अनुरूप असा खोल खोदून पाया बांधावा लागतो. पायात प्रथम वाळू घालावी व नंतर भक्कम पायावर तटाची दहा हात उंच व तीन हात रुंद अशी भक्कम भिंत उभारावी. तटास लावलेल्या तोडी किंवा विटा चुन्यामधे चांगल्याप्रकारे बांधून काढून ही भिंत सभोवार बांधावी. भिंतीवर थोडे नक्षीकामही करावे. त्यायोगे किल्ल्यास शोभाही येते व योध्द्यांना गुप्तपणे राहता व वावरताही येते. भिंतीच्या वरच्या बाजूस टेहळणीसाठी क्रमाक्रमाने छिद्रे पाडावीत. कोटाच्या आतल्या बाजूस दहा हात रुंदीचा एक गस्तीसाठी तटावरून फिरण्याकरता सभोवार चबुतरा बांधावा. त्यावर जाण्याकरता पायऱ्या बांधाव्यात.

दुर्गाचे दार तीन किष्कु (किष्कु म्हणजे दीड फूट) म्हणजे तीन हात व सहा किष्कु म्हणजे सहा हात उंच असल्यास ते उत्तम समजावे.

जे अडीच किंवा तीन हात रुंद व पाच हात उंच असेल ते मध्यम होय.

जे द्वार दोन हात रुंद व चार हात उंच असेल ते अधम जाणावे.

जे द्वार शिलेच्या चौकटीत बसविले जाते ते मध्यम प्रतीचे समजले जाते.

परंतु यातही ती शिला पुंशिला असल्यास श्रेष्ठ, स्त्रीशिला असल्यास मध्यम आणि नपुंसकशिला असल्यास अधम मानावी. ज्या शिलेला टोला मारला असता घंटानादासारखा खणखणीत आवाज येतो ती पुंशिला समजावी. जी तीन आवाज देते ती स्त्रीशिला व कास्यासारखा आवाज देते ती नपुंसक

जातीची शिला समजावी. प्रत्येक बाह्य दरवाजाखालील उंबरठ्यावर भद्रमुख कोरावे. वरच्या भागावर यक्षराक्षसांच्या प्रतिमा उठावदार अशा कोराव्यात. त्यावर अति भयंकर सिंहाच्याही आकृती ठसठशीत अशा खोदाव्यात. बाहेरील प्रत्येक दारावर तीन किंवा पाच मजले अथवा शोभिवंत गच्ची बांधावी. दरवाजा व्याघ्रमुखी असावा आणि तो तटापेक्षा उंच किंवा तटाएवढा तरी असावा, प्रत्येक कोटाला द्वार असावे व अंतिम द्वारावर तीन किंवा चार मजले, एक गच्ची व त्या गच्चीस लागून एक गोपूर असावे. तटास लागूनच द्वाररक्षकास राहण्यासाठी चौकी बांधून द्यावी.

ती चौकीदाराची दर्शनी असल्याने, जरी सुंदर नसली तरी, मनोहर खांबावर आधारलेली असावी. आतल्या तटांच्या दरवाज्यांची बांधणी अशी असावी की बाहेरच्या पूर्व दरवाज्याने आत शिरणाऱ्या माणसाला आतील तटात समोर दार नसून त्याला दक्षिणेकडे गेल्यावरच वाट मिळेल; दक्षिणद्वाराने शिरणाऱ्यास पश्चिम दरवाजा शोधावा लागेल व उत्तर दरवाज्याने शिरणारास पूर्वेकडे यावे लागेल. सारांश, किल्ल्यात जाण्यास सहज सरळ वाट ठेवल्यास शत्रूचा प्रतिकार करणे जड जाईल. सर्व बाहेरील व्याघ्रमुखी असावेत. आतल्या कपाटाच्या दरवाज्यासारखे साधे पण भक्कम असावेत. बाहेरच्या पूर्व द्वारावर विन्घराज, दक्षिण द्वारावर उग्रदेवी (कालिका) स्थापावी.

पश्चिम दरवाज्यावर भद्रकाली व उत्तरेस हनुमंत स्थापावा. दरवाज्यास भक्कम अशी अर्गळा असावी व दरवाज्याच्या पुढील बाजूस लोखंडी जाड पट्ट्या व खिळे असे ठोकावेत की त्याचा अंकुशासारखा प्रभाव पडून मस्त हत्तीही ती द्वारे फोडण्यास तयार होणार नाहीत. कोटाबाहेरील खंदकावर काढता घालता लाकडी पूल किंवा फळ्यांचा सेतु किंवा शिला विटा यांचा पूल बांधावा.

'आकाशभैरवकल्प' व 'राजव्यवहारकोश' या आधारे दिलेल्या या माहितीवरून गडदुर्गांच्या वास्तूची व्याप्ती कशी वाढत गेली याची स्पष्ट कल्पना येते.

गडदुर्गांच्या बलाबलाचा विचार जसा त्यांच्या बांधणीवरून करिता येतो, तसाच तो ज्या ठिकाणी वसविला गेला त्या ठिकाणासभोवतालच्या परिस्थितीवरूनही करावा लागतो.

'आकाशभैरवकल्पा'त कोणते दुर्ग राजास वस्ती करण्यास वर्ज्यनीच होत याची चर्चा केलेली आहे.

जो दुर्ग सुईमुखासारखा अथवा शूर्प म्हणजे सुपाच्या आकारासारखा असतो किंवा शकटाकृती किंवा मध्ये खंड पडलेला, अथवा अति वक्र अथवा दंडाकार, अथवा हलाकार असतो, त्या दुर्गात राजाने आपले वसतिस्थान करू नये.

कारण सूचिदुर्गात राजाला तोंड फिरवावे लागते, नराकार राजा शौर्यहीन होतो, शकटाकारी दुर्गात राजा धनहीन राहतो. शाकहारी दुर्गात व्याधियुक्त होतो, अति वक्र दुर्गात सदा युध्दच करावे लागते, दंडाकारी दुर्गात नृप निंदेला पात्र होतो. कौटिल्याने धनवित्ताच्या संरक्षणास अधिक महत्त्व दिले आहे. कोर्टदुर्ग व जलदुर्ग हे तत्कालीन नरदुर्गाच्या शक्तीला व नरदुर्गाच्या हाती असलेल्या शस्त्रास्त्रांच्या व गजाश्वादि साधनांच्या वाढत्या उपयोगामुळे ते पूर्वीसारखे बलवान मानले न जाता सतराव्या शतकात गडदुर्गच खरे बलवान होते.

सतराव्या शतकातील अण्वस्त्रे मोठमोठे गडदुर्ग उडवण्याइतकी सामर्थ्यवान नव्हती. ती शस्त्रास्त्रे निबिड अरण्यातून तसेच डोंगरी रस्त्यातून नेणेही तितके शक्य होत नसे. शस्त्रांपेक्षा अस्त्रांवरच अधिकाधिक भर देण्यात आल्याने कर्दम व कोटदुर्ग सपाटीवर असल्याने तितकासा टिकाव काढू शकत

नव्हते. कारण अधिक बलाच्या साहाय्याने मर्यादित स्वरूपाच्या दुर्ग कोटांना वेढून आणि सभोवताली प्रदेश काबीज करून कोटातील लोकांची उपासमार, आतील घरादारांची जाळपोळ, तटांना सुरुंग लावून उडवणे वगैरे चढाई करणे फारसे जड जात नव्हते.

राज्याचा भार विस्तृत होत गेल्याने त्यांच्या सैन्यांचाही तितकाच विस्तार झाला. सतराव्या शतकाच्या सुरवातीस तर गडकोटांसमोर माऱ्याच्या जागी धमधमे रचून त्यावरून सामान्य स्वरूपाच्या तोफाही डागण्याइतकी मजल गेली होती. त्यामुळे सपाटीवरील दुर्गकोटांचे बल सभोवतालील परिस्थितीवर व मदतीवर अधिक अवलंबून असे.

गिरिदुर्गांची परिस्थिती मात्र सतराव्या शतकाचे अखेरपर्यंत तरी तितकी निर्बल झाली नव्हती. इस्लामी सत्तांनी नरदुर्गावरच अधिक भर ठेवला होता. त्यांनी प्रदेश काबीज करून तो पूर्णपणे राजनियंत्रणाखाली आणण्याच्या भरीस न पडता मांडलिकत्व स्वीकारणाऱ्या किंवा नोकरीत येणाऱ्या सरदारांच्या ताब्यामध्ये मुलखाची व्यवस्था व किल्ल्यांचा ताबा ठेवला होता. त्यामुळे त्यास फक्त स्थानिक महत्त्व प्राप्त झाले होते आणि अर्थातच बऱ्याचशा गडदुर्गांची आबाळही होत राहिली.

एक तर या सत्तांचा विस्तार फार दूरवर झाल्याने सामान्य बंडाईखेरीज त्यांना राज्यसंभारासाठी गिरिदुर्गांची मदत घेण्याचे कारण पडत नव्हते. शिवाय गिरिदुर्गांना विशेष सामर्थ्य प्राप्त करून द्यावयाचे तर या इस्लामी सत्तांजवळ त्यांचे खात्रीचे असे मनुष्यबळ नव्हते.

सपाट प्रदेशामध्ये गड किल्ले झुंजवण्याचे प्रसंग फारच थोड्यावेळी मोगल सत्तेस आले. दक्षिणेतील इस्लामी सत्तेनेही काही मुख्य गडांखेरीज इतरांकडे दुर्लक्षच केले.

■■■

# ३.६ किल्ल्यांच्या बांधणीचे प्राचीन संदर्भ

तसं पाहिलं तर अवघ्या जीवसृष्टीत मानव हा एक अतिशय केविलवाणा प्राणी भासतो. कारण तो दिसायला लहानखुरा, थंडीवाऱ्यापासून बचाव करायला ना भरपूर केस ना जाड कातडी. नख्या-तीक्ष्ण दात-टोकदार शिंगे असं आक्रमक बचावाचं नैसर्गिक साधन त्याच्यापाशी सुरवातीपासूनच नव्हतं. प्रचंड आवाज, भरपूर वेग, उडता येणं यासारख्या गोष्टीही त्याच्याजवळ नव्हत्या. हा भित्रा द्विपाद खडकांच्या झाडांच्या आश्रयाने राहत असे. तेव्हापासून जळतं लाकूड, सहज फेकून मारता येण्याजोगी दगड काठ्या अशी शस्त्रे किंवा बंदिस्त आडोसा करणं अशा उपयांनी तो स्वत:चे संरक्षण करीत असे.१०

क्वचित कधी गुहेसारखा सुरक्षित आडोसा मिळाला, तर गुहेवर बसवण्याजोगी शिळा हा संरक्षणाचा उत्कृष्ट प्रकार. हा भित्रा प्राणी समूहानं वावरू-हिंडू-फिरू लागला. अन्नशोधक मानवापासून अन्नउत्पादक मानवांपर्यंत प्रगती झाली.

वस्त्रप्रावरणे, धारदार शस्त्रांची निर्मिती अन् गुरे पाळणे हे प्रगतीचे टप्पेही त्याने ओलांडले. आता पाण्याच्या आसपास, काटेरी कुंपण घातलेल्या वस्त्या निर्माण झाल्या. हे देखील एक प्रकारचे किल्लेच होत. कारण दुसऱ्यांपासून बचाव, संरक्षणात्मक उपाययोजना आणि वेळप्रसंगी तेथे राहून दुसऱ्यावर हल्ला चढवणे ही उद्दिष्टे या काटेरी कुंपणामुळे शक्य होत असत.

दुसऱ्या मानवी टोळ्यांपासून बचाव करण्यासाठी अशी वस्ती थोडी उंचवट्याच्या जागी केली, तर फायदेशीर होते, हेही ध्यानी आले. वस्तीभोवती चर किंवा खंदक असेल तर अधिकस्य अधिकं फलंम हेही लक्षात आलं. वस्तीभोवती सुरक्षित अंतरावर झाडझाडोरा अन् फांद्या व पालापोचाळा ठेवून तो पेटवून दिला तर संरक्षण करणं आणखी सुलभ होतं, हेही अनुभवाने मान्य झाले.

साठवलेलं धान्य - गुरेढोरे कमी श्रमात मिळवण्यासाठी अशा प्रकारच्या बंदिस्त व रस्त्यांवर हल्ला करून पळवापळवी करणे याचं प्रमाणही दुर्लक्ष न करण्याजोगं असायचं. अशा लुटारूंना धाक बसवण्याकरता गोफण गुंडे, बाण यांचा वापर करण्याचे कसब श्रेष्ठ मानले जाई.

पुढे पुढे बाहेर खंदक आणि आत दगडी वा लाकडी तटबंदीत केलेली वस्ती हे सुरक्षित आश्रयस्थान मानले जाऊ लागले. या बंदिस्त वस्त्या म्हणजेच 'पूर' ही प्रथा वेदकाळापासून सुरू झाली असावी.

**मनुस्मृती**

मनुस्मृतीत अशा प्रकारच्या संरक्षित वस्त्यांचे सहा प्रकार सांगितलेले आढळतात. (७: ७०, ७१)

धनुदुर्ग महीदुर्गमकदुर्ग वार्क्षमेव वा।

नृदुर्ग गिरिदुर्ग वा समाश्रित्य वसेरपुरम्।।

सर्वेण तु प्रयत्नेन गिरदुर्ग समाश्रयेत।

एषां ही बाहुगुण्येन गिरिदुर्ग विशिष्यते।।

**धनदुर्ग -** सभोवार वीस कोसापर्यंत पाण्याचा पुरवठा नसणारा किल्ला.

**महीदुर्ग -** बारा हात उंचीच्या वरून फिरत येणे शक्य असलेल्या रुंदीच्या व झरोक्यांसारख्या खिडक्या असणारी तटबंदी असणारा किल्ला.

**अब्दुर्ग -** सभोवताली भरपूर पाण्यामुळे नैसर्गिक संरक्षण मिळालेला म्हणजे बेटावरचा किल्ला.

**वार्धादुर्ग –** अतिशय दाट झाडीत लपलेला किल्ला. त्यातील काटेरी झाडे – जाळ्या, मोठे वृक्ष यापासून त्यातील माणसांचे संरक्षण होत असे.

**नृदुर्ग –** हत्ती, घोडे, रथ, पायदळ यांचं संरक्षण लाभलेले ठिकाण.

**गिरिदुर्ग –** डोंगरी उंचवट्यावर पुरेसा पाणीपुरवठा असणारे, झाडे व धान्य पिकवता येतील असे पण जाण्यासाठी एखादीच वाट असणारे स्थान.

यापैकी डोंगरी किल्ला म्हणजे गिरिदुर्ग हेच सर्वात श्रेष्ठ ठिकाण मानले जाई. खुद्द देवही अशाच ठिकाणी वास्तव्य करत असत.

राजाने किल्ल्याचा आश्रय घेतला तर, त्याला अन्य शत्रू वा राजे त्रास देऊ शकत नाहीत. हे किल्ल्यांचे महत्त्व आहे, असे मनुस्मृतीत म्हटले आहे.

एका: शतं योद्ययति दुर्गस्योऽस्त्रधरो यदि ।

शतं दशसहस्त्राणि तस्माद् दुर्ग समाश्रयेत ।। (मनस्मृती ७:७४)

दुर्गात राहणारा एकच माणूस शंभर जणांशी लढू शकतो तर किल्ल्यात राहून शंभर लढाऊ वीर दहा हजार जणांशी देखील सहज लढू शकतील अशी किल्ल्यांची ताकद असल्याचे मनुस्मृतीत नोंदवलेले आहे.

राजाने अशा किल्ल्यात वेगवेगळी हत्यारे, युध्दसाधने ठेवावीत. भरपूर धनधान्ये, वाहने तेथे असावीत. बुध्दिमान व ज्ञानी ब्राह्मण, कुशल व उपयुक्त असे लोहार, सोनार, शिल्पकला येणारे पाथरवट–गवंडी आदी प्रकारचे लोकही अशा किल्ल्यात असावेत.

वेगवेगळी यंत्रे, भरपूर दाणावैरण, गवत, विपुल पाणी या ठिकाणी साठवलेले असावे. आपल्या या वसतिस्थानाभोवती वेगवेगळी फळझाडे–फुलझाडे लावावीत म्हणजेच कोणतीही अडचण न येऊ देता तेथील वास्तव्य सुखकारक होईल असे मनुस्मृतीत सांगितलेले आहे. (मनुस्मृती ७:७५, ७६)

यापूर्वी ऋग्वेदामध्ये तर

कडेकोट बंदोबस्त असणारी ठिकाणे (५.३४.७) (७.२५.२) असल्याचे उल्लेख आहेत.

चिरेबंदी कोट असणाऱ्या नगरांचा उल्लेखही त्यात आढळतो (४.३०.२०) आर्यांप्रमाणे अनार्यांनीही अशी भक्कम नगरे बसवली होती.

पुरातत्त्व शास्त्रज्ञानी काही ठिकाणे तर उकरून काढून याबाबत शिक्कामोर्तब केले आहे.

गिरिव्रज, राजगृह, पाटलीपुत्र ही काही प्राचीन संरक्षणसम नगरांची नावेही साहित्यात आढळतात. चंद्रगुप्ताच्या पाटलीपुत्राचे वर्णन मेगॅस्थिनसने 'इंडिका' या ग्रंथात लिहून ठेवले आहे. या शहराची लांबी सुमारे तेरा ते चौदा कि.मी. तर रुंदी पाऊण कि.मी. होती. शहराभोवती भक्कम लाकडी तटबंदी म्हणजे मेढेकोट होता. त्यातून आत प्रवेश करण्यासाठी चौसष्ट वेशी होत्या. पाचशे सत्तर बुरूज या तटबंदीत होते. तटाभोवती २०० मीटर रुंदीचा व १५ मीटर खोलीचा पाण्याने भरलेला खंदक होता. पाटण्याजवळ असणाऱ्या कुम्हरार या जागी जेव्हा प्रत्यक्ष उत्खनन झालं, तेव्हा ती लाकडी तटबंदी सापडली.

ख्रिस्तपूर्व ३०० ते ३५० काळामध्ये अस्तित्वात असणाऱ्या भुवनेश्वराजवळील शिशुपालगडाच्या उत्खननात देखील अशाच तऱ्हेचं गाडलेलं शहर सापडलं आहे.

मोहोंजोदरो, हडप्पा, लोयल, सूरकोठडा याही ठिकाणी दुर्गसदृश कामे उत्खननात आढळली आहेत, म्हणजेच कोटयुक्त नगरे किंवा पूर ही कविकल्पना नाही, तर अशी ठिकाणे प्रत्यक्ष अस्तित्वात

होती. याचे प्रत्यक्ष पुरावेच मिळतात. श्रीकृष्णाने आपल्या बळकट द्वारकानगरीचे वर्णन करताना असे म्हटले आहे– स्त्रियोऽपि यत्र युध्येरन किम वृष्णिमहारथा: ।।

याचा अर्थ असा की, दुर्गाच्या मदतीने आमच्या बायकाही लढू शकतील, मग आमचे महारथी लढतील यात नवल ते काय ?

महाभारतातील शांतिपर्वात भीष्माचार्य म्हणतात, उपयुक्त माणसांचा संचय करणे हा सर्वश्रेष्ठ संचय आहे आणि नरदुर्ग हा सर्वात दुर्भेद्य असतो.

मनूने ज्याप्रमाणे किल्ल्यांचे ६ प्रकार सांगितले आहेत, तसेच महाभारतातही सहाच प्रकार सांगितले आहेत.

फक्त जलदुर्गाऐवजी मृद्दुर्ग हा प्रकार सांगितला आहे.

महाभारतामधील भीष्मांच्या दुर्ग प्रकरणामध्ये कोट म्हणजे तटबंदीयुक्त शहरांचा प्रामुख्याने विचार केलेला आढळतो. बाण आणि शताग्नी म्हणजे चामडी पिशवीत स्फोटक पदार्थ भरणे. यांचा उपयोग तटाच्या झरोक्यातून टाकणे व किल्ल्यांचे संरक्षण करणे गृहीत धरले आहे. खरं तर रामायणातदेखील काही उल्लेख आढळतात, पण त्यामध्ये तपशिलाचा अभाव आहे. थोडीफार माहिती मिळते ती लंकेच्या वर्णनात आहे.

त्रिकूट पर्वताच्या शिखरावर असणाऱ्या राक्षसांच्या पहाऱ्यामध्ये असणाऱ्या लंकेमध्ये हत्ती, रथ, राक्षसयोध्दे होते.

बाण व धोंडे फेकणारी यंत्रे त्या ठिकाणी होती. खोल खंदक आणि त्यामधील सुसरी व इतर जलचर. खंदकावरील सरकपूल, तटबंदीच्या आत असणारे विस्तृत शहर याबद्दल मोजकीच माहिती आहे.

कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये अधिकरण २ मधील अध्याय २४ व २५ यामध्ये दुर्गरचना व किल्ल्यातील नगररचना याबाबत माहिती दिलेली आहे.

१) पाण्याने वेढलेले

२) खंदकाच्या आतमध्ये सुरक्षित असणारे

३) डोंगरावरील दगडात रचलेले किंवा खोदलेले

४) दलदलीच्या प्रदेशात असणारे

५) कुसळाच्या गवताने वेष्ठिलेले

६) काटेरी झाडांनी घेरलेले

असे किल्ल्यांचे प्रकार आढळतात.

कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये किल्ल्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केले आहे.

१) ओदक – अ अंतर्द्विप आ स्थळ

२) पर्वत – अ प्रांतर आ गुहा

३) धन्वन – अ निरुदकस्तंब आ इरिन

४) वन – अ खज्योनोंदक आ स्तंबगाहन

अशा प्रकारे ८ किल्ले होतात.

राजधानीसाठी बसवायच्या नगर दुर्गाविषयी कौटिलीय अर्थशास्त्रामध्ये अधिक तपशिलवार

माहिती मिळते. हा नरदुर्ग किंवा राजधानीचे शहर देशाच्या मध्यभागी असावे. या ठिकाणी भरपूर पाणी असावे. नदीचा संगम, सरोवर अशांची जवळीक साधून बसवावे. त्याचा आकार देशकालपरत्वे गोल, लांबट किंवा चौकोनी असावा.

जाण्यायेण्याचे मार्ग सुरक्षित असावेत. नगराभोवती खंदक खोदावेत. त्यामध्ये कमळांचे वेल व मगरी असाव्यात म्हणजे त्यात उतरून पलीकडे कोणी येऊ शकणार नाहीत.

एकाऐवजी जास्त खंदक असावेत. सर्वात आतील खंदकाच्या आत सोयीस्कर असा तट उभारावा. त्याच्या बाहेर विषारी व काटेरी वेली असाव्यात.

तटाची रुंदी रथ चालवता येईल एवढी असावी. तटाच्या बांधकामात लाकडू काम नसावे कारण ते जळून तोटा होण्याचाच संभव जास्त असतो.

तटावर व दरवाज्यावर आतून लक्ष ठेवण्यास व मारगिरी करण्यास सोयी असाव्यात. चोरवाटा, भुयारे यांची योजना असावी.

तटबंदीयुक्त प्रकारात मध्यभागी राजवाडा असावा. त्यात विहीर असावी. दारांना अडसर असावेत. किल्ल्याच्या भोवती फेरी मारता येईल अशा प्रकारची वाट नसावी.

किल्ल्यामध्ये तळघरे असावीत. त्यामध्ये गोटे, कुदळी, कुऱ्हाडी, बाण, हत्ती सजवण्याचे सामान, गदा, मुदगर, दंड, चक्रे, यंत्रे, शतन्घी, (शेकडो लोकांचा एकदम घात करणारे यंत्र) लोखंडाची हत्यारे, त्रिशूळ, भाले, वाकड्या बांबूच्या काठ्या, आगीचे बाण व विविध प्रकारच्या वस्तू साठवून नीट ठेवावीत.

नगररचनेबाबत असे सांगितले आहे की, ''नगरामध्ये कोठे, कोणाची मंदिरे असावीत, वेगवेगळ्या वस्तूंचे साठे कोठे व केव्हा करावेत, अधिकारी वर्गाबद्दलही त्यामध्ये माहिती आहे.

कौटिलीय अर्थशास्त्राची रचना उत्तर भारतामध्ये झाली होती. त्या ठिकाणीची भौगोलिक स्थिती पाहता डोंगरी किल्ल्यांबाबत यामध्ये पुरेशी माहिती नाही.

भुईकोटापेक्षा पाणकोट उत्तम व त्यापेक्षाही डोंगरी गड उत्तम असे त्यामध्ये नमूद आहे.

कारण भुईकोटाला वेढा घालून तो जिंकणे व शत्रूला त्यातून निसटून जाणे कठीण. जलदुर्गातील अन्नपाण्याची रसद तोडणे त्यामानाने अवघड पण हत्तीवरून पूल बांधून किंवा नावांच्या मदतीने जलदुर्गाचाही पाडाव करता येतो, पण डोंगरी किल्ल्यावर हल्ला करणे ! तेथपर्यंत पोचणे अथवा तो पाडणे अवघड आहे. आतमध्ये असलेल्या आतील लोकांना साधे दगड फेकून, धोंडे लोटून अथवा अन्य मार्गाने बचाव करता येतो.

डोंगरी किल्ला हा आश्रयाकरता उत्तम मानला जातो. अभिल्लाषितार्थ चिंतामणी: हा ग्रंथ अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात लिहिला आहे.

सोमेश्वर देव याने लिहिलेल्या या ग्रंथामध्ये किल्ल्यांचे ९ प्रकार सांगितले आहेत.

१) पाण्याने वेढलेला पाणकोट अथवा जलदुर्ग

२) अवघड डोंगरावर, पुरेसे पाणी असणारा डोंगरी किल्ला किंवा गिरिदुर्ग

३) दगडांनी भक्कम बांधकाम केलेला अश्मदुर्ग

४) खंदकाने वेढलेला अन् विटा-चुन्याने बांधलेला इष्टिकादुर्ग

५) चिखलमातीत बांधून काढलेला मृत्तिकादुर्ग

६) दाट काटेरी झाडीने संरक्षित केलेला बाक्ष्मदुर्ग किंवा वनदुर्ग

७) ओसाड वाळवंटात उभारलेला मरुदुर्ग

८) उत्तम शस्त्रे व शूर योध्दे असणारा नृदुर्ग किंवा नरदुर्ग

९) वेळू किंवा लाकडी कूड अथवा भिंती असणारा दारुदुर्ग म्हणजे मेढेकोट

गिरिदुर्ग व जलदुर्ग उत्तम, दारुदुर्ग व नरदुर्ग कनिष्ठ तर इतर दुर्ग मध्यम मानावेत असे नमूद केले आहे.

तंजावरच्या सरस्वती महाल ग्रंथालयामध्ये अपूर्ण अवस्थेत असणाऱ्या 'आकाशभैरवकल्प' पोथीच्या सात प्रती मिळाल्या त्यामध्ये २१ ते २४ पटलांमध्ये अष्टविध गिरिदुर्गांची माहिती दिली आहे.

सुईसारख्या निमुळत्या आकाराचा, माणसाच्या आकाराचा, सुपाच्या आकाराचा, मध्ये तुटलेला, वाकडा तिकडा, नांगरासारखा असे किल्ले राजाला राहण्यास योग्य नाहीत. अशी माहिती या पोथीमध्ये मिळते. किल्ल्यांचे प्रकार सांगताना त्यामध्ये पुढील श्लोक दिला आहे.

प्रथमं गिरिदुर्ग स्याद्वनदुर्ग द्वितीयकम ।

तृतीयं गव्हरांतस्थं जलदुर्ग चतुर्थकम् ।।८ ।।

पंचमं कर्दमाविष्टं षष्ठं स्यान्नाथिनामकम् ।

सप्तमं नरदुर्ग स्यात् कोष्ठदुर्ग तथाष्टकम ।।९ ।।

अगदी अशाच तऱ्हेचे वर्गीकरण राजा कृष्णदेवराय यांच्या कारकिर्दीतील लाला लक्ष्मीधर याने देवज्ञविलास या ग्रंथामध्ये मांडले आहे.

प्रचमं गिरिदुर्गच, वनदुर्ग द्वितीयकम् ।

तृतीयं गव्हरदुर्ग, जलदुर्ग चतुर्थकम् ।।

पंचमं कर्दमदुर्ग, षष्ठं स्यान्मिश्रकं तथा ।

सप्तमं ग्रामदुर्ग स्यात, कोष्टदुर्ग तथाष्टकत् ।।

उपयुक्ततेच्या क्रमानुसार डोंगरी किल्ला, वनदुर्ग किंवा दाट झाडीत लपलेला किल्ला, गुहेचाच किल्ल्यासारखा उपयोग केलेले ठिकाण, पाणकोट किंवा जलदुर्ग, दलदलीच्या प्रदेशातील कर्दमदुर्ग, मिश्रदुर्ग, गावकुसू किंवा कोट आणि लाकडी वस्तूंपासून बनविलेला मेढेकोट अशी ही उतरती भांजणी आहे.

याच ग्रंथामध्ये भद्र, अतिभद्र, चंद्र, अर्धचंद्र, नाभ, सुनाभ, रुचिर, वर्धमान असे डोंगरी किल्ल्यांचे आठ उपप्रकार सांगितले आहेत.

१) भद्रागिरिदुर्ग म्हणजे जो वर्तुळाकृती स्निग्ध आणि पर्वताच्या उंच पण सपाट पठारी शिखरावर आहे, पाणीही भरपूर आहे अशा ठिकाणी राजा हत्तीवर बसून ध्वजपताका घेऊन वर जाऊ शकतो.

२) अतिभद्र गिरिदुर्ग म्हणजे ज्या डोंगराचे टोक खूप उंच चौकोनी, विस्तीर्ण व जलसमृध्द आहे अशा डोंगरशिखरावर बांधलेला किल्ला.

३) चंद्रगिरिदुर्ग म्हणजे पायथ्यापासून वर चढण्याचा मार्ग अवघड आहे, ज्याचे शिखर मोठे पण चंद्राकृती असते असा डोंगरी किल्ला.

४) अर्धचंद्र गिरिदुर्ग म्हणजे ज्याचा पायथा व शिखर अर्धचंद्राकृती आहेत. जो मध्यम उंचीचा पण उत्तम पाण्याचा भरपूर साठाअसलेला आहे असा डोंगरी किल्ला.

५) नाभ गिरिदुर्ग- म्हणजे कमळाच्या फुलासारखा विकसित झालेला ज्याचा आकार आहे तो गिरिदुर्ग.

६) सुनाभ गिरिदुर्ग हा पायथ्याशी पुरेसा रुंद व वर क्रमाक्रमाने निमुळता होत गेलेला डोंगरी किल्ला.

७) रुचिर गिरिदुर्गाला पायथ्यापासून वरपर्यंत लहान मोठ्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. जो पुरेसा उंच व पाण्याची विपुलता तेथे आहे, असा डोंगरी गड.

८) वर्धमानदुर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे तो अर्दलाकार डोंगरावर बसविला आहे, पण हे सारेच प्रकार कल्पनेतील वाटतात अशा तऱ्हेच्या किल्ल्यांची अचूक उदाहरणे सापडणे कठीण आहे म्हणूनच केवळ ग्रांथिक माहिती म्हणूनच याचा उपयोग आहे. आजमितीस अशा सर्व प्रकारांचे किल्ले अचूकपणे दाखवता येत नाहीत.

शिवपुत्र संभाजी राजांनी रचलेल्या 'बुधभूषणम' या ग्रंथामध्ये राजनीती या प्रकरणामध्ये अशीच माहिती मिळते. जुन्या ग्रंथामधील वचने उदघृत करून ही माहिती दिलेली असल्याने ती खूपच आदर्श वाटते.

मजबूत किल्ल्यामध्ये राजाने आपले मंदिर बांधावे. ते मंदिर मध्यभागी व विपुल जल - वृक्षांनी वेढलेले असे बांधावे आणि आपल्या सर्व संपत्तीचे संरक्षण करून सुखे राहावे.

गडामधील राजमंदिरापासून चार दिशास चार रस्ते बांधावेत. एका रस्त्याला देवभाग, दुसऱ्याला राजभाग, तिसऱ्याला धर्माधिकरण भाग व चवथ्याला गोपुरविभाग समजावे.

गडामध्ये कोशगृह, गजशाला, अश्वशाला, गोशाला, आयुधागार, पाकशाला, होमशाला, धर्मकर्मशाला, पुरोहित-मंत्री-ज्योतिषी-वैद्य यांची घरे कशी व कोठे बांधावीत याचीही चर्चा या ठिकाणी केलेली आढळते.

हत्ती, घोडे, गाई-गुरे यांच्या व्यवस्थेसाठी सारथी, योध्दे, शिल्पी, मंत्री, काळ जाणणारे, पशुवैद्य आदींची उत्तम व्यवस्था गडावर हवी. कुलशीलवान अशा आवश्यक लोकांव्यतिरिक्त इतरांना राहू देऊ नये, अशी सूचनाही केलेली आढळते.

किल्ल्यांमध्ये कोणकोणत्या वस्तूंचा संग्रह राखावा, याबाबतही ऊहापोह येथे केलेला आढळतो.११

किल्ल्याच्या रक्षणासाठी चांगली धनुष्ये, बाण, गोफणी, खड्गे, चिलखते, कणप, त्रिशूळ, पट्टे, त्रास, परशू, चक्रे, वर्मासह तपण, कुऱ्हाडी, दोर, वेत्र या वस्तू ठेवाव्यात. कारागीर व शिल्पकार हेही गडावर असावेत. वाद्ये, औषधे, विपुल गवत व सरपण, गूळ, सर्व तऱ्हेची तेले, दूध चरबी, मज्जा, स्नायू, हाडे, चामडे, कापड, ताग, राळ, भूर्ज, लाख, लाखेचे रंग, टाकणखार व अडीअडचणीला लागणाऱ्या सर्वच वस्तू पुरेशा प्रमाणात गडावर ठेवाव्यात. रत्ने, लोखंड, सर्व धान्ये, सातू, गूळ, गहू, कोद्र, मूग, उडीद, हरभरे, तीळ यांचा भरपूर साठा किल्ल्यांवर असावा. सर्व प्रकारचे गवत, माती, शेण, मातीचे रांजण पुरेशा प्रमाणात असावे. विषारी साप, सिंह, भुंगे, हिंस्र पक्षी तसेच विषारी शमन करणारे लोक, विचित्र श्वापदे याचकरिता येथे बाळगावेत. कलावंत, चतुर माणसे, भूतपिशाच्च उतरवणारे

मांत्रिक, गडावर असू द्यावेत. पण भित्रे, रागीट, उन्मत्त, अवमान करणारे, द्वाड नोकर, पापी, अनिष्ट माणसे यांना गडावर थारा देऊ नये. अडचण आली की व्यापारी, धनिक व त्यांची संपत्ती किल्ल्यात संरक्षणाखाली ठेवावी. युध्दात लागणाऱ्या व जगायला अती आवश्यक अशा सर्व वस्तू किल्ल्यात आवर्जून ठेवाव्यात. किल्ल्याचा प्रमुख अधिकारी म्हणजे कुलशीलवान, कोणतेही काम करायला तयार असणारा असेल तर गडावर राजाला सुखाने राहता येते.

■■■

# ३.७ शिवशाहीतील किल्ल्यांचे महत्त्व

भारतामध्ये महाराष्ट्राइतके गडदुर्ग इतरत्र नाहीत. विशेषत: कोंकण, मावळ भागामध्ये अथवा सह्याद्री सातपुडा पर्वतांच्या भागात डोंगरी गडांची संख्या फार मोठी आहे. तशीच अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर जलदुर्गांचीही संख्या मोठी आहे. मात्र यातील बरेच जलदुर्ग शिवशाहीत बांधलेले आहेत. डोंगरी दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला व जंगलांनी शृंगारलेला पण खडकाळ भाग अन्यत्र क्वचितच पाहावयास सापडतो.

पोर्तुगीज व इंग्रज यांचा नूतन संबंध जडल्याने पश्चिम किनाऱ्यावर नवीनच जलदुर्ग बांधावे लागले.

इस्लामी परकीय सत्तांना आपल्या राज्यात स्नानिक परंतु स्वकीय असे मनुष्यबळ स्वाधीन करून घेता येण्यासारखे नव्हते. त्यांनी आपली राजसत्ता केवळ अधिराज्य किंवा साम्राज्य स्वरूपातच सांभाळून ठेविली होती.

बहामनी राज्यात मुलुखाचा बंदोबस्त देशमुख-देशपांडे-पाटील कुलकर्णी यांचेकडे राहिल्याने व लहान परगण्यांच्या तुकड्यांवर देशमुख देशपांड्यांचाच अंमल चालू राहिल्याने ते प्रदेशाबरोबर त्या प्रदेशातील गडदुर्गांचेही मालक होत. त्यामुळे इस्लामी सलतनातील परचक्र निवारण्याची व जे देशमुख ठराविक करभार देत नसतील त्यांचा बंदोबस्त करण्याचीच फक्त कामगिरी मुख्य सलतनीच्या सैन्याला व सेनाधिकाऱ्यांना करावी लागे. त्याकरिता सुलतान आपले स्वकीय मंत्री सेनापती नेमीत व त्यांच्या हाती भरपूर खास सेना व राज्यातील देशमुखादींची मदतगार मांडलिकी सेना देत. या नरदुर्गांच्या साहाय्याने दूरस्थ शत्रू व बंडखोर देशमुख यांचा परिहार करिता येणे शक्य होते, परंतु बहामनी राज्याचे पांच तुकडे झाल्यावर ते आपआपसात भांडू लागले व दूरस्थ शत्रूऐवजी घरातच रणधुमाळी माजू लागताच साहजिकच दक्षिणेतील इस्लामी सत्तेचे दुर्गम नरदुर्ग निर्बल ठरू लागले. देशमुखांवरील सुलतानांचा दाब कमी झाला. सरहद्दीवरील लोक करवसुली देण्याची टाळाटाळी करू लागले. शासनार्थ सैन्य आल्यास इतरत्र किंवा जवळपासच्या गड जंगलात तात्पुरता ठाव घेत. त्यामुळे पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून एखादा गडकोट देशमुख जहागीरदारास संरक्षणार्थ ठेवून बाकीच्या महत्त्वाच्या गडकोटावर सुलतान आपले हवालदार नेमू लागले व करवसुलीचे कामही त्याकडे सोपवू लागले. परंतु काही महत्त्वाचे गड सोडले तर बाकीचे स्थानिक माणसांकडेच सोपवले जात.

तत्कालीन राज्यपध्दतीत देशमुख, जहागीरदार हे जरूर पडली तर करभार देऊन स्वतंत्रतेने वागत आणि कधी कधी सुलतानांच्या भांडणाचा फायदा घेऊन करभारही देण्यात कुचराई करीत.

बहामनी राज्याचे तुकडे झाल्यावर हे सुलतान एकमेकांच्या मुलखात शिरून प्रांत हैराण करीत. अशा लढ्यात नरदुर्गाच्या साहाय्यावर शत्रूसैन्य पुष्कळ दूरवर राज्यात शिरे आणि प्रतिकार करणाऱ्या सैन्यास तयार होऊन शत्रूच्या रोखावर येण्यापूर्वीच शत्रूसैन्य हालचाली करून प्रदेश पादाक्रांत करून त्याची नासाडी करी. आदिलशाही सैन्याने उठून निजामशाहीत थेट अहमदनगर-जुन्नरपर्यंतचा मुलूख तुडवीत जाणे किंवा निजामशाही सैन्याने थेट सोलापूर गुलबर्ग्यापर्यंत जाऊन आदिलशाहीस हैराण करणे अशासारखे घोडदळाचे प्रकार नेहमी होत असत. त्यामुळे या लढायांच्या राजरस्त्यामधील देशमुख -

देशपांडे आदि मंडळी जो चालून येईल त्याची तेवढ्यापुरती सत्ता मानून आपला बचाव करून घेत व आक्रमकही आपल्या पिछाडीचे रक्षण व्हावे म्हणून त्यास राजी होत. मात्र या सर्व चढाईत लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ही सैन्ये.

गडकोटांना वेढा घालून ते लढविण्याच्या किंवा ताब्यात घेण्याच्या भानगडीत अधिक काळ घालवीत नसत. कारण अशा वेढ्यात अडकून राहणे आणि त्यासाठी सैन्याची तरतूद ठेवणे कठीण जात होते. शिवाय त्यांना आपले सैन्य वेळीच परत सुरक्षितपणे आपल्या भूमीत नेऊन पोहचविण्याकडे लक्ष द्यावेच लागे. एकतर हाताच्या बोटावर मोजण्याइतके राजरस्ते होते आणि तेही इतके वाईट होते की, एकदा का पावसाळा सुरू झाला की, चांगल्या निवाऱ्याच्या अभावी त्यास फार हाल भोगावे लागत.

सतराव्या शतकाच्या सुरवातीपासून आदिलशाहीत आणि विशेषत: निजामशाहीमध्ये बहुसंख्य हिंदूंचा राजकारभारात उच्चपदांवर भरणा होऊ लागल्याने त्यांच्याशी संबंधित असलेल्या स्थानिक लोकांची स्वसामर्थ्याबद्दलची भावना जागृत होऊ लागली. गडकोटावरील अधिकारी सभोवतालच्या प्रदेशातील स्वकियांशी चांगले संबंध ठेवू लागले. त्यामुळे राज्यनियंत्रणाबाबतची परकीय सत्तेची भीती पुष्कळच कमी कमी होत गेली. याबरोबरच निजामशाहीतील सरदारा, सरदारामधील आपआपसातील भांडणे व त्यात झालेली गटबाजी यामुळे काही हिंदू सरदारांनी प्रजेवर नुसतीच आपली छाप बसवली असे नाही तर त्यांनी आपल्या कार्य कर्तृत्वावर व सत्तेवर लोकांचा पूर्ण विश्वास संपादन केला. त्यामुळे या सरदारांत एखाद्या गडकोटाच्या आधाराने प्रबल शत्रूसही तोंड देण्याइतकी शक्ती असल्याची जाणीव उत्पन्न झाली होती. गडाचे महत्त्व कमी होण्यास स्थानिक परिस्थितीची अनुकूलता व मनुष्यबलाचा अभाव हीच इस्लामी अमदानीत कारण झाली होती. ह्या मोठ्या अडचणी हिंदू सरदारांच्या बाबतीत दूर झाल्या आणि निर्बल म्हणण्यापेक्षा दुर्लक्षनीय वाटणारे गड आता दुर्गम व प्रबल झाल्याने नरबलाच्या साहाय्याने होणाऱ्या आक्रमणांना बराच पायबंद बसू लागला. दौलताबाद, अहमदनगर, कंदाहार वगैरे गडांच्या बाबतीत ज्या मोगली व आदिलशाही हालचाली झाल्या त्यात गडकोटांच्या लढ्याबाबत मुसलमानी सैन्य व सरदार टिकाव काढू शकत नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांचेत एक प्रकारचा न्यूनगंडच झाला आहे, असे प्रकर्षतेने दिसून आले. या परिस्थितीचा फायदा शहाजी महाराजांनी घेतला. प्रथम गडकोटाच्या आधाराने आपला दर्जा कायम राखला. नंतर निजामशाहीची दैना उडवली जाताच शहाजी महाराजानी आपल्या सहकाऱ्यांच्या व स्थानिक लोकांच्या साहाय्याने नवीनच सत्ता स्थापण्याचा यशस्वी प्रयत्न केवळ गडांच्या आधाराने करून महाराष्ट्रात एक नवीनच आदर्श निर्माण करून ठेवला. परंतु मोगली व आदिलशाही जोड सैन्याने उचल करून शहाजीस पायबंद घातला.

शहाजीस गडकोटात खितपत पडून राहता येणे शक्य नव्हते. मुख्य कारण असे की रणदुल्लाखानाने या चढाईत गडकिल्ल्यास सरावलेल्या पुणे मावळ भागातील देशमुख व त्यांच्या लोकांचाच पाठिंबा मिळवला होता. मात्र शहाजी व त्यांच्या अनुयायांना या गडकोटाचा प्रभाव चांगलाच पडला. मोगली सरदारानाही या गडकिल्ल्यांचे भय वाटू लागले. शहाजीने नवीन मार्ग काढण्यासाठी आपण होऊन ते गड सोडले व आदिलशाहीच्या नोकरीत राहण्याचे ठरवले. मोगलाने व आदिलशहाने त्यास अधिक मानमरातब व सरंजामी दिली. सर्व काही त्यांच्या मागणीप्रमाणे कबूल केले; परंतु महाराष्ट्रातून कर्नाटकाकडे केलेल्या त्यांच्या उचलबांगडीने पुणे मावळ भागात उत्पन्न झालेला मोठा काटा सुलतानाच्या मार्गातून दूर झाला. या प्रयत्नात वरघाटातील गडांपेक्षा मावळकोकणातीलच गडकोट

अधिक सुरक्षित व शत्रूस दुर्गम याची पूर्ण जाणीव मिळाली. हा प्रयत्न प्रत्यक्षात निष्फळ झाल्यासारखा वाटला तरी त्या घटनेचे अप्रत्यक्षपणे झालेले परिणाम फार दूरगामी होते. मोरे, शिर्के, सावंत वगैरे लोकांनी आपल्या दुर्गम व निबिड जंगलप्रदेशातील गडकोटांच्या साहाय्याने स्वतंत्रपणे वागण्यास सुरुवात केली. सिद्दीने तर आपल्या एका जंजिरा दुर्गांच्या आधाराने वेळोवेळी सवडसंधी पाहून लूटमार व सभोवतालील प्रदेशात किंवा आसमंतात आपल्या आक्रमक कारवाया चालू ठेविल्या आणि कोणाही शाही सत्तेला सिद्दी जुमानेसे झाले. मावळातील देशमुख देशपांड्यांचा पत्रव्यवहार पाहिला तर तेही स्वैरपणे वागून शाह्यांच्या राजनियंत्रणास न जुमानता आपआपसात सारखे भांडत होते. परस्थ पोर्तुगीज यांनाही दोन तीन जलदुर्गाच्या साहाय्याने इस्लामी सत्तांना रोखून धरिले होते. समुद्रकिनाऱ्याकडे जशी इस्लामी सत्तांना डोळेझाक करीत होती.

पोर्तुगीज, सिद्दी, अरब या लोकांनीच तेथील सत्ता चालू ठेवली होती. सतराव्या शतकाच्या सुरवातीपासूनच निजामशाहीत भोसले घराणे व आदिलशाहीत घोरपडे घराणे, मुरार जगदेव यांनी आपल्या दक्षिणेतील राजकारणामध्ये बरीच थोरवी वाढवली होती. विशेषत: शहाजी महाराजांनी निजामशाहीच्या पुनरुज्जीवनाच्या नावाने स्वातंत्र्याचा प्रयत्न करताना माहुली वगैरे किल्ल्यांच्या आधाराने जो यशस्वी लढा दिला व त्या लढ्यात इस्लामी सत्तांनी जी गडदुर्गाच्या लढ्यातील दुर्बलता व अज्ञान दाखवले त्याचा फायदा घेण्याकडे साहजिकच स्थानिक लोकांची प्रवृत्ती झाली. शहाजी महाराजांची अडगळ दूर करण्याकरता त्यास कर्नाटकात नेले. रणदुल्लाखानाचा मृत्यू होताच शहाजीचा मित्र व पुरस्कर्ता गेला. अफझलखानाचे व शहाजीचे फारसे पटले नाही. त्यांनी शहाजी महाराजांचा सरंजाम आपल्या मावळ सुभ्यातून न देता स्वतंत्र बंगलोरच्या बाजूकडील प्रांतातून करून दिला. तेव्हा आपली सुटका लवकर होणार नाही व आपले पुणे मावळ भागामधील संबंध दुरावतील या भीतीने शहाजी महाराजांनी शिवाजी महाराजास आपले खास लोक व नातलग बरोबर देऊन पुणे जहागिरीवर पाठवले व वडील मुलगा संभाजी यास बंगलोर जहागिरीचा वसूल वगैरे कामगिरीवर आवश्यक म्हणून ठेवले.

मावळचे देशमुखांचे सैन्य रणदुल्लाखानापासून शहाजीच्याच तैनातीत होते, ते तसेच त्यांचेकडे राहिले होते. कर्नाटकातील मुलूखगिरीत शहाजी महाराजांनी जे हिंदू राजे वाचवण्याचे व त्यांचे किल्ले आदिलशाही सरदारांचा त्याचेवर रोष होताच. जुमल्याचे मार्फत शहाजीने मोगलाचे आधाराने परत निजामशाही मुलुखात येण्याचा प्रयत्न केला परंतु शहाजीला गडकोटात पुन्हा वावरू देणे मोगलाला व आदिलशहाला धोक्याचे होते. तो प्रयत्न फसला. मात्र या आशेने कोंडाणा पुरंधर घेण्यात जी कारवाई व्हायची ती होऊन गेली आणि शहाजीचा मिर जुमल्याशी चालू असलेला गुप्त कट मोगलानेच आदिलशहाला कळवले. शहाजी पळून जाण्यापूर्वीच पकडला गेला. शहाजीने पड खाऊन आपल्या मुलाकरवी किल्ले परत केले; परंतु त्याचबरोबर आपल्या नामांकित मावळच्या सरदारांना परत पाठवून व शपथा घेवून शिवाजीस कोकण मावळ भागातील गडकोट घेण्यास मदत करण्यास रवाना झाले. शिवाजीने आपल्या सपाट भूपृष्ठावरील पुणे सुपे जहागिरीची पर्वा न धरिता कोंकण मावळ भागातील गडकोटांचा आसरा घेतला. मिळेल तो गड सबळ करण्याकडे सर्वस्व खर्चले व त्या जोरावर सर्व मावळ, कोंकण भागावर थोड्याच वर्षात वर्चस्व स्थापले. कारवाईत गडकोटानाच खरे महत्त्व प्राप्त झाले.

पुणे सुपे जहागिरींचा भाग बहुतेक उजाड मैदानात असल्याने व मोगली परचक्राला बारामतीकडून

येण्यास राजरस्ता असल्याने नवीन राज्यस्थापनेच्या उपक्रमास सुरक्षिततेच्या दृष्टीने मावळ व कोकण भागातच प्राथमिक हालचाली सुरू ठेवणे धोक्याचे नव्हते. म्हणून मावळ-कोकणच्या तोंडावरील महत्त्वाचे गडकोट घेऊन तेथेच प्रथम येणाऱ्या परचक्रास तोंड देण्याची तयारी केली. मावळ कोंकण भाग म्हणजे एक लांबलचक पट्टा असून त्याची पूर्व बाजू सह्याद्रीने रक्षिली आहे व पश्चिम अरबी समुद्राने राखली आहे, दक्षिण व उत्तर बाजू फक्त उघड्या आहेत, परंतु उत्तर बाजूचे पुरंधर व कोंडाणा हे गड सांभाळल्यास तिसरीही बाजू सुरक्षित राखता येते. या पट्टीच्या आत शिरकाव करून घेण्यास काही वाटा आहेत. त्यातील पहिली पुरंधर-शिरवळ मार्ग, दुसरी तेथून भोरातून कोकणातील वाट, तिसरी कल्याण-लोहगड रस्ता, चवथी सातारा-प्रतापगड, पाचवी कोल्हापूर-पन्हाळा आणि सहावी गोवा-वेंगुर्ला वाट असे अनेक लहान मोठे मार्ग होते. परंतु त्यातील तीनच महत्त्वाचे म्हणजे परचक्राला वाट देणारे होते. ते म्हणजे कल्याण-भिंवडी, पुणे-बारामती व पन्हाळा. त्यापैकी सुरवातीस पुणे बारामती मार्गावरील अडवणूक पुरंधर-कोंडाणा व त्या सरहद्दीचे आतील गडांनी व्हावयाची होती. त्यानंतर कल्याण-भिवंडीचा मार्ग आडवावयाचा होता. त्याकरता कल्याण-कोट, लोहगड, विसापूर यावर लक्ष ठेवणे प्राप्त होते. त्यानंतर म्हणजे मावळ भागाची रक्षणाची तयारी झाल्यानंतर कोकण भाग हाती घ्यावयाचा. त्याकरता प्रथम प्रतापगडाच्या अलीकडील भागातील गड ताब्यात घेणे प्राप्त होते. दक्षिण कोकण हाती पडावयाचे तर पन्हाळा, विशाळगड हेच मोक्याच्या जागी होते. सारांश परचक्राची वाट मोगल हद्दीतून असल्याने अगर आदिलशाही मुलखातून असल्याकारणाने पूर्व पश्चिम बाजूपेक्षा दक्षिणोत्तर सीमांच्या संरक्षणाचीच काळजी घेतलेली शिवाजी महाराजांच्या हालचालीवरून दिसते आणि शिवशाही बुडवण्यासाठी औरंगजेबाने सर्व पणाला लावून जे निकराचे हल्ले या सतराव्या शतकाच्या अखेरीला अफाट सामुग्री, दारूगोळा, अजस्त्र तोफखाना व बहुसंख्य मनुष्यबळाच्या साहाय्याने चढविले तेही याच मार्गानी गडांचा मोड करण्याकरता चढवले होते. ह्याचा विचार केल्यास युध्दाच्या दृष्टीने मावळ कोकण भागाच्या सुरक्षिततेस दुर्गरचना कशी साहाय्यक होती हे लक्षात येते. प्रदेशाचे संघटन करणे ही एक बाब वेगळी व त्या हालचालीसाठी स्वारी शिकारी करून धनसंपत्ती मिळवणे हे वेगळे.१२

त्यात राज्य मर्यादेचा प्रश्न नसून राजसत्तेची जरब कोठवर राखावयाची एवढाच प्रश्न असतो. एकंदरीत कोकण मावळ भागामधील सर्वच गिरिदुर्ग बळकट व उंच शिखरावर बसवले गेल्याने त्यांचा उपयोग स्थानिक लोकांच्या साहाय्याने परचक्रास तोंड देण्यास सहज करता येण्यासारखा होता आणि या डोंगरी भागातील गडकोटाना हादरा देणाऱ्या अजस्त्र तोफा तेथपर्यंत सहज पोहोचू शकतील अशी भौगोलिक परिस्थिती नव्हती; परंतु सुरवातीच्या दुसऱ्याच टप्प्यात शिवाजी महाराजांच्या राज्याची सीमा दृढ झाल्याने राज्याच्या सरहद्दीवरील संरक्षक गडकोट म्हणून कल्याण, सिंहगड, चाकण, पुरंधर, पन्हाळा, कोंडा या गडांवरच शत्रूपक्षीय आघातांचे निवारण करण्याचा सर्व भार पडत राहिला होता.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील विपुल गिरिदुर्गांचा वापर अंतर्गत व्यवस्था ठेवण्याकडे केला. सर्व गडकोट आपल्या खास नियंत्रणाखाली घेऊन त्यावर हवाले नेमून त्याकडे सरकारी महसूल धान्यातच करणे असल्याने ती साठवून ठेवणे, सैन्यभरती व त्यासाठी जो मुशाहिरा द्यावयाचा तो त्यातून देणे, शस्त्रास्त्रांचा साठा करून तो पुरवणे व परत संग्रहित करून ठेवणे वगैरे काम गडाभोवतालील प्रदेशापुरते त्या त्या हवाल्याकडे दिले गेले. त्यामुळे ठिकठिकाणी सैन्य जमविणे व तेथून जवळपास तातडीने रवाना करणे फार सोईचे पडे. मुख्य सेना सोई व जरुरीप्रमाणे निरनिराळ्या भागात तळ देऊन

राहत असे व तिची सरबराई या गडकोटातील कोठारामधून होत असे. त्यामुळे जरूर ती उपरी मदत चटकन मिळत असल्याने त्या सैन्याचा जसा स्थानिक देशमुखादि लोकांवर वचक असे तसाच तो परकीय सैन्यालाही बसे. विशेषत: धान्याचा साठा ठिकठिकाणी होऊन तो शीघ्रगतीने जरूर तेथे उपयोगास देणे सोपे जाई आणि दोन तीन वर्षेपुरणारा साठा त्या दुर्घट गडांवर पूर्णपणे सुरक्षितही राही. तसेच शत्रूच्या सैन्याला पिछाडीवरून सतावण्यास व शत्रूची रसद लुटण्यास या किल्ल्यावरील बंदीचा चांगलाच उपयोग करून घेता येई. सारांश, या लहान लहान गिरिदुर्गाचा जरी शहरकोट म्हणून उपयोग होणे कठीण होते, तरी आसपासची धान्यादी संपत्ती सुरक्षित ठेवण्याची चांगली सोय होत होती. गडकरी किंवा आसपासचे गडांवर काम करणारे लोक जरूर तेव्हा गडावर चढून तो रक्षण करण्याचे काम करीत व इतर वेळी गडाच्या पायथ्यास छोट्या छोट्या जमावाने राहून आपली शेती करून कालक्रमणा करीत.१३

मावळ कोकणातील गडांची विपुलता आणखी एका दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. गडांपासून दूरवर टेहळणी ठेवणे व परचक्राचा दूरवर थोड्याच अवधीत इशारा देणे शक्य होत होते. बहुतेक सर्व गड रांगे रांगेने एकमेकांपासून पाच दहा मैलांच्या आतच असल्याने ही टेहळणी बिनचूक राखता येत असे आणि धोका दिसताच सावध होऊन, प्रतिकाराचीच तयारी नव्हे तर आसपासच्या लोकांनाही इशारा देऊन तयारीत राखीत. बारीक सारीक कोटांचा चौकीपहाऱ्याकरता उपयोग केला जात असे.

सर्व गिरिदुर्गावर पाण्याची उत्तम सीय असल्याने तेथे सर्व अधिकारी कायम वस्ती करून राहत. पावसाळ्यात वगैरे धुक्यामुळे व पावसाच्या धूमधारेत राहणे त्रासदायक होत असे. तेव्हा ते जरूर तितकेच बंदोबस्तास राहून पायथ्याशी आपआपली कुटुंबे घेऊन राहत. गडावर आवश्यक तो सर्व संग्रह करण्यात येत असे. या गडांवरील साठ्यांमुळेच या भागातील सतराव्या शतकातील दुष्काळात जनतेला तितके भीषण वाटले नाही.

कोकणात राज्यविस्तार केल्याने व अरबी समुद्रात परकीय युरोपीय शत्रूंनी ठाणे दिल्याने शिवाजी महाराजांना पोर्तुगीज, सिद्दी आणि उत्तर कारकिर्दीत इंग्रज यास तोंड देण्यासाठी जलदुर्गांच्या बांधणीचा विचार करावा लागला. त्यांनी आरमार उभारून धावत्या कोटाचा बंदोबस्त प्रथम केला आणि नंतर जलदुर्ग बांधण्यास सुरवात केली.

ज्याकाळी सपाट प्रदेशात गिरिदुर्गांना तितके महत्त्व राहिले नव्हते व इस्लामी सत्ता केवळ नरदुर्गांच्याच बळावर सर्व प्रदेश त्यांनी आपल्या परकीय अंमलाखाली ठेवला होता, त्याचवेळी कोकण मावळ भागात केवळ निसर्गबध्द रचनेचा फायदा घेऊन व स्थानिक लोकांच्या सहानुभूतीने व संघटनेने शिवाजी महाराजांनी गिरिदुर्गाचा हरतऱ्हेने उपयोग करून राज्यांतरंगत व्यवस्था, कोशसमृध्दी, सैन्यबल संपत्तीची राज्यात वाटणी आणि सैन्यदलाची कार्यक्षमताअल्पखर्चात व थोड्याच प्रयत्नाने साध्य केली.

सर्वच गडकोट हाती राहिल्याने देशमुखादी पुंडपाळेगारास ह्या नवीन राज्यसत्तेला जपावे लागले आणि त्यातील सर्वच पुढाऱ्यास सैन्यात मोठमोठ्या पदावर चढवल्याने त्यासही या गडदुर्गांचा ताबा गेल्याने खेद वाटला नाही. या व्यवस्थेमुळे आदिलशाही व मोगली गडकोटावरील अधिकाऱ्यांनी इस्लामी सत्तेचे जू झुकारून देऊन आपले गडकोट शिवाजी महाराजांच्या हवाली केले. मात्र शिवाजी महाराजांनी असाच दगा फटका हिंदवी राज्यासही भोगावा लागू नये म्हणून किल्ल्याचा कारभार एकाचे हाती न ठेवता चिटणीस, मुजुमदार व सेनापती या तिघांच्या संमतीने चालवण्याची योजना मुक्रर केली होती.

थोडक्यात सांगावयाचे तर शिवाजी महाराजांनी आपल्या बुध्दिबलाने ३००-३५० गडदुर्गांचा पूर्णपणे फायदा घेऊन त्यांच्याच साहाय्याने दक्षिणेतील ही स्वराष्ट्रीय राज्यसंघटना अगदी सुरवातीपासूनच सुदृढ आणि कार्यतत्पर अशी राखली होती. या विशिष्ट घटनेचा विचार केला तर गडदुर्गांची महती सतराव्या शतकातही हिंदवी स्वराज्यास कशी पोषक झाली होती याची सहज कल्पना करता येण्यासारखी आहे.

ज्या गडकोटांना सतराव्या शतकाच्या उत्तरार्धाच्या सुरवातीपासूनच विशिष्ट प्रकारचे व सर्वांगीण महत्त्व प्राप्त झाले होते त्याच शतकाच्या उत्तरार्धाच्या शेवटी कोकणमावळातील गडकोटांना मागली परचक्रास तोंड देताना कसोटीस उतरावे लागले. संभाजीनंतर महाराष्ट्रात नेतृत्वाचा अभाव असताना या गडकिल्ल्यावर एकाकी फार मोठ्या शत्रूपक्षीय आघाताना तोंड देण्याची वेळ आली. मोगलांनी आपल्या चतुरंग बलाच्या साहाय्याने दक्षिण पादाक्रांत करण्याची शिकस्त केली. त्यात दक्षिणी मुसलमानही औरंगजेबास सहायक झाले.

अफाट सैन्यानिशी तीन वर्षेसतत लढाई दिली परंतु मावळ कोकणात त्याला अपयशी होऊन पावसाळ्याच्या निवाऱ्यास परतावेच लागले. भेदाने एक दोन कोट घाटावरील घेतले परंतु इतरत्र तग निघाला नाही. गडांच्या वाटेस न जाता प्रदेश जिंकण्याची कसोटी केली, परंतु त्यातही दक्षिणेतील मोहिमेत पाय घसरता येणे शक्य झाले नाही. नाइलाजास्तव विजापूर गोवळकोंडा व रायगड लढवण्याचा प्रयत्न केला. अत्यंत जिकिरीने व सर्वच पणास लावून ते जिंकण्याचा प्रयत्नही तितकासा उत्साहवर्धक झाला नाही.

भेदाचाच अवलंब करावा लागला. त्यामुळे औरंगजेबाने होता होई तो गडकोटांच्या भानगडीत न पडता व निष्कारण मनुष्यहानी करून न घेता देश पादाक्रांत करण्याचे शक्य ते प्रयत्न केले परंतु त्यामुळे कोणताही प्रांत कायमचा ताब्यात येऊ शकला नाही. सैन्याची पाठ फिरताच पुन्हा मुळचीच घडी कायम असा सर्वत्र प्रकार होऊ लागला. उत्तर हिंदुस्थानातील सैन्याला गडकोट झुंजवणे शक्य नव्हते. मुसलमानांचा पाडाव केल्यावर दक्षिणी मुसलमान व इतर सरदार औरंगजेबास मिळाले. त्यांनी गडकोट घेण्यास मदत केली आणि औरंगजेबाने आपल्या अजस्त्र तोफा व दारूगोळा यांच्या साहाय्याने १५-२० वर्षेरखडल्यानंतर गडदुर्गांचा नाश करण्यास सुरवात केली. गड जिंकले व गडाचे तटबुरूजही निकामी केले.

परंतु स्थानिक लोकांची स्वराज्यावरील निष्ठा ढासळविणे जड होते आणि ज्याप्रमाणे गडांच्या कृत्रिम वास्तूचा थोडाबहुत नाश केल्याने ते तात्पुरते दुर्बल झाले तरी त्यांचा पाया दुर्गम राहिला, त्याप्रमाणेच स्थायिक लोकांच्या आशा आकांक्षा अभेद्यच राहिल्याने कोकण मावळ भागात परकीय मोगली सत्ता कोठेच घर घेऊ शकली नाही. सारांश सतराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्त्रांच्या प्रगतीला जरी सपाटावरील किल्ले बळी पडले तरी जंगलदऱ्यांनी संरक्षित असलेले व काळ्या कठीण फत्तरावर आधारलेले आणि शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या संघटनेत एकजीव झालेल्या नरदुर्गांनी जोपासलेले हे गडकोट कसोटीला उतरले. भौगोलिक परिस्थिती हीच परकीय किंवा परप्रांतीय सत्तासामर्थ्याला दूर लोटण्यास समर्थ होती. स्थानिक लोकांची स्वराष्ट्रनिष्ठा या सामर्थ्याला समर्थ

ठेवण्यास पोषक म्हणूनच शिवाजीच्या महाराष्ट्राला परकीय मुसलमानांच्या भारतातील वर्चस्वाला नामोहरम करता आले हा महाराष्ट्राच्या सतराव्या शतकातील ऐतिहासिक घडामोडीवरून निघणारा निष्कर्ष कसा वाजवी ठरतो हे लक्षात येईल.

शिवाजीने स्वराज्याचा उपक्रम करण्यापूर्वी शहाजी व त्याचा मुलगा संभाजी यांनी इ.स. १६३६ पूर्वी मावळकोकणात मोगली व आदिलशाही जोड सैन्याशी लढा देऊन गडकोट त्यांना अजिंक्य राखले होते. त्यापूर्वीही अहमदनगर, कंदाहार, दौलताबादमधील लढ्यात आक्रमकांना ते पूर्णपणे जिंकता आले होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा उपक्रम सुरू केल्यापासून गडकोटांचे निर्णायक लढे पन्हाळा, सिंहगड, पुरंधर या ठिकाणीच लढले गेले. त्यात इस्लामी सत्तांना तात्पुरते यश प्राप्त झाले होते. तरी ते क्षणिकच टिकले. इब्राहिम आदिलशहाच्या मृत्यूनंतर आदिलशाहीत भांडणे लागल्याने आदिलशाहीकडून जोरकस लढा पन्हाळ्याच्या वेढ्यानंतर देण्यात आला नाही. औरंगजेब बादशहा होण्यासाठी उत्तरेस गेल्यापासून त्याला तेथील व उत्तरेकडील लढ्यातच गुंतून पडावे लागले. मोगली सरदारांना डोंगरी गडकोट लढविण्याचे साहस करण्याचे धोक्याचे वाटत होते. तो धोका टाळण्यासाठी ते या दिशेने फारशी हालचाल करीत नसत आणि हालचाल केलीच तर ती सरळ मार्गाने थेट विजापूरकडे कूच करीत आणि विशेषत: डोंगराळ प्रदेशातून जाताना त्यांची जी हानी होत होती व अन्नपाण्यावाचून हाल होत होते ते टाळण्यासाठी शिवाजी महाराजांच्या सरदारांशी सुप्तासुप्त योजना करीत.

मराठा सैन्याला गनिमी लढा देण्यास योग्य असा त्यांचा मुलूख होता. चपळाईने गिरिकंदरातून निसटता आले की मोठे सैन्य अंगाशी येऊन भिडण्यापूर्वी जवळपासच्या गिरिदुर्गात जाऊन स्वस्थपणे ठाव घेत. त्यामुळे मोगली सरदार वरून जरी औरंगजेबाचा हुकुम पाळण्याचा बहाणा करीत असत तरी ते या गडकोटांशी संघर्ष टाळण्याचीच काळजी घेत.

उत्तरेकडील राजकारण आवरल्यानंतर औरंगजेबानी दक्षिणची मोहीम करण्याचे ठरवले. ह्या अपयशी मोहिमेत औरंगजेबाच्या ४२ वर्षाच्या दीर्घ कारकिर्दीतील अर्धा भाग खर्ची पडला व त्याला आपला देहही तेथेच विसर्जन करावा लागला. त्याने शहा आलम यास आघाडीवर पाठविले. दक्षिणेतील सरदाराबाबत संशय घेऊन नतीजा पोहोचवल्याने दिलेरखान व बहादुरखान यांनी थोडासा धीर धरून सालहेरमुष्टेदला वेढा दिला परंतु तो तसाच रेंगाळत राहिला. शिवाजीच्या मृत्यूने दक्षिणेतील मोहिमेस इष्ट वातावरण निर्माण झाले म्हणून मोहिमेचा मनसुबा मुक्रर केला, परंतु दरम्यान रजपुतांचे बंड झाले पुन्हा दक्षिणेतील खासा मोहीम लांबली. रजपुतांचा मोड झाला आणि खासा औरंगजेब उत्तर हिंदुस्थानातील सर्व शक्तिसामर्थ्य बरोबर घेऊन दक्षिणेत उतरला. औरंगजेबाच्या छावणीजवळच संभाजीने हल्ला चढविल्याने तो थोडासा गोंधळला. इतका धाडसी प्रकार घडून येण्यास आपलेच सरदार फितूर असले पाहिजेत असा संशय घेतला. या संशयाला दिलेरखान बळी पडला व बहादुरखान दूर गेला. त्यापूर्वी दख्खनची खासा मोगली राजधानीच लुटली गेली. थोडा अवधी गेल्यानंतर हिंदवी स्वराज्याचा निकाल लावण्याच्या उद्देशाने सैन्यभारही रवाना झाले.

या पहिल्या फेरीत अपयश आले. साल्हेर फितुरीने मिळवला, तरी समसेजाच्या लढ्यामध्ये मोगली सेनेचे पुष्कळ नुकसान झाले. मोगली सैन्याने कल्याण घेतले, पण थोड्याच अवधीत ते सोडून पावसाळ्याच्या निवाऱ्यासाठी परत फिरावे लागले. परंतु गनिमी काव्याने लढणाऱ्या संभाजीच्या सैन्याने मोगली सैन्याचे, वाटचाल करीत असताना, फारच नुकसान केले. त्याबद्दल त्या सरदारासही

औरंगजेबाने शासन केले. पुन्हा दुसऱ्या वर्षी मोगली सैन्याची तीच गत झाली. तिसऱ्या वर्षीही तसेच नुकसान झाले. सारांश, मोगलास दिसून आले की, कितीही मोठे सैन्यबळ असले व शत्रूने लढा न देताच गिरिकंदरात आडवून पिछाडीवर हल्ले केले तर अशा सैन्याच्या हालचालींचा कधीही फायदा होत नाही. त्यानंतर औरंगजेबाने शहा आलमकडून गोवामार्गाने मोहीम केली. समुद्रामार्गेदाणागोटाही पाठवला परंतु, वाटमारीत शहा आलमचे सैन्य सर्वच पणाला लागले. दाणागोटाही बुडवला गेला व जवळजवळ ५०-६० हजार सैन्यबलही घाटखिंडीत धुळीस मिळाले. शेवटी औरंगजेबाने मराठा स्वराज्य बुडवण्याचा नाद सोडून स्वधर्मीय सुलतानांची राज्ये घेरून अब्रू राखण्याचा प्रयत्न केला.

विजापूरचा कोट जिंकला तर हिंदवी स्वराज्याच्या सीमेवर गेल्याने तेथून लढा देता येईल या आशेने औरंगजेबाने विजापुरास वेढा दिला. शेवटी किल्ला फितुरीनेच मिळवावा लागला. अब्रू बचावली. या आदिलशाहीच्या लढ्यास कुतुबशहाने मदत केली होती.

ती तशीच होत राहिली तर आदिलशाहीचे इतर सरदार जोर धरून मोगली सैन्याशी लढा देत राहतील म्हणून कुतुबशाहीच्या राजधानीला वेढा दिला. कुतुबशहा गोवळकोंडा गडावर जाऊन बसला. गोवळकोंड्याचा लढा तर फारच महागात पडला. लढ्यात व रोगाच्या साथीत पुष्कळच सैन्य मेले. तोही गड शेवटी फितुरीनेच स्वाधीन करून घेतला. रायगडावरही नंतर सैन्य पाठवले. मधीलच एका लहानशा गडाला वेढा देऊन तो रायगड समजून तसे अहवाल बादशहास पाठवले व निरोप्यानी बक्षिसेही घेतली परंतु रायगड दूरच राहिला होता. त्याची त्यांना नंतर खात्री पटली. या लढ्यामध्ये औरंगजेबाची आणखी ४-५ वर्षेगेली, यानंतर आदिलशाहीचा व कुतुबशाहीचा मोड झाल्यामुळे औरंगजेबाला दक्षिणेतील स्थानिक मुसलमान सरदारांचे साहाय्य मिळू शकले आणि त्यांच्या जोरावर त्यांनी बेळगाव, अदोनीसारखे काही किल्ले घेतले व मोगली सैन्याला कोल्हापूरपर्यंत निवांतपणे मुक्काम करता येऊ लागला. तसेच पुणे-शिरवळ प्रांत हाती आल्याने मोगली सैन्याला भोर घाटामधील रस्ता निर्धास्त झाला. उपराळ्याच्या अभावी रायगडही सामदाम पध्दतीने मोगलास मिळू शकला आणि औरंगजेबाच्या हाती बराच मुलूख पडला परंतु मराठा सैन्य अधिकाधिकच मोगली सैन्यास सतावू लागले. राजाराम महाराज कर्नाटकातून परत आले. त्यांनी बराच मोठा छापा खास बादशाही सैन्यावरच घातला. तेव्हा औरंगजेबास पूर्ण कळून चुकले की जोपर्यंत मराठ्यांच्या हाती गडकोट आहेत तोपर्यंत ते राज्य इस्लामी शाह्यांसारखे नष्ट करणे शक्य नाही. औरंगजेबाने गडकोट घेण्याचा सपाटा लावला परंतु गडाची नासधूस करून तो घ्यावा पण त्यावर चिरकाल ताबा राखणे अशक्य झाले. हिंदवी स्वराज्यातील नेत्यांची त्याने धुळधाण उडवली परंतु प्रजा अजिंक्यच राहिली. ती सैन्याची पाठ फिरताच मोगली अधिकाऱ्यांना उधळून लावी व आपली सत्ता कायम राखी.

सारांश- सतराव्या शतकातील हिंदवी स्वराज्यासाठी केलेल्या शहाजी, शिवाजी, संभाजी, राजाराम यांच्या कारकिर्दीतील हालचालीचा आणि विशेषत: राजारामानंतर नेतृत्वाच्या अभावी लोकसंघांनी केलेल्या अविश्रांत कामगिरीचा विचार केल्यास, मावळ-कोकणातील गडकोट हिंदवी स्वराज्याच्या उभारणीत घटनेत व यशस्वी जोपासनेत अत्यंत सामर्थ्यवान ठरले यात शंका नाही. इतकेच नव्हे तर भारतातून परकीय मोगली सत्ता कायमची नामोहरम करण्यास महाराष्ट्रातील याच गडकिल्ल्यांचे अस्तित्व कारण झाले.

■■■

## टीपा स्पष्टीकरण (प्रकरण – ३ )


१) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन २००५ पृष्ठ क्र. १०३

२) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन २००५ पृष्ठ क्र. १३१

३) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर डायमंड प्रकाशन २००८ पृष्ठ क्र. १३४

४) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्र.१३७

५) राजकोश अ. द. मराठे डायमंड प्रकाशन २००८ पृष्ठ क्रमांक १२२

६) राजकोश अ.द. मराठे डायमंड प्रकाशन २००८ पृष्ठ क्रमांक १२४

७) राजकोश अ.द. मराठे डायमंड प्रकाशन २००८ पृष्ठ क्रमांक १२६

८) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर डायमंड प्रकाशन २००८ पृष्ठ क्रमांक ७८

९) गड कोट दुर्ग आणि त्यांची वास्तू बा.सी. बेंद्र मुंबई मराठी ग्रंथमाला क्रमांक ५ १९९५ पृष्ठ क्रमांक ३७

१०) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन २००८ पृष्ठ क्रमांक १८

११) अथातो दुर्ग जिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नेहल प्रकाशन २००८ पृष्ठ क्र.५६

१२) गड कोट दुर्ग आणि त्याची वास्तू मुंबई मराठी ग्रंथमाला क्रमांक ५ १९६५ पृष्ठ क्रमांक ५५

१३) गड कोट दुर्ग आणि त्याची वास्तू बा.सी. बेंद्रे मुंबई मराठी ग्रंथमाला क्रमांक ५ १९६५ पृष्ठ क्रमांक ५३.

# प्रकरण ४


**गडाची वास्तुरचना, व्यवस्था, देवदेवता व द्वारशिल्पे** **११२–१३१**

| | | |
|---|---|---|
| ४.१ | गडाची रचना | ११२–११४ |
| ४.२ | गडाचे महत्त्व | ११५–११५ |
| ४.३ | गडाची व्यवस्था | ११६–११८ |
| ४.४ | गडावरील जल व्यवस्थापन | ११९–११९ |
| ४.५ | गडावरील अधिकारी वर्ग | १२०–१२० |
| ४.६ | शिवकालीन गडांवरील देवदेवता व द्वारशिल्पे | १२६–१३१ |

किल्ल्यासंबंधी माहिती करुन घेण्याकरता आपल्याला एका जुन्या ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो त्याचे नाव आज्ञापत्र. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे या ठिकाणी सर्वात जुनी प्रत उपलब्ध आहे. ही प्रत मूळ मोडी लिपीत आहे. डॉ.व. दि. राव, मोरमकर, प्रा. उध्वरेशे, प्रा.पुणतांबेकर, प्रा. ग. ह. खरे, श्री. र. भिडे, वा. दा. गोखले, रा. चिं. ढेरे, डॉ. प्र. न. जोशी अशा अनेकांनी मूळ ग्रंथाचे संपादन केलेल्या प्रती उपलब्ध आहेत.

आज्ञापत्रात एकूण ९ प्रकरणे आहेत. त्यातील प्रकरण ८ व ९ किल्ल्यांविषयक आहे. गडाची रचना, महत्त्व व व्यवस्था याबाबत नेमकी माहिती. या ग्रंथातुन मिळते.

अभ्यासकांकरता ही माहिती अधिक सोपी करुन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. (गडाची रचना, महत्त्व व व्यवस्था)

ज्यांनी प्रथम आज्ञापत्राचे लेखन केले त्यांचे पूर्ण नाव रामचंद्र नीळकंठ भादाणेकर. हे देशस्य ऋग्वेदी आश्वलायन सूत्राचे भारद्वाज गोत्री ब्राह्मण घराण्यातील भिवंडीजवळील सोनवणे तर्फेचे हे देशमुख वतनदार. १६७२ ते १६७७ अमात्यपद त्यांनी यशस्वीरित्या संभाळले.

शिवाजीमहाराज, संभाजी, राजाराम, कोल्हापूरकर शिवाजी व कोल्हापूरकर संभाजी अशा ५ छत्रपतींच्या कारकिर्दीचे साक्षी असणाऱ्या व्यक्तीने राजनीतीवर ग्रंथ लिहावा व त्यामध्ये दुर्गाबद्दलचे महत्त्व विशद करावे हा एक महत्त्वाचा भाग आहे.

**मागील पानावर संशोधकाने आज्ञापत्राबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.**

# ४.१ गडाची रचना

राज्यसंरक्षणाचे मुख्य कारण किल्ले, ते देशोदेशीं स्थळे पाहून बांधावे. किल्ल्यासमीप दुसरा पर्वत किल्ल्यासमुदायी असू नये. कदाचित असला तरी सुरंग लावून पाडून गडाचे आहारी आणावा. सुरंगास असाध्य असा असला तरी तोही जागा मोकळा न सोडिता बांधून मजबूत करावा. गडाची इमारत गरजेची करू नये.१

तट, बुरूज, चिलखते, पाहारे, पडकोट जेथे जेथे असावे ते बरे मजबूत बांधावे, नाजूक जागे जे असतील ते सुरंगादि प्रयत्नें करून, अवघड करून पक्की इमारत बांधोन गडाचा आयब काढावा. दरवाजे बांधावे. ते खालील मारा चुकवून पुढें बुरुज देऊन, येतिजाती मार्ग बुरुजाचें आहारीं पडोन दरवाजे बांधावे. किल्ल्यास एक दरवाजा थोर अयब आहे. याकरिता गड पाहून, एक, दोन, तीन दरवाजे तशाच चोरदिंड्या करुन ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्यात. इमारतीवरील मामलेदार वगैरे आदिकरुन ठेवणे ते बरे शहाणे, कृतकर्मेनिरालस्य पाहून ठेवावे. गडाची इमारत मुस्तेद करावी. प्रत्येक किल्ले प्रत्येक पर्वताचे आहेत. कित्येक पर्वत थोर थोर, त्याचा एखादा कोन कोपऱ्याची जागा पाहोन बांधावा लागतो. त्यास दरवाजापुढे अथवा तटाखाली मैदानभूमी लागते, म्हणजे तो गड भुईकोटात दाखल जाहला. आला गनीम त्यांनी दरवाजास अथवा तंटास लागावे असे होते. ही गोष्ट बरी नव्हे. याकरिता या जातीचा किल्ला असेल त्यास आधीं सर्व प्रयत्ने दरवाज्यापुढे तटाखाली जितके मैदान असेल तितका खंदक खोल आणि रुंद खणून तटाचे पायीं दुसरा पडकोट मजबून बांधोन त्यावर भांडी (तोफा), जुंबरे (लहान तोफा), ठेवून खंदकाचे कडेस एकाएकी परकी फौज येऊन न पावे असे करावें. गडास यावाचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असेल तर ते मार्ग मोडून त्यावर झाडी वाढवून आणखीकडे परके फौजेस येतां कठीण असे मार्ग घालावे. याविरहित बलकुबलीस चोरवाटा ठेवाव्या. त्यासर्वकाळ चालू देऊ नयेत. समयास तेच खिंडी (खरा शब्द दिंडी हवा) दरवाचाजा राबता करुन सांजवादा चढवीत जावा. (वापरास योग्य करावा) गडाची राखण म्हणजे कलारग्याची (कमरग्याची) झाडी (डोंगराच्या उतारावरील झाडी) ते झाडी प्रयत्नें वाढवावी. त्यामध्यें एक काठीही तोडों न द्यावी. बलकुबलीस (अडचणीचे वेळी) त्या झाडीमध्ये हशम बंदुके घालावे, या कारणाजोगे असो द्यावे. गडासभोवती नेहमी मेटें असावी. घेरियाची घस्ती करीत जावी. घस्तीचा जाब मेटकरी याणी देत जावा. गडाखालतें इमारतीचे घर किंवा घराभोंवतें दगडाचे कुसूं सर्वथा असों न द्यावे. तसेच गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा. पण नाही आणि ते स्थळ तो आवश्यक आंधणे प्राप्त झालें तरी आधी खडक फोडून तळी, टाकीं पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे. जसे तसें पाणीही पुरते, म्हणून तितकियावरीच निश्चिती न मानवी किनिमित्य की, झुंजामध्ये भांडियाचे आवाजाखाली (तोफांच्या गडगडाटामुळे) झरे स्वल्प होतात. (पाणी कमी होते) आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो.(जास्त पाणी लागते) तेव्हा संकट पडते.२

याकरिता तसे जागी जखिरीयाचें पाणी (जादा साठ्याचे राखीव) म्हणून दोन चार टाकी तळी बांधावी. त्यातील खर्च होऊ न द्यावे. गडाचें पाणी बहुत जतन राखावे. गडावरी राजमंदिरविरहित थोर

इमारतींचे घर बांधो नये. राजमंदिरासहीं ती इंटाच्या बांधोन त्यास चुना दाट गच्च घालावा. घरांत कोठें उंदिर. विंचू. किंडा. मुंगी राही अशी दरद न ठेवावी, घरास कुसूं पाहिजे ते निरंगुडी आदिकरुन झाडांचे पाताळ घालावे. गडकरी यांणी राजमंदिर म्हणून खाली न ठेवावे. सर्व काळ वस्ती करुन धरें करुन घर शाबूत राही. जीव जंतु न राही ते करावे. धनी म्हणून तयार केलेली विशिष्ट खोळ, गोळे, कीट (जळके लोखंड) आदिकरुन रेजगिरी (तोफेतून उडविण्याच्या धातूच्या गोळ्या) सुपारीप्रमाणे लहानथोर नदीतील खडे, बाणाच्या पलाखा (भोते) जामण्या (तोफा किंवा बंदुका डागण्यासाठी असणारा तोडा किंवा वात किंवा काकडा), तराफा, काने दुरुस्त करावयाचे सामते (तोफ डागण्यासाठी असलेले भोक स्वच्छ) करण्याचे यंत्र), आदिकरुन हा जिन्नस भांडियांचा भांड्याजवळ हमेशा तयार असावा. अहिनी (लोखंडी) दगडी जिन्नस दारुचे अंतर ठेवावे, होके, बाण हेही पहारे पहाऱ्यास तयार असो द्यावे. दरम्यान मुलखात गनीम कोठे आहे येईल समयी कोठूतून आणून तयारी करीन म्हणेल तो मामलेदार नामाकूळ (मूर्ख), आळशी. तशास मामला सांगो नये. एक वेळ केली आज्ञा त्याप्रमाणे अंधपरंपरेने निरालस्यपणे अगेच वर्तावे तरीव समयी दगा होत नाही. लावन दिला कायदा अव्याहत चालतो. पर्जन्य काळी भांडियास व दरवाज्यास तेल मेण देऊन भांडियाचे कोने मेणाने भरुन भांडियावर भांडियापुरती आघाडी घालून जाया होऊ न द्यावी. (तोफा आच्छादून खराब होऊ न द्याव्यात) वरकडही जिन्नस सर्दी न लागे असे आबादान ठेवावे. इमारतींचे काम आधी तयार झालेच असते. तथापि, तट, पहारे, बुरुज, कोट काही जाया होतच आहे. ते वरचेवरी कापून काढावे.तटाचे व तटाखाली गवत जाळून गड नाहाणावा लागतो. (गड स्वच्छ ठेवावा लागतो) या कामास गडोगडास गड पाहून इमारतीचा कारखाना नेहमी ठेवून मुद्राधारी यांचे स्वाधीन करावा. तसेच गोलंदाज (तोफा उडविणारे) विश्वासुक कबिलेदार, नेमिला जागा दुरुस्त मारणार असे मर्दान गड व गडाची भांडी पाहून जितके लागत असतील तितके ठेवावे. गडावरी झाडे जी असतील ती राखावी. याविरहित जी जी झाडे आहेत ती आंबे, फणस, चिंचा, वड. पिंपळ आदिकरुन थोर वृक्ष, निंबे, नारिंगे, आदिकरुन लहान वृक्ष तसेच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जे झाड होत असेल ते गडावर लावावे. जतन करावे. समयी तितकेही लाकडाचे तरी प्रयोजनास येतील. गडोगडी ब्राह्मण, ज्योतिषी, वैदिक, व्युत्पन्न तसेच रसायणवैद्य व झाडपाल्याचे वैद्य व शास्त्रवैद्य (शस्त्रवैद्य असा शब्द असावा), पंचाक्षरी (मांत्रिक) जखमा बांधणारे व लोहार, सुतार, पाथरवट, चांभार यांच्याही गड पाहून एक एक दोन दोन असाम्या करुन ठेवावे. लहानसहान गडावर या लोकांचे नित्य काम पडते असे नाही. याकरिता त्यांचे कामाची हत्यारे त्याजवळी तयार असो द्यावी. जे समयी काम पडेल ते समयी काम करितील, नाही ते समयी आदिकरुन तहशील तलब चाकरी( वसूल करण्याची नोकरी) घ्यावी. रिकामे न ठेवावे. गडोगडी तनखा (पगार), दास्तान (कोठार), इस्ताद (तयार) आदिकरुन गडाच्या प्रयोजनाची वस्तुजात गडास संग्रह करुन ठेवावेच लागते. याविरहित गड म्हणजे आपले कार्याचे नव्हते, असे बरे समजून आधी लिहिलेप्रमाणे उस्तवारी गडाची करावी.[३]

■ ■ ■

# ४.२ गडाचे महत्त्व

**संपूर्ण राज्यांचे सार ते दुर्ग :** दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उद्धंस होतो. देश उद्ध्वस्त झाल्यावरही राज्य असें कोणास म्हणावें ? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रयी परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी (श्रीशिवछत्रपतींनी) गडांवरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेच जलदुर्ग बांधले. त्यावरून आक्रम करीत करीत सालेरी (साल्हेर) अहिवंतापासून (अहिवंत गड) कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगरांसारखी महास्थाने आक्रमिली. संपूर्ण तीन-बत्तीस वर्षांपर्यंत या राज्यांशी अतिश्रम केला. त्याचे यत्नास असाध्य काय होते ? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिले. पुढे पूर्ववत् करावयास अवकाश नव्हता. या उपरहि ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणे आहे. त्यापेक्षा अधिकोत्तर साधनी स्वत: गडकिल्ल्यांची उपेक्षा न करिता, परम सावधपणे असतील त्या गडकिल्ल्यांची यथोक्त मजबुदी करावी. नूतन देश साधणे त्या देशात जी स्थळे असतील ती महत्प्रयत्ने हस्तवश करावी. ज्या देशात गडकोट नसतील त्या देशांत आपले राज्याचे सरहद्दीपासून पुढे जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयी सेना ठेवून पुढील देश स्वशासने वश करावा. असे करीत करीत राज्य वाढवावे. गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी टिकाव धरून राहवत नाही.[४]

फौजेविरहित परमुलखी प्रवेश होणेच नाही. इतक्याचे कारण ते गडकोटविरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरिता ज्यांस राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतीस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण, असे पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरवशावर न राहता आहे त्याचे सरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा, कोणाचा विश्वास मानू नये.[१]

■■■

# ४.३ गडाची व्यवस्था

गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक. परम नाजूक स्थळास एखादा मामलेदारादी जे लोक ठेवणे त्यांनी भेद केलियामुळे अथवा शत्रू चालोन आला असता नामर्दी केल्यामुळे अथवा त्याचे गाफिलीमुळे स्थळास दगा जाहला तर स्थळासहित तितके राष्ट्र हातीचे गेलेच, उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला, शत्रु प्रबळ येऊन पावला असता जो गेला किल्ला, त्या किल्लेकराचे वारे इतर राहिले किल्लेकरास लागोन तेही स्थळास अपाय योजितात. म्हणजे एक एक राज्यासच धक्का बसतो. या कारणे किल्ले कोट जतन करणे ही गोष्ट सामान्य असे न समजता, तेथील उसनवारी व शासन यास तिळतुष्य अंतर पडो न द्यावे. त्यास आधी किल्ल्याचा जीव तो हवालदार तसाच (सदर) सरनोबत (सेनापती) म्हणजे निस्पृह कोणाचे निसपतीचे अथवा एकाचे आर्जवामुळे ठेवावे असे नाही जे कुलवंत मराठे आणि शिपाई, जे शरम धरीत असतील, कबीलेदार (कुटुंबवत्सल) विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रिस्त, सकल लोकांचे समाधान रक्षून यथोचित सर्वापासून स्वामिकार्य घेत, हे स्थळ म्हणजे धन्याने ही परमप्रिय ठेवी दिली आहे, आपले प्राणान्त यास दगा होऊ नये, असे पूर्ण चित्तात आणून जे धन्यांनी लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडो न देता, दिवसाचा उद्योग दिवसा, रात्रीचा उद्योग रात्री. निरलस्वपणे करून सर्व प्रयत्ने स्थळ जतन करीत, असे ठेवावे. तसेच सबनीस व कारखानीस हे कारकून धन्यांनी लावून दिल्हे हे मर्यादेचे प्रेरक, सकळ उचितानुचित कार्याचे सूचक असे हवालदार, सरनोबत खावंद तसे हेही खावंद, याणीही त्याच न्याये सकळास वर्तवून आपण वर्तावे लागते. याकरिता तेही याच गुणांचे आणि लिहिणार, अमीन निर्भीड असे पाहून ठेवावे. तसेच तटसरनोबत, बारगीर, नाईकवाडी, रजपूत, जे ठेवणे ते बरे मर्दान काबीलेदार, विश्वासू असे पाहून नजर गुजार (नजर परीक्षा) करून ठेवीत जावे. किल्ल्यास दहा टक्क्यांचा रजपूत (प्यादा) ठेवणे तोही हुजूरचे सनदेखेरीज न ठेवावा. किल्ल्यामध्ये मनुष्ये ठेवणे ती चालक (चंचल) चोरटे, खुनी, तऱ्हेवाईक, कैफी, फितवखोर असे सर्वथाही न ठेवावे. जे ठेवणे ते परीक्षा करून ठेवीत जावे. ४त्यातही तीन वर्षांनी हवालदार काढावा, चार वर्षांनी सरनोबत काढावा, पाच वर्षांनी सबनीस, कारखानीस काढावे; आणि त्या मामलेवर त्या त्या मामले योग्य आणखी तशा गुणसंपत्तीचे मामलेदार पाठवावे. (म्हणजे त्याही वेळी बदलीच्या नोकऱ्या दिल्या जात असत. एकच माणूस एकाच जागी फार वर्षेराहिला म्हणजे प्रशासनात काही अडचणी निर्माण होण्याचा संभव असतो. ते टाळण्यासाठी ह्या बदल्या आवश्यक आहेत हे तत्त्व त्या वेळी माहीत होते व ते अमलात आणलेही जात होते.) त्याचेही त्याचे स्वरूपानुरूप समाधान करून काही एखादे दिवशी समागमे वागवून स्वामिसेवकभावाची त्यांची बुध्दी काही मलीन जाहली असली तर सहवासामुळे पुन: सोज्वळ करून, श्रमी होऊ न देता, त्याचे आटोपानुरूप आणखी मामले सांगावे. तसेच तटसरनोबत, बारगीर हेही जुने-नवे करीत असावे. नाईकवाडी, रजपूत, अन्यायी अथवा कार्यकर्ता असल्याची त्यास काढून ज्यास जे शासन अथवा सरफराजी करणे ती करीतच जावी. किल्ल्याचा हवालदार सरनोबती करीत असता तो मृत्यू पावला असता तो मामला त्याचे पुत्रास अथवा भाऊबंदास न सांगावा. त्याचे पुत्र अथवा भाऊबंद असतील त्यांचे समाधान करून त्यांचे स्वरूपानुरूप

आणखी उद्योग सांगून चालवावे. लष्करचे सरदाराचे भाऊबंदाना अथवा त्याचे निसपन लोक त्यास परिधिन्न किल्ल्याचा मामला सांगू नये. तसेच एका घराचे भाऊबंद एक, दोन, तीन आहेत आणि इतकेही गडवई तर त्यास किल्लेचे मामले आवश्यमेव सांगावेच लागतात. काय निमित्त की, किल्ल्याचे कामास माणूस मिळणे परम कठीण आहे. परंतु त्यास समीप किल्ल्यावर न ठेवावे. दूर, दूर किल्ले, एकाचा एकास न पावे, मध्ये आणखी किल्ले असतील अशा किल्ल्यांचे मामले सांगून सेवा घ्यावी. किल्लेखालील मुलुखातील देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले आदिकरून मिरास वतनदारी यास त्या समीपच्या किल्ल्यावर सेवा न सांगावी. त्यांचे वतनापासून दहा–पाच गावे दूर किल्ले असतील अशा किल्ल्यास ठेवावे. तेच वतन आणि समीपतेची सेवा जाहलियावरी चाकरीवर दुरुस्त न राहता क्षणाक्षणा घरास जाणार, किंबहुना समयविशेषी वतनाचे आशेने स्थळास भेद करून दगाही करणार, याकरिता किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावे. किल्ल्याचे मामले करीत असता चोरीमारी, लाच कलागत सुस्ती या काहिली (नाकाबिली, आळस, सुस्ती) इत्यादी अन्याय असलिया शिरस्त्याप्रमाणे मुदतीचाच मार्ग न पाहता मुदत न भरताही त्यास काढून आणावे. अन्याय पाहून शासन करावे.त्या मामल्यावर त्या मामल्या योग्य दुसरे मनुष्य मर्दान पाहून ठेवावे. गडकोटचे मामलेदाराने अथवा हरएकाने स्थळास दगा होई. अशी दुर्बुद्धि धरली आहे असे वर्तमान आले तरी आधी खरे खोटे न पाहता प्रलापावरि न घालिता त्यास सावध होऊ न देता, तत्क्षणी काम हातीचे न जाय असा उपाय योजून, कोणासही कळो न देता त्यास काढून आपणाजवळ आणावे. हजूर आलियावर रास्ती न्याय करून अन्याय खरा जाहला, तर तात्काळ बेमुलाहिजा त्याचा शिरच्छेद करावा आणि ते मस्तक गडोगडी फिरवावे. असे जो करील त्यास हा नतीजा म्हणोन दांडोस पिटवावा. वाजवी न्याय करिता निरपराध झाला तर त्याचे आपणास काढून आणिलेला डाग चित्तातून जाय असे बहुता रीतीने समाधान करावे परंतु फिरोन त्याचे मामलियावर त्यास न पाठवावे. रोजमुरा चालवून सहा चार मास हुजूर ठेवून त्यायोग्य आणखी मामला असेल त्यावर पाठवावा. तसेच आणखी खरी अथवा लटकी बदलामीमुळे ज्या स्थळांकडून मनुष्य आणावे, राहपाहमुळे (चौकशी) निरपराधी झाला तरी फिरोन त्याचे मामलियावरी त्यास न पाठवावा.

अन्याय खर जाहलियावर परिछिन्न त्या त्या अन्यायानुरूप शासन करावेच करावे. स्थळास गलिमाचा वेढा आला तरी सामान व उपराळा आहे तो गडवईतून रोज झुंजून स्थळ जतन करावे. ५ सामान सरले, उपराळा राहिला, निदान येऊन पडिले, तरी धन्यांनी हरडपाय मामलेदारादी लोक काढून आणून वाचवावे. धन्याचा हात पावेना असे झाले तरी परिछिन्न मामलेदारादी लोकी वारवा होऊन (स्वबलिदान करून) भरावे. त्यांचे मुलांचे. धन्यानी सर्व प्रकारे चालवावे; परंतु लिहिलेप्रमाणे निदान येऊन पिडिले (पडले) तर सल्ला करून स्थळ देऊन आपला जीव वाचवावा, असे सर्वार्थी न करावे. जो मामलेदार असे करून तोंड घेऊन येईल त्याचे मुखावलोकन न करिता फिरोन सेवा न सांगता त्यास घरीच बसवावे. फिरोन त्याचविशी कोणी अर्ज करतील तरी त्यास अर्ज करू न देता लिहिलेप्रमाणे त्यास ठेवून, स्थळाचा तगादा लावून इलाज करवावा. तो श्रम करीत असता स्थळाचा उपाय न होय तेणे शरमिंदा होतो आणि भय वागवितो, असे प्रत्ययास आले तरी, मग कोणी सरकारकून अर्ज करितील त्यांचे भिडेने अर्ज कबून केला असे करून त्यास दर्शन देऊन हुजूरच मामला सांगावा. मग वाढवीत, वाढवीत वाढवावा. कदाचित कोणी मामलेदार स्थळास संकट झाले म्हणोन स्थळ गतिमान देऊन आपला जीव वाचवून तो

गनिमाकडे गेला तरी तो यत्नेकरून हस्तगत होई ते गोष्ट करावी. कदाचित हातास न लागे तरी उपाये मारवावा.उपाये करून गनिमाकडे गेला तो न लागे ये असे झाले तरी लेक गुलाम करावे. बायका बटकी कराव्या. त्यासही विष मारेकरी आदिकरून हरप्रयत्ने तेथील तेथे मारवावा. जरी सामान सरले, उपराळा राहिला, धनी याचा हात न पावे, असे जाहलायियाबरी निदानी मामलेदारांनी गड गनिमास देऊन गनिमाकडे गेला तरी त्याचे कविलियास तसाच निर्बंध करावा. पहिले लिहिलेप्रमाणे सकळ निर्वाह करावा. जरी कौल घेऊन आला तरी त्याची मुले लेकरे सोडावी. त्यास घरी बसवावा. स्थळाचा उपाय करील तरी करू न द्यावा पर्यायेकरून कितीका दिवसाउपर हरएक कामही कधी कधी सांगो नये. किल्ल्याची सेवा परम कठीण, शासन परम उग्र. शासन करिता किल्ले याचे काम सर्वसाधारण होऊन जाणार, असे सर्व थैव न करावे. शरीरसंबंधी आप्तविषयी अथवा त्यांचे निसबतीचे लोक अंतर पडलिया शासनकरिता आपणास संकोच, असे लोकास किल्ल्याचे मामले सर्जथैव न सांगावे. शासनास अंतर जाहलिया दुसरियास अर्ज करावयास जागा होतो. भिडेने भीड वाढते. केली मर्यादा ते भंगतेच. तेच राज्यनाशाचे कारण याकरिता मर्यादाभंग सहसा होऊ न द्यावा.

■■■

# ४.४ गडावरील जलव्यवस्थापन

**गडावरील जलव्यवस्थापन**

किल्ला बांधण्याचे अगोदर पूर्वी त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे याची खात्री करुन मगच त्या ठरलेल्या ठिकाणी किल्ला बांधला जाई. पाण्याची नैसर्गिक सोय नसेल तर त्या ठिकाणी पाण्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागे. पाण्याची गरज बांधकाम चालू करण्यापासूनच निर्माण होई. पाणी साठवण्यासाठी उतारावर बांध घालणे, मोठ्या आकाराचे तलाव खोदणे, खडकात लहान आकाराची टाकी खोदणे, झिरपणारे झऱ्यांचे पाणी चारी बाजूनी बंदिस्त करुन त्याचा व्यवस्थित साठा करणे, गुहा खोदणे आदी अनेक मार्गाचा वापर करुन पाण्याची मुबलक व्यवस्था करण्यात येत असे. पावसाळा सुरु होईपर्यंत हे पाणी पुरून उरेल इतक्या प्रमाणामध्ये पाण्याचा साठा हा आवश्यक मानला जाई. पिण्याच्या पाण्याचे संरक्षण अत्यंत कसोशीने केले जाई. कोणत्याही किल्ल्यावर आपण गेलो तरी त्या ठिकाणी पाण्याची सोय केलेली दिसते.

रायगडावरच्या गंगासागर तलाव, हत्ती तलाव, बारा टाकी प्रसिद्ध आहेत. शिवनेरी किल्ल्यावरील गंगा, यमुना या गुहेप्रमाणे खोदलेल्या टाक्या पहाण्यासारख्या आहेत. सिंहगडावरचे देव टाक्यातील पाणी चवीकरता प्रसिद्ध आहे. राजगडावरील पद्मावती तलाव व पद्मावती मंदिराशेजारची जोड टाकी प्रसिद्ध आहेत. चारी बाजूनी वेढलेल्या सिंधुदुर्गावरील दुधबाव, दहीबाव व साखरबाव या गोड्या पाण्याच्या विहिरी आजही आपले लक्ष वेधतात. प्रतापगडावरील भवानी तलाव, पन्हाळा किल्ल्यावरील अंधारबाव, धारुर किल्ल्यातील सर्व बाजूंनी तटानी बंदिस्त गोडी दिंडी अथवा गोड्या पाण्याचा विशाल तलाव आदी बांधकाम आश्चर्यकारक आहे.

**अमात्य रामचंद्र बावडेकर आज्ञापत्रात म्हणतात.**

तैसेच गडावरी अधिउदक पाहून किल्ला बांधावा. पाणी नाही आणि ते ते स्थळ तो आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी, टाकी पर्जन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे ऐसी मजबूत बांधावी.

गडावरी झराही आहे. जैसे तैसे पाणीही पुरते म्हणोन तितक्यावर निश्चिती न मानिता उद्योग करावा किंनिमित्य की जुझमामध्ये भांडियाचे आवाजाखाले झरे स्वरुप होतात आणि पाणियाचा खर्च विशेष लागतो. तेव्हा संकट पडते. याकरिता पैसे जागा जकेरियाचे पाणी म्हणोन दोन चार तळी टाकी बांधून देऊन त्यातील पाणी खर्च होऊ न द्यावे.

गडाचे पाणी बडुन जतन करावे. शिवकाळात गडावरील पाण्याचे नियोजन अभ्यासपूर्ण केल्याचे आपणांस दिसते.

महाराष्ट्रातील गड कोट दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन याबाबत तपशीलवार अभ्यास केलेला पानी पानी दिसतो.

महाराष्ट्रातील भौगोलीक परिस्थितीचा अतिशय बारकाइने शिवाजी महाराजांनी अभ्यास केलेला होता म्हणूनच ते स्वराज्याची निर्मिती करु शकले.

■■■

# ४.५ गडांवरील अधिकारी वर्ग

सतराव्या शतकाचा उत्तरार्ध हा महाराष्ट्रातील गडांचा वैभवसंपन्नतेचा काळ होता. या गडांचे तेथील राजसत्तेच्या शासकीय व्यवस्थेशी अगदी जवळचे संबंध होते. गड म्हणजे संरक्षणाचे, दूरवरच्या प्रदेशावर टेहळणी करण्याचे आणि शत्रू सैन्यावर हल्ला करण्याचे महत्त्वाचे लष्करी केंद्र मानले गेले होते. त्यामुळे गडावरील संपूर्ण व्यवस्था ही पूर्णपणे शासकीय व संरक्षणात्मक होती. हे महत्त्वाचे, राजसत्तेचे आणि गडाच्या परिसरातील (घेऱ्यातील) नागरी जीवनाचे एक अतूट नाते होते. कारण गड हा त्यांचा रक्षणकर्ता होता. युध्दप्रसंगी जीवनाचा मुख्य आधार होता. दुर्गव्यवस्था, दुर्गयोजना आणि दुर्गरचना किंवा निर्मिती यांचा विचार राजसत्तेच्या दृष्टिकोनातून झालेला होता.

शिवकाळाच्या दृष्टिकोनातून या गड कोट व दुर्गाकडे बघताना लष्करी स्वरूप व लष्करी संबंध त्याबरोबरच गडांची रचना व बांधणी याचा विचार करावा लागतो. त्यात गडावरील संबंधित अधिकारी, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, त्यांचे कार्य आणि गडाचा कारभार पाहण्यासाठी बांधलेल्या कचेऱ्या व कारखाने यांचा अंतर्भाव होतो. शिवाजी महाराजांनी येथील व्यवस्थेचा बारकाईने विचार केलेला होता. त्यांनी स्वराज्याला आवश्यक असणारी शासनव्यवस्था निर्माण केली होती आणि शिवकाळातील गडांवरून त्यावेळी फार मोठे शासकीय व्यवहार सुरू होते. यासाठी महाराजांनी एका विशिष्ठ पध्दतीने एक गड आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर (गडाचा घेरा) हा तेथील शासकीय व लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यात दिलेला होता.

शिवाजीमहाराजांनी स्वराज्यरक्षणात गडांना महत्त्व दिले आणि तेथील व्यवस्था निर्दोष ठेवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गडावर नेमलेली निरनिराळ्या दर्जाची माणसे व गडोपयोगी सामान यांची पारख खुद्द महाराजांकडून व्हायची. एक गड, पण त्याला जबाबदार अनेक या नियमामुळे गडावरचा लष्करी विभाग कधी जायबंदी झाला आहे असे शिवकाळात कुठे आढळून येत नाही. त्यांनी गडाच्या व्यवस्थेचे दोन प्रमुख विभाग केले. पहिला म्हणजे गडावर नेमलेली माणसे आणि दुसरा म्हणजे गडासाठी लागणारी साधनसामुग्री. त्यात अव्यवस्था व गोंधळ यांना कधीच वाव दिला नाही.

शिवकाळात गडाच्या संरक्षणव्यवस्थेत तीन भाग होते. १) अधिकारी वर्ग २) सैन्य ३) इतर अधिकाऱ्यांमध्ये मुख्य व त्याच्या कार्याशी संबंधित असलेले त्याचे सहकारी याचा अंतर्भाव होत असे.[६]

शिवकालीन दुर्गावरचा सर्वोच्च अधिकारी म्हणजे हवालदार. रघुनाथ पंडिताने लिहिलेल्या 'राजव्यवहार कोशात' याला 'मुद्राधारी' म्हणून संबोधले आहे.

सर्वसाधारणपणे याला किल्लेदार म्हणण्याची पध्दत आहे. हवालदार पद मुलकी कारभारात देखील येत असे. सुभेदाराच्या हाताखाली राहून कारभार पाहणारा परगण्याचा मुख्य अधिकारी तो हवालदार.

शिवकाळात गडाचा हवालदार जणू गडाचा राजा. हुकुमत पन्हा रामचंद्र अमात्य बावडेकर आपल्या आज्ञापत्रात त्याचा उल्लेख करताना लिहितात की, ''किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार.'' स्वराज्यातल्या दुर्गावरचा हा हवालदार कुलवंत मराठा जातीचा, कबिलेदार आणि महाराजांनी सोपविलेला गड डोळ्यात तेल घालून जपणारा त्यांचा निष्ठावंत सेवक होता.[७]

तो प्रत्यक्ष महाराजांच्या परिचयाचा असायचा. त्याला त्या गडाची खडान् खडा माहिती असायची.

हवालदाराची सत्ता फक्त गडातील भागावरच नव्हती, तर गडावर गडाबाहेरच्या परिसरावर (घेऱ्यावर) आणि या दोन्ही ठिकाणी राहणाऱ्या लोकांवरसुध्दा होती. गडाची संरक्षणव्यवस्था आणि युध्दप्रसंगी हातापाशी असलेल्या सैन्याची व्यूहरचना करण्याचा अधिकार त्याला महाराजांकडून दिलेला होता. युध्दजन्य परिस्थिती पाहून किंवा त्याच्याही अगोदर तो गडाच्या डोंगर उतारावर टेहळणीसाठी एखादे नवे मेट वसवी. युध्दजन्य परिस्थिती निर्माण होण्यापूर्वी हवालदार गडाच्या परिसरातील गाव किंवा वाड्या उठवी आणि वेळप्रसंगी गडाच्या परिसरातील लोकांकडून कर देखील वसूल करत असत.

सर्वसाधारण हवालदाराचा कालावधी तीन वर्षाचा होता. त्यानंतर त्याची त्या गडावरून बदली केली जात असे. गडाला धोका उत्पन्न करणाऱ्या हवालदाराला वेळ न घालवता, त्याला सावध होऊ न देता अचानक छापा टाकून कैद करत असत. महाराजांसमोर हवालदाराचा न्यायनिवाडा करण्यात येई. त्यात जर तो दोषी आढळला, तर त्याचा तात्काळ शिरच्छेद करून त्याचे मस्तक गडोगडी फिरवून फितुरीचा काय परिणाम होतो याची समज इतर हवालदारांना दिली जाई. स्वराज्यातल्या गडावरील हवालदाराची नेमणूक खुद्द शिवाजी महाराजांकडून केली जायची.

गडाच्या हवालदार व सरनोबततीतून शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे दोन सेनापती निवडले होते. पुरंदरच्या हवालदारीवरून नेताजी पालकर आणि रायगडाच्या सरनोबतीवरून कडतोजी उर्फ प्रतापराव गुजर. दोघांनाही आपल्या अंगचे अनमोल गुण महाराजांच्या निदर्शनास आणून द्यावे लागले होते. स्वकर्तबगारीवर सेनापती पदापर्यंत चढत गेलेली ही दोन्ही सामान्य माणसं होती.

गडाच्या हवालदारावर फार मोठी जबाबदारी सोपवलेली असे. त्याला अनेक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागायची. एखाद्या गडावर एखाद्या हवालदाराची नेमणूक झाली तर, त्याचा त्रास, अगर इतर नातेवाईक जवळच्या दुसऱ्या गडावर याच पदावर नेमला जात नसे. किल्ल्याचा हवालदार एखाद्या लढाईत सैन्याचे नेतृत्व करीत असताना मारला गेला, तर त्याचे पद त्याच्या मुलाला किंवा इतर भाऊबंदास देत नसत. रायगड किंवा राजगड यासारखा एखादा मोठा गड असेल तर, त्या ठिकाणी दोन-तीन हवालदार नेमले जात असत आणि त्यातील एकाला सरहवालदार या पदवीने नावाजत असत.

शिवकाळात पुरंदरचा हवालदार नेताजी पालकर होता, तर सज्जनगडावर जिजोजी काटकर होता आणि महिपत गडावर दसमाजी नरसाळे सर हवालदार म्हणून नेमलेला होता. काही वेळा युध्दजन्य प्रसंगी शिवाजीमहाराज एखाद्या निष्णात सेनानीची एखाद्या गडावर नामजाद (specially appointed) म्हणून नेमणूक करीत. त्याला 'नामजाद किल्लेदार' म्हणून संबोधले जाई.८

मिर्झा राजा जयसिंह व दिलेरखान यांनी पुरंदरला जेव्हा वेढा घातला तेव्हा तिथे 'नामजाद किल्लेदार' म्हणून मुरारबाजी देशपांडे याची महाराजांनी नियुक्ती केली होती.

अनेक अवधड प्रसंगांतून तावून-सुलाखून निघालेला माणूसच शिवकाळातील गडाचा हवालदार म्हणून नेमला जात असे.

हवालदाराचा जवळचा सहकारी म्हणजे सरनोबत. हा देखील हवालदाराप्रमाणेच चांगला घरंदाज मराठा समाजातील असे. युध्दकलेत हवालदाराप्रमाणेच तो अत्यंत निपुण व अनुभवी असावा लागे. हवालदाराच्या अनुपस्थितीत तो गडाचा कारभार पहात असे.

गडाची लष्करी सुरक्षितता, सैन्याची व्यवस्था, पहाऱ्याच्या पध्दती, युध्दजन्य परिस्थितीत गड झुंजाविण्याच्या योजना, सैन्यभरती इत्यादी अनेक कार्यांचा समावेश सरनोबतीत होत असे.

राजगडासारखा तीन माच्यांचा (सुवेळा, संजीवनी व पद्मावती) गड असेल तर गडाच्या सरनोबताच्या हाताखाली त्या त्या माचीच्या रक्षणासाठी तटसरनोबत नेमले जात. गडाचा विस्तार जसा असेल त्याप्रमाणे त्यांची संख्या कमी जास्त होत असे. गडाच्या सरनोबताचा कार्यकाळ चार वर्षाचा असे. त्यानंतर त्याची बदली दुसऱ्या गडावर करण्यात येई. सरनोबताच्या हाताखाली तट सरनौबत, सरनाईक व नाईक हे दुय्यम दर्जाचे लष्करी अधिकारी काम करीत असत. ते सैन्याच्या लहान लहान तुकड्यांचे मुख्य असत. या दुय्यम अधिकाऱ्यांच्या हाताखाली सैनिक, बंदुकधारी सैनिक, तिरंदाज, आगहत्यारी (गोलंदाज) वगैरे असत. युध्दप्रसंगी गडावरील सैन्याच्या सर्व हालचाली सरनोबताच्या आज्ञेनुसार केल्या जात असत.

हवालदाराच्या लष्करी आणि आर्थिक व्यवहाराला मदत करणारा अधिकारी म्हणजे सबनीस. हा जातीने ब्राह्मण असे. शिवकाळात हवालदार जर गडाचा राजा असेल तर सबनीस गडाचा पेशवा होता.

गडावरील सर्व आर्थिक व्यवहाराचा प्रमुख म्हणून याची नेमणूक केली जाई. त्याचा कार्यकाल पाच वर्षाचा असे. गडावरील लोकांची हजेरी, पगार, गडासंबंधीचा पत्रव्यवहार, आल्या गेल्याची चौकशी, इतर लेखन इत्यादी कार्यभागाचा समावेश होत असे. त्याचबरोबर गडावरची रोख रक्कम आणि खजिना देखील त्याच्याच ताब्यात असे आणि यासंबंधीचा पत्रव्यवहारही तोच करत असे. गडासंबंधीच्या हुकुमासाठी सबनीसाची परवानगी घ्यावी लागे. सबनीसाच्या परवानगीशिवाय हुकुमाची अंमलबजावणी होत नसे.

हवालदार व सबनीस या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मदतीला आणखी एक अधिकारी दिलेला होता आणि तो म्हणजे कारखानीस.

हा जातीने कायस्थ प्रभू असे. त्याकाळी स्वराज्यात ब्राह्मण, प्रभू व मराठे हे शिक्षित होते, पण ज्या शिक्षणाने हिशोबी काम करता येईल आणि दरबारी रीतिरिवाजांचे भान ठेवून पध्दतशीरपणे पत्रव्यवहार लिहिता येईल याचे शिक्षण त्या काळी ब्राह्मण व कायस्य प्रभूंना असे. त्यामुळे शिवकाळात कारकुनी पेशातील नोकरदारांमध्ये बहुतांशी हेच लोक आढळतात. दोघेही जसे उत्तम लेखक असत, तसे ते नामांकित सेनानी देखील असत. मोरोपंत पिंगळे, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, राघो बल्लाळ अत्रे अशी शिवकाळातील कितीतरी उदाहरणे देता येतील. गडावरील कारखाने (वस्तुनिर्मितीची स्थाने), कामगार, धान्य कोठारे, सरपण, दारूगोळा, तोफा, बंदुका, कापडचोपड, जनावरे, झाडलोट इत्यादी कामांसाठी लागणाऱ्या साधनसामुग्रीचा साठा ठेवणे, तपासणे व कमी पडल्यास बाहेरून मागवणे इत्यादी संबंधित कामांचा अंतर्भाव कारखानिशीत होत असे. त्याचबरोबर गडावरील इमारतीची बांधणी व दुरुस्ती इत्यादी सर्व कामे कारखानिशीत समाविष्ट असत. गडाची तटबंदी कशी बळकट राहील, बुरूज कसे बुलंद राहतील आणि गडावरील व्यवस्थेतील प्रत्येक वास्तू व त्यासंबंधित साधनसामुग्री कशी व्यवस्थित राहील, असे व्यापक क्षेत्र कारखानिशींच्यावर सोपविले जाई. याला आपल्या कामाव्यतिरिक्त गडाच्या इतर कामात ढवळाढवळ करता येत नसे, पण गडासंबंधीच्या महत्त्वाच्या कागदपत्रांबाबत याची मान्यता घेण्याची पध्दत होती. रोजकीर्द (डायरी) लिहिण्याची जबाबदारी देखील कारखानीसाचीच असे. याचा कार्यकाल पाच वर्षाचा असे. काही वेळ गडावरील इमारतींच्या डागडुजीसाठी, नव्याने बांधण्यासाठी, गडाच्या तट–बुरुजांची दुरुस्ती व निगा राखण्यासाठी असलेल्या अधिकाऱ्याला 'इमारती हवालदार' असे पद दिल्याचे दिसते. रायगडावर हिरोजी इंदलकर हा इमारती

हवालदार म्हणून काम करताना आढळतो.

गडाचा सारा कारभार हवालदार, सबनीस व सरनौबत यांच्या एकविचाराने चालत असे. गडाचा कारभार कोणा एका अधिकाऱ्याच्या हाती राहू नये, तिघांच्या एकविचाराने गडाची व्यवस्था व्हावी आणि गडासारखा राज्याचा संरक्षक राज्यस्मरणार्थ सदैव सज्ज असावा, हा शिवाजी महाराजांचा मानस होता. त्यामुळे गडाच्या कारभारात हवालदार, सबनीस व सरनोबत ही महत्त्वाची पदे मानली जात होती आणि सरनोबत, सबनीस व कारखानीस यांच्या कार्याचा समन्वय हवालदाराच्या कार्यात घेतला जात असे.

दुय्यम अधिकारी गडाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याखेरीज गडावर दुय्यम अधिकारी असत. त्यात गडणवीस, तटणीस, कोटणीस, दख्तवान, दिवाणी, मुजुमदार, फडणीस, पोतनीस, चिटणीस वगैरेंचा समावेश होत असे आणि त्याची संख्या त्या त्या खात्यातील कामाप्रमाणे कमी-अधिक होत असे. या अधिकाऱ्यांबरोबरच गडाच्या संरक्षणार्थ सैन्य तैनात केले जाई. त्यांना हशम असे संबोधत असत. गडाचा आकार व महत्त्व लक्षात घेऊन त्या त्या गडाच्या संरक्षणार्थ कमी-अधिक प्रमाणात सैन्य तैनात केले जाई. हशम हा 'इस्म' या फार्सी शब्दाचा अपभ्रंश आहे. मराठीत याला पाईक म्हणतात. सरनोबताच्या हुकुमाप्रमाणे सरनाईक सैन्याची व्यवस्था करत असे. पाच पाईकावर सहावा नाईक आणि पाईक व नाईक यांच्यावर सरनाईक अशी पध्दत सर्वसाधारणपणे असे. गडावरचे अनेक सरनाईक सरनोबताच्या हाताखाली असत आणि सरनोबत गडाच्या हवालदाराच्या आज्ञेत राहून काम करीत असे

स्वराज्यातील बहुतांशी दुर्ग डोंगरावर होते. त्यामुळे रात्रं-दिवस दऱ्याखोऱ्याशी संबंध असलेली लोकंच गिरिदुर्गावर निवास करायला योग्य असायची. जेव्हा शत्रुसैन्याचा गडाला वेढा पडे तेव्हा हाताशी असलेल्या साधनसामुग्रीवर गडावरील लोकांना अवलंबून रहावे लागत असे आणि तेही अनिश्चित काळपर्यंत त्यात ज्यांची रोगप्रतिबंधक शक्ती जबर असायची, असेच लोक गडावर राहू शकत असत; परंतु पावसाळ्यात मात्र त्यांची खरी कसोटी लागत असे. पावसाची सतत धार, सोसाट्याचा वारा, धुक्याची वाट, वांबळी हवा अशा साऱ्या वातावरणात चाकरी करणे कठीण जात असे.

त्याबद्दल रामचंद्र अमात्य आज्ञापत्रात लिहितात : 'किल्ल्यांची सेवा परम कठीण, शासन परम उग्र.' खरोखरच शिवकाळातील गिरिदुर्गावर राहून स्वराज्याची सेवा करणे सोपे नव्हते. गडावर माणसांची निवड कशी करावी, त्यांच्याबद्दल नियम काय असावेत हे नमूद करताना रामचंद्र अमात्य लिहितात की, ''गडकोट संरक्षणाचे कार्य फार नाजूक. परम नाजूक. स्थळास एखादा मामलेदारादी जे लोक ठेवणे, त्यांनी भेद (फितुरी) केल्यामुळे अथवा शत्रू चालोन आला असता नामर्दी केलीयामुळे अथवा त्यांचे गाफिलीमुळे स्थळास (किल्ल्यास) दगा जाहला, तर स्थळासहित तितके राष्ट्र (राज्य) हातीचे गेलेच, उरल्या स्थळास व राष्ट्रास उपसर्ग लागला. शत्रू प्रबळ येऊन पावला असता जो गेला किल्ला, त्या किल्लेकराचे (किल्लेदाराचे) वारे इतर राहिले किल्लेकरास लागोन तोही रचकास अपाय योजितात, म्हणजे एक एक राज्यास धक्का बसतो. या कारणे किल्ले कोट जतन करणे ही गोष्ट सामान्य आहे असे न समजता तेथील उस्तवारी वा शासन यास तिळतुल्य अंतर पडो न द्यावे.९

सरनोबत (गडाचा सेनापती) म्हणजे निस्पृह, कोणाचे निसपतीचे (निसबत - पदरी असलेले) अथवा एकाचे आर्जवामुळे ठेवावे असे नाही. जे कुलवंत मराठे आणि शिपाई, जे शरम धरत असतील, कबीलेदार (कुटुंबवत्सल), विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रित, सकल लोकांचे समाधान रक्षून

यथोचित सर्वापासून स्वामीकार्य घेत हे स्थळ (किल्ला) म्हणजे धन्याने ही परमप्रिय ठेवी दिली आहे, आपले प्राणान्त यास दगा होऊ नये, असे पूर्ण चित्तात आणून जे धन्यानी (शिवाजी महाराजांनी) लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडो न देता, दिवसाचा उद्योग दिवसा, रात्रीचा उद्योग रात्री, निरलस्यपणे करून सर्व प्रयत्ने स्थळ जतन करीत, असे ठेवावे.

तसेच सबनीस व कारखानीस हे कारकून धन्यांनी लावून दिले मर्यादेचे प्रेरक, सकळ उचितानुचित कार्याचे सूचक जसे हवालदार, सरनोबत खावंद तसे हेही खावंद यांनीही त्याच न्याय सकळास वर्तवून आपण वर्तावे लागते. याकरिता तेही याच गुणांचे आणि लिहिणार, अमीन (व्यवस्थापक), निर्भीड असे पाहून ठेवावे. तसेच तटसरनोबत, बारगीर (सरकारी घोड्यावर बसणारा सरकारी नोकर किंवा सैन्यातला शिपाई), नाईकवाडी (मराठ्यांच्या सैन्यातील लहान वतनी अंमलदार), रजपूत जे ठेवणे ते बरे मर्दान कबिलेदार, विश्वासू असे पाहून नजर गुजर करून (नजरेने परीक्षा करून किंवा पारखून) ठेवीत जावे. किल्ल्यास दहा टक्क्यांचा रजपूत (प्यादा) ठेवणे. तोही हुजुरचे सनदेखेरीज न ठेवावा. (दहा टक्के रोजमुरा असलेला माणूस) किल्ल्यांमध्ये मनुष्य ठेवणे ती चालक (चंचल), चोरटे, खुनी, तऱ्हेवाईक, शराबी, कैफी, भंगी (भांग पिणारे किंवा भंगड) फितवखोर असे सर्वथाही न ठेवणे. जे ठेवणे ते परीक्षा करून ठेवीत जावे. तटसरनोबत. बारगीर हेही नवेजुने करीत असावे. नाईकवाडी, रजपूत, अन्यायी अथवा कार्यकर्ता असलिया त्यास काढून ज्यास जे शासन अथवा सर्फराजी करणे ते करीतच जावे.

लष्कराचे सरदाराचे भाऊबंदांना अथवा त्याचे निसपत लोक त्यास परिच्छिन्न किल्ल्याचा मामला सांगू नये. तसेच एका घराचे भाऊबंद एक, दोन, तीन आहेत आणि इतकेही गडवई (गडाच्या कामासाठी योग्य असलेला अधिकारी) तर त्यास किल्ल्याचे मामले आवश्यमेव सांगावेच लागतात. काय निमित्त की, किल्ल्याचे कामास माणूस मिळणे परम कठीण आहे, परंतु त्यास समीप समीप किल्ल्यांवर न ठेवावे. दूर दूर किल्ले, एकाचा हात एकास न पावे मध्ये आणखी किल्ले असतील अशा किल्ल्यांचे मामले सांगून सेना घ्यावी.

किल्लेखालील मुलखातील देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले आदीकरून मिरास (वडिलोपार्जित मिळकत किंवा वतन) वतनदारी यांस त्या समीपच्या किल्ल्यावर सेवा न सांगावी, त्यांचे वतनापासून दहा-पाच गावे दूर जाहलीयावरी चाकरीवर दुरुस्त न राहता क्षणाक्षणा घरास जाणार, किंबुहना समयविशेषी वतनाचे आशेने स्थळास भेद करून दगाही करणार, याकरिता किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावे.

शिवकाळात स्वराज्यातील गड, कोट व किल्ल्यांवर कोणकोणती माणसे ठेवावीत आणि त्यांची नेमणूक करताना काय काय काळजी घ्यावी याचे आज्ञापत्रातील विवेचन पाहता एखाद्या किल्ल्यावर माणसे नेमताना त्यांची किती काळजीपूर्वक निवड केली जाते ते स्पष्ट होते.

युध्दजन्य परिस्थितीत राजाने आणि गडावर नेमलेल्या अधिकाऱ्यांनी कशा प्रकारे वागावे, गड कसा लढवावा, त्याचबरोबर गडाचा जीव तो हवालदार गड सांगताना रामचंद्रपंत अमात्य लिहितात :

''स्थळास गलिमाचा वेढा आला तरी सामान व उपराळा (कुमक किंवा गडोपयोगी कोणत्याही प्रकारची मदत) आहे तो गड हरहुन्नराने (हर प्रकारे) झुंजून स्थळ जतन करावे. सामान सरले (संपले), उपराळा राहिला. निदान येऊन पडिले (निर्वाणाची वेळ आली), तरी धन्याने हरउपाय मामलेदारादी लोक काढून आणून वाचवावे. धन्याचा हात पावेना. (सरकारातून मदत आली नाही), तर असे झाले

तरी परिछिन्न मामलेदारादी लोकी वारवा होऊन (स्वत:चे बलिदान करून) मरावे. त्यांचे मुलांचे धन्यांनी सर्व प्रकारे चालवावे. परंतु लिहिलेप्रमाणे निदान येऊन पडले, तर सल्ला (तह, करार-मदार) करून स्थळ (किल्ला) देऊन आपला जीव वाचवावा, असे सर्वार्थी न करावे. जो मामलेदार (हवालदार) असे करून तोंड घेऊन येईल त्याचे मुखावलोकन न करिता फिरोन सेवा न सांगता त्यास घरीच बसवावे. फिरोन त्याचविशी कोणी अर्ज करतील (रदबदली करतील) तरी त्यास अर्ज करू न देता लिहिलेप्रमाणे त्यास ठेवून, स्थळाचा तगादा लावून इलाज करवावा. (गड परत घेण्याविषयी निकड लावावी) तो श्रमी करीत असता स्थळाचा उपाय न होय (प्रयत्न करूनही गड हस्तगत करता आला नाही) तेणे शरमिंदा होतो आणि भय वागवितो, असे प्रत्ययास आले तरी, मग कोणी सरकारकून अर्ज करतील त्यांचे भिडेने अर्ज कबूल केला असे करून त्यास दर्शन देऊन हुजुरच मामला सांगावा. कदाचित कोणी मामलेदार स्थळास संकट झाले म्हणोन स्थळ गनिमास देऊन आपला जीव वाचवून तो गनिमाकडे गेला तरी तो (प्र) यत्नेकरून हस्तगत होई ते गोष्ट करावी. कदाचित हातास न लागे तरी उपाये मारवावा. उपाये करून गनिमाकडे (शत्रूकडे) गेला तो न ये असे झाले तरी त्याचे लेक (मुलं) गुलाम करावे, बायका बटकी कराव्या, त्यासही विष मारेकरी आदी करून हरप्रयत्ने तेथील तेथे मारवावा. जर सामान (गडोपयोगी साहित्य) सरले, उपराळा राहिला, धनी याचा हात न पावे. (सरकारातून मदत येऊ शकली नाही) असे जाहलीयावरी निदानी मामलेदारांनी गड गनिमास देऊन गनिमाकडे गेला तरी त्याचे कविलियास (कुटुंबास) तसाच निर्बंध करावा. पहिले लिहिलेप्रमाणे सकल निर्वाह करावा. जरी कौल घेऊन आला तरी त्याची मुले-लेकरे सोडावी. त्यास घरी बसवावा, स्थळाचा उपाय करीत तरी (गड जिंकून घेण्याचा प्रयत्न करील) करून द्यावा. पर्याये करून कितीका दिवसी उपर हरएक मामला सांगावा.'' स्वराज्यातील गडावर नेमलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या कार्याचा अंतर्भाव हवालदाराच्या कार्यात केला जात असे. त्यामुळे गडावरील लष्करी व मुलकी कारभाराचा मुख्य म्हणजे हवालदार. शिवाजी महाराजांच्या आज्ञेत राहून गडाचे रक्षण करणारा स्वराज्याचा एकनिष्ठ सेवक, गडावरच्या या विशिष्ट पद्धतीमुळे शिवाजीमहाराजांचे गड, कोट व दुर्ग शत्रूशी झुंजले.

मिर्झाराजा जयसिंग व दिलेरखानाच्या सेनासागरापुढे लढलेला पुरंदरचा रुद्रकेदार मुरारबाजी देशपांडे, शायिस्तेखानाच्या विरुध्द चाकणचा गढीवजा किल्ला झुंजवणारा फिरंगोजी नरसाळा किंवा कणेरागडासारखा अल्पपरिचित गड लढवणारा रामाजी पांगारा हे शिवकाळाचे खरे मानकरी होत.[१०]

■■■

# ४.६ शिवकालीन गडांवरील देवदेवता व द्वारशिल्पे

कोणताही गडदुर्ग घ्या, त्यावर एखादे दुसरे मंदिर हे असतेच. गडाच्या आश्रयाने राहून शत्रुसैन्याशी झुंज देण्यासाठी, मनोधैर्य वाढविण्यासाठी आणि केलेल्या प्रयत्नांना यश दे म्हणून परमेश्वराला विनंती करीत दोन हात जोडण्यासाठी मंदिरे बांधली गेली. अनेक वेळा कातळकड्याच्या जवळ बांधलेल्या तटबंदीत श्री गणेश किंवा श्री हनुमान यांच्या छोट्या प्रतिमा कोरीत असत आणि देवतांच्या नावे त्या भागाला खंदकडा अशी दुर्गसंज्ञा जोडत. उदाहरणार्थ, गणेश खंदकडा किंवा हनुमान खंदकडा अशा प्रकारचे खंदकडे तोरणा, सिंहगड, पुरंदर या गिरिदुर्गांमध्ये आजही आहेत. ते सर्वच्या सर्व शिवकालीन असतीलच असे ठामपणे म्हणता येणार नाही.

शिवाजी महाराजांची कुलदेवता श्री आदिशक्ती तुळजाभवानी देवी होती. त्या देवीचे मंदिर तुळजापूर येथे होते. त्यावेळी तुळजापूर आदिलशाहीत होते. त्यामुळे महाराजांच्या मनात जरी श्री तुळजाभवानीचे दर्शन घेण्याची कितीही इच्छा असली तरी त्यांना ते स्वराज्यकार्यामुळे अशक्यच होते. त्यांनी त्या वेळचा धामधुमीचा काळ लक्षात घेऊन आपल्या कुलदेवतेचे मंदिर स्वराज्यातील एखाद्या गिरिदुर्गावर बांधण्याचे योजले आणि त्याप्रमाणे त्यांनी प्रतापगडाची निवड केली.

प्रतापगडावरील श्री तुळजाभवानी देवीच्या स्थापनेबद्दल कृष्णाजी अनंत सभासद आपल्या बखरीत नमूद करतो की, त्या उपरांत (नंतर) मग राजियासि स्वप्नात श्री तुळजाभवानी बोलू लागली की, ''आपण अफजल तुझ्या हाते मारविला व कित्येक पुढेही आले त्यास पराभवात नेले. पुढेही कर्तव्य उदंड कारण करणे आहे. आपण तुझ्या राज्यात वास्तव्य करावे. आपली स्थापना करून पूजा-पूजन प्रकार चालविणे.'' त्या उपरि राजियाने गंडकी नदीस. (इथे नदीवरून असा अर्थ घ्यावा. कारण गंडकी नदी नेपाळमध्ये असून त्यातील शिळेला गंडकी शिळा असे म्हणत. त्या शिळेला शाळिग्रामी व नारायणी अशी इतरही नावे आहेत) द्रव्य गाडियावरी घालून, गंडकी पाषाण आणून, श्री भवानी सिध्द करून, प्रतापगडा(वर) देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणे नानाप्रकारे करून दिली. महाल-मोकाशे देऊन सचंतर (स्वतंत्र) हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोत्सव चालविला. नवस यात्रा सर्वदा तुळजापूरच्याप्रमाणे तेथे चालती आली आणि तुळजापूरचे यात्रेस लोक जातात त्यास दृष्टांत स्वन्पे होतात की, ''आपण प्रतापगडास आहे. तेथे तुम्ही जाऊन दर्शन घेणे व नवस फेडणे.'' असे (देवी) बोलू लागली. मोठे जागृत स्थान जाहले.[११]

प्रतापगडावर श्री तुळजाभवानीची स्थापना इ.स. १६६१ मध्ये झाली. अतिभंग अवस्थेतील अष्टभुजा महिषासुरमर्दिनीच्या अतिशय देखण्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना मोरोपंत पिंगळ्यांच्या हस्ते करण्यात आली. प्रतापगडावर आज प्राकार, सभामंडप व गाभारा अशा दालनांनी युक्त असलेल्या मंदिरासमोर दीपमाळा आहेत. गाभाऱ्यात सिंहासनावर देवीची मूर्ती विराजमान आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूस चंद्र, उजव्या बाजूस सूर्य आणि तिने मस्तकावर शिवलिंग धारण केलेले आहे. अष्टभुजा देवीच्या डाव्या बाजूकडील हातांमध्ये अनुक्रमे शंख, ढाल व धनुष्य ही आयुधे असून तिने एका हाताने महिषासुराचे केस पकडलेले आहेत, तर उजव्या बाजूकडील हातांमध्ये खड्ग (तलवार), बाण व चक्र ही आयुधे असून तिने एका हाताने त्रिशूळ महिषासुराच्या शरीरात खुपसले आहे. महिषासुराच्या एका

बाजूस देवीचे वाहन सिंह असून राक्षसाच्या दुसऱ्या बाजूला नाग आहे.

इ.स. १६६१ नंतर शिवाजी महाराजांवर आणि त्यांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्यावर एकापाठोपाठ एक संकटे कोसळू लागली. पन्हाळगडावरून सिद्दी जौहर उर्फ सलाबतखानाच्या वेढ्यातून सुटका होते न होते तोच त्यांना कारतलबखानाशी झुंज द्यावी लागली. पुण्यातील लाल महालात बसून मुगलांच्या लष्करी कारवायांची सूत्रे हालवणाऱ्या शायिस्तेखानावर छापा टाकावा लागला. सुरतेवर हल्ला चढवून मुगलांच्या दख्खनमधील अर्थकारणाला धक्का द्यावा लागला. खवासखानाचा बंदोबस्त करावा लागला. बसरुरची मोहीम करावी लागली. अशा अनेक प्रसंगांची जणु मालिकाच सुरू झाली आणि अखेर आग्र्याच्या सुटकेच्या प्रसंगाने या मालिकेची सांगता झाली. त्यानंतर काही काळ महाराजांनी व त्यांच्या सैन्याने विश्रांती घेतली. पुरंदरच्या तहानुसार महाराजांना स्वराज्यातील तेवीस किल्ले मुगलांना द्यावे लागले होते. ते परत जिंकण्याची मोहीम आखली आणि ती यशस्वी देखील केली. त्यानंतर इ.स. १६७३ मध्ये कोंडाजी फर्जंदने अवघ्या ६० मावळ्यांच्या मदतीने पन्हाळगड जिंकून घेतला होता. तो गड पाहण्यासाठी शिवाजी महाराज रायगडावरून निघाले. पाचाड-पोलादपूर मार्गेते प्रतापगडावर आले. दि. ९ मार्च १६७३ रोजी त्यांनी श्री तुळजाभवानीची यथासांग पूजाअर्चा केली आणि त्या रात्री प्रतापगडावरच मुक्काम केला आणि दि. १६ मार्चच्या सुमारास त्यांनी पन्हाळगड गाठला.

शिवाजी महाराज पन्हाळगडावर आल्यावर दत्ताजीपंत वाकनीस यांनी सोन्याची फुले उधळून त्यांचे स्वागत केले. गडावरचे स्त्री-पुरुष त्यांच्याकडे आनंदाने पाहत होते. भाट मंडळी महाराजांची स्तुती करीत होती. जयराम पिंडे याने आपल्या पर्णाल पर्वतग्रहणाख्यान या काव्यातील चवथ्या अध्यायात या प्रसंगाचे मोठे बहारदार वर्णन आहे ते असे :

ततः सोमालये नाक्नाा तटाके प्रस्फुटांबजे ।
सारसैश्चक्रवाकैश्च हंसैः संशोभिते तटे ।।६६ ।।
मत्सैः समुच्चलत्युत्यैः कच्छपैश्च तरंगिते ।
वाताहतिचलां मोजोरपत् द भृंगकुलाकुले ।।६७ ।।

**अर्थ :** पुढे सोमालय नावाचा, विकसित कमळांनी भरलेला असा तलाव लागला. त्याचा काठ सारस, चक्रवाक व हंस या पक्षांनी सुशोभित झाला होता. माशांच्या व कासवांच्या योगाने त्यातील पाणी खळबळत असून त्यावर लहरी उमटत होत्या. वाऱ्याच्या तालावर हलणाऱ्या कमळांमधून उडणाऱ्या भुंग्यांच्या झुंडीमुळे ते गजबजून गेले होते.

मणिभंगाच्छसलिले श्रान्तविश्रान्तिकारिणी ।
कर्पूरवापिका तोयमुपस्पृश्य ततः परम ।।६८ ।।
दत्तदृष्टिः समालक्ष देवतायतनं पुरः
भोजभूपोप्त चांपेयपुष्पैरपि मनोहरैः ।।६९ ।।
देवतायने तस्मिललक्षपूजां समादिशत् ।
पुण्यहवनं कृत्वा शैलारोहनिमित्तकम् ।।७० ।।

**अर्थ :** त्या तलावातील पाणी स्फटिकाप्रमाणे स्वच्छ व थकलेल्यांचा थकवा नाहीसा करणारे होते. तेथे कर्पूर वापी (विहिरी)चे पाणी (कापराप्रमाणे गार व सुगंधी असे पाणी) पिऊन (शिवाजी महाराजांनी)

पुढे दृष्टी फेकली. तेव्हा त्यांना समोर देवालय दिसले. त्या देवळात भोज राजानी लावलेल्या चाफ्याच्या मनोहर फुलांनी (महाराजांनी गडावरील सैनिकांना) लक्षपूजा करण्यास सांगितले. गडावरील आपल्या आगमनानिमित्त त्यांनी पुण्यवहन केले.

त्यानंतर शिवाजी महाराजांनी स्वत:ला रायगडावर राज्याभिषेक करून घेण्याचे ठरविले. त्या समारंभापूर्वी आपल्या कुलदेवतेचे अर्थात प्रतागडावरच्या श्रीतुळजाभवानी देवीचे आशीर्वाद घेण्यासाठी महाराज दि. १९ मे १६७४ रोजी रायगडावरून निघाले आणि लवकरच तेथे पोहोचले. तिथे देवीची यथासांग पूजा-अर्चा करून तिला सुवर्णयत्र विधिपूर्वक अर्पण केले. नंतर दोन-तीन दिवस महाराज प्रतापगडावर राहिले आणि त्यानंतर रायगडावर परत आले.१२

प्रतापगडाची श्री तुळजाभवानी व पन्हाळगडावरचा श्री सोमेश्वर महादेव यांच्याबद्दलचे हे उल्लेख शिवाजी महाराजांची धार्मिक वृत्ती दर्शवणारे आहेत. शिवकाळात स्वराज्यातील इतर गडदुर्गावर अनेक लहान-मोठी देवालये असतीलही आणि त्यांना महाराजांनी भेटी देखील दिल्या असतील, पण त्यांचा इतिहास आज उपलब्ध नाही हे मोठे दुर्दैव आहे.

■■■

## गडावरील द्वारशिल्पे

आपण गडदुर्गावरून भटकंती करीत असताना जेव्हा दुर्गाचा दरवाजा दिसतो तेव्हा मनाला हायसे वाटते की आता दुर्गात प्रवेश होणार मग तो रायगड, राजगडासारखा बेलागदुर्ग असो; सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग सारखा जलदुर्ग असो किंवा बहादुरगड, बेळगावच्या किल्ल्यासारखा स्थलदुर्ग असो. अनेकदा डोंगराची खडी चढण चढून आल्यावर दरवाजात सावलीत विश्रांती घेतली जाते. विश्रांती घेताना नकळतपणे आपली नजर दरवाजाच्या कमानीवर पडते आणि तिथेच खिळून राहते. एखादा मोडी, मराठी किंवा फार्सी शिलालेख तिथे असतो, कधी प्राणी, पक्षी, फुले, शुभचिन्हे आणि कधी-कधी तर देवदेवतांच्या प्रतिमा देखील तिथे असतात. ते पाहिल्यावर जिज्ञासेपोटी आपण विचार करू लागतो की या शिलालेखाचा अर्थ काय असावा ? दरवाजाच्या कमानीच्या दोन्ही बाजूला असलेल्या व्याघ्राकृती कशाकरिता तिथे लावल्या गेल्या असाव्यात ? असे अनेक प्रश्न एकाच वेळी डोक्यात येतात आणि आज आपण रायगड, राजगड, पद्मदुर्ग, प्रतापगड या दुर्गांवर दुर्गदर्शनासाठी जातो. मोठ्या उत्सुकतेने त्यांच्याकडे शिवकालीन दुर्ग म्हणून पाहतो. त्यावेळी एक गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे की, हे जरी एकेकाळी शिवाजी महाराजांच्या ताब्यात असले तरी आज ते जसे दिसत आहेत तसे ते शिवकाळातही होते असे मानणे चुकीचे ठरेल. कारण अनेकदा या दुर्गाची मालकी मुगल, सिद्दी, आदिलशहा आणि शेवटी इंग्रज यांच्याकडे होती. त्यांनी त्यांच्या संकल्पनेनुसार दुर्गामध्ये बदल केले, त्यात जुने पाहून नवीन बांधले, शिलालेख कोरले, मंदिरे पाडून मशिदी उभारल्या. शिवाय काळाच्या ओघात वेळोवेळी दुर्गांची डागडुजी करण्यात आली.१३

जस जसा काळ पुढे गेला तसतशी युध्दशास्त्रात प्रगती होत गेली आणि त्यानुसार आधुनिक शस्त्रास्त्रे आली. त्याच्या खाणाखुणा विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, अजिंक्यतारा, पद्मदुर्गसारख्या शिवकालीन दुर्गावर आजही स्पष्ट दिसतात. याचा अर्थ शिवकाळात ती आधुनिक शस्त्रे होती असा घेता येत नाही.

शिवकालीन दुर्गांवर शिलालेख आणि द्वारशिल्पे आढळतात. कमानीच्या दोन्ही बाजूस आढळणाऱ्या प्राणी, पक्षी, फुले, शुभचिन्हे, देवदेवता यांना द्वारशिल्पे असे म्हणतात. शिवकाळात खुद्द शिवाजी महाराज फार्सी भाषेत शिलालेख कशाला कोरवून घेतील ? ते त्यांच्या मातृभाषेत म्हणजे मराठीत किंवा देवभाषेत म्हणजे संस्कृतमध्ये कोरवून घेतील. रायगडावर अशा प्रकारचे दोन शिलालेख असून ते दोन्ही शिवकालीन आहेत यात कुठेच शंका नाही. ते शिलालेख पुढीलप्रमाणे आहेत.

पूर्वीच्या श्री वाडेश्वर आणि शिवराज्याभिषेकानंतर श्री जगदीश्वर नाव प्राप्त झालेल्या शिवालयाच्या दरवाज्याच्या उजव्या भिंतीवर उठावदार पध्दतीने कोरलेला एक शिलालेख आहे. तो असा :

।। श्री गणेशाय नम: ।।

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया
श्रीमच्छत्रपते: शिवस्य नृपते: सिंहासने तिष्ठत: ।
शाके षष्ठावबाण भूमिगणनादानन्द संवत्सरे
ज्योतीराजमुहूर्त कीर्तिमहिते शुक्लेशसापें तिथौ ।।१ ।।
बापीकूपतडांगराजिरुचिरं हमेर वनैर वीतिकौ
स्तंम्भे: कुम्त्रिगृहे नरेंद्रसदनैर भ्रांत्विहे मीहिने ।
श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो
यावच्चद्र दिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते ।।२ ।।

हा शिलालेख सुमारे १२५ सें.मी. लांब व ७५ सें.मी. रुंद आकाराच्या चौकटीत कोरलेला असून त्यात शिवाजी महाराजांचा इमारती हवालदार हिरोजी इंदलकर याने शिवराज्याभिषेकाच्या वर्षी जगाच्या स्वामीचा प्रसाद म्हणजे शिवालय, वापी (विहिरी), कूप (आड), तडागराजी रुचिरं (चवदार पाण्याचा तलाव), हमेंर बर्ने(रम्य उद्याने), बितीको (रस्ते), स्तंभ: (मनोरे), कुंभीगृह (गजशाला किंवा हत्तीखाना), नरेन्द्र सदन (राजवाडा) या वास्तू बांधल्या. रायगडाचे वैभव जोपर्यंत सूर्य-चंद्र आकाशात असतील तोपर्यंत म्हणजे कायमस्वरूपी टिकून राहू दे अशी विनंती करून शिलालेखातील समाप्ती केली आहे.

श्री जगदीश्वर शिवालयाच्या पायरीवर हिरोजी इंदलकर या स्वराज्याच्या इमारती हवालदाराने स्वत:च्या नावाचा दोन ओळींचा शिलालेख कोरून शिवाजी महाराजांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. हा शिलालेख मराठीत असून मोडी लिपीत कोरलेला आहे. तो शिलालेख असा :

**सेवेचे ठाई तत्पर : हिरोजी इंदुलकर**

शिवचरित्राच्या दृष्टिकोनातून पाहिले तर रायगडावर असलेले हे दोन्ही शिलालेख फार महत्त्वाचे आहेत.१४ याशिवाय राजगडाच्या पाली किंवा म्यान दरवाजाजवळ उजव्या बाजूच्या ओवऱ्यांच्या खाली एक शिलालेख कोरलेला आहे; परंतु त्यातील अक्षरे इतकी अस्पष्ट झालेली आहेत की त्यांचे वाचन करणे आज जवळजवळ अशक्यच आहे. याशिवाय समसेज गडावर एक शिलालेख आहे, पण तो शिवकालीन नसून पेशवेकालीन आहे. साल्हेर, राजदेहर, सज्जनगड वगैरे किल्ल्यांवर फार्सी शिलालेख आहेत. त्यांचा शिवाजी महाराजांच्या राजनीतीशी काहीही संबंध नाही.

दरवाजाच्या कमानीच्या दोन्ही बाजूंवर आढळणारी द्वारशिल्पे अनेकदा बुचकळ्यात टाकणारी आहेत. त्यांचे त्या जागी नेमके काय प्रयोजन आहे ते समजायला आज एकही साधन नाही. परंतु

'आकाशभैरवकल्पम्' या संस्कृत ग्रंथात या द्वारशिल्पांबद्दल अगदी थोडी माहिती आली आहे. ती अशी की, ''प्रत्येक बाह्य दरवाजावरील उंबरठ्यावर भद्रमुख (कीर्तिमुख) कोरावे. वरच्या भागावर यक्ष राक्षसांच्या उठावदार कल्पना कोराव्यात, तसेच अतिभयंकर सिंहाच्या आकृती ठसठशीत (उठावदार पध्दतीने) कोराव्यात. पूर्व दरवाजावर विघ्नराज (श्री गणेश किंवा गणेशपट्टी), दक्षिण दरवाजावर श्री भैरव, पश्चिम दरवाज्यावर श्री भद्रकाली आणि उत्तरेला श्री हनुमान कोरावा.'' परंतु ते का कोरावे याचे कारण दिलेले नाही. एक वेळ शिलालेखांवरून दुर्गांची माहिती मिळते, पण द्वारशित्यांबद्दल अंदाज करणेही अडचणीचे ठरते.

त्या काळी दरवाजाच्या सुशोभिकरणासाठी प्राणी, पक्षी, फुले, शुभचिन्हे यांचा कलेच्या दृष्टिकोनातून उपयोग केला गेला असावा असे वाटते. कारण कमानीच्या दोन्ही बाजूंवरील द्वारशिल्पे पाहिल्यावर ती एकमेकांच्या जणू प्रतिमाच (Mirror Image) आहेत, असे अनेक वेळा वाटते.

दुसरी शक्यता म्हणजे द्वारशिल्पात असलेले प्राणी व पक्षी हे कदाचित काही राजवटींची बोधचिन्हे १५ (monogram) असू शकतील. महाराष्ट्रातील बहुतांशी गडदुर्गांच्या दरवाजावर अशा प्रकारची द्वारशिल्पे आहेत. त्यात शरभ, गंडभेरुंड आणि क्वचित आढळणारा व्याल देखील आहे.

कर्नाळा, रायगड, प्रतापगड यांच्यासारख्या गिरिदुर्गावर शरभाचे द्वारशिल्प हमखास आढळते. ज्ञानेश्वरीत याचा उल्लेख 'रिपुगजपंचानन' असा केलेला आहे. हत्तीप्रमाणे बलाढ्य असणाऱ्या शत्रूचा नि:पात करणारा असा रिपुगजपंचानन याचा अर्थ होतो 'वाचस्पत्य' ग्रंथात पंचाननाचा अर्थ पंच + आनन यस्य स: म्हणजे मोठ्या जबड्याचा किंवा अक्राळ-विक्राळ मुख असलेला असा दिला आहे. त्यामुळे रिपुगजपंचानन हे विशेषण बहुधा शरथाला उद्देशून केले असावे असे वाटते. कारण पंख नसलेल्या व्याघ्राकृतीच्या पायाखाली बऱ्याच वेळा हत्ती आणि क्वचितच कधी गंडभेरुंड असणारे द्वारशिल्प काही दुर्गावर आढळते.

पंख नसलेल्या किंवा पंख असलेल्या व्याघ्राकृतीला जर शरभ मानले तर काही अंदाज करता येतात. महाकवी कालिदासाच्या 'मेघदूत' या सुप्रसिध्द काव्यात शरभाचा उल्लेख आलेला आहे. भगवान शंकराचे काल्पनिक पशूचे रूप म्हणजे शरभ. या संदर्भात एक दंतकथा सांगितली जाते ती अशी : शिवभक्त हिरण्यकश्यपू याचा वध केल्यावर श्री नरसिंह उतला-मातला. त्याने लोकांना उपद्रव द्यायला सुरवात केली. त्यावेळी लोकांनी शंकराचा धावा सुरू केला. तेव्हा श्री नरसिंहाला शिक्षा करण्यासाठी पशू, पक्षी आणि नर या तिन्हीच्या शक्ती एकत्रित करून भगवान शंकर प्रकटले ते शरभाचे रूप घेऊन त्यांनी नृसिंहाचा वध केल्यावर त्याचे कातडे अंगावर पांघरले आणि त्याचे डोके आपल्या मुकुटात अलंकृत केले. तेव्हापासून शरभ नामक संकल्पना पुढे आली.

रायगडच्या महादरवाजावर डावीकडे शरभाने हत्तीला पायाखाली धरलेले आहे. अशा अर्थाचे द्वारशिल्प आहे, तर याच दुर्गावरील नगारखाना नामक वास्तूच्या प्रवेशद्वारावर शरभाने आपल्या तीक्ष्ण नख्या असलेल्या चारही पायांमध्ये व शेपटीत प्रत्येकी एक, एक हत्ती पकडलेला आहे. अशाच आशयाचे द्वारशिल्प प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला असून ती डाव्या बाजूच्या द्वारशिल्पाची प्रतिमा (Mirror Image) आहे. प्रवेशद्वारातून आत आल्यावर सिंहासनाच्या जागेकडे पाठ करून नगारखान्याच्या प्रवेशद्वाराकडे पाहिले की वरच्या भागात डाव्या व उजव्या बाजूला इथेसुध्दा द्वारशिल्पे आहेत. त्यात शरभाने आपल्या पुढच्या उजव्या पायाखाली हत्ती व गंडभेरुंड (दुतोंड्या पक्षी) धरलेले

आहेत. दोन्ही द्वारशिल्पे एकमेकांच्या प्रतिमा आहेत.

त्याचप्रमाणे पंख असलेल्या शस्त्राचे द्वारशिल्प कर्नाळा, मुल्हेर, माहुली या गिरिदुर्गांवर आढळते. अक्राळविक्राळ मुखाच्या शरभाने पुढच्या पायात गंडभेरुंड तर मागच्या दोन्ही पायात प्रत्येकी एक एक हत्ती पकडल्याचे शिल्प सुबळ तर आहेच, पण ते सुंदरही आहे. त्याचबरोबर मुरुडच्या जंजिऱ्याकडे जाताना जलदुर्गाच्या महादरवाजाच्या डाव्या बाजूच्या बुरुजाच्या दर्शनी भागावर शरभाने चार पायात चार आणि शेपटीत व तोंडात प्रत्येकी एक, एक हत्ती पकडलेले आहेत. अशा आशयाचे द्वारशिल्प आहे. लोहगड, पुरंदर, सिंहगड या गिरिदुर्गावर पंख नसलेल्या किंवा बरीच वर्षे ऊन-पावसाचा मारा सहन करून आता झिजून गेलेल्या शरभांची द्वारशिल्पे आहेत.

शिवाजी महाराजांच्या ताब्यात असलेल्या रायगडावर गंडभेरुंडाचे द्वारशिल्प आहे. तसेच शिवकाळात कायम मुगलांच्याच ताब्यात असलेल्या शिवनेरीच्या दुसऱ्या दरवाजाच्या उजव्या बाजूवरील द्वारशिल्पात देखील गंडभेरुंड आहे. त्यामुळे शरभाप्रमाणे गंडभेरुंड ही संकल्पना हिंदू धर्माप्रमाणे इतरही धर्मात असण्याची दाट शक्यता आहे. एका धडाला दोन शिरे असणाऱ्या एका काल्पनिक पक्षाला गंडभेरुंड किंवा (Double pleaded Egal) असे म्हणतात. विष्णु शर्माच्या पंचतंत्रातील पाचव्या तंत्रात 'अपरिक्षित कारकम'मध्ये भेरुंडकथा म्हणून एका द्विमुखी पक्षाची कथा आहे. इतकंच नाही, तर तक्षशिलेच्या उत्खननात सापडलेल्या एका भिंतीवर दोन मुखे आणि एकच धड असणाऱ्या पक्षाचे शिल्प आढळले आहे. याचा अर्थ इसवी सनपूर्व दुसऱ्या शतकापासून अशा प्रकारच्या द्विमुखी पक्ष्याची संकल्पना आपल्या भारत देशात नक्की होती. चिपळूणजवळील भगवान परशुराम मंदिरामागील श्री रेणुकामातेच्या मंदिरातील एका खांबावर, गाविल गडासारख्या स्वराज्यांपासून बऱ्याच लांबवरच्या दुर्गावर गंड भेरुंडाचे शिल्प आढळते. दापोली जवळच्या गोरादुर्गांच्या बाहेर गंडभेरुंडाची शिल्पे आहेत. युरोपमधील ग्रीक व रोमन कलेतही या काल्पनिक पक्षाचा अंतर्भाव होतो. एके काळी विजयनगर महाराज्याचे प्रतीक असणारे गंडभेरुंड, आजही KST किंवा कर्नाटक राज्य परिवहन मंडळाचे प्रतीक आहे.

■■■

**टीपा स्पष्टीकरण (प्रकरण–४)**


१) अथातो दुर्गजिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नहेल प्रकाशन २००२ पृष्ठ क्रमांक ४१

२) अथातो दुर्गजिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नहेल प्रकाशन २००२ पृष्ठ क्रमांक ४२

३) अथातो दुर्गजिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नहेल प्रकाशन २००२ पृष्ठ क्रमांक ३७

४) अथातो दुर्गजिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नहेल प्रकाशन २००२ पृष्ठ क्रमांक ३८

५) अथातो दुर्गजिज्ञासा प्र.के.घाणेकर स्नहेल प्रकाशन २००२ पृष्ठ क्रमांक ३८

६) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक ३३

७)शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक ३५

८) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक ३५

९) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक ३९

१०) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक ४३

११) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक १५७

१२) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक १५९

१३) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक १६१

१४) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक १६२

१५) शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था महेश तेंडुलकर २००९ पृष्ठ क्रमांक १६३

# प्रकरण ५

## (अ) बखर वाङ्मय (ब) अस्सल साधने १३४-१५१

### (अ) बखर वाङ्मय


| | | |
|---|---|---|
| ५.१ | सभासद बखर | १३५-१३६ |
| ५.२ | चिटणीस बखर | १३७-१३९ |
| ५.३ | एक्याण्णव कलमी बखर | १४०-१४२ |
| ५.४ | शिवदिग्विजय बखर | १४२-१४२ |
| ५.५ | चित्रगुप्त बखर | १४३-१४७ |


### (ब) अस्सल साधने


| | | |
|---|---|---|
| ५.६ | अस्सल साधने | १४८-१५१ |

शिवकालीन बखरींमध्ये प्रेरणा सुप्त आहेत. त्यांच्या वांङमयीन रुपावरुनच त्यांच्या प्रयोजनांचे अनुमान करावे लागते. 'बखर' हा शब्द माहिती देणे या अर्थाने मराठे शाहीत रुढ झाला आहे. कारण चरित्र म्हटले तरी त्याला जोडून 'बखर' हा शब्द वापरलेला आढळतो. राजव्यवहार कोशाने बखैर म्हणजे आख्यायिका अशी स्पष्ट नोंद केली आहे. उपलब्ध झालेल्या अनेक बखरी मोडी लिपीमध्ये होत्या. शिवकाळात शिवचरित्र कथेच्या दृष्टिने जिला प्रथम स्थान मिळाले ती ९१ कलमी बखर होय. विविध क्रमवार प्रसंग माध्यमातून सांगितलेल्या शिवचरित्र कथा असे तिचे स्वरुप आहे. पुढे कृष्णाजी अनंत सभासद याने तिला सलग, सुसंगत आकृतिबंधयुक्त असे रुप दिले. ती सभासद बखर होय. मल्हार रामराव चिटणीस याने चरित्र माध्यमातून छत्रपतींच्या दौलतीची कथा सांगितली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासाच्या संदर्भात प्रारंभिक अवस्थेत बखर ही आख्यायिका म्हणून अवतरते. शिवकाळात तिला चरित्रकथेचे माध्यम मिळते व पुढे पेशवेकाळात तिला स्वयंपूर्ण रुप मिळते. चित्रगुप्तमध्ये युक्तिवाद, राज्यकारभार, कौतुक, ममता आदी वर्णन आहे. स्वप्न प्रकरण बखर व्यक्तिदर्शन स्वरुप निश्चित करते.

शिवकाळातील किल्ल्यांबाबत खालील नोंद आढळते.

सभासद बखर – २४० किल्ले

चिटणीस बखर – ३१७ किल्ले

शिवादिग्विजय बखर – ३६० किल्ले

चित्रगुप्त बखर – ३६१ किल्ले

बखर वाचकांनी वाचावी, श्रोत्यांनी ऐकावी यासाठी कथात्मकतेचे रंजक रुप होते. बखरकारांचे मनातील रंग त्यात भरले जातात. तरीही सतराव्या व अठराव्या शतकात बखर वाङ्मयास निश्चित रुपाने महत्त्व होते.

महाराष्ट्रातील गड कोट दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन या विषयावर संशोधन करीत असताना शिवकाळामध्ये प्रशासकीय व लष्करी केंद्र याचा विचार करता यास विशेष महत्त्व होते.

**मागील पानावर संशोधकाने बखर वाडमयाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.**

## ५.१ सभासद बखर

कृष्णाजी अनंत सभासदविरचित शिव-छत्रपतींचे चरित्र किंवा सभासद बखर ही शिवाजी महाराजांवर लिहिलेल्या इतर बखरींपेक्षा अतिशयोक्ती व कपोलकल्पित गोष्टी या दोषांपासून सामान्यत: मुक्त आहे. इ.स. १६९७ मध्ये कृष्णाजी अनंत सभासदाने राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून शिवाजी महाराजांची बखर जिंजी येथे लिहिली. बखरकाराने त्या बखरीला विशिष्ट असे नाव दिलेले नाही. सभासदाने ती लिहिली म्हणून त्या बखरीला सभासद बखर असे म्हणतात. सभासद बखर राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून जरी लिहिली असली तरी त्या वेळची युध्दजन्य परिस्थिती आणि त्या कारणाने निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, कृष्णाजी अनंत याला शिवाजी महाराजांचे चरित्र लिहिण्यास आवश्यक असलेली कागदपत्रे जिंजीला मिळणे अशक्य होते. शिवकाळात जसजशा घटना घडत गेल्या तसतशा बखरकाराने त्याच्या काही लेखी नोंदी केल्या असव्यात असे एकूणच बखरीवरून वाटत नाही. केवळ स्मरणशक्तीवर भिस्त ठेवूनच सभासदाने ही बखर लिहिलेली असावी असे वाटते. त्यामुळे शिवचरित्रातील घटनाक्रम चुकलेला आहे. तरीही कृष्णाजी अनंत हा शिवकाळाला समकालीन होता. राजाच्या सभेत बसण्यास पात्र असा तो सभासद होता आणि त्याने केलेले लिखाण शिवछत्रपतींच्या मृत्यूनंतर अवघ्या सोळा-सतरा वर्षांनी केले होते. यामुळे शिवकाळातील शिवचरित्राचे दुय्यम साधन म्हणून सभासद बखर ओळखली जात असली तरी इतर बखरींच्या तुलनेमध्ये ती अव्वल आहे.

शिवाजी महाराजांच्या काळातील दुर्गव्यवस्थांबद्दल सभासद लिहितो की, ''जे जे गड घेतले. त्या गडावर राजियांनी कारभारी ऐसी पध्दत घातली की, गडावरी हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक असे तिघेजण एका प्रतीचे जो कारभार करणे तो तिघांनी एक प्रतीचा करावा. गडावरी गढ्याचे, सामानाचे (अन्नधान्य व इतर साधनसामुग्री) अंबर (कोठार) करावे. त्यास कारखानीस म्हणून कारभारी केला. त्याने विद्यमान सर्व कारखाने यास जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तिथे, त्या गडाचा घेर थोर, त्या जागा सात-पाच तट सरनोबत ठेवावे. त्यास तट वाटून द्यावे. हुशारी खबरदारीस त्यांनी सावध असावे. गडावरी लोक ठेवावे. त्यास दहा लोकास एक नाईक करावा. 'नऊ पाईक दहावा नाईक' येणेप्रमाणे जातीचे लोक ठेवावे लोकात बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आड (आग) हत्यारी असे लोक मर्दाने चौकशीने आपण राजियांना नजरगुजर (करून) एक एक माणूस पाहून ठेवावे. गडावरी लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यास जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यापैकी घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखानीस परभू ठेवावे. असे एकास एक प्रतीमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हाती किल्ला नाही. हरएक फितवा- फंद यास किल्ला कोणाच्याने देववेना. ये रीतीने बंदोबस्ताने गडकोटाचे मामले केले. नवी पध्दतीत घातली.''

शिवाजी महाराजांनी केलेल्या दुर्गबांधणीबद्दल सभासद आपल्या बखरीत नमूद करतो करतो की, ''ज्या ज्या मुलखात अदलशाही, निजामशाही गड होते ते (तेथे) गड वसविले. जागोजागा गावावरी मुलखात नूतन गड वसविले. गडाकरता मुलूख जप्त होतो असे समजून गड बांधिले व कोकण, कल्याण, भिवंडी, राजापूर पावेतो देश काबीज केला. काबीज करिता, करिता जागा पुंड पाळेगार (महालकरी

किंवा डोंगराळ प्रदेशात राहून स्वतंत्र जहागीरदारासारखे वागणारे सरदार) होते व देशमुख होते. त्यामध्ये जे युध्दास आले त्यास मारून गर्दीस मिळवले आणि ज्यांनी कौल घेतला, त्यास यथायोग्य चालवून रक्षिले. रेवदंडा, राजपुरी दर्यामध्ये किल्ला निजामशाही आहे (सभासदाला मुरुडचा जंजिरा इथे अपेक्षित आहे) तेथे हबशी (सिद्दी) किल्लेदार जागियाचा खावंदच. याची पाणियातील जाहाजे गुराबा (लढाऊ गलबत) चाळीस पन्नास आरमार त्याने करून, मुलूख मारून पैदा करून (जिंकून) जागा जतन (सुरक्षित) आहे. त्याचे लोकांनी राजियांचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियाने बाजी पासलकर यास लष्कर मावळा हजार दोन हजार (दिले).

तैसेच जहाजे पाणियातील जाली. समुद्रास पालाण (संस्कृतशब्द पलायन किंवा फार्सी शब्द पालान या दोन्हीचा अर्थ खोगीर असा होतो) राजियानी घातले. हा एक हात सजला. राजापुरी एक पाणियात उरली, याकरिता अद्यापि निजामशहाचे नाव चालते. तो स्थळ हस्तगत म्हणून राजियानी जागा जागा डोंगर पाडून गड बसविले की, येणे कडोन दर्या जेर आहे आणि पाणियातील राजे जेर होतील असे जाणून कित्येक पाणियातील डोंगर बांधून दर्यामध्ये गड बसविले. पाणियातील म्हणजे केवळ जंजिरे. असे करून गड जहाजे मेळवून दर्यास पालाण राजियांनी घातले. जोवर पाणियातील गड असतील तोवर आपले नाव चालेल असा विचार करून अगणित गड जंजिरे जमिनीवर व पाणियांत बसविले असे कर्म केले.''

राज्यसभेमध्ये बसलेले जाणते लोक ते सभासद राज्यकारभारातील गुणी अधिकारी म्हणजे सभासद. याचा आदिलशाही फर्मानांनमधून 'मजालीस' असा उल्लेख येतो. सभासद हे पद शिवकाळापासून तर आहेच, पण पुढे पेशवेकाळात देखील या पदाधिकाऱ्याचे उल्लेख आढळतात. शिवकालीन सभासद हे गडावरील अधिकारी असून त्यांचा उल्लेख 'नामजाद' या शब्दासह आलेला आहे. म्हणजे स्वतंत्र अधिकार देऊन मुद्दाम नियोजन करून पाठविलेला दरबारी अधिकारी असा याचा अर्थ होतो. इ.स. १६५९ मध्ये 'पदो नारायण सभासद नामजाद किले कोंढाणा असा उल्लेख आढळतो.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील एकूण गडांची संख्या २४० आहे असे कृष्णाजी अनंत सभासद आपल्या शिवचरित्रात नमूद करतो. त्यात ५० पूर्वीपासून असलेले, १११ शिवाजी महाराजांनी नवीन बांधलेले आणि ७९ कर्नाटक प्रांतात असलेले एकूण २४० नावे सभासद देतो.

■■■

# ५.२ चिटणीस बखर

मराठी माणसाच्या मनावर किमान दीड-दोनशे वर्षे राज्य करणारी बखर म्हणजे चिटणीस बखर किंवा मल्हार रामराव चिटणीस लिखित 'श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र.' मल्हार रामराव म्हणजे शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी चित्रे प्रभु यांचा निपणतू किंवा खंडो बल्लाळ चिटणीस यांचे नातू व सखाराम हरी गुप्ते यांचे जावई. मल्हार रामराव हा सातारच्या छत्रपती प्रतापसिंह यांचा चिटणीस होता. त्याने शिवाजी महाराज ते धाकटे शाहू छत्रपतीपर्यंत सहा छत्रपतींची चरित्रे बोरगाव मुक्कामी लिहिली. चिटणीसांचे घराणे शिवाजी महाराजांच्या काळापासून भोसले घराण्याची चाकरी करीत असल्यामुळे मल्हार रामरावास 'पुरातन सेवक' असे छत्रपतींनी संबोधलेले आहे. साताऱ्याच्या छत्रपती प्रतापसिंह यांच्या आज्ञेने इ.स. १८१० मध्ये मल्हार रामरावाने बखर लिहायला सुरवात केली. त्याने लिहिलेले शिवचरित्र हे सत्पप्रकरणात्मक असून त्यासाठी त्याच्याकडे फार कमी साधनसामग्री उपलब्ध होती. मल्हार रामरावाने शिवचरित्र लिहीत असताना सभासद बखरीचा सर्रास वापर केलेला आहे, हे प्रकर्षाने जाणवते त्याबरोबर ९१ कलमी बखर, कवी परमानंदाचे शिवभारत अशा इतर साधनांचाही त्यात समावेश आहे.

मल्हार रामरावाने जेव्हा शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र लिहायला सुरवात केली तेव्हा त्याची दृष्टी एखाद्या चोखंदळ इतिहासलेखकाची नव्हती. कारण त्या काळी महाराष्ट्रात शास्त्रशुध्द भूमिकेतून इतिहासलेखन करण्याची पध्दत रुजलेली नव्हती. त्या वेळच्या समाजाच्या मनावर पुराणिकादिकांचा, देववादाचा, अद्‌भुततेचा, चमत्कारांचा आणि दंतकथांचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे अर्थातच त्याचा परिणाम ऐतिहासिक घटनांचे व वस्तुस्थितीचे तारतम्य सुटण्यावर होऊन विश्वसनीयतेच्या दृष्टीने मल्हार रामरावाची चिटणीस बखर मोठी जरी असली तरी अगदी सामान्य प्रतीची असल्याचे सिध्द होते.

शिवकाळातील दुर्गव्यवस्थेबद्दल खालील तपशील यामध्ये आलेला आहे.

''किल्ले, कोट, ठाणी घेतली त्यांचा बंदोबस्त सुभेदार एक व हवालदार एक, सबनीस व सरनोबत व तटसरनोबत व फडणीस व कारखानीस याचा हस्तक हे दरखी अधिकारी करून दिले. त्यात हवालदार इतबारी व घरंदाज, कुलीन, मर्द, शहाणे ऐसे पाहून मराठे ठेविले. सुभेदार व सबनीस ब्राह्मण, देशस्थ, कराडे, कोकणस्थ, मध्यंदिन ऐसे विश्वासू शहाणे मर्द स्वामिसेवातत्पर पाहून योजिले, कारखानीस प्रभु लोक, बाळाजी आवजी प्रभु चिटणीस यांचे निसबतीस धंदा देऊन त्यांचे तर्फेचे नेमून दिले. सरनोबत व तटसरनोबत हे म्हराठे केले. हवालदार यानी सदरेस कारभार करावा. परवानगी रसानगी दरवाज्याची व किल्ल्याची त्यांजकडे किलियांचा तनख०, दाणागल्ला, दारूगोळा सामान आणवणे हाही कारभार त्याजकडेच, शिक्का त्याचे नावे, किलियाचे मुख्यत्व त्याजकडे, सुभेदार याणी सर्व कारभार करावा तो त्यांचे विचारे अनुमते करावा. सबनिसाकडे हाजिरी लोकांची व चौकशी. कारखानीसांनी कोठीचा जिन्नस, जमा-खर्च व दारूगोळा, इमारत, लोकास रोजमेरा (रोजमुरा किंवा पगार) वाटणे हे लिहिणे करणे त्याजकडे. याप्रमाणे करून दिले. चालण्याचे कानून जाबते करून दिल्हे. त्याप्रमाणे एकचि काम नाजूक जाणून फार सावध. इतबारी (विश्वासू) चांगली माणसे रीतीची योजून किलियास ठेविली.[२]

अश्वारूढ व सभासद व गडकरी मेटकरी व परवारी व रामोशी याणी तटाखालील चौक्या कराव्या.

कदाचित एकात एक विरुध्द चालू लागले तरी हे वर्तमान कळताच बदलून दुसरे ठेवावे आणि रोखापात्र पाजवरी शिक्का करणे व सरकार पत्र येणे हे सर्व हवालदार यांचे नावे यावे. संध्याकाळी दरवाजा लावून कुलुप लावावे. आपण येऊन ते मागती वोढून पाहून हवालदार याणी आपले आंगेकरून किल्ल्या घेऊन जाव्या. आपण जवळ उशाशी ठेवाव्या. प्रात:काली येऊन कुलूप काढून दरवाजा उघडावा. रोज गस्त सर्व दरखरदासुध्दा घालावी. जागा जागा पहारे यांची हवालदार याणी करावी. याजवरि सरनोबतांनी गस्तीची व लोकांची रात्रीची चौकशी करावी. तटसरनोबत यांनी किल्ला लहान थोर. त्यांचे पाहारे त्यास दोन–चार पाहारे नाजूक जागा जागे असतील त्यांची चौकशी त्याणी करावी.

किल्ला कोट पाहून माणसांची भरती नेमणुकी (करावी) त्यास अडिसेरी व नख्ती वगैरे बेगमी किल्ला पाहून जकीरा (साहित्य) दहा पाच वर्षाची बेगमी गल्ला (धान्य) लाकूड फाटे, जिन्नस मात्र दारूगोळा व चुना वाटून तयार ऐसेसुध्दा अमके किल्ल्यावर अमके सामान याप्रमाणे धारे बांधून दिले.

किल्ल्याचे तट जिथे सोपे होते ते तपासून व सुरुंग लावून इमारती करून बेलाग करविले. कोणतेही किलियास इमारत नाही ऐसे नाही. हवालदार यास दिवटी, भालदार, पालखी योग्यतेनुरूप किल्ला पाडून नेमून दिल्हे. वरकडास दिवटी चाकर, पोरगे वगैरे नेमून दिल्हे. हवालदार याणी रात्रंदिवस सदरेस सावध लोकसुध्दा हत्यारबंद असावे. किलियाखाली नाकियास वाटेचे जागा भेटे, तेथेही चौक्या ठेवाव्या.

दहा माणसांचा दाहिजा, त्यात एक नाईक व नऊ पाईक (सैनिक) त्यात बंदुखी व आडहत्यारी, सांग (वाले), बरची (वाले) इटेकरी, पटेकरी पाहून ठेविले. लोक पाहून ठेवणे (ने) खास महाराजांनी आपण नाईक पाईक करणे (ते करावे) जसे माणूस मर्द चांगले इतबारी असेल त्याची परीक्षा हाजिरी करून ठेवावे आणि कामे योजून दिल्ही त्याप्रमाणे किल्ला–किल्ल्यांचे बंदोबस्त निरनिराळे करून देऊन ते किल्ले सुभेदार, मामलेदार, तालुकेदार यांचे निसबतीस (पदरी) लावून त्यांणी किलियावरी सामान नवे जुने करवणे, खर्च लोकास वगैरे जाला तो पाहून भरती करून देणे, ते सरकारातून तालुकेयास नेमून दिल्हे. त्यास विचारून करून द्यावे. लोक व दरकदार यांची नगिरी व बाहाली, गयाळ, मयत, नाकारे कामगार (त्यास दूर करणे) हे हुजूरसनदेने व्हावे. त्याचा इनला कोण्हाकडे नाही. तालुकदार याणी करणे ते महाराजांच्या आज्ञेप्रमाणे करावे.

ऐसे रीतीने सर्व कामे विभागपरत्वे लावून देऊन आज्ञेखेरीज पाय पालटू नये आणि जेयील तेथे आयास न होता घडत असावे असे करून दिल्हे. किल्लेकोट हे आपल्या राज्याचा जीवप्राण. प्रांत घेतले त्यांचे संरक्षण, मोठमोठी संकटे पडली असता किल्ले, कोट, जंजिरे सावध तरि मोठेही शत्रूंचा हिसाब धरावयास नको म्हणून किलियांचा बंदोबस्त फार बारीकपणे करयिला.''

शिवाजी महाराजांनी विचार केला जे ३००० पागा (घोडदळ) व मावळे लोक १०,००० जमा केले. मोगल किल्ले प्रांत घेतले. हे जतन जाले पाहिजेत. त्यास द्रव्य करून लोक राजी राहतात. किल्ले काव्याने मुलूख, जेरदस्तीत येतो. मुलूख हस्तगत झाला म्हणजे राज्य साध्य होते.

मोगलाई राज्यात बिकट जागा जयाद्रीचा बांधारा हा त्यांची फौज आली असता आपणास आश्रा (आसरा) होय. त्यास यास्तव हा आधी साध्य करावा. साधण्यास त्या मुलुखातील कजाखीचे लोक व माहितगार पावसात डोंगरात जाणे, चढणे, पळणे, झाडीत शिरणे हे मावळे व कोकणे लोक याजवाचून घडणार नाही. म्हणूनच तेच लोक अधिक ठेवून त्यास सरदार येसाजी कंक व तान्हाजी मालुसरे व (बाजी) पासलकर व देशपांडे मुसे खोरे, पौड खोरे व हिरडस मावळ वगैरे प्रभू लोक यास किताबा

सरदाऱ्या देऊन नावाजसी (नावनशी) (चे) लोक व शिपाई ऐसे ठेविले जाले.''

शिवाजी महाराजांनी गडदुर्ग कसे जिंकले, कोणकोणते दुर्ग कुठे कुठे बांधले याबद्दल चिटणीस बखर सांगते की :[३] यवनांचा उत्कर्ष यास्तव त्यांची मोठमोठी शहरे व जागा येथे द्रव्य बहुत आहे. त्याची पाळत राखून ती मारावी म्हणजे दुष्ट यवन सहजच आचास येतील आणि आपण झाडी षह्याद्री धरून होतील तैसे यत्न करावे. तैसेच त्यांचे तालुक्यातील द्रव्यवान असतील ते जेरदस्तीत आणोन त्यांजपासोन निघेल तसा खंड अथवा कर्ज म्हणोन द्रव्य घ्यावे. म्हणजे तो सहजच द्रव्यहीन होतो. आपणास (त्या द्रव्याचा) जमावाचे खर्चास उपयोग पडतो (हे) जाणून या रितीने द्रव्य सांध्य करते जाले. लोकांस द्रव्य पाऊ (मिळू) लागले म्हणजे लोक राजी राहतात. नामांकित कर्तेमाणूस शिपाई असेल तेथून आणावा. ये विचारे तमाम किल्ले मांची राजकारणे करविते जाले. किल्ले घेण्यास आपणच खासे जावे. धारकरी याजबरोबर आपणच माळेस अगोदर चढावे. तसेच भेदाने व माहितगार मावळे लोक यांचे युक्तीने कोट घेरियाचे.

समुद्र किनारा किल्ले मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, खांदेरी, कुलाबा ऐसी बेटे बांधिली. तेथे आरमार आश्रयाने राहावे लागावे ऐसे केले. उंदरीचे बेट आरमार उभे करून बांधिले. त्याचे नाव पद्‌मदुर्ग ठेविले. आरमार समुद्रात याणा द्रव्य बहुत आणावे. ते केलियाचे बंदिस्ती (स) व खर्चास आरमारसुध्दा (खर्च) करावे. आरमारकरी याणी त्या ठिकाणी जागा जागा किलियाचे लगनीने तारवे खुंटवून असावे ऐसे करविले. जंजिरेनजीक महाराज बेट बांधू लागले. त्यावरून हबशी (सिद्दी) यांनी किलियानजीक जंजिरेयाजवळ बांधिले. उंदेरी बांधली. कल्याण अहद तहद फौंडे बिदुनपर्यंत कोकण किल्लेसुध्दा राज्य महाराजांचे जाले. देशीही राज्य सातारा पनाळा आदि किल्ले प्रांत राज्य सोडविले. विजापूरची पादशाहात (आदिलशाहीत) फार करून घेतली. राहिली तीही पादाक्रांत करू हे पादशाहात दस्तात आलीच. त्यातील अमीर आले तितके नामोहरम जाले.''

गावचा सेकार अगोठीस किल्ल्यावरी जाणार त्या दिवसात धारकरी निवड करून किल्ल्यांचे घेरातील गाव तेथे लोक आपले मजूर करून डोईवर भारे घ्यावे, त्यात तलवारा घालून आपणही त्यात जावे, जाऊन किल्ला घ्यावा. ऐसे अनेक प्रकारे सीमेपरती मेहनत करून महाराज घेत चालले ते बांधारीचे कांगोरी (मंगळगड), तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची, कुवारी (कोरीगड), भोरप (सुधागड), धनगड, कोळंजा (केंजळगड) आदिकरून किल्ले घेतले.

जागा जागा कोकणात व मावळ देशात डोंगर चांगला आढळेल तेथे व समुद्रकिनारा किल्ले बांधावे ऐसे करिते जाले. यासि कारण येक, देशास प्रांतास जायाचा आधार होतो. जागा असेल तेथे सुभा जमयतीने ठेवणे घडते. त्या दहशतीने दुसरा शत्रू आपले देशात उपद्रव लावीत नाही व देशक (देशमुख देशपांडे) आदिकरून पुंडपणे बळावत नाही. सर्वांवर सलाबत (वचक) असती, हे मनास आणोन किल्ले बांधिले. लहान सामान्य किल्ला पाणीही वरते नाही, तेव्हा शत्रूस उपायास जागा होती ऐसे नाही. शत्रू चालून आला तो लागलाच डोंगरावरी चढून तटास लागत नाही. शत्रू चालोन येतो हे पाहून आपले लोक सावध होतील, दगड लोटतील, तरि त्यांचे दबावाने गनीम दबेल. इतिकियात आपली उपराळा (मदत) होईल. दुसरी ठाणी, किल्ले, कोट, सुभे जवळ असतील ते मदत करतील. त्याणे किलियास अपाय होणार नाही, ऐसी कल्पना करून किल्ले केले.

■■■

# ५.३ ९१ कलमी बखर

एक्याण्णव कलमी बखर ही शिवाजी महाराजांचे चरित्र कथन करणारी एक बखर आहे. रायरीची बखर, शिवदिग्विजय बखर, मराठी साम्राज्याची बखर, शहाण्णव कलमी बखर व प्रो. जदुनाय सरकारांना मिळालेले तारीखे शिवाजी हे हस्तलिखित या साऱ्यांचा समावेश ९१ कलमी बखरीत होतो. याचे मुख्य कारण म्हणजे यापैकी काही प्रतींमध्ये मजकुराची ९१ कलमे आहेत. या बखरीच्या लेखकानी हिला विशिष्ट नाव असे दिलेले नाही. बडोद्याच्या श्री. विनायक सदाशिव वाकसकर यांनी भारतवर्ष मासिकात इ.स. १८९७ मध्ये प्रकाशित झालेली पारसनीस प्रत, प्रभात मासिकात इ.स. १९०७ मध्ये इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी प्रकाशित केलेली राजवाडे प्रत, काव्येतिहास संग्रह मासिकात इ.स. १८८८ मध्ये क्रमश: प्रकाशित झालेली साने प्रत, इ.स. १८८५ मध्ये जॉर्ज फॉरेस्ट याने संपादित केलेल्या सिलेक्शन फ्रॉम द लेटर्स, डिस्पॅचेस ॲन्ड अदर स्टेट पेपर्स प्रिझर्व्हड इन द बॉम्बे सेक्रेटरीएट, मराठा सिरीज खंड १ या ग्रंथात प्रकाशित केलेली फॉरेस्ट प्रत आणि इ.स. १९०९ मध्ये प्रो. जदुनाथ सरकार यांनी द मॉडर्न रिव्हू मासिकात क्रमश: प्रकाशित केलेले फार्सी प्रतीचे इंग्रजी भाषांतर याला सरकारांनी 'तारीखे शिवाजी' हे नाव दिले. या पाच प्रतींचा पाठ श्री. वाकसकर यांनी शिवछत्रपतींची '९१ कलमी बखर' या नावाने इ.स. १९३० मध्ये एकत्रितपणे प्रकाशित केला आहे. तेव्हापासून ९१ कलमी बखर हे नाव सर्व प्रतींना पडले.[४]

९१ कलमी बखर मुळात दत्ताजी वाकनीस यांनी लिहिली असे समजले जाते. बखरीत लेखन काल दिलेला नाही.

९१ कलमी बखरीच्या साने प्रतीतील ४८ व्या कलमात दुर्गव्यवस्थेबद्दलची अगदी त्रोटक माहिती आली आहे ती अशी : किल्ल्यांचे हवाले मराठे यांसी व कारखानीशीची कामे परभूस अशा नेमणुका करून दिल्या. गडास दहा राजपुतास (मावळ्यास) एक नाईक, तिघा नायकांसि एक तट्ट, सर जाबत्यात मशाल करून दिली. हशम लोकांस सबनीस परभू नेमून दिला व इमारतीस ब्राह्मण मजमदार करून दिला. किल्ल्याच्या इमारती चालविल्या. हिरोजी फर्जंद (इंदुलकर) यासी कुल इमारतीचे काम (इमारती हवालदाराचे काम) अखत्यारीचे सांगितले.'' जदुनाथ सरकार प्रतीतील याच कलमात याबद्दल थोडी वेगळी माहिती आलेली आहे ती अशी :

"Every ten men of a garrison were placed under a corporal called Naik. over every three naiks was placed a Jamdar who thus commanded thirty men. (In every fort) was posted a torchbearer to show the way at night with his torch. Members of the prabhu caste supplied the chaukinavises of the army. Brahmans were given charge of the building operations, with urgent orders to complete the repair or constructions of all fortifications. The land around a fort was set apart for providing its expenses. Hiruji farzand was made superintendent of Buildings. His own son-in-law Netaji was made commander-In-Chief. Every (high) officer was joined to a colleague, in order that the latter might counteract the tormer if he planned any mischief. Thus Shiva regulated his forts, Kingdom and army to his heart's content."

शिवाजी महाराजांनी कोणकोणते नवे गडदुर्ग बांधले आणि कोणती बांधकामे केली याबद्दल साने प्रतीतील ५७ व्या कलमात काही माहिती आहे ती अशी :

''राजश्री केसोपंताजवळून श्रीवर्धन मनरंजन किल्ले नवे नूतन बांधिले. (पुरंदरच्या) तहामध्ये सत्तावीस किल्ले मिर्जा राजे (जयसिंग) यास दिले होते ते माघारे घेतले. किल्ल्यात इमारती चाल (वि)ल्या. रायगडास इमारती कारकुनांचे वाडे व दुकानांची चिरेबंदी करविली. राजाराम मंदिर आपणास महालाचे अष्टकोनी, बिछाने बसावयाचे व विवेकसभा व कल्याण महाल व प्रगटसभा व दफ्तर महाल व खासे मंदिर व अष्टमहाल व अष्ट कुलवधूस व राजकुवरास व राजकन्येस महाल बांधून दिले.''

सरकार प्रतीत याच कलमात आलेली माहिती अशी : In the konkan Shiva built, under the wealthy noble keshav panth's supervision, two forts near his old ones. These were named Raman - ranjan and Rajashriwardhan.

Gaga Bhat, a very pious and accomplished Brahman and other holy Brahmans were brought from Banaras (बनारस ?) and at an auspicious moment he ascended the throne at Rajgarh, according to the Hindu custom. Henceforth the name of the fort was changed to Rajgarh (V.)

He (Shivaji Maharaj) ordered that all officers, great and small should build nice, Puccea (पक्का) houses and live there. For himself he laid the foundation of a palace in 8 blocks (manzil) named Bek-sava-mahal, the Kalian mahal, the Birak-sava-mahal, Dafter mahal & c. He built and gave to his Son and other relatives charming mansions according to their desire."

साने प्रतीतील ७४ व्या कलमात दुर्गबांधणीबद्दल अगदी थोडी माहिती आहे ती अशी :

''मालवण व नवगिरी कोट व रत्नागिरी व सुवर्णदुर्ग बांधावयास काम चालू लागले. महिपतगड व खेळणा (विशाळगड) फार प्रबळ जबर किल्ला पाडून आबजीपंतास तेथे घोड्याची पागा बांधावयास सांगितल्या. किल्ल्यांची किंमत नाम दृष्टीने पाहून इमारतीची कामे वगैरे पाहू लागले.''

सरकार प्रतीतील याच कलमात पुढील माहिती आहे : "The fort of Malvan, Ratnagiri suvernadurga and others in shivaji's possession, were strengthened and fortified. Aoji panth was posted with a strong force in the fastnesses of Mahipatgarth and khelna. Shiva himself visited these two forts and urged the building of those houses and the repair of the walls and towers saying." Never neglect the repair of the walls, the strengthening of gates and towers. Always keep the stores, munitions and provisions of the fort ready."

Shiva built a fort at every place which he found strong and beautiful in situation and put in it trustworthy and brave men. Mudforts were demolished and stronger oncs founded on the strong and beautiful hillock khanderi. He urged his masons to build a fort and palace and they did so in a short time."

शिवाजी महाराजांचा स्वराज्यातील गडदुर्गांवर होणारा अवाढव्य खर्च त्यांच्या काही मुत्सद्यांना मान्य नव्हता. त्यांनी मोठे धाडस करून ती गोष्ट महाराजांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला. असे ९१ कलमी बखरीतील ७४ व्या कलमात म्हटले आहे.

मोरोपंती व निळोपंती अर्ज केला की, ''इमारतीस पैका बहुत खर्च होतो. किल्ले बहुत झाले. महाराज आता किल्ले बांधितात याचे कारण काय ? हे ऐकून महाराज बोलले. तुम्ही बहुत शहाणे सावध आहात. परंतु याचा विचार करून बोलला नाही. जो किल्ला बांधतो तो काय निमित्त म्हणाल तरी दाखला. जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो असे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवास खिळे मारून बळकट करितात तशी राज्यात बळकटी किल्ल्यांची आहे. औरंगजेबासारखा किल्ल्यावर चालोन आला तरी ती एकवेळ चिंता नसे. किल्ल्यावर सामान पोक्त असल्यास औरंगशहाची उमर गुजरून जाईल. म्हणोन किल्ल्याचा पुस्त पुन्हा राज्यास असावा.'' असे महाराज म्हणतात.

त्याउपर उभयता पंतास दोन वर्षाचा सरंजाम, गल्ला व दारूगोळा वगैरे जिन्नस बेगमी करावी म्हणोन सांगितले. ''गडावर लोक इतबारी (विश्वासू) आहेत. त्यास सावध राखावे म्हणजे औरंगशहा पातशाहाची दाढी तोडतील. गडाखाली उतरल्यास घोड्याचे स्वार मारतील.'' ऐसे ऐकून पंत कजाला (खजिल) होऊन तोंड झाकून घरास गेले की, महाराजांनी आपले बुध्दीस दोष ठेविला. महाराजांचे बुध्दीपुढे आपली बुध्दी तृणप्राय आहे. उपर जागा डोंगर उंच फार असेल तेथे किल्ला बांधावा. जागा जागा पाहून काम चालविले. जेथे काम कच्चे तेथे इमारतीचे कारकून दूर करून दुसरे हवालदार ठेविले.

बखर वाङ्मयातून शिवाजी महाराजांचा दुर्गविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.

■■■

# ५.४ शिवदिग्विजय बखर

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस शिवाजी महाराजांवर आणखी एक बखर लिहिली गेली. ही बखर शके १७४० इ.स. (१८१८-१९) मध्ये लिहिली असून त्यात बखरकाराने स्वत:चे नाव नमूद केले नाही. त्याचबरोबर त्याने बखरीला विशिष्ट असे नावही दिलेले नाही; परंतु तिचा पाठ श्री दिग्विजय या नावाने प्रकाशित झाला असल्याने सामान्यत: ती शिवदिग्विजय बखर या नावाने ओळखली जाते.

शिवदिग्विजय बखरीत शिवाजी महाराजांच्या दुर्गसंपत्तीबद्दल लिहिताना बखरकार नमूद करतो की, ''त्या प्रांती शामल हबशी (जंजिरेकर सिद्दी) याचा रयतेस उपद्रव होईल सबब बिरवाडी किल्ला नवाच करून बसविला. महाराज पूर्ण प्रतापी. त्याणी नवे किल्ले ३६० करविले. त्याविरहित पुरातन राहिले, ठेविले त्यामुळे नावानिशी बारनिशीत आली ती लिहिली. याशिवाय कागदपत्र गेले, तसनस झाल्यामुळे राहिल्यास, लिहिण्यास हस्तदोष आला, तरी शब्द न ठेवावा. सूचनार्थ विनंती लेखनरचनेची असे. नवे किल्ल्यांची नावे बीततपशील, प्रांतात नवे व जुने किल्ले सुधारून नावे दुसरी ठेवली.[५]

■■■

## ५.५ चित्रगुप्त बखर

चित्रगुप्त बखर ही शिवकाळाविषयी माहिती देणारी उत्तर पेशवेकाळातील एक बखर आहे.

ती रघुनाथ यादव चित्रगुप्त याने लिहिली. त्यात चित्रगुप्त हे काल्पनिक आडनाव असून बखरकाराचे खरे आडनाव चित्रे आहे.

बखरकाराने या बखरीला विशिष्ट असे नाव दिले नाही. परंतु जशी सभासदाने लिहिलेली सभासद बखर, चिटणीसाने लिहिलेली चिटणीस बखर तशी चित्रगुप्त हे आडनाव किंवा उपाधी धारण केलेल्या बखरकाराच्या नावाने ती बखर चित्रगुप्त म्हणून ओळखली जाते.

कोल्हापूरच्या मिळालेल्या एका हस्तलिखित प्रतीवरून या बखरीचा पाठ 'चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर' या नावाने काव्येतिहास संग्रह मासिकाच्या पुस्तक ११ मे, अंक २, (फेब्रुवारी १८८८) ते पुस्तक ११ वे अंक, अंक ९ वा (सप्टेंबर १८८८) या अंकात हप्त्यांनी प्रकाशित केली आहे.

बखरकार हा बाळाजी आवजी चित्रे प्रभु ह्याचा पुतण्या होता. सो. राजाराम महाराजांचे पुत्र युवराज संभाजीराजे (दुसरे) यांच्याकडे चाळीस वर्षेचिटणीशी लेखनाची सेवा करीत होता. संभाजी राजांच्या मृत्यूनंतर तो चरितार्थासाठी इकडे तिकडे फिरत असताना चिकोडी येथे आला. तिथे संभाजी राजे (दुसरे) यांची महाराणी जिजाबाई यांच्या विश्वासातील यशवंतराव शिंदे सुभेदार यांच्याकडे वखरकार आला.

तेव्हा यशवंतरावांनी त्याला कृष्णाजी अनंत सभासद याची बखर काळाच्या ओघात सदोष झाली आहे त्यामुळे तू त्याचे पुनर्लेखन कर, अशी बखरकाराला आज्ञा केली. त्यानुसार बखरकाराने लेखन सुरू केले. ही बखर इ.स. १७६० ते १७७३ ते १७८३ या दरम्यान लिहिली असावी.

शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील गडदुर्गांचा बंदोबस्त कसा केला हे सांगताना चित्रगुप्त लिहितो की, ''हवालदार एक व सबनीस एक व सरनोबत एक या तिघांनी मिळून कारभार करावा व तख्त नाणे व गल्लेचे दास्तान वगैरा जिन्नस सरकार निसबत कारखानीस जमेवर नेमून सरकारकून ठेविला त्याचे विद्यमाने सर्व करावा. गड तोलदार आहे, तेथे तट गडाचा घेरा थोर, या जाग्यास पाच-चार तटसरनोबत ठेवावे. त्यास तट गजाप्रमाणे नेमून द्यावे. हुशारी खबरदारी यांनी सावध असावे. गडावर लोक ठेवावे. यास दहा लोकास एक नाईक नऊ जण पाईक, यावरहुकुम चाकरी करून रात्रंदिवस सावध राहून गड रक्षावा. सदरहू लोक इटेकरी, बंदुखी व पट्टेकरी, तिरंदाजी अडाव व आडहत्यादी ऐसे माणूस मर्दाने चौकस पाहून महाराजांनी खास नजरगुजार (नजरेखालून घालून) करून ठेविले. गडावर लोक हवालदार सरनोबत मराठा जातिवंत कुलवंत ठेवावयासि जमान (जमीन) हुजरातीचे लोक असतील त्यापैकी घ्यावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचा ओळखीचा ठेवावा. कारखानीस प्रभु कायस्थ ठेवावा.

परमविश्वासू गड हवालदार याच्या हाती त्यांनी धनियाचे पायापाशी इमाने इतबारे बर्तावे. फितवा

फादडा करून किल्ला कोणास न द्यावा. जातीने बंदोबस्तीने गडकोटाचे मामलेदार केले. नवी पध्दत अष्टप्रधान यांचे संमते घातली.''

शिवाजी महाराजांच्या दुर्गबांधणीबद्दल सांगताना चित्रगुप्त लिहितो की, ''ज्या ज्या मुलखात अद्दल (आदिल) शाही व निजामशाहीमध्ये गड किल्ले होते ते घेऊन कितेक अवघड डोंगर बाके जागे होते तिथे गड बसविले. गडाकरिता मुलूख जात होता ऐसे समजोन गड बांधिले. कोकण कल्याण भिवंडीपासून राजापूर पावेतो देश काबीज केला. जागा जागा पुंड, पाळेगार, देशक (देशमुख देशपांडे वगैरे) होते त्यामध्ये जे युध्दास आले त्यास युध्द करून मारून गर्दीस मिळविले आणि ज्यांनी कौल घेतला त्यांचे यथायोग्य चालविले व प्राणानिशी रक्षिले. दडराजपुरी समुद्रामध्ये किल्ला निजामशाही आहे तेथे हवशी किल्लेदार याची जहागीर. तो खावंद त्या पाणियातील आपखुदीने होऊन चाळीस पन्नास गुराब (एक प्रकारचे जहाज) करून व आरमारे सजवून मुलूख मारून जागा जतन करून राहिले. त्यांचे लोकांनी महाराजांचे मुलखास उपद्रव लाविला. मग त्याजवर बाजी पासलकर मावळा व दोन हजार माणूस ठेविले.''

त्याचे देशात (मुलखात) जागा जागा गडकोट नवे राजपुरी नजीक बांके जागे होते ते घेऊन तेथे बांधोन कुल देश काबीज केला. ठाणी ठेविली. मग त्याचा (सिद्दीचा) ही इलाज चालला नाही.

बलहीन जाहला. पाच हजार हशम सुभे ठेविले. राजापुरीस मुलूख नाही. धान्य वगैरे जहाजातून नेऊन निर्वाह करू लागले. या वेळी महाराजांनी संभू गुराब व तरांडी व तारा-मचवे व महागिऱ्या ऐसी नाना जातीची जहाजे करून दर्यासागर म्हणोन मुसलमान करून चारशे आरमारे सजवून सुभे केले. त्यांशी व हबशी यांचे जहाजाशी युध्द होऊ लागले मग चोरून सामान पावू लागले. महाराजांची जहाजे जागाजागा बंदरे मोगलाई व फिरंगी, बलंदेज (डच) व फराशीस व इंग्रज वगैरे बावीस पादशाह पाण्यातील आहेत त्यांची स्वारी बेदनूर सावंदे व श्रीरंग पट्टण इत्यादी दर्या किनारेची शहरे मारून निर्वाह करून युध्द करिते जहाले व मालमत्ताही महाराजांस नाना प्रकारचे जिन्नस आणून देत होते. येणेप्रमाणे सातशे जहाजे पाण्यातील जहाली. समुद्रातीलही एक हात होऊन एक लष्कर जहाले. राजापुरी मात्र एक राहिली. याजकरिता पाण्यात जागजागी डोंगर पाहून येथे किल्ले बसविले. त्यास (राजापुरीस) अद्यापि निजामशाही चालत आहे. पाण्यात गड बसविले म्हणजे दर्या जेर जप्त आहे. पाण्यातील राजे व पातशाह व मवास (लुटारू, चाचे) शक्तिहीन होऊन आश्रयास येतात ऐसे जाणून पाण्यात पूर्वीच किल्ले व जहाजे करविली व पृथ्वीवरील किल्ले जोपर्यंत तत्काळ आपले नाव चालेल असा विचार करून अगणित किल्ले नूतन वसविले.''

रायगडाची शिवाजी महाराजांनी राजधानीचा गड म्हणून निवड केली. त्याबद्दल चित्रगुप्त आपल्या बखरीत नमूद करतो की, ''राहिरीगड अधल (आदिल) शाही होता तो घेतला. महाराजांनी जाऊन पाहिला तो मोठा उत्तम, चहू तर्फा गडाचे कुबलकडे तासल्याप्रमाणे दीड गाव. पर्जन्यकाळी गवत देखील उगवत नाही. निघोर धोंडियाचा. दौलताबाद किंबहुना पृथ्वीवरी समतुलनेस अतिउत्तमोत्तम किल्ला,

उंच नेटका तळसुध्दा शोभिवंत, उपमेस दौलतावही न पावे. ऐसा रमणिक पाहून महाराज बहुत समाधान पावले. तख्तास गड हाच करावा, ऐसा विचार करून ते क्षणी तेथे घरे, वाडे, सदरा, चौसेपे अठरा कारखाने यास वेगळाली, तैशीच राणीवशाची घरे पृथक व सरकारकुनांची (मंत्र्यांची) घरे व गजशाला, अश्वशाळा व पालखीचे महाल व वहिली महाल (रथशाळा किंवा गाडीखाना) व कोठी व चट्टी (गोशाळा) महालास व वसनागार, भांडारगृह व एकांत स्थळे, राजसभा, विलासनुभुवने, उपरमाड्या व शिकारखाना (पक्षीशाळा) तयार करून चुनेगच्ची व चिरेबंदी बांधली.'' आणि राज्याभिषेकानंतर ''रायरी किल्ल्याचे नाव रायगड ठेविले. महाराजांचे तख्तायोग्य गड सुभावना (सुंदर, सुरेख) बांका, दुजी दौलताबादच विलोकिला किंवा दौलताबादपेक्षाही अधिकोत्तर, महाराजांनी चित्तानुरूप तख्तास करार केला.'' राज्यकारभाराबद्दल चित्रगुप्त लिहितो की, पूर्वीच्या राज्यपध्दतीप्रमाणे वेदशास्त्रसंपन्न गागाभट्ट यांनी समस्त ब्राह्मणांच्या परवानगीने निर्णयार्थ करून राजपत्र लिहिण्याची पध्दत केली असे म्हणून चित्रगुप्त आपल्या बखरीत कामकाज कसे करावे याबद्दल नमूद करतो,की ''स्वराज्यातील जाबसाली चिटणीशीकडील पत्रे व गडकिल्ले यांसी पत्रांचे जाबसाल गडनिसांनी लिहावे. गडकरी यांचे नावची उत्तरे गडनिसांनी लिहावी. हवालदार व कारखानीस व सबनीस जे दिवाण निसबतीचे मामलेदार आहेत त्यांस पत्रे चिटणिसांकडील हा कायदा समस्तास समक्ष महाराजांनी करून दिधला.''[७]

सिंधुदुर्गाबद्दल लिहिताना चित्रगुप्त लिहितो, ''जैसा सिंधुदुर्ग राजियाचा जिव्हाळीयाचा किल्ला तैसा कर्नाटक देशात वेळूर (वेलोर)चा किल्ला, राजापूर प्रांती महाराजांची स्वारी जहाली. संपूर्ण जंजिरे समुद्रातील पाहिले, परंतु महाराजांचे चित्तात ते जागे न आले. यापेक्षा अधिकोत्तर स्थळ पाहिजे. तेव्हा समुद्रकिनारा पहात चालले तो अकस्मात जागा समुद्रोदरी पाहिला. पाहून महाराजांस संतोश जाहला. चौऱ्यांऐशी बंदरी ऐसा जागा नाही.[८]

तेव्हा नानाजी व मानाजी व गंगाजी व सावजी कोळी होते. त्यास महाराजांनी सन्निध पाचारून आणिले आणि आज्ञा केली, तो जागा पाहून मार्ग कोणे प्रकारीचा याचे ठिकाण पाहून येणे म्हणोन आज्ञा होताच कोळी मजकुरांनी. जिवाची तमा न धरिता नाना यत्ने लाग करून मार्गाचा ठिकाण पाडून येऊन कळविलेवर महाराज फौजेनिशी त्या जागेचे नजीक समुद्रथडीस गेले. जागा पाहिला, मार्ग कठीण सूर्पाकार, तरांडी होडी मात्र चालते. सभोवते सारे खडक, दुसरी तरांडी तीन कोशापर्यंत यावयासि अगदी गती नाही. तेव्हा तो जागा महाराजांचे चित्तास मानला. कोळी मजकुरावर महाराज महेरबान होऊन चौघास सोनेची कडी व मंदीळ पैठणी पासोड्या व किनखापी तुंबे (तुमान, विजार) पायातील देऊन बक्षीस पादशाही होन सुमार १०० प्रमाणे दिले व चौघास गाव तेच क्षणी वंशपरंपरागत देऊन गौरविले आणि तांडेल कर्माची सेवा सांगितली.

तदनंतर उत्तम मुहूर्त पाहून पाथरवट असामी पाचशे व लोहार असामी दोनशे आणून व लोखंड दोनशे खंडी खरेदी करून टाक्या, हातोडे व पहारा व अडू वगैरे तयार करविले. नंतर धोंडे काढवून पायाचे व इमारतीचे टाकी लावून तयार करविले. काही आरपार छिद्रे पाडून मुस्तेद (तयार) केले व पाच खंडी शिसे

आणून जंजिरेचा पाया शोधून घातला. श्री गणेशा पूजन व समुद्र पूजन करून तरांडियातून धोंडे व सामान नेऊन कामचालीस लावले. शर्करा वाटल्या. ब्राह्मण भोजने घातली. समुद्रास दक्षणा सुवर्ण नाणे होन १०० अर्पिले व पंचखाद्ये, फळावळ, सुवर्णाचे श्रीफळ (नारळ) पाणियात अर्पण केले, वाद्ये लाविली, वस्त्रे, मंदील चादर वाहिली. तद्नंतर महाराजांनी हुन्नरवंत पाथरवट चुना मुस्तेद करावया कोळी, कामाठी व बाजेलोक (इतर लोक) मिळोन तीन हजार माणूस व वरकड जंजिरियाचे आरमार आणून पाणियांत गाव दोन गावाचे तफावतीने सामानसुध्दा व तोफा, दारूगोळा सहित ठेविले. तडीस पाच हजार मावळे लोकांची चौकी नेमिली व गोवेकर फिरंगी यास ताकीद केली व तेथील फिरंगी हुन्नरवंत काबील (हुशार, योग्य) जंजिरियाचे कामकाजात म्हणोन शंभर आणविले. दिवसेंदिवस जंजिरा मुस्तेद करावयासि कोटी होनांचे उदक महाराजांनी सोडिले. इमारत पक्की तळ शोधून बांधावयासी शिसेबंदी धोंड्यात आरपार आडून घालून पक्के काम पाणियास जुम्मस (धास्ती, भीती) न खाय ऐसे बांधिले. पुढे काम गच्ची पिक्के होत चालले. बांधावयाची सारी युक्ती महाराजांनी सांगितली. त्या कामावर नेहमी गोविंद विश्वनाथ प्रभु सुभेदार कुंभारजुवे यात कुडाळकर पेशजीचे वतनदार शहाणे मनुष्य होते त्यास ही नावाजून कामावरी ठेवून महाराज रायगडास आले.

तिसरे वर्षी जंजिरा मुस्तेद होत आला. महाराजास गोविंद विश्वनाथे खबर पाठविली. त्याजवरून महाराज पनाळियास येऊन तेथून बावडे घाट उतरोन कोकणातून जंजिरा पहावयास गेले आणि सुमुहूर्त पाहून आत प्रवेश केला. तोफा झाल्या, शर्करा वाटली. तद्नंतर वास्तु करून ब्राह्मण संतर्पण पाच हजारांचे करून दान दक्षणा यथासांग संपादून पाथरवट यांचे नाइकास वस्त्रे व सोनियाची कडी दिधली आणि गोवे हुन्नरवंत फिरंगी यास नावाजून कपतान जे होते त्यास भरजरी वस्त्रे व सोनेची कडी देऊन निरोप दिधला. तदुत्तर गोविंद विश्वनाथ प्रभु सुभेदार यास नावाजून प्रासादिक वस्त्रे, मंदील, नाबदी (उसाचे कांडे) व चादर भरजरी व झगा मंदिलाचा व मोत्याचा तुरा, चौकडा व सोनेची कडी व खासा हुद्देतील फिरंग जेनबी (दक्षिणी) नवटाकी अतिउत्तम देऊन पाठी थोपटून बहुत प्रकारे नावाजले आणि हे लोक शहाणे इतबारी परम युक्तिवान चतुर भरवशाचे म्हणोन जंजिरा पाहोन मोठा आनंद जाहला. त्यास पारावार नाही. मग त्याचे नाव सिंधुदुर्ग ठेविले आणि शर्करा सर्व जनास वाटली. तदुत्तर मामलेदार तीन हजार माणूस ठेवून ठेविले. त्या मावळे लोकांस नाइक्या, सरनाइक्या व तटसरनोबत असे हुद्दे देऊन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा वेतने शाश्वत केली.

आरमारे सजली. चौऱ्याऐंशी बंदरात हा जंजिरा मोठा अठरा टोपीकरांचे उरावर शिवलंका अजिंक्यजागा निर्माण केला. जशी सुवर्णाची लंका दशाननाची, तेथेही यत्न चालविला, परंतु येथे अयत्न जागा, शत्रूचे किमापी भय नाही. महाराज अवतारी यास्तव प्राप्त जाहला, पाणियाचे भारास बुरूज करवणे असोन नानाप्रकारे यत्न केला. परंतु उपाय चालेना, याजकरिता महाराज चिंतासागरी पडले. पुढे गती कैशी करावी म्हणोन श्रमी असता चैत्र शुध्द पौर्णिमा भृगुवारी मध्यरात्रीस महाराजांचे अंगी श्री अंबेने संचार करून म्हणो लागली जे, ''अरे लेकरा, येविशी चिंता न करणे, तू चित्तात योजिले कार्य सिध्दीस

पावेल. येविशी श्री सागराची प्रार्थना करून सिंध तटाकी दर्भासन घालून तीन उपोषणे केलिया सागर प्रसन्न होऊन मागा सरेल. हे प्रमाण यदर्थी संशय नाही.'' ऐशी श्री अंबेने आज्ञा करून तत्क्षणी गुप्त जाहली. महाराज सावध होऊन स्वप्नावस्था कावजी नाईक व बाळाजी आवजी प्रभु चिटणीस यांस बोलावून सविस्तर वृत्त श्रीदेवीचे कृपेने सांगितले.

तदनंतर महाराजांनी समुद्रतीरास जाऊन यथाविधी पूजन करून साष्टांगे प्रणिपात (नमस्कार) घालून एकाग्रचित्ते आसनावर निराहार तीन उपोषणे केली. तिसरे दिवशी रात्री सागर ब्राह्मणरूपे स्वप्नात येऊन चमत्कार दाखविला. जे, ''तुज प्रसन्न जाहलो. जे इच्छा केली ती परिपूर्ण सिध्दीने पाववीन. चिंता न करणे. उपोषण न करिता ध्यान विसर्जन करून स्वस्थ राहणे.''

अशी आज्ञा होताच प्रात:काळी महाराजांनी दर्भासनावरून उठोन नवविधा भक्तिभावे पूजा करून सुवर्णपात्री कर्पूरदीपिका पाजळोन सागरास महाराजांनी वोवाळिले. नंतर द्वयकर (दोन्ही हात) कमल जोडून साष्टांगे अभिवंदन प्रार्थना केली, ''समर्थेअमोघ कृपा सदैव करून यवन औरंगजेब शत्रु भयास्तव उदरात जागा दिधला होऊन मानाभिमान धरून दर्जा बुरूज सिध्दीस न्यावा म्हणजे चित्तास संतोष होईल. एवढी प्रार्थना ऐकावी.''

ऐशी प्रार्थना करिताच पंधरा हात सागर माघार सरला. बुरूज बांधावयास जागा दिधला. हा अर्थ समुद्रकृपेने घडताच जयजयकाराची ध्वनी संतोषचित्ते जाहली. तदनंतर दर्या बुरूज तयार केला. महाराजावर श्रीअंबेने व समुद्राने अद्वितीय कृपा केली. या कंकणीकित जगतीत अठरा टोपीकरांस व औरंगजेब पादशहास ऐसा जागा अप्रतिम नाही. सागराने सकृप (प्रसन्न) होऊन निरुपम महास्थळ महाराजास प्राप्त केले. संपूर्ण जंजिरियांत प्रमुख अधिक हा सिंधुदुर्ग महाराजांचे हृदयकमलच.

सभासद बखरीच्या जवळपास जाणारी चित्रगुप्त बखर होय.[१]

■ ■ ■

# ५.६ अस्सल साधने

## आज्ञापत्र

किल्ल्यांसंबंधी विचार करताना जुन्या ग्रंथांचा आधार घ्यावा लागतो त्याचे नाव 'आज्ञापत्र'. या ऐतिहासिक ग्रंथाच्या जुन्या प्रती उपलब्ध वा ज्ञात आहेत.

१९७५-७६ साली विविधज्ञान विस्तार या मासिकामध्ये आज्ञापत्र प्रथम मुद्रित स्वरूपामध्ये लोकांपुढे आले, परंतु ज्या प्रतीवरून हे मुद्रण करण्यात आले ती मूळ प्रत उपलब्ध नाही.

धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरात बाळबोध लिपीतील एक प्रत उपलब्ध आहे.

७ नोव्हें. १८४३ म्हणजे, कार्तिक शु. १५ शके १७६५ या दिवशी ही प्रत नकलून घेतल्याची त्यावर नोंद आहे.

विविधज्ञान विस्तार, राजवाडे संशोधक मंडळ यांनी प्रकाशित केलेल्या प्रतीशिवाय अर्थ व विवेचनासह डॉ. व.दि. राव, कै. मोरमकर, प्रा. उर्ध्वरेषे, प्रा. श्री.मा. कुलकर्णी, प्रा. पुणतांबेकर, प्रा. ग.ह. खरे व श्री. श्री.र. भिडे, पंत, अमात्य, बावडेकर, श्री. वा. दा. गोखले, डॉ. प्र. न. जोशी अशा अनेकांनी आज्ञापत्राच्या छापील प्रती लोकांच्या पुढे आणल्या आहेत.

रामचंद्र अमात्य यांचे पूर्ण नाव रामचंद्र नीळकंठ भादाणेकर. हे देशस्थ ऋग्वेदी आश्वलायन सूत्राचे भारद्वाज गोत्री ब्राह्मण घराण्यातील, भिवंडी जवळील सोनवळेतर्फेचे हे देशमुख वतनदार होते.

आबाजी सोनदेव हे शिवरायांचे एक ज्येष्ठ सहकारी होते. ते याच घराण्यातील रामचंद्रपंतांचे काका होते. निळो सोनदेव हे रामचंद्रपंतांचे वडील. ते १६६२ मध्ये शिवरायांचे अमात्य झाले. १६७२ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ या दोघांना अमात्यपद मिळाले. त्यानंतर एकट्या रामचंद्रपंतांना हे अमात्यपद मिळाले. हे पद पूर्वी मुजूमदार या नावाने ओळखले जायचे. त्यांचे संस्कृत रूपांतर 'अमात्य' असे झाले.

१६७२ ते १६७५ ही पाच वर्षे रामचंद्रपंतांकडे अमात्यपदाची जबाबदारी,धुरा होती.

छत्रपती राजाराम महाराज महाराष्ट्रातून जिंजीकडे जाताना रामचंद्रपंतांना 'हुकुमतशहा' हा किताब देऊन गेले. प्रसंग विशेषी खुद्द राजानेही त्यांचे ऐकावे असा हा मान होता.

शिवाजी महाराज, संभाजी, राजाराम, कोल्हापूरकर शिवाजी, व कोल्हापूरकर संभाजी अशा पाच छत्रपतींच्या कारकिर्दीचे आधी असणाऱ्या व काही काळ महाराष्ट्राच्या सर्वाधिकारी असणाऱ्या व्यक्तीने राजनीतीवर ग्रंथ लिहावा व त्यात दुर्ग प्रकरणाचे महत्त्व विशद करावे हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे.[१०]

## अर्थशास्त्र

कौटिल्याने इ.स. पूर्व तिसऱ्या शतकामध्ये राजनीती विषयक अर्थशास्त्र ह्या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथामध्ये किल्ल्यांविषयी तसेच नगररचनेबद्दल माहिती आहे.[११]

ह्या ग्रंथामध्ये किल्ल्यांच्या विविध भागांवर होणारा खर्च, किल्ल्यांवर असणारा अधिकारी, ज्येष्ठ, कनिष्ठ नोकरांचा पगार, सरबराई करणारांचा मेहेनताना, विशिष्ठ प्रसंगी देण्यात येणारी बक्षिसी, नवनिर्माण करण्यासाठीचे (किल्ल्यावरील) अंदाज पत्रक, खर्चाचा तपशील, गडावरील प्राणी उदा. हत्ती घोडे, गाय, बैल, म्हशी इत्यादीवर होणाऱ्या खर्चाची तजबीज, दिवाबत्ती, हत्यारे, दुरुस्ती, गडावरील शिपायांचे पोषाख इ. अनेक बाबींचा विचार करून खर्च नियोजन कसे असावे ह्याचा विचार केला आहे.

## शिवभारत

शिवचरित्रावर कवी परमानंद यांनी 'शिवभारत' या काव्यग्रंथाची रचना केली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे गावातील रहिवासी असलेल्या कवी परमानंद यांनी 'शिवभारत' या ग्रंथामध्ये शहाजीराजे व शिवाजी यांच्या कारकिर्दीमधील अनेक घटनांचे वर्णन केले आहे.[12]

शिवाजी महाराजांना कवी परमानंद अवतारी पुरुष मानीत असत. समकालीन या नात्याने या ग्रंथास विशेष महत्त्व आहे.

'शिवभारत' ह्या मूळ संस्कृत भाषेमध्ये असलेल्या ग्रंथाचे नाव 'सुर्यवंशम' असे आहे.

## राधा माधव विलास चंपु

'राधा माधव विलास चंपू' व 'पर्णाल पर्वत ग्रहणाख्यानम्' या ग्रंथांची रचना जयराम पिंडे यांनी केली आहे. या संस्कृत ग्रंथामध्ये  शिवकाळातील माहिती मिळण्यास मदत होते.

'पणील पर्वत ग्रहणाख्यानम्' या काव्य ग्रंथामध्ये शिवाजी महाराजांनी जिंकून घेतलेल्या पन्हाळा किल्ल्याच्या विजयासंबंधी माहिती इतिहास संशोधक श्री. वि.का. राजवाडे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून मिळते.[13]

## राज्य व्यवहार कोष

शिवाजी महाराजांच्या असामान्य प्रतिभेची झेप निरनिराळ्या क्षेत्रातून निर्वेधपणे चालू असे. राजकारण, मसलती, प्रत्यक्षयुध्दे, शत्रूशी साम-दामाचे संबंध, राजकीय डावपेच हे त्यांचे गुण प्रसिध्द आहेतच पण कल्याणकारी राज्याची कल्पनासुध्दा महाराजांच्या प्रतिभेचीच निदर्शक आहे. हा सर्व व्याप सांभाळत असताना महाराजांनी विद्या आणि कला यांच्याकडेही लक्ष पुरविले होते. अनेक विद्वान, पंडित आणि कलावंत यांना त्यांचा आश्रय लाभला होता. कवींद्र परमानंद, भूषण कवी, समर्थ अशी अनेक नावे ह्या संदर्भात घेता येतील.[14]

राज्यव्यवहारामध्ये प्रामुख्याने आढळून येणारे फारसी व दख्खनी उर्दूतील शब्द ह्यांच्या ऐवजी संस्कृतातील पर्यायी शब्द वापरून राज्यव्यवहाराचे मराठीकरण करण्याची योजनाही शिवप्रभूंनी आखली व अमलात आणली.

अशा प्रकारचा कोष तयार करण्याचे काम त्यांनी प्रसिध्द मुत्सद्दी व प्रशासक रघुनाथ नारायण हणमंते यांजकडे सोपविले होते. त्यांनी धुंडिराज व्यास या विद्वानाच्या साह्याने राज व्यवहार कोष सिध्द केला ही घटना इ.स. १६७८ ची असावी.

शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने रचल्या गेलेल्या ह्या कोषात १६७९ मधे रूढ असलेल्या दक्षिणी उर्दूतील १००० हून अधिक शब्द आलेले आहेत. अभ्यासकांना ही मोठी पर्वणीच आहे

## मोगल दरबारची बातमीपत्रे

'अखबारान-ए-दरबार इ मुअल्ला' अनुवाद प्रख्यात इतिहास संशोधक सेतू माधवराव पगडी यांनी केला आहे.[15]

मोगल दरबारची बातमीपत्रे १,२,३ खंडांमधील माहितीवरून मोगलकालीन इतिहास समजण्यास उपयुक्त झाले आहे.

त्या काळच्या प्रत्येक दिवसाची माहिती ह्या ग्रंथांतून दिली आहे.

## शिवचरित्र साहित्य

शिवचरित्र साहित्याचे १ ते १४ खंड उपलब्ध आहेत.

कृ.वा. पुरंदरे, शं.ना. जोशी, ग.ह. खरे, ब.द. आपटे, शा.वि. आवसळकर यांनी या खंडांचे संपादन केले आहे.

शिवकाळातील संदर्भात विविध प्रकारच्या घडामोडींवर प्रकाश टाकणारी कागदपत्रे 'शिवचरित्र साहित्य' या खंडांतून प्रसिध्द करण्यात आली आहेत.[16]

## 'तारिखे-ए-दिल्कुशा'

भीमसेन सक्सेना यांनी फारसी भाषेत आत्मचरित्र लिहिले आहे. भिमसेन ह्यांचे वडील बुरहानपूरचे रहिवासी होते. भीमसेन ह्यांच्या वडिलांचे नाव रघुनाथदास असे होते. रघुनाथदास हे मोगल सेनेच्या 'मुशर्रफ' पदावर नियुक्त होते.

भीमसेन हे ३० वर्षाचे असताना आपल्या वडिलांचे समवेत नाशिक, त्र्यंबकेश्वर व प्रवरा संगम ह्या ठिकाणी यात्रेस गेले होते, या संदर्भातील माहिती वरील ग्रंथात दिली आहे.

शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि औरंगजेब यांच्या कारकिर्दीतील घटना यामध्ये सविस्तर नोंदविल्या आहेत.

१७०९ मध्ये 'तारिखे-ए-दिल्खुशा' या नावाचे हे आत्मचरित्र भीमसेन सक्सेना यांनी लिहिले आहे.[17]

कॅप्टन स्कॉट याने याचा अनुवाद इंग्रजी भाषेत केला आहे. या अनुवादावरून श्री पां.न.पटवर्धन यांनी 'बुंदेल्याची बखर' या नावाने इ.स. १९२० साली मराठी भाषेत अनुवाद केला आहे.

सेतू माधवराव पगडी यांनी भीमसेन सक्सेना यांच्या ग्रंथामधील काही भागाचा अनुवाद 'मोगल आणि मराठे' या नावाने ग्रंथामध्ये केला आहे.

## औरंगजेबाचा इतिहास

"A Short History of Aurangjeb' या ग्रंथाचा अनुवाद श्री. म.ग. कुंटे यांनी केला आहे. हा ग्रंथ सर यदुनाथ सरकार यांनी लिहिला आहे.[18]

दुसऱ्या खंडाच्या अर्ध्याभागाचा अनुवाद 'डाऊन्सन' यांनी केला आहे. 'इलियट ॲण्ड डाऊन्सन' या मालेच्या आठव्या खंडात त्याचा समावेश आहे.

इतिहासकार खरे ग.ह. यांनी या ग्रंथातील 'शिवकाळ' या भागाचा मराठी भाषेत अनुवाद केला आहे व तो शिवचरित्रवृत्त यामध्ये खंड-२ या ग्रंथात प्रसिध्द केला आहे.

या पुढील भागाचे भाषांतर प्रख्यात इतिहास संशोधक सेतू माधवराव पगडी यांनी 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द' या ग्रंथात केले आहे.

मोगलकालीन इतिहासकारांनी सम्राट, प्रशासन, त्यांचे कुटुंब व कौटुंबिक संघर्ष आणि राजकीय डावपेच यांना इतिहास लेखनामध्ये विशेष असे स्थान दिले आहे.

■■■

## टीपा स्पष्टीकरण (प्रकरण–५)


१ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र. ७३

२ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल पृष्ठ क्र.८३

३ चिटणीस बखर संपादक डॉ. भीमराव कुलकर्णी

४ ९१ कलमी बखर संपादक वि.स. वाकसकर

५ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.१००

६ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.११८

७ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.११९

८ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.१२०

९ शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था तेंडुलकर महेश स्नेहल प्रकाशन २००९ पृष्ठ क्र.१२१

१० अथातो दुर्ग जिज्ञासा घाणेकर प्र.के. स्नेहल प्रकाशन २००५ पृष्ठ क्र. ३४

११ अर्थशास्त्र कौटिल्य शतक इ.स. पूर्व तिसरे

१२ शिवभारत कवी परमानंद

१३ राधा माधव विलास चंपु जयराम पिंडे

१४ राज्यव्यवहार कोष रघुनाथ नारायण हणमंते १६७८

१५ मोगल दरबारची बातमीपत्रे सेतुमाधवराव पगडी (सं.पा. अनु.) खंड १ म.सा.सं.मं. मुंबई १९७९ खंड २ व ३. १९९९

१६ शि.च.ग्रा. १ ते ४४ खंड संपादन पुरंदरे कृवा. जोशी शं.ना., खरे ग.ह.

१७ औरंगजेबचा इतिहास (A Short History Aurangabad) अनुवाद श्री. म.ग. कुंटे

# प्रकरण ६


**शिवाजी महाराजांच्या दोन राजधान्या १५३–१८१**

| | | |
|---|---|---|
| अ) | राजगड | १५३–१६८ |
| ब) | रायगड | १६९–१८१ |

# (अ) राजगड

किल्ल्याची उंची : १३९४ मीटर किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग : पुणे जिल्हा : पुणे

श्रेणी : मध्यम किल्ले राजगड, हिंदवी स्वराज्याची राजधानी, गडांचा राजा, राजियांचा गड

**मार्ग –** राजगडावर जाण्यास पाच मार्ग आहेत. पुण्याकडून जाणाऱ्याने नसरापूर-वेल्हे रस्त्याने पुण्यापासून ३२ मैल अंतरावर असलेल्या मार्गासनी गावाजवळ उतरून गुंजवण्यास जावे. हल्ली पुण्याहून मार्गासनीस जाण्यासाठी दिवसा दोन-तीन एस.टी.च्या गाड्या आहेत. पावसाळा सोडून इतर दिवसांत मार्गासनीहून गुंजवण्यास जीप किंवा ट्रक जाऊ शकतो. जीप किंवा ट्रकने जाणारास प्रत्यक्ष गुंजवणे गावास जावे लागत नाही. तो मार्गासनी, कानंदी नदी, साखर, गुंजवणी नदी, चिरमोडी अशा वाटेने गुंजवण्याच्या दक्षिणेस सुमारे एक मैलावर किल्ल्याच्या पायथ्याशी येऊन पोहोचतो. लागलीच गडाचा चढ सुरू होतो. ह्या गडाचा अर्धा अधिक भाग चढून गेलो म्हणजे थोडी बिकट वाट लागते. सुमारे पंचवीस फूट उंचीचा कडा खोदून अगदी लहान लहान पायऱ्या हात-पाय स्थिर रहाण्यापुरत्या जागा किंवा खोवणी केल्या आहेत. हा बिकट भाग संपताच थोड्याशा घडीव दगडाच्या पायऱ्या लागतात. त्या संपल्यावर गुंजवणे दरवाजा लागतो. या दरवाज्यातून आत गेले असता काही अंतरावर आणखी एक दरवाजा लागतो. या दरवाज्याच्या शेवटी व गणेशपट्टीच्या खाली दोन्हीकडे दोन उपडे घट घेतलेल्या व एका कमलकलिकेसमोर आलेल्या सोंडा आहेत. बौध्द वाङ्मयात, बुद्धाचा जन्म होताच तो व त्याची आई माया, यावर दोन हत्तींनी अनुक्रमे उष्ण व थंड पाण्याचा अभिषेक केला, असे सांगितले आहे. पण प्राचीन काळी बुद्धाची मूर्ती करीत नसल्यामुळे हा प्रसंग चित्रित करण्यासाठी, केवळ त्याची आई किंवा उत्फुल्ल कमल व दोन्ही बाजूस सोंडा वर केलेले व त्यात घट घेतलेले दोन हत्ती एवढा प्रसंग दाखवीत. या प्राचीन शिल्पांतूनच सध्याचे श्री किंवा गजलक्ष्मी शिल्प तयार झाले अशी कल्पना आहे. घट धारण केलेल्या या दोन सोंडा श्री शिल्पाचे अवशेष आहेत. शिवाजी महाराजांचे डोक्यात ह्या जुन्या सांस्कृतिक महत्त्वाच्या शिल्पाचा अंशत: आविष्कार करण्याची कल्पना आली, हे त्यांच्या प्रतिभेस योग्य असेच आहे. या दरवाज्यातून आत थोडे अंतर चालून गेल्यावर डाव्या अंगास एक टाके लागते. येथून पुढे गेल्यावर उजव्या बाजूस आणखी एक दरवाजा लागतो. यातून आत गेले असताना आपण पद्मावती माचीवर येऊन पोहोचतो. २) दुसरा मार्ग गडाच्या वायव्य बाजूने आहे. त्या मार्गाने जाण्यासाठी वर सांगितलेल्या नसरापूर-वेल्हे मार्गाने पाबे गावाच्या ओढ्याजवळ उतरावे. तेथून दक्षिणेकडील कानदी नदी व खरीव खिंड उतरून सुमारे तीन मैलांवरील वाजेघर गावी यावे. तेथे ओढा उतरून पिंप्री व पाली गावांवरून जाणाऱ्या पायवाटेने डोंगर चढू लागावे. सुमारे अर्धा डोंगर चढून गेल्यावर चिरेबंदी पायऱ्यांची वाट लागते. हिच्या अखेरीस पाली दरवाजा आहे. या दरवाज्यातून आत

गेले म्हणजे सुमारे एक फर्लांगावर आणखी एक दरवाजा लागतो. त्यामधून आत गेले म्हणजे आपण पद्मावती माचीवर येतो. या वाटेवर लागणाऱ्या पायऱ्यांचे स्वरूप लक्षात घेता शिवाजी महाराजांच्या वेळी घोडे, हत्ती इत्यादी जनावरे याच रस्त्याने वर जात असावीस वाटते. पालीच्या शिवारात राजवाडा, राजबाग, प्रधानबाग इत्यादी स्थळे आहेत त्यावरूनही या वाटेचे महत्त्व लक्षात येते व राजमार्ग कोणता होता हे समजते. ३) या दोन मार्गांच्या मध्येच प्रत्यक्ष गुंजवणे गावातून जाणारा व एका दिंडीवाटे पद्मावती माचीवर पोहोचविणारा (निघणारा) हा मार्ग आहे. त्या मार्गानेही सध्या काही यात्री वर जात असतात. ४) या सर्वांहून मनोरंजक मार्ग भाटघर धरणाच्या फुगवट्यांतून आहे. दर मंगळवारी भोरच्या बाजारासाठी धरणाच्या फुगवट्याच्या दोन्ही अंगच्या गावातून भाटघरच्या बंधाऱ्यापर्यंत नावा येतात आणि तीन प्रहरच्या सुमारास आपआपल्या गावी जाण्यासाठी परत निघतात. अशा नावांपैकी मळे किंवा ती न मिळाल्यास कुरुंजी गावची नाव पकडून रात्रीचे मुक्कामास तेथे यावे आणि सकाळी सुवेळा माचीच्या दक्षिण बाजूने गड चढावयास लागून काळेश्वरी म्हणून स्थान आहे तेथे असलेल्या दिंडीने सुवेळा माचीवर यावे. ५) याशिवाय मळ्यावरून थेट उत्तरेस कड्यामधून एक वाट संजीवनी माचीवर जावयास निघते. याशिवाय गडाच्या तटास आणखी काही ठिक़ाणी दिंड्या होत्या. त्यांचाही प्रसंगानुसार उपयोग होत असावा. या गडाच्या बाले किल्ल्याचा भाग सर्वात अधिक म्हणजे समुद्र सपाटीपासून ४५१४ फूट उंच असून पद्मावती माचीवरील उंचवटा ३६१२ फूट उंच आहे. या गडास असलेल्या पद्मावती, सुवेळा व संजीवनी या माच्या सुमारे १५० ते २०० फूट कमी उंच आहेत.[१]

**१. संजीवनी माची –** ही कमीत कमी दीड मैल तरी लांब असून उण्याअधिक प्रमाणांत अगदी अरुंद अशी आहे. हिच्या दोन्ही बाजूंनी भक्कम तट बांधलेला असून त्यास जागोजाग चिलखती बुरूज आहेत. ही माची पश्चिमेकडे तीन टप्प्यांनी उतरत गेली असून पहिल्या दोन टप्प्यांत प्रत्येकी एक पोट टप्पा आहे. प्रत्येक टप्प्यास एक लहान मोठा चिलखती बुरूज असून शिवाय पाण्याची टाकी, राहण्यासाठी घरे वगैरे व्यवस्था केली होती. तिसरा किंवा अगदी पश्चिमेचा टप्पा जेथून सुरू होतो तेथपासून तो थेट शेवटच्या बुरुजापर्यंत दोन्ही अंगच्या तटाच्या आत पण तटाशी समांतर दुसरा तट बांधलेला आहे. दोन्ही तटांमध्ये सुमारे १ ।।–२ फूट अंतर असून खोली कोठे कोठे २०–२० फुटांपर्यंत आहे. यातून बाहेरच्या तटाबाहेर जाण्यास किंवा बाहेरून आत येण्यास मधून मधून दिंड्या ठेवल्या आहेत. पण शत्रूचा बाहेरून मारा होत असल्यास त्यापासून आतील सैन्याचा बचाव करण्यास बराच उपयोग होत असावा.

**२. पद्मावती माची –** सर्वात लांब–रुंद जागा व उत्तम पाण्याची व्यवस्था याच माचीवर असल्याने किल्ल्याची मुख्य वस्ती येथेच होती. त्याप्रमाणे हीवर सदर, सदरेच्या नैऋत्येस ढाल–निशाणाची जागा, उत्तरेस राजवाडा, ईशान्येस अंबारखाना व घोड्याची पागा इत्यादी ठिकाणांचे अवशेष, एक तळे व अनेक टाकी आपणास पहावयास मिळतात. या अवशेषांवरूनही मूळ इमारती किती विस्तृत असतील याची कल्पना सहज येऊ शकते. श. १८६७ (इ. १९४५) मध्ये सदर, पद्मावतीचे देऊळ व दिवाणघर

एवढ्या तीनच इमारती साधारण सुस्थितीत होत्या. आता दिवाणघर व देऊळ सोडून बाकी इमारती अवशेष रूपानेच ज्ञात होतात. पूर्वी सदरेत ओटीच्या कडेस मधल्या खणात गालिचा आंथरून त्यावर लोड ठेवलेला असे. शिवाजी महाराज तेथे बसत असत. दिवाणघर सरकारी नोकर कामकाजासाठी आले असता उघडत; एरवी बंदच असे.

**३. सुवेळा माची –** पद्मावती माचीवरून बाले किल्ला उजव्या अंगास आहे. ही संजीवनी एवढी लांब नाही . याकडे जात असताना प्रथम उजव्या अंगास झाडीने आच्छादिलेला एक उंचवटा लागतो. त्यास डुबा म्हणतात. डुब्याच्या पुढे गेलो म्हणजे एकापुढे एक तानाजी मालुसरे, शिलिंबकर सरनौबत व येसाजी कंक यांचे घरे लागतात. प्रत्येक घराजवळ पाण्याची स्वतंत्र व्यवस्था केलेली आढळते. पूर्वेस पुढे जाऊ लागला म्हणजे माचीचा तटबंद भाग सुरू होतो. यास दोन टप्पे असून प्रत्येकाच्या शेवटी चिलखती बुरूज आहे. पहिल्या टप्प्याचा बुरूज व त्याच्या विशाल पायऱ्या आजही सुस्थितीत असून गतवैभव डोळ्यांपुढे आणतात. खालच्या टप्प्यांत गेलो म्हणजे तटाच्या दोन्ही अंगास आतल्या बाजूने संजीवनी माचीप्रमाणे नाळ किंवा विवर किंवा चिलखती बांधणी पाहावयास सापडते. जाताना डाव्या अंगच्या बाजूस एक उंच खडक असून त्यास सुमारे १० फूट व्यासाचे आरपार छिद्र आहे. हे नैसर्गिक असून दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे. या छिद्राची मजा ही आहे की, नसरापूर–वेल्हे रस्त्यावरून जात असता कितीतरी वेळ हे छिद्र दिसत असते व ते प्रत्यक्ष जाऊन पाहण्याची अनिवार इच्छा होते. दुसरा टप्पा पाहून आपण परत मालुसऱ्याच्या घरट्याजवळ आलो म्हणजे डुब्याच्या आग्नेय अंगास टाकी व मूर्ती यांचा समूह लागतो. रामेश्वर मंदिरात शिवलिंग, फुटका नंदी, एक स्त्रीमूर्ती आणि एक लठ्ठ, शस्त्रे व कवच धारण करणारी पुरुषमूर्ती अशी शिल्प आहेत.

**बालेकिल्ला**

बाल म्हणजे लहान. मुख्य किल्ल्यामधील लहानपण अति महत्त्वाचे ठिकाण होय. यास बालेकिल्ला म्हणतात. मूळ बला–ए–किल्ला हा उर्दू शब्द होय.


एकूण किल्ल्याच्या भूभागांपैकी मध्यभागी लहान जागेमध्ये काहीसा उंचवट्याचा भाग की ज्या भागामधून सर्व किल्ल्यावरील प्रदेशावर लक्ष ठेवता येईल. त्याचे रक्षण करता येईल अशा ठिकाणास 'बालेकिल्ला' याचा अर्थ किल्ल्यामधील लहान किल्ला होय.२

बालेकिल्ला प्रत्येक किल्ल्यास अस तो असे नाही. मुख्य किल्ल्यापासून काहीशा उंचावर हा किल्ला असुन हा ठिकाणावरुन संपूर्ण किल्लादृष्टीपथामध्ये येतो. वा तशी व्यवस्था केलेली असे. अशा महत्त्वाच्या ठिकाणी मुख्य व्यक्तिचे निवास स्थान असे. राजगडास बालेकिल्ला आहे.


यावरुन प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवता येत असे. उदा. धान्याची कोठारे, दारु कोठार, लक्कडखाना, पाण्याची उपलब्धता आदी. राजगडावरील बालेकिल्ला देखणापण तितकाच चढण्यास अवघड आहे.

■■■

## राजगड किल्याचा नकाशा




राजांचा गड राजगड – राहुल बांदल










राजांचा गड राजगड – राहुल बांदल

## ऐतिहासिक निर्देश

१) अहमदनगरच्या निजामशाही घराण्याचा संस्थापक अहमद बहिरी याने आपले आसन स्थिर होताच (श. १४१२, इ. १४९० सुमार) सध्याच्या अहमदनगर, कुलाबा, ठाणे व पुणे या चार जिल्ह्यांतील शिवनेरी, चावंड, लोहगड, तुंग, तिकोना, कोंढाणा, पुरंदर, भोरप हे गड जिंकून घेतले व नंतर आपला मोर्चा मुरबदेवाकडे वळविला. येथील गडकऱ्यांच्या कानांवर उपर्युक्त गड कसे पडले याची बातमी अगोदरच गेली होती. यामुळे येथील लोक त्यास तात्काल शरण आले. त्याने त्यास क्षमा करून अभय दिले. पण तेथील मूर्ती-मंदिरांचा नाश करून तेथे मशिदी उभारल्या आणि नवे हवालदार व नायक हवालदार नेमण्याची व्यवस्था केली (बुर्हान-इ-मासिर, मूळ फार्सी प्रत पृ. १८२-३) ३

२. सु. १०१७ जिल्हेज ११ (श. १५३८ मार्गशीर्ष शुद्ध १२ = इ. १६१६ डिसेंबर १०) असा कालनिर्देश असलेल्या एका महजराचा पाठ उपलब्ध आहे. यावरून एवढे समजते की, यावेळी राजगड मुरुंब-मुरुमदेव या नावाने ओळखला जाई (रा. १६/२).

३. रा. १७।४ ही एक तक्रीर किंवा कैफियत आहे. हीत निजामशाहीकडून आदिलशाहीकडे मावळचा काही मुलूख गेला त्यात मुरुमदेव इत्यादी गड होते एवढे सांगून त्या वेळची थोडी हकिकत दिली आहे ती अशी-तेथील निजामशाही हवालदार किल्ला आदिलशाहीकडे देताना गड सोडून निघाला व बाजी हैबतराव सिलिमकर यास म्हणाला 'मी चाललो, तुम्ही किल्ल्याचे रक्षण करा' त्याप्रमाणे बाजी हैबतरावाने ताबडतोब किल्ला ताब्यात घेतला. नंतर त्याने आपला बाप रुद्राजी नाईक यासही किल्ल्यावर नेले. एवढे होते न होते तो आदिलशाही हवालदार हैबतखान याने १२ मावळांच्या देशमुखांसह मुरुमदेव किल्ल्यास वेढा घातला. त्यावर बाजी हैबतरावाने मलिक अंबराकडे काय करावे म्हणून विचारणा केली. मलिक अंबराने किल्ला हैबतखानाच्या हवाली करा असे सांगितल्यावरून किल्ला हैबतखानाच्या हवाली करून बाजी व रुद्राजी दोघे खाली उतरले. या सुमारास हैबतखान वाई व तिच्या लगतचा प्रदेश यावर आदिलशाहीतर्फे सत्ता चालवीत होता, एवढे इतर पुराव्यावरूनही दाखविता येते. मलिक अंबर श. १५४८ (इ. १६२६) मध्ये मेल्यामुळे ही सर्व हकिकत इ. १६२६ पूर्वीची आहे असे ठरते.

४. राजगडाचा मुरुंबदेव या नावाने आलेला तिसरा निर्देश सु. १०२७ रजब १ (श. १५४९ चैत्र शुद्ध १=इ. १६२७ मार्च ९) चा आहे. यात हा निर्देश तोरणा, कोंडाणा व रोहिडा या गडांच्या संगतीने आला आहे (शिचसा ३।६२४).

५. सु. १०३१ रखर २३ (श. १५५२ कार्तिक वद्य ९=इ. १६३० नोव्हेंबर १८) च्या एका पत्रांत पुढील निर्देश आहे. शहाजीचा एक नोकर सोनजी हा त्याच्या ताब्यातील किल्ला मुरुमदेव येथे आश्रय घेऊन राहिला असता त्यावर बहुधा विजापूरकरांपैकी कोणी सरदार चालून आला. तेव्हा तेथे दोघांची लढाई झाली. तीत सोनजी जखमी होऊन त्याचे काही लोक ठार झाले किंवा त्याचा लेक मेला. हे पाहून बाळाजी नाईक शिलिंबकर आपला जमाव घेऊन धावून आला व त्याने सोनजीच्या शत्रूशी लढाई केली. तीत बाळाजी नाईक जखमी झाला तरी शत्रूचा मात्र त्याने मोड केला. याबद्दल त्यास पोषाख देऊन सांगितले की, नेहमी अशाच तऱ्हेने शत्रूला शिक्षा करीत जावे. यावेळी शहाजी आदिलशाही सोडून निजामशाहीकडे परतला होता (शिचसा ५।७७७).

६. शिचसा १० पृष्ठ ५४ वर एक मनोरंजक माहिती आली आहे. आपणास राजगडाचे जुने नाव मुरुंबदेव होते हे ठाऊक आहे; पण या पृष्ठावरील एका नोंदीत मावळच्या हद्दीत शहामृग नावाचा पर्वत होता. तेथे शिवाजीने ठाणे घालून इमारत बांधली आणि त्यास पर्वतास श. १५६४ (इ. १६४२-४३) मध्ये राजगड हे नाव ठेविले व पुढे दोन वर्षांनी राजगडास लोकांची भरती केली असे सांगितले आहे. शहामृग हे नाव इतरत्र कोठेही आलेले नाही आणि राजगड किंवा मुरुंबदेव इतक्या लवकर शिवाजीच्या ताब्यात आला होता की नाही या विषयी शंका आहे. सभासदी बखरीमध्ये तर 'मुरबाद म्हणून डोंगर होता त्यास वसविले. त्याचे नाव राजगड म्हणोन ठेविले.' असे सांगितले आहे (शं.ना. जोशी - छत्रपती श्रीशिवाजी राजे यांची बखर पृ. ५).

७. सु. १०४५ सफर ११ (श. १५६७ चैत्र शुद्ध १४ = इ. १६४५ मार्च ३०) या दिवशी लिहिलेल्या एका पत्राच्या नकलेत सांगितले आहे की, रोहिडखोरे व वेलंवंडखोर यांचा देशपांडे व कुलकर्णी दादाजी नरस प्रभू हा, विजापूरच्या बादशाहासी बेइमानी करून व रोहिरेश्वराच्या (रायरेश्वराच्या ?) डोंगराचा आश्रय घेऊन मावळ्यांच्या मदतीने पुंडावे करणाऱ्या शिवाजीला मदत करीत आहे आणि त्याने मुरुमदेवाचा किल्ला बळकावून त्यास राजगड हे नाव ठेवले आहे; देशपांडे रसद देत नसून शिरवळच्या ठाणेदाराशी सरळ वागत नाही; पण हे योग्य नाही; तो असे करील तर त्यास विजापुरास नेऊन ठार करण्यात येईल व त्याचे हक्क त्याजकडे चालणार नाहीत. (रा १५।२६७). प्रस्तुत पत्र नकल आहे. शिवाजीने मुरुमदेव एवढ्या लवकर आपल्या ताब्यात घेऊन त्याचे राजगड नाव ठेवले असेल असे संभवत नाही. रोहिडेश्वर असा देव ठाऊक नाही. रोहिडमल्ल आणि रायरेश्वर असे दोन निरनिराळे देव ठाऊक आहेत. तेव्हा पत्र बनावट असावे.

८. जेधे करिण्यात राजगडाविषयी माहिती आली आहे ती काल व प्रसंग या दोन्ही दृष्टींनी अचूक असेल तर दादाजी कोंडदेवाचा श. १५६९ (इ. १६४७) मध्ये मृत्यू झाल्यावर व.श. १५७० (इ. १६४९) पूर्वी शिवाजीने तोरण्यासह हा किल्ला बापूजी मुद्‌गल नऱ्हेकर देशपांडे याच्या साह्याने घेऊन त्याचा जीर्णोद्धार करण्याचे काम चालविले होते असे ठरते (शिचप्र पृ. ४१).

९. खाफीखानाने आपल्या मुन्तखबुल्लुबाब ग्रंथामध्ये अनेक ठिकाणी शिवाजीविषयी माहिती दिली आहे. त्या सर्व माहितीशी आपणास सध्या काही कर्तव्य नाही; पण तीमध्ये तो राजगडावर तांब्याचे पैसे व सोन्याचे होन ही नाणी पाडतो असे सांगितले आहे ते लक्ष्य आहे. ही माहिती खरी असेल तर शिवाजी आपल्या राज्याभिषेकापूर्वी एवढेच नव्हे तर आपली राजधानी रायगडास नेण्यापूर्वीही आपल्या नावाचे शिवराई होन व पैसे पाडू लागला होता असे ठरते (शिचवृस ३।७०).

१०. सु. १०४९ (श. १५७० = इ. १६४८-४९) या वर्षी शिवाजीने राजगडावर सामराज नीळकंठ रांझेकर यास आपला प्रधान केले (शिचसा १०।५४).

११. शहाजीच्या प्रसिद्ध कैदेच्या समयास शिवाजीकडे राजगड, सिंहगड, पुरंदर हे व आणखी काही किल्ले होते. त्यापैकी राजगड शिवाजीने आपली राजधानी केली होती (शिचसा १०।५४).

१२. मार्गशीर्ष शुद्ध ५ = इ. १६५२ नोव्हेंबर २५) चे एक पत्र आहे. शिवाजीसमोर केदारजी व खंडोजी खोपडे यांच्या वतनविषयक तंट्यात निमेनिम वाटणीचा महजर झाला असता. त्यावर दादाजी नरस प्रभू देश-कुळकर्णी याचा गुमास्ता बाबाजी शिवदेव सोनटक्के याने देशकुळकर्णी म्हणून आपलेच नाव घातले. त्यास राजगडावर कैदेत टाकले असे या पत्रात सांगितले आहे (रा. १५।२७३).

१३. सु. १०५७ जरवर १५ (श. १५७९ चैत्र वद्य २ = इ. १६५७ मार्च २१) या कालनिर्देशाच्या एका महजरांत रुद्राजी व बाबाजी हैबतराव यास पकडून मुरुमदेव गडावर ठेवून दिल्याचे सांगितले आहे. येथील मुरुमदेव हा उल्लेख लक्ष्य आहे (रा १७।१०).

१४. सु. १०६० जवल २ (श. १५८१ माघ शु. ३=इ. १६६० जानेवारी ५) या दिवशी २ ऱ्या अली आदिलशहाने दिलेल्या एका फर्मानांत विठोजी हैबतराव (शिलिमकर) ह्यास मूरबगर = मुरुमगडाचा देसाई म्हणून संबोधिले आहे. या फर्मानात उपर्युक्त देसायाची इनामे व वतने त्याजकडे चालू ठेवल्यास तो शिवाजीने आपल्या ताब्यात घेतलेला निजामशाही व इतर प्रदेश स्वत:च्या जमावाच्या साह्याने आदिलशाहीच्या ताब्यात आणून देईल असे सांगितले आहे ते लक्ष्य आहे (शिचसा ४।६८८). शिवाजीने या फर्मानाच्या कालापूर्वीच मुरुमदेव हे नाव बदलून त्याचे राजगड हे नाव केले होते; पण अली आदिलशहाने शत्रूने ठेवलेले नवे नाव उपयोगात न आणता येथे पूर्वीच्या कागदांप्रमाणे जुने नावच उपयोजिले आहे.

१५. सु. १०६३ जिल्हेज ५ (श. १५८४ श्रावण शुद्ध ६ = इ. १६६२ जुलै १३) या दिवशी शिवाजीने रोहिडखोऱ्याच्या देशमुखांना व शिपायांना पाठविलेल्या एका पत्रात पुढील आशय आहे. पंताजी पंडित आंबोड्यास असताना बाजाराचे दिवशी रायाजी देशमुख तेथे गेला. त्या वेळी तो आणि पंताजी पंडित याचे भांडण झाले. त्यात रायाजी देशमुखाने मूर्खपणाने पंताजी पंडितांवर हल्ला केला व त्यांची मानहानी केली. हे शिवाजीस समजल्यावर त्याने प्रस्तुत कानउघाडणी करणारे पत्र लिहिले. त्यातच पुढे शिवाजीने रायाजी देशमुख वगैरे लोकांस बजाविले आहे की, त्यांनी पंताजी पंडितांकडे जाऊन, त्यांची क्षमा मागून, आपला गुन्हा त्याजकडून माफ करून घेतला नाही तर सर्व शिपायांच्या पायात बेड्या आणि गळ्यात साखळदंड घालून त्यास राजगडावर कैदेत ठेवू व त्यास धोंडे वाहण्याचे काम करावयास लावू. यावरून असे वाटते की, या वेळपर्यंत राजगड बांधण्याचे काम पुरे झाले नव्हते किंवा कदाचित वार्षिक डागडुजीचेही काही काम चालू असेल (ऐसंसा १।११९).

१६. श. १५८७ (इ. १६६५) मध्ये जयसिंग शिवाजीवर चालून आला आणि त्याने सर्व बाजूंनी शिवाजीच्या प्रदेशात धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. त्याच्या सैन्यापैकी दाउदखान व रायसिंग हे ता. २१ शब्बल (श. १५८७ वैशाख वद्य ८ = इ. १६६५ मे २७) रोजी रोहिडा व राजगड यांच्या आसमंत भागात पोहोचले आणि त्यांनी तिकडील ५० खेडी जाळून टाकली. शिवाय डोंगरात अडचणीच्या जागी असलेल्या ४ गावात दंगल माजविण्यास सुरुवात केली. तेथे शिवाजीच्या लोकांशी त्यांची थोडी लढाई झाली. परंतु मुघलांनी ते चारी गाव धुळीस मिळविले. नंतर ते ता. २४ शव्वाल (श. १५८७ वैशाख वद्य ११ = इ. १६६५ एप्रिल ३०) रोजी राजगड किल्ल्याचे पायथ्याशी पोहोचून तेथील प्रदेश हस्तगत करू लागले. यावेळी शिवाजीचे लोक किल्ल्यावरून तोफा, बंदुका व बाण यांचा मारा करीत होते तरी मुघली फौज ठाण मांडून राहिली; पण लौकरच त्यांच्या लक्षात आले की, मुलूख डोंगराळ असल्यामुळे तो सर करणे कठीण आहे. म्हणून त्यांनी आपला मोर्चा सिंहगडाकडे वळविला (शिचवृसं ३।३३).

१७. राजवाडे खंड ८ ले. ९ या पत्रात कालनिर्देश नाही. पण आतील आशयावरून त्यातील प्रसंग श. १५८७ आषाढ शुद्ध ९ (इ. १६६५ जून ११) नंतर लागलीच घडला असावा. या वेळी राजगडाचा सबनीस केसो नारायण होता. शिवाजीच्या अनुपस्थितीत तेथे हवालदार व सरनौबत नाहीत, सर्व

कारभार आपल्याकडेच आला आहे, असे पाहून राजगडचे खर्चासाठी अंबाजीपंत व राघोपंत यांजकडून आलेल्या ३००० लाऱ्यांपैकी १४०० लाऱ्या त्याने जमा करावयास दिल्या, ६०० लाऱ्या तोडल्या आणि १००० लाऱ्या दादजी व गुंडा नायकवाडी यांजपाशी ठेवल्या असे सिद्ध झाले. ही हकिकत शिवाजीस कळली. अफरातफरीच्या या अपकृत्याबद्दल केसो नारायणास कोणती शिक्षा झाली, हे कळत नाही.

१८. आलमगिरी जु. ८ रवल ५ (श. १५८७ भाद्रपद शुद्ध ७ = इ. १६६५ सप्टेंबर ५) रोजी शिवाजीने जयसिंगाच्या मध्यस्थीने मुघलांशी मांडलिकत्वाचा तह केला. त्यामध्ये त्याने तेवीस किल्ले मुघलांच्या स्वाधीन केले व जे बारा त्याजकडे राहिले त्यात राजगड होता (रा ८।१४).

१९ श. १५८९ माघ शुद्ध १ (१६६८ जानेवारी ४) या कालनिर्देशाच्या एका पत्रात राजगड येथे पंचायत करून सई आबा ढोर देशमुख हीस मैजे जतपड येथील ४ पैसे जमीन नेमून दिली आणि ती जमीन व सई आबा ढोर यांची जपणूक बेलवंडीचे पाटील व कुलकर्णी यांनी करावी असे सांगितले आहे. सु. १०६९ मोहरम १५ असा एक कालोल्लेख या पत्राच्या शेवटी आला आहे त्याची व्यवस्था लावता येत नाही. ही या पत्राच्या खरेपणाबाबत उत्पन्न होणारी अडचण आहे (रा १५।२७७).

२०. शिवाजीने आपला बराच काळ म्हणजे सुमारे २० ते २२ वर्षेराजगड आपली राजधानी करून तेथे घालविल्यामुळे अनेक कौटुंबिक घटना राजगडासच घडल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे राजारामाचा जन्म राजगडास झाला. त्याची मिती श. १५९१ फाल्गुन शुद्ध १५ (इ. १६७० फेब्रुवारी २४) ही आहे (शिचप्र पृ. २४).

२१. सु. १०७२ (श. १५९३, इ. १६७१) च्या एका पत्रात शिवाजीने त्या साली त्याच्या ताब्यात असलेल्या गडांपैकी २० गडांवर बांधकाम करण्यासाठी एक लाख पंचाहत्तर हजार होन खर्च करण्याचा संकल्प केला; त्यात राजगडावरील बांधकामासाठी १०,००० होन खर्च करण्याचे ठरविले होते असे नमूद आहे (रा ८।२२).

२२. सु. १०७२ (श. १५९३=इ. १६७१) च्या एका पत्रात सांगितले आहे की शिवाजी महाराज संभाजीसह आग्ऱ्याहून निसटल्यावर, मार्गात संभाजीला कृष्णाजी विश्वासराव याच्या हवाला केले होते. त्याने संभाजीस सांभाळून राजगडास आणले. त्यावेळी कृष्णाजी विश्वासराव याची आई आणि काशी त्रिमल हेही त्यांच्या सांगाती राजगडास आले. याबद्दल त्या दोघांना प्रत्येकी २५००० रुपये पारितोषिक मिळाले. येथे कृष्णाजी विश्वासराव यास काय मिळाले हे मात्र नमूद केलेले नाही. तो बहुधा आईच्या पोटात समाविष्ट असावा (रा. ८।२३).

२३. सु. १०८६ रजब ५ (अखेर साल = श. १६०८ ज्येष्ठ शुद्ध ६ = इ. १६८६ मे १८) या दिवशी शंकराजी नारायण सचिव याने कृष्णाजी दादाजी प्रभू देशपांडे यास लिहिलेले पत्र आहे. त्यात शंकराजीने, शत्रूने चाल केली असता त्याने (कृदाप्रदे) शिरवळ येथे चांगली मर्दुमकी गाजविली याबद्दल त्यास शाबासकी दिली असून यापुढे कोरलखिंड, ढवळाघाट व मांढरदेवाचा सडा या ठिकाणी व जागोजागी चौक्या बसवून शत्रूची बातमी राजगडाला पोहचवावी म्हणजे रोहिडा वगैरे ठिकाणाहून कुमक करू असे सांगितले आहे. (रा. १५।२८०).

२४. रा.श. १३ श. १६०९ वैशाख शु. ६(५) (इ. १६८७ एप्रिल ७) या कालनिर्देशाच्या एका पत्रात बदल देणे वर्षासन त्र्यंबक देव गोसावी किले राजगड असा एक निर्देश आला आहे (रा १८।५७).

२५. संभाजीचा वध झाल्यानंतर मराठ्यांमध्ये जी स्तिमितता आली होती, तिचा औरंगजेबाने

फायदा घेतला आणि मोठी त्वरा करून मराठ्यांचे बहुतेक गड त्याने हस्तगत केले. त्यात श. १६११ आषाढाच्या (इ. १६८९ जून) सुमारास किशोरसिंह हाडा या मुघली सरदाराने राजगड हस्तगत केला. तेव्हा त्यावर औरंगजेबाने आपल्या तेहतिसाव्या राज्यवर्षाच्या पहिल्याच म्हणजे रमजान १ (श. १६११ आषाढ शुद्ध २ = इ. १६८९ जून ९) या दिवशी अबुल खैरखान या सरदारास नेमले; पण संभाजीच्या वधाची बातमी कळण्यापूर्वी मराठे किल्ल्याभोवती जमा झाले. यामुळे अबुल खैरखान गर्भगळित होऊन त्याने मराठ्यांकडे सुरक्षिततेची याचना केली. मराठ्यांनी ती याचना मान्य केली. तीवर विश्वास ठेवून तो जडजवाहिराचे पेटारे घेऊन बायकामुलांसह रात्रीचे वेळी बाहेर पडला; पण मराठ्यांनी दिलेले वचन मोडून त्यावर अचानक हल्ला केला आणि त्यास सर्व बाजूंनी नागविले. तेव्हा तो पूर्ण फजीत होऊन कसाबसा जवळच असलेल्या फीरूझजंगाच्या छावणीत पोहोचला. औरंगजेबास हे समजताच त्याने त्यास कामावरून दूर करून जबरदस्तीने मक्केस पाठवून दिले (खाफीखान-मुन्तखबुल्लु-बाब, फार्सी मूळ, खंड २ पृ. २९२-९३; मासिर-इ-आलमगीरी फार्सी मूळ पृ. ३३०). मासिर-इ-आलमगीरीप्रमाणे औरंगजेबाने आपल्या ३३व्या राज्यवर्षाच्या पहिल्याच म्हणजे रमजान १ (श. १६११ आषाढ शुद्ध २ = इ. १६८९ जून ९) या दिवशी अबुलखैरखान यास राजगडाचा हवालदार केले. अर्थात या वेळी संभाजीचा वध होऊन तीन महिन्यांचा काळ लोटला होता. त्या प्रसंगाची बातमी सर्व मराठ्यांना कळली असलीच पाहिजे. तेव्हा संभाजीच्या वधाची बातमी कळण्यापूर्वी मराठ्यांनी राजगड हस्तगत केला हे मुन्तखबुल्लुबाबांतील म्हणणे आपोआपच लटके पडते. दिलेल्या हकिकतीवरून आणखी असेही कळते की, यावेळी मराठ्यांनी अबुलखैरखानास सुरक्षिततेचे वचन देऊन नंतर त्यास रात्रीच्या अंधारात सर्व बाजूंनी नागविले. पण हे विधान कितपत सत्य आहे याविषयीही संशय येतो. कारण खाफीखान सोडल्यास इतर कोणीही इतिहासकार ही हकिकत देत नाही. विशेषत: मासिर-इ-आलमगीरी सारखा प्राय: समकालीन लेखक ही हकिकत देत नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. पण मराठ्यांची ही दिङ्मूढता फार काळ टिकलीसें दिसत नाही. कारण संभाजीचा वध होताच औरंगजेबाने जे किल्ले जिंकून घेतले त्यापैकी तोरणा, राजगड व रोहिडा हे किल्ले रामचंद्रपंत अमात्य व शंकराजीपंत सचिव यांनी थोड्याच अवधीत परत जिंकून घेतले असे दिसते (शिचप्र ३६).

२६. सु. १०९१ शव्वाल ६ (श. १६१२ आषाढ शुद्ध ८ = इ. १६९० जुलै ३) या दिवशी रामचंद्रपंत अमात्य यांनी कानदखोऱ्याचा देशमुख कान्होजी झुंजारराव यास एक पत्र लिहून कळविले की, त्याने खटपट करून मुघलांकडून प्रचंडगड घेतला, नंतर मुघल त्यावर चालून आले असता त्या वेळीही खूप श्रम केले व त्यास मुघलांनी पकडले असता तो सुटून आला, याबद्दल त्यास शाबासकी दिली आहे आणि त्यास राजगड व सिंहगड घेण्याविषयी उत्साहित केले. या सुमारास छत्रपती संभाजी नुकताच मारला गेला असला तरी मराठ्यांची उमेद खचली नव्हती असे दिसते (रा. १६।२७).

२७. खाफीखानाने आपल्या मुन्तखबुल्लुबाबाच्या दुसऱ्या खंडात पृ. ३८३, ४१५, ४५१ व ५२१ अशा आणखी चार ठिकाणी राजगडाचा निर्देश केला आहे. पैकी पहिल्या दोन उल्लेखांत औरंगजेबाने आपल्या ३४, ३७ व ४० या राज्यवर्षांच्या आरंभीच महाराष्ट्रांतील गड व प्रदेश जिंकण्याच्या ज्या योजना आखल्या त्यात ३४ मध्ये फीरुझजंगाला उचित सैन्यासह राजगडच्या बाजूचे किल्ले जिंकण्यासाठी पाठविले आणि ३७ मध्ये निरनिराळ्या सेना पन्हाळा, राजगड इत्यादी किल्ले जिंकण्यासाठी पाठविल्या एवढेच सांगितले आहे. तिसऱ्या म्हणजे ४० व्या राज्यवर्षाच्या उल्लेखात

रामराजा (राजाराम) राजगड प्रदेशातील किल्ले सोडून जिंजीस गेला असता तिकडून साताऱ्याच्या बाजूस आल्याचे सांगितले आहे. चौथा निर्देश तोरण्याचा ठावठिकाणा सांगण्याच्या संदर्भात आला आहे. सारांश, मुन्तखबुल्लुबाबाच्या या खंडात औरंगजेबाच्या राजवटीसाठी ५६५ पृष्ठे खर्ची पडली असली तरी त्यात राजगडाविषयी एवढीच माहिती आली आहे.

२८. सु. १०९४ जवल १७ (श. १६१५ पौष वद्य ३ = इ. १६९४ जानेवारी ४) या दिवशी शंकराजी नारायण सचिव याने राजगडाचा सुभेदार मल्हार येसाजी यास एक पत्र लिहिले आहे. त्यात तो म्हणतो 'कान्होजी झुंझारराव तर्फे कानदखोरे याने खूप मेहनत करून तो प्रदेश (आसपासच्या प्रदेश) वैराण झाला असता वहितीला आणला आणि छत्रपती राजाराम कर्नाटकामध्ये गेला असता व इकडे मुघलांनी दंगा सुरू केला असता हा एकनिष्ठ राहिला व पुष्कळ कष्ट घेतले; तेव्हा त्याची इनामे त्याजकडे चालवावी; तसेच त्याने २० लोक सरकारामध्ये चाकरीस ठेवण्याचे मान्य केले आहे, त्याप्रमाणे तो लोक ठेवील; त्याची इनामे त्याजकडे चालविणे' (शिचसा ५।९५४; ६।१२०).

२९. छत्रपति राजाराम जिंजीच्या वेढ्यातून निसटून महाराष्ट्रात आला आणि येथे त्याने मोगलांविरुद्ध जोराच्या हालचाली सुरू केल्या. त्या हाचालींचे केंद्र मुख्यत: राजगड हेच होते. तथापि छत्रपती राजारामाचा मृत्यू मात्र राजगडावर न होता सिंहगडावर झाला हे लक्षात ठेवले पाहिजे (शिचप्र ६७).

३०. सु. १०९८ रवल १ (श. १६१९ आश्विन शुद्ध ३ = इ. १६९७ सप्टेंबर ८) या दिवशी शंकराजी नारायण सचिव याने राजगड सुभ्याचे सुभेदार व कारकूर यांस लिहिलेल्या पत्रात रामचंद्र नीळकंठाचे मौजे केळवडे येथे असलेले इनाम मुघलांच्या राजकारणामुळे त्याजकडे चालले नाही. सध्या छत्रपती स्वामीनी शत्रूचा पराभव करून राज्य सुरक्षित केले. देश वसाहत केला, वतनदार व इनामदार यास त्यांची इनामे परत दिली. त्याप्रमाणे रामचंद्र नीलकंठाचे इनाम त्यास परत द्यावे असे आज्ञापिले आहे. याच आशयाचे व दिनांकाचे एक पत्र शंकरजी नारायणाने खेडेबारेंच्या देशमुखास लिहिले आहे (शिचसा ३।४३४). या पत्रात शिवाजीने राज्यात बटाई केली तेव्हा इनामे अनामत केल्याचे नमूद आहे.

३१. सु. ११०२ रवल १० (श. १६२३ श्रावण शुद्ध १२ = इ. १७०१ ऑगस्ट ४) या दिवशी शंकराजी नारायण सचिव याने राजगड येथील पद्मावती माचीचा हवालदार शहाजी मोहिते व कारकून यास लिहिलेल्या पत्रात चंदनगडाचा कारखानीस त्र्यंबक मल्हार याची माणसे आश्रयासाठी पद्मावती माचीस आली आहेत, तरी त्यांना गडावर घ्यावे आणि त्यास राहण्यासाठी घर देऊन त्यांचा परामर्ष घेत जावा असे आज्ञापिले आहे (शिचसा ३।५८९).

३२. साधारणत: श. १६२२ ते १६२९ (इ. १७०० ते १७०७) या दरम्यान लिहिले गेलेले एक मुघली पत्र आहे. त्यात सांगितले आहे की, बादशाहाच्या हुकुमाप्रमाणे तर्बियतखानाने वाई परगणा खालशांत सामील केला व त्यातून येणारा वसूल सातारा, परळी, वसंतगड व राजगड यांवरील सामग्री व शिपाई यांच्या व्यवस्थेसाठी लावून दिला. हे सर्व गड या वेळी मुघलांच्या ताब्यात होते असे दिसते (शिचसा ११।२२).

३३. रा.श. २९ वैशाख शुद्ध ११ (श. १६२५, इ. १७०३ एप्रिल १६) या दिनांकाचे व राजारामाचा मुलगा छत्रपती शिवाजी याने वर्धई व खंडई बेरड यास लिहिलेले एक पत्र आहे. त्यात औरंगजेबाने सिंहगडास वेढा घातला त्यावेळी त्यांना सर्व प्रकारचे साह्य पोहोचविले असताही त्यांनी उतावळी करून गड मोगलांच्या स्वाधीन केला व स्वत: निवृत्त राजगडास आले; याबद्दल त्यास दोष दिला आहे आणि

आता राजगडास शंकराजीपंतास भेटून पाऊस सुरू होईतो तरी, औरंगजेबास यशस्वी विरोध करण्याबद्दल आज्ञापिले आहे (भाइसमंत्रै ७।७५).

३४. गदाधर प्रल्हाद शकावलीमध्ये सांगितले आहे की, 'पातशाह श. १६२५ कार्तिक शुद्ध १४ (इ. १७०३ नोव्हेंबर ११) या दिवशी पुण्याहून कूच करून जाऊन राजगडास वेढा घालून बैसले व माघ वद्य नवमीस (इ. १७०४ फेब्रुवारी १८) राजगड सला करून घेतला' (शिचप्र ६८). पण या वेढ्याबाबत मासिरइ-अलमगीरीमध्ये (फार्सी मूळ पृ. ४७७-४८४.) पुष्कळ अधिक माहिती आली आहे ती अशी- हि. १११५ रजब १२ (श. १६२५ कार्तिक शुद्ध १४ = इ. १७०३ नोव्हेंबर ११) ला बादशाही सैन्य राजगड जिंकण्यासाठी पुण्यातून बाहेर पडले. वाटेने राजगडापासून चार कोस अंतरावर खूप उंच डोंगर लागला. तो उतरून पलीकडे जाण्याला वाट करण्यासाठी बादशाही माणसे दोन महिनेपर्यंत झटत होती. तरीही कठीणपणामुळे तो डोंगर उतरण्यास बादशाही सैन्याला सात दिवस लागले. नंतर आणखी एक मजल मारून बादशाही सैन्य रजबच्या अखेरच्या तारखेस (मार्गशीर्ष शुद्ध १ = नोव्हेंबर २८) राजगडाच्या पायथ्याशी येऊन पोहोचले. हा गड अतिशय उंच असून त्याचा घेरा बारा कोसांचा होता. अगोदरच तो दुर्गम प्रदेशात होता आणि शिवाजीच्या ताब्यात आल्यावर तीन माच्यांची तटबंदी करून तो त्याने अधिकच दुर्गम केला. पैकी सुवेळा माच्यांची तटबंदी करून तो त्याने अधिकच दुर्गम केला. पैकी सुवेळा व पद्मावती ह्या माच्या देशाच्या बाजूस तर संजीवनी कोकणच्या बाजूस होती. शाबान ४ (श. १६२५ मार्गशीर्ष शुद्ध ५ = इ. १७०३ डिसेंबर २) रोजी बादशहाने हुकूम दिला की, हमीदखानाच्या देखरेखीखाली व तर्बियतखानाच्या व्यवस्थापकत्वाखाली सैन्याने गडावर हल्ला चढवावा. येथे पद्मावती माचीच्या मागील लहान दरवाज्यापासून डोंगराच्या माथ्यापर्यंत भिडणाऱ्या दोन भक्कम तटांमुळे सोंडेसारखा भाग तयार झाला होता. म्हणून त्याला 'सोंड' म्हणत. ही बांधणी शिवाजीकाळात झाली होती. या तटाच्या भिंतीलगतच्या वाटा इतक्या अवघड आहेत की, तेथून पायी जाणेसुध्दा अशक्य आहे. या दोन तटांच्या भिंती जेथे मिळतात तेथे शिवाजीने एक बळकट बुरूज बांधला होता. त्याची उंची तीस गज होती. ह्या बुरुजात त्याने युद्धसाहित्य साठवून ठेवले होते. दोन्ही सरदारांनी किल्ल्याच्या तटाएवढा उंच दमदमा बांधला. किल्ल्यांतील लोकांनीही त्यांचे दमदमे बांधले. परंतु ते शत्रूचा हल्ला थोपवू शकले नाहीत. मुघलांनी आपल्या तोफांनी किल्ल्यातील बुरुजाची आणि इतर ठिकाणांची अमाप हानी केली. शव्वाल महिन्याच्या ११ व्या तारखेस (श. १६२५ माघ शुद्ध १२ = इ. १७०४ फेब्रुवारी ६) मुघल सैनिक बुरुजावर चढून शत्रुसैनिकांना पिटाळीत भिंतीच्या आत घुसले व तेथून चिकाटीने लढा देऊ लागले. किल्ल्यातील लोकांनी तोफा, बंदुकी, बाण आणि दगडधोंडे यांचा सतत वर्षाव केल्यामुळे बरेच मुघल ठार झाले. पण मुघलांचा निर्धार, त्याग, सैन्य आणि शक्ती पाहून किल्ल्यांतील लोकांचा धीर खचला. तेथील किल्लेदार मियानजी याचे सरदार फिरोनजी व हामानजी यांनी बख्शी रूहुल्लाहखान याकडे सुरक्षितता भाकली. खानाच्या मध्यस्थीवरून बादशाहाने किल्ल्यातील लोकांना नि:शस्त्र होऊन किल्ला सोडण्याची आज्ञा केली. शव्वाल महिन्याच्या २१ तारखेला (श. १६२५ माघ वद्य ७ = इ. १७०४ फेब्रुवारी १६) किल्लेदाराने आपल्या हाताने शाही झेंडा किल्ल्यावर चढविला आणि सर्वनाश पत्करून लोक तेथून निघून गेले. बख्शी रुहुल्लाहखान आणि हमीदुद्दीनखान बहादुर व इतर सरदार किल्ल्याच्या विजयाचा जयघोष करीत मुख्य दरवाजांतून आत शिरले व शत्रूला किल्ल्यांतून घालवून देण्यात आले. हमीदुद्दीनखान बहादुर हा पूर्वी सोडतीन हजारी मनसबदार होता त्यास आता त्याच्या

शौर्याबद्दल नैबतीचा मान देण्यात आला. तर्बियतखानास पांचशेंची बढती देण्यात येऊन त्यास साडेतीन हजारी मनसबदार करण्यात आले. रूहुल्लाहखान साडेतीन हजारी मनसबदार होता त्याला मूल्यवान रत्नजडित शिरपेच देण्यात आला व किल्ल्याचे नाव नबीशाहगड असे ठेविले.

३५. वर दिल्याप्रमाणे मुघलांतर्फे राजगड जिंकून घेण्याचे काम चालू असता व जिंकून घेतल्यावर लागलीच शंकराजी नारायणाने धाडलेली काही पत्रे उपलब्ध आहेत. त्यावरून ठरते की, हा वेढा चालू असता सुवेळा माचीजवळच्या हातघाईत शौर्याने लढताना संताजी शिलिंबकर व सिंहगडचा एक सरनाईक सिदोजी थोपटे तोफेचा गोळा लागून ठार झाले, त्यांच्या सांगाती सिंहगडाचा दुसरा सरनाईक खंडोजी थोपटे यानेही या वेळी मेहनत घेतली होती. थोपट्यांनी तर सिंहगडाच्या वेढ्यातही मेहनत केली होती. याबद्दल त्यास इनामे मिळाली. क्र. ३६-३८ हे निर्देशं एतद्‌विषयक माहिती सांगणारे आहेत.

३६. सु. ११०४ रमजान १५ (श. १६२५ पौष वद्य १ = इ. १७०७ जानेवारी १२) या दिवशी शंकराजी नारायण सचिव याने गुंजण मावळचा देशमुख प्रतापराव शिलिमकर यास लिहिलेले एक पत्र आहे. संताजी हैबतराव वतनी काम करण्यासाठी राजगडास रहात असता या वर्षी औरंगजेबाने त्यास वेढा घातला; पादशाही मोर्चा सुवेळा माचीच्या तटाच्या खालपर्यंत आला आणि शत्रूने गडावर लगट केली; त्यावेळी संताजीने शत्रूशी लढाई दिली, त्यास मारून काढले व तरवारेची शर्थ केली; इतक्यात तोफेचा गोळा लागून संताजी मरण पावला; तेव्हा त्याचा मुलगा प्रतापजी हा शंकराजी नारायणाकडे आला व वरील हकिकत सांगून नवीन इनाम मिळण्याविषयी त्याने विनंती केली; तीवरून त्यास नवीन इनाम देण्यात आले; इत्यादी हकिकत त्यात सांगितली आहे. अशाच प्रकारची पण उणीअधिक हकिकत आणखी काही पत्रांत आली आहे. (रा. १७।३०, २३, २४, २७-२९, ३२; १५।२८८). यापैकी तेविसावा लेख रा.श. ३० मार्गशीर्ष वद्य ७ (श. १६२५ = इ. १७०३ डिसेंबर १९) चा असून त्यात औरंगजेबाने राजगडास घातलेला वेढा आणि त्याविरुद्ध संताजी शिलिमकराने चालविलेला प्रयत्न यांचा उल्लेख आहे. चोविसावा लेख याच वर्षाच्या मार्गशीर्ष वद्य १० (डिसेंबर २२)चा असून त्यात संताजी ठार झाल्याचे सांगितले आहे. यावरून मार्गशीर्ष वद्य ७ ते ९ या तीन दिवसात केव्हा तरी विशेषत: वद्य ८ किंवा ९ या दिवशी संताजी मरण पावला असे दिसते.

३७. श. १६२५ माघ वद्य ७ (इ. १७०४ फेब्रुवारी १६) या दिवशी मुघलांनी राजगड घेतल्यानंतर, औरंगजेबाने त्या ठिकाणी किल्लेदार म्हणून जाण्यास कोणी तयार आहे का म्हणून अनेक सरदारांना विचारले, पण तेथील परिस्थितीच्या काठिण्यामुळे त्या सर्वांनी किल्लेदारी पत्करण्यास नकार दिला. शेवटी इरादतखान नावाचा सरदार तयार झाला. तेव्हा औरंगजेबाने त्यास २०० मोहरा व १०० मोहरांचे एक मोठे नाणे, तो व त्याचा मुलगा यासाठी दोन घोडे व त्याचे भावासाठी पाच घोडे, तसेच वाहण्यासाठी २०० बैल लागतील एवढे धान्य देऊन राजगडास पाठविले. काही दिवसानंतर औरंगजेबाने त्यास परत बोलावून त्याच्या जागी मनसुरखान यास नेमले (तारीख-इ-इरादतखानाचा जे.सी. वेअरिंग याने केलेला व हिस्ट्री ऑफ दि मराठाजमध्ये प्रसिद्ध झालेला अनुवाद भाग ४ पृ. ३).

३८. वर दिलेल्या निर्देशानंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे सु. ११०४ शव्वाल २९ (श. १६२५ फाल्गुन शुद्ध १ = इ. १७०४ फेब्रुवारी २४) या दिवशी शंकराजी नारायण सचिवाने रोहिडखोऱ्यांतील उतरोलीचे देशमुख व देशकुलकर्णी यांस लिहिलेले एक पत्र उपलब्ध आहे. त्यात सांगितले आहे की, चिमणाजी थोपटे याचा बाप सिदोजी थोपटे यास राजगडावरील पद्मावती माचीची सदर-सरनौबत होती;

औरंगजेबाने या गडास वेढा घातला असता त्यात सिदोजी थोपट्याने पुष्कळ मेहनत केली; पादशाही मोर्चा सुबेळा माचीच्या बरशाजवळ आला असता मुघलांनी एकदम हल्ला केला आणि बरसा घेतला; त्या वेळी झालेल्या लढाईत सिदोजी थोपटे तोफेचा गोळा लागून ठार झाला; हा स्वामिकार्यावर पडल्यामुळे त्याच्या मुलामाणसांचे चालविणे आवश्यक असे समजून त्याचा मुलगा चिमणाजी थोपटे यास अर्धा चावर जमीन नव्याने इनाम दिली. अशाच मजकुराची आणखी दोन पत्रे असून, त्यात याच कारणासाठी चिमणाजी थोपट्यास खानापूर व पिंपरे खुर्द या दोन गावातील मिळून १ चावर जमीन इनाम दिल्याचे सांगितले आहे (ऐसंसा १।७०-७३).

३९. शंकराजी नारायण सचिवाने मावळ प्रांताचे देशाधिकारी यास सु. ११०४ जिल्काद २ (श. १६२५ फाल्गुन शुद्ध ४ = इ. १७०४ फेब्रुवारी २७) या दिवशी पाठविलेल्या एका आज्ञापत्रात कळविले आहे की, सिंहगडचे सरनाईक खंडोजी व सिधोजी थोपटे यांनी औरंगजेबाने सिंहगड व राजगड यास वेढा घातला असता दोन्ही किल्ल्यावर शत्रूविरुद्ध खूप मेहनत घेतली म्हणून त्यास मावळ कर्यातीपैकी खामगाव येथील तीस बिघे जमीन इनाम दिली आहे ती त्याजकडे चालवावी (सप १९०). ही व पूर्वीची अशी सर्व पत्रे एकाच प्रसंगात शौर्य दाखवून रणात मेलेल्या दोन वीरांविषयी आहेत.

४०. सु. ११०७ रवल १ (अखेर = श. १६२८ ज्येष्ठ शुद्ध २ = इ. १७०७ मे २२) या दिनांकाच्या आणि शंकराजी नारायण सचिव याने हणमंतराव फाटक यास लिहिलेल्या एका पत्रात सांगितले आहे ते असे : राजगड शत्रूचे ताब्यात असताना तुम्ही आपले लोक किल्ल्यावर चढविले आणि किल्ला जिंकला अशी हकिकत पंताजी पंतांनी (पंताजी शिवदेव) लिहिली आहे. ते आम्हास मान्य झाले. या पुढेही पंताजी पंत सांगतील त्याप्रमाणे कामे करून आपली सेवा मान्य करून घ्यावी (भाइसंत्रे ६।८८). यावरून असे दिसते की, या कालाच्या किंचित अगोदर मराठ्यांनी मुघलांकडून राजगड परत जिंकून घेतला होता.

४१. रा.श. ३३ ज्येष्ठ शु. १० गुरुवार (श. १६२८ = इ. १७०७ मे २९) या दिवशी दुसऱ्या शिवाजीने गुणाजी सावंत यास एक राजपत्र लिहून दिले. त्यात सांगितले आहे की, तुम्ही शंकराजी पंडित सचिव याचे आज्ञेवरून स्वत: आणि आपली सेना घेऊन पंताजी शिवदेवाबरोबर राजगडाकडे गेला व प्रयत्न करून तो हस्तगत केला असे सचिवांकडून समजले; फार चांगले केले, पुढेही तुम्ही अशीच सेवा कराल याविषयी आमचा पक्का भरवसा आहे; तशी सेवा केली म्हणजे तुमचे ऊर्जित होईल (सप पृ. १९३, विषय ४४).

४२. सु. १११० (श. १६३१ = इ. १७०९) या सालच्या एका सरंजाम झाड्यामध्ये राजगडापैकी सुवेळा माचीस सुवेळा गड म्हटले असून तीसाठी ३०० रुपये आणि संजीवनी माचीसाठी १०० रुपये मिळून ४०० रुपयांची व्यवस्था केली आहे. या निर्देशात पद्मावती माची व बालेकिल्ला यांचा उल्लेख नाही याचे आश्चर्य वाटते. शिवाय या उपयुक्त दोन माच्यांसाठी सारी ४०० रुपयांची तरतूद केल्याचे पाहून अचंबा वाटतो. तथापि या वेळेस शाहूच्या ताब्यात राजगड नव्यानेच आलेला होता; त्यातून तो बहुधा सचिवांकडे दिलेला असावा; शिवाय या वेळी शाहूपाशी द्रव्यसंचयही नव्हता; यामुळे त्याने राजगडची ही अशी कामचलाऊ व्यवस्था केली असावी (पेद ४५।५।२६).

४३. पेशवाईत हळूहळू किल्ल्याचे महत्त्व कमी होऊ लागले आणि मैदानी लढायांवर भर पडू लागला. तेव्हा अशा लढायांसाठी किंवा एखादा किल्ला घेण्यासाठी निरनिराळ्या गडावरील,


आवश्यकतेपेक्षा अधिक असलेले लोक पाठवून देत असत. अशाप्रकारे विशाळगडाच्या मोहिमेसाठी राजगडाचे लोक शाहूने उंब्रज येथे आपल्यासमोर आणल्याचे सु. ११३१ जवल १५ (श. १६५२ कार्तिक वद्य २ = इ. १७३० नोव्हेबर १५) च्या एका पत्रात नमूद केले आहे (रा. १७।३८).

४४. कोणा बापूजी गणेशाने ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेले एक पत्र आहे. यात जिल्काद १६ एवढाच कालोल्लेख असला तरी आतील मजकुरावरून हे पत्र श. १६५५ वैशाख वद्य २ = इ. १७३३ एप्रिल २० या तारखेचे आहे म्हणून कै. राजवाडे यांनी ठरविले आहे. यात पहिला बाजीराव व फत्तेसिंह भोसले यांनी कोकणात उतरण्याची तयारी केली आहे; प्रतिनिधी जाऊ म्हणतात; पण जाण्याची तयारी दिसत नाही; त्यांना साह्य म्हणून शाहूने राजगडी २००० मावळे त्यांजकडे पाठविल्याचे सांगितले आहे. येथे राजगड ऐवजी रायगड असणे अधिक उचित नाही का ? (रा ३।१०).

४५. पेशवाईत सरकारी नोकरांचे वेतन थकणे ही सामान्यत: नित्याची बाब झाली होती. त्याप्रमाणे राजगडावरील सेवकांचे वेतनही थकले होते. या विषयी राजगडाचा कोणी अधिकारी चिंतोपंत याने विचारणा केली असता सदाशिव चिमणाजी सचिव त्यास लिहितो 'अजून गडाचे गेल्या सालचे देणेच राहिले आहे; तर चालू वर्षांचे कुठून देणार ? या देण्याविषयी अजून ठरावच व्हावयाचा आहे; तो झाला म्हणजे निम्मेशिम्मे देऊ' (रा १२।२८०).

४६. सु. १२०३ मोहरम १४ (श. १७२५ वैशाख शुद्ध १५ = इ. १८०३ मे ६) या दिवशी लिहिलेल्या एका पत्रात दुसऱ्या बाजीरावाने पंत सचिवांचा चाकर राघो नारायण यास आज्ञा केली आहे की, 'आंबवली तर्फे मुठें खोरे' हा गाव फौजेच्या दंग्याने बेचिराख झाला असता त्र्यंबकराव चिंतामण याने तो गाव-त्यास इनाम असल्यामुळे-वस्तीस आणण्याची खटपट केली; पण राघो नारायण हा राजगड, तोरणा, तिकोना व भोर येथून वाटेल तशी पत्रे पाठवून वस्ती होऊ देत नाही; तरी निष्कारण उपद्रव देऊ नये' (रा १२।३५४).

■■■




रायगडची जीवन कथा – आवळसकर शा. वि.

## (ब) रायगड

किल्ल्याची उंची : २९०० मीटर

किल्ल्याचा प्रकार : गिरीदुर्ग

डोंगररांग : पुणे

जिल्हा : रायगड

श्रेणी : सोपी

रायगडाचे इतिहासप्रसिद्ध स्थान माहीत नाही, असा मनुष्य महाराष्ट्रात सापडावयाचा नाही. इंग्रज, पोर्तुगीझ, फ्रेंच या परकीयांस आणि भारतातील सुशिक्षितास रायगडच्या इतिहासाची कल्पना निश्चित आहे; कारण, तो रोमांचकारी व स्फुरण देणारा आहे. एके काळी मुसलमानी सत्तांना रायगडचा विलक्षण दरारा वाटत होता आणि तेथे नांदू लागलेली स्वकीयांची निर्भय, दृढ सत्ता त्यांच्या डोळ्यांत कुसळासारखी सलत होती.[5]

रायगडचे प्राचीन नाव रायरी असे होते व युरोपचे लोक त्यास 'पूर्वेकडील जिब्राल्टर' म्हणून संबोधीत. जिब्राल्टरचे ठाणे जितके अभेद्य, दुर्गम, तितका रायगड अजिंक्य असे स्पष्ट मत इंग्रज ग्रंथकारांनी नमूद करून ठेविले आहे. पाचशे वर्षांपूर्वी रायगडास जेव्हा गडाचे स्वरूप नव्हते व जेव्हा तो नुसता एक डोंगर होता. तेव्हा त्यास तणस व रासिवटा अशी दोन नावे होती. त्याचा आकार, उंची व भोवतालच्या दऱ्या व या सर्वांचे स्वरूप ध्यानी घेऊन त्यास नंदादीप असेही एक नाव पडले, अगदी आरंभी तेथे धडशी कोळी रहात, आज आपण याच कोळी जमातीस डोंगरकोळी म्हणून संबोधितो, निजामशाहीत रायगडचा उपयोग कैदी ठेवण्यापुरताच होई व त्यावर पहारा ठेवण्यासाठी पहारेकरी तेवढे रहात. येथील 'घळकीच्या पहाऱ्या'चा उल्लेख जुन्या कागदपत्रांतून आढळतो.[6]

रायरी हे नाव बदलून त्यास रायगड हे नाव शिवाजी महाराजांनी दिले. हा नामकरणविधी केव्हा झाला असावा, हे आपणास शिवचरित्रप्रदीप पृ. ५० वरून स्पष्ट कळते. 'गडाची नावे ठेविले' अशी नोंद तेथे आढळते. रियासतकारांनी या नोंदीच्या आधारे केवढे काव्यमय भाष्य केले आहे ! ते म्हणतात, ''शिवाजीने पुष्कळशा किल्ल्यांची जुनी नावे बदलून संस्कृत वळणावर नवीन सुंदर नावे ठेवली. रायरी घेतल्यावर शके १५७८ भाद्र. व ।। ११ रोजी (इ.स. १६५६ सप्टें. ४) गडांची नावे ठेविली असा उल्लेख शकावलीत आहे.''यावर आमचे म्हणणे एवढेच की शिवाजीने गडांस नवी, सुंदर नावे दिल्याचा प्रकार खरा असला, तरी तो नंतरचा आहे. इ.स. १६५६ सप्टें. ४ नंतर जिंकलेल्या व बांधलेल्या किल्ल्यात शिवाजीने अगोदरच नवी नावे दिली, असे मानणे योग्य होणार नाही, झुल्फिकार खानाने इ.स. १६८९ त रायगड जिंकल्यानंतर औरंगजेबाने त्यास इस्लामगड असे नवे नाव दिले व ते कागदोपत्री अनेक वर्षे रूढ राहिले.'

प्रथमदर्शनी रायगड अगदी बाजूस असल्यासारखे वाटते, पण रायगडपासून मुंबई, पुणे व सातारा ही शहरे सारख्याच अंतरांवर आहेत. महाडच्या त्यावेळच्या बंदरापासून रायगड केवळ सोळा मैलांवर आहे. अरबी समुद्रापासून रायगड फक्त अठ्ठेचाळीस मैलांवर, सह्याद्रीतील किल्ल्यांच्या रांगांतील एक दुवा आहे. रायगडची भूमी शिवराज्याभिषेकापर्यंत तरी रक्तलांछित नव्हती. सिंहगड, पुरंदर, लोहगड, प्रतापगड, राजगड इत्यादी शिवकालीन किल्ल्यांबद्दल तसे म्हणता येणार नाही. रायगडच्या नैसर्गिक

रचनेमुळे त्याचे वैशिष्ट्य ध्यानी येते. यासाठीच शिवाजीने तो राजधानीसाठी पसंत केला असावा. मोंगलांच्या हल्ल्यापासून आपला बचाव व्हावा, यासाठीच पुणे सोडून पश्चिम डोंगरात रायगड राजधानी केली असावी.

केळदिनुपविजयम् या ऐतिहासिक कानडी काव्यात रायगडचे वर्णन करताना, 'भूतलात आश्चर्यकारक म्हणून गणला जाणारा रायरी' असे वर्णन कवीने केले आहे.' तेथे लिहिले आहे की रायगड १८ आक्षांश, कला १३ व ७३ रेखांश, कला ३० वर आहे; पण कुलाबा गॅझेटियरकार लिहितात की, रायगड उत्तर अक्षांश १८-१४' आणि पूर्व रेखांश ७३-२०' वर असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची २८५१ फूट आहे. तो किल्ले महरुसा उर्फ जंजिरापासून पूर्वेस चाळीस मैलांवर आहे. तुटलेल्या कड्यांमुळे सह्याद्रीच्या रांगांपासून तो अलग झाला असून भोवती सुमारे एक मैल रुंदीची दरी निर्माण झाली आहे. सह्याद्रीच्या रांगांनी, जवळ जवळ सर्व बाजूंनी वेढल्यामुळे आणि झाकल्यामुळे रायगड ठळकपणे आळखता येत नाही. रायगडपासून पश्चिमेस १६ मैलांवर माणगाव हे तालुक्याचे ठिकाण आहे; तेथून रायगडवरची टकमक टोक व हिरकणी बुरुज ही ठिकाणे दिसतात. तेथून रायगडचा आकार घोड्याच्या नालाप्रमाणे वाटतो. दक्षिणेकडून नजर टाकल्यास कलकाईचा व गुहरीचा डोंगर रायगडच्या अगदी सन्निध असल्यासारखे असतात; त्यामुळे रायगडचे स्पष्ट दर्शन त्या बाजूने होत नाही. कलकाईच्या डोंगरावरूनच, इ.स. १८१८ मध्ये तोफा डागून रायगड इंग्रजांनी जेर केला. महाबळेश्वरावरून रायगडचे दर्शन होणे दुर्घट आहे; कारण, तेथून रायगडच्या आसमंतातील सह्याद्रीचा बराच भाग इतका ठळकपणे नजरेसमोर येतो, की त्यातून नेमका रायगड तेवढा ओळखणे जाणत्या माणसासही मुष्किलीचे होते. डग्लसने बुक ऑफ बॉम्बे मध्ये म्हटले आहे की रायगडचे अचूक आणि स्पष्ट दर्शन तोरणा किल्ल्यावरून होते, कारण तोरणा रायगडच्या पूर्वेस वीस मैलांवर असून हजार फुटांनी जास्त उंच असल्यामुळे हे दर्शन सहजसुलभ होते. रायगडापासून केवळ दोनच मैलांवर असलेल्या, सह्याद्रीच्या पश्चिम रांगेतील लिंगाण्याच्या शिखरावरून रायगड चांगला दृष्टिक्षेपांत येतो. तोरण्यावरून रायगडचे उद्ध्वस्त अवशेष दिसत नाहीत पूर्वेस, रायगडचे भवानी टोक दिसते व रायगडचा वायव्येकडील टकमक टोकाचा तुटलेला कडा दिसतो. या टोकावरून गुन्हेगारांचा कडेलोट होई.

येथेच लिंगाचा किल्ल्याचा परिचय करून देणे योग्य होईल. लिंगाच्या आकाराचा हा किल्ला महाडपासून ईशान्येस सोळा मैलांवर असून सह्याद्रीच्या मुख्य रांगेत तोरणा व रायगड यांचे दरम्यान आहे. लिंगाण्याचा खडक समुद्रसपाटीपासून २९६९ फूट उंच असून त्याची चढण चार मैल लांबीची आहे. या चढणीतील अर्धे अंतर चढावयास बरेच सोपे असून वरचा अर्धा मार्ग एकदम उंच, अवघड झाला आहे. पूर्वी या चढावात पायऱ्या होत्या; पण त्या आता नष्ट झाल्या आहेत. लिंगाण्याचा लिंगाकृती भाग पठाराच्या भागापासून म्हणजे माचीपासून वर आहे. त्याला तट व बुरूज होते व या तटबंदीचे आतील क्षेत्रफळ अवघे २५०० चौरस फूट होते. आता तटबंदी व इमारती नष्ट झाल्या असून काही हौद व धान्याच्या कोठारांच्या खुणा तेवढ्या शिल्लक आहेत (कुर्ग पृ. ३४३). मोऱ्यांचा पराभव केल्यावर शिवाजीने रायगडजवळ हा किल्ला बांधला (९१ कलमी बखर कलम ३० सानेप्रत पृ. ६१) त्याचा उपयोग केवळ कैदी ठेवण्यासाठी करीत. खडकांत असलेल्या अंधारी खोल्यांतून हे कैदी ठेवीत. या खोल्यांपैकी एक खोली पन्नास कैदी राहू शकतील एवढी मोठी आहे. इ.स. १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने हा किल्ला मराठ्यांकडून घेतला (कुर्ग पृ. ३४३).

कुलाबा जिल्ह्यात राहणारांना रायगडावर जावयाचे असल्यास अनेक मार्गांनी जाता येईल. (१) निजामपूरपासून रायगड १६ मैलांवर असून वायव्य दिशेने डोंगरातून गेलेल्या पायवाटेने, नागमोडी वळणे घेत, डोंगर चढत-उतरत, रम्य वनश्रीचे सौंदर्य हृदयात आणि नेत्रांत साठवीत जाता येईल, पण हा प्रवास पायी करावा लागेल. (२) माणगावपासून हा प्रवास डोंगरातील पायवाटेने करता येईल. (३) रायगडाच्या पूर्वेस केवळ सोळा मैलांवर बिरवाडी हे शिवपूर्वकालीन गाव असून तेथून ईशान्य दिशेने रायगडावर जाता येते. बिरवाडीपासून बारा मैलपर्यंत बैलगाडीने, अगर जपून गेल्यास मोटारने जाता येते. हा रस्ता काळनदीच्या तीरालगत्याने गेला असून नदी दोन ठिकाणी ओलांडावी लागते. छत्री निजामपूरपर्यंत वाहनाने जाता येते व पुढील चार मैलांचा प्रवास पायी करावा लागतो. या मार्गाने जात असता, डावीकडे गुहरीचा डोंगर व त्याचेच जवळ असलेल्या रायगडाचे आपणास दर्शन घडत असते. वाटेत वाळणकुंड नावाचा काळनदीतील एक डोह लागतो. डोहाची लांबी सुमारे तीनशे फूट असून रुंदी अवधी तीस फूट आहे. डोहात वर्षभर मासे विहरत असतात व कुंड पवित्र स्थान मानलेले असल्यामुळे त्यास कोणी उपद्रव देत नाही. छत्रनिजामपूरपासून वाडी किंवा रायगडवाडी हे ठिकाण दीड मैल अंतरावर आहे. तेथून रायगडाची चढण सुरू होते. येथेच, ९ मे १८१८ या दिवशी घडून आलेल्या शरणागतीच्या तहाने रायगड इंग्रजांच्या ताब्यात गेला. रायगडाचे अठरा कारखाने वाडी येथेच असून मराठेशाहीत या गावास फार महत्त्व होते. मराठ्यांच्या स्वातंत्र्यकालात हा मार्ग विशेष रहदारीचा होता. (४) ज्याला रायगडची नीटशी माहिती नाही, अशा प्रवाशाने महाड येथून मोटारने जाणे सोयीचे आहे. महाड ते रायगड हे अंतर १४ मैलांचे असून गांधारी नदीच्या काठाने कोंझरपर्यंत जाता येते; तेथून पायी प्रवासास सुरवात होते. एक अवघड टप्पा ओलांडून पाचाड येथे पोहोचल्यावर, रायगडच्या प्रत्यक्ष चढावास प्रारंभ होतो.

काणे रायगडच्या अगदी पायथ्याशी असून त्यामधील अंतर फक्त दीड मैलाचे आहे. दोहोंचे दरम्यान डोंगराची निरुंद दरड आहे. कोंझरहून पाचाडास जाऊ लागले म्हणजे सावंताची चौकी म्हणून पाचाडचे एक चौकीचे ठिकाण लागते; त्यांचे फक्त जोते तेवढे शिल्लक आहे. जोत्याची लांबी रुंदी २०x१५ फूट आहे. रायगडच्या डोंगराच्या कडसरीसच पाचाड गाव बसला आहे. पाचाड येथे पूर्वी रायगडची पेठ असून गडास लागणाऱ्या वस्तू येथील दुकानदार पुरवीत. पूर्वी पाचाड येथे दहा हजार घोडेस्वारांची शिबंदी असे (BBD पृ. ४०३). येथे शिवाजीने आपल्या मातुश्री जिजाबाई यांच्याकरिता एक वाडा बांधला होता. वाड्याचे जोते २००x४० फूट लांबी रुंदीचे आहे. त्या वाड्यासच कोट म्हणत. आत हत्ती, घोडे बांधण्याच्या जागांची जोती आहेत. तटाची भिंत ६ फूट जाड असून उंची ८ ते १२ फूट आहे. वाड्याचे जोते व तटबंदी आजही दृष्टीस पडते. चिरेबंद पायऱ्या असलेली एक विहीर आत आहे. इ.स. १७७३ मध्ये नारायणराव पेशव्याने रायगड आपल्या ताब्यात घेतला, त्यावेळी आप्पाजी हरी या पेशव्यांच्या सरदाराने कोट हस्तगत केला व मोडला (शिचसा खं. १० ले. ३८). जिजाबाईचे देहावसान याच वाड्यात झाले व पाचाड येथेच तिचे स्मारक उभारलेले आहे. सध्या रायगडावर जाण्याची मुख्य वाट पाचाड येथूनच आहे. किल्ल्याकडे जाताना शिद्दीच्या कारकिर्दीतील चौक्यांची दोन जोती लागतात.

रायगडावर चढून जाण्याचा मार्ग गेल्या तीस वर्षात काहीसा बदलला आहे. वाडी ते रायगड हे अंतर चार मैलांचे असून तेथून रायगडाची उंची २२५० फूट आहे. वाडी समुद्रसपाटीपासून ६०० फूट उंचावर

आहे. रायगडावर जाण्याची पूर्वीची वाट पाचाडकडून नसून वाडीकडून होती. म्हणजे, पाचाडच्या मनुष्याला खूबलढा बुरुजाजवळची दरड ओलांडून, वाडी गाव डाव्या हातास टाकून रायगडच्या वाटेस मिळावे लागे. वाडीकडून रायगडच्या चढास जेथे प्रारंभ होतो, तेथे रस्ता निरुंद असून बराच अडचणीचा असल्याने पायी जावे लागते. वाडीपासून पाव मैल अंतर चढून आल्यावर रायगडच्या चढास प्रारंभ होतो. या चढात, आरंभीच, जो झाडीचा भाग लागतो, तेथे पूर्वी शिवछत्रपतींचा बाग होता. या रस्त्यालगत वाडी येथील घरांची काही जोती अद्याप दृष्टीस पडतात. झुडुपे वाढल्यामुळे आत दडलेली व भंगलेली ही जोती, गडास पुरविल्या जाणाऱ्या धान्याची कोठारे होत. इ.स. १८८३ पर्यंत या जोत्यांवरील पडकी भिंताडे उभी होती आणि कोठारांच्या सभोवार चार फूट उंचीची भिंत होती.

वाडीकडील या मार्गाने गड चढू लागले, म्हणजे उजव्या बाजूस वायव्य कोपऱ्यात एका बुरुजाचे ठिकाण दिसते; तोच प्रसिद्ध खूबलढा बुरूज होय. सध्याचा पाचाडचा मार्ग या बुरुजापाशी येऊन पोहोचतो व आपण पायऱ्या चढून बुरुजावर जातो. बुरुजाशेजारी पूर्वी एक दरवाजा असे; त्यास चित् दरवाजा म्हणत. हा दरवाजा कोसळला असून बुरूज मात्र अस्तित्वात आहे. त्याची उंची २७ फूट व घेर ५० फूट आहे (राकीव पृष्ठ ३२,३३). खुद्द रायगडपासून हा बुरूज काहीसा विलग झाल्यासारखा दिसतो. हा तुटकपणा डोंगराच्या निरुंद दरडीमुळे आणि बाळसुरे गावाकडील एका खिंडीमुळे आला आहे. ही खिंड व खूबलढा बुरूज यांचे दरम्यान असलेला मार्ग एखाद्या भिंताडावरील वाटेसारखा निरुंद आहे. खूबलढा बुरुजांपासून 'नाना दरवाजा' सुमारे तीन फर्लांग अंतरावर आहे. हा मार्ग एका निरुंद दरडीवरूनच आहे.

रायगडवाडी येथील, वर निर्देश केलेल्या धान्याच्या कोठारांपासून 'नाना दरवाजा' सुमारे एक मैल अंतरावर आहे. या एक मैलात एकूण चढ ६०० फुटांचा असून नाना दरवाजापाशी रायगडची उंची १२०० फूट भरते. स्थानिक लोकांची समजूत अशी आहे की 'नाना दरवाजा' या शब्दांचा संबंध नाना फडणिसांशी असून इ.स. १७९६ मध्ये नानांनी रायगडची डागडुजी, दुरुस्ती केली, तेव्हापासून हे नाव प्रचलित झाले असावे; पण हा गैरसमजुतीचा प्रकार होय. इ.स. १६७४ च्या मे मध्ये शिवराज्याभिषेकाच्या निमित्ताने मुंबईकर इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झेंडन रायगडावर याच वाटेने आला होता. त्याने आपल्या रोजनिशीत रायगडच्या दोन दरवाजांचा उल्लेख केला असून, या दरवाजास त्यावेळी लहान दरवाजा म्हणत, असे त्याने सूचित केले आहे. भाषा बदलते व शब्दांची स्वरूपे बदलतात; त्यास अनुसरून लहाना, नान्हा, नाना अशा क्रमाने या दरवाजाचे नाव बदलत गेले असे मानणे उचित होईल. किल्ल्याच्या मुख्य दरवाजास महादरवाजा असे नाव दिल्यावर दुसऱ्यास लहाना दरवाजा हेच नाव ओघाने प्राप्त व्हावयाचे ! दिले हे विवेचन गॅझेटियरकारांचे आहे. पेशवे दप्तरांतील अप्रसिद्ध कागदांतून या दरवाजाचा उल्लेख जाणे दरवाजा असा आहे; तेव्हा हे विवचेन बरोबर नाही, हे उघडच आहे.

नाणे दरवाजास दोन कमानी आहेत. कमानीतील अंतर दहा फूट असून कमानींची उंची अनुक्रमे बारा व चौदा फूट आहे. या दोन कमानींच्या दरम्यान सतरा पायऱ्या आहेत. दरवाजाच्या दर्शनी भागी एक बुरूज लागतो; त्याची उंची वीस फूट आहे. दरवाजाच्या आतील बाजूस, खडकात, पहारेकऱ्यांसाठी दोन लहान खोल्या तयार केलल्या आहेत. दरवाजास आडसर घालण्यासाठी खोबणी आहेत; पण इ.स. १८८३ पासून दरवाजे नष्ट झाले आहेत. नाणे दरवाजापासून महादरवाजा आणखी एक

हजार फूट उंचावर आहे. महादरवाजाची उंची समुद्रसपाटीपासून २२०० फूट आहे.

दरवाज्यातून आत शिल्यावर, पूर्वेकडे व पश्चिमेकडे नागमोडी वळणे घेत असलेल्या रस्त्याने पाऊण मैल सपाटी तुडवावी लागते. या मोकळ्या जागेत, टोकाशी, दोन पडक्या इमारती आहेत. त्यापैकी एक जागा पहारेकऱ्याची खोली असून दुसरी धान्याचे कोठार आहे. या खोल्याची लांबीरुंदी अनुक्रमे ३९ x २५ ।। व ७५ x २० फूट आहे. या इमारतींपासून थोड्या अंतरावर नाणे दरवाजाचे वर ३०० फुटांवर तोफेचा एक मोर्चा आहे. लेफ्टनंट रेमन याने इ.स. १८१८ मध्ये ज्याचा मसजिद मोर्चा म्हणून उल्लेख केलेला आहे तोच हा असावा. शिवाजीने रायगडावर मुसलमानांसाठी एक मशीद बांधविली होती (NHM I Pages 264-265) ती येथे असावी. येथे मदनशहा नावाच्या एका साधूची कबर आहे. जवळच सुमारे चारशे यार्डांवर सपाट जागी, खडकात खोदलेल्या तीन गुहा असून त्या धान्य साठविण्यास वापरीत असत. त्यांची लांबीरुंदी अनुक्रमे २०x८; १८x८ व ३३x८ फूट असून तिसऱ्या गुहेस दोन दगडी, चौकोनी खांब आहेत. या खोल्यांची उंची आठ ते दहा फूट आहे. येथे रस्ता एकदम उजवीकडे वळतो व एक मोठी चढण लागते. येथून मोठा दरवाजा अर्ध्यामैलावर असून एकूण चढ तीनशे फुटांचा आहे. प्रत्यक्ष मोठ्या दरवाजाशी पोहोचताना एकदम चढ लागतो. दरवाजाशी पोहोचावयास बत्तीस पायऱ्या चढाव्या लागतात. हा अर्ध्या मैलाचा रस्ता प्रवाशास तापादायक होतो; कारण, एकतर, साधले तशा खोदलल्या असल्याने त्या कमी अधिक उंचीच्या आहेत. महादरवाजात शिरण्यापूर्वी किंचित उजवीकडे वळावें लागते.

महादरवाजाला दोन भव्य बुरूज असून एक ७५ फूट व दुसरा ६५ फूट उंच आहे. त्यामध्ये असलेला दरवाजा वायव्य दिशेस आहे. दोन बुरुजांतील अंतर ८।। ते १६।। फूट भरते, महादरवाजापासून हिरकणी टोक ४०० फूट उंचीवर राहते व किल्ल्याचा अत्युच्च भाग ६०० फूट उंचीचा ठरतो. महाद्वाराच्या वायव्येस रायगडास भक्कम तटबंदी आहे. गडास सर्व बाजूंनी तटबंदी नाही. अन्यत्र, वर चढून जाण्यासारख्या जागी मात्र तटबंदी असून, आत बालेकिल्ल्यात सर्व बाजूंनी तटाची भक्कम भिंत आहे. एकूण, गडाची तटबंदी तुटक आहे.

महादरवाजाच्या आत प्रवेश केल्यावर, खडकात खोदलेली पहारेकऱ्याची जागा प्रथम दृष्टोत्पत्तीस येते उजव्या बाजूस संरक्षकांच्या रहाण्याच्या खोल्या आहेत.

किल्ल्यात जाण्याचा हा एकच मार्ग आहे व प्रत्येकास या महाद्वारातूनच आत जावे लागते. दक्षिणेस आणखी एक दरवाजा आहे; त्यास चोर दरवाजा असे म्हणतात. अकस्मात एकादा वहिमी आल्यास, त्याला गाठण्यासाठी या दरवाजाचा उपयोग केला जात असावा. चोर-दरवाजाशी जाण्यास वाट नाही. महादरवाजाने आत गेल्यावर टकमक टोक व हिरकणी बुरूज थोडी उंचावर बाजूस असलेली दिसू लागतात; बालेकिल्लाही दिसू लागतो.[७]

महादरवाजापासून पाऊण मैलाच्या वाटचालीनंतर आपण रायगडच्या अत्युच्च मार्गी येऊन पोहोचतो. आरंभी, प्रसिद्ध मदारशहाची कवर लागते. तिचेच शेजारी एक लोखंडी मल्लखांब दिसतो. 'रायगड किल्ल्याचे वर्णन' या पुस्तकात या कबरीबद्दल संशय प्रकट केला आहे.

शिवाजीने रायगड बांधला, तेव्हा त्याने वर जाण्यास पायऱ्या बांधल्या. हे काम पुरे करण्यास त्यास अनेक वर्षे लागली. काही ठिकाणी खडकास सुरुंग लावून, खडक फोडून त्यात पायऱ्या खोदल्या होत्या. सर्वात वरच्या पायऱ्या अजून शाबूत आहेत; पण बाकीच्या, दोनशे वर्षात नैसर्गिक घडामोडींनी

आणि कर्नल प्रॉरच्या दारुगोळ्याने नष्ट झाल्या (BBD. पृ. ४०४ ते ४०६). आता आवश्यक जागी नव्याने पायऱ्या बसविल्या आहेत.

मदारशहाच्या कबरेजवळ, खडकांत अंडाकृति तळे लागते. ते १२० x ७५ फुटांचे असून त्याचा तळ सर्वत्र सारखा नाही. यासच हत्ती तलाव असे म्हणतात. तेथून सुमारे १०० यार्ड अंतरावर गंगासागर तलाव असून तो १२० x १०० यार्ड आकाराचा आहे. पूर्व आणि पश्चिम बाजूस खडक खोदून आणि पूर्व व दक्षिण बाजूस बांधकाम करून गंगासागर तलाव बनविला आहे. त्याचे पाणी चांगले असून शिवकालात शिबंदीसाठी तेच वापरण्यात येई. शिवाजी व राजकुटुंबातील मंडळींसाठी बालेकिल्ल्यात पाण्याची व्यवस्था स्वतंत्र होती.

गंगासागराच्या दक्षिणेस दोन उंच मनोरे असून त्यांचा वरचा भाग ढासळल्यामुळे ते आता भग्नावस्थेत आहेत. पूर्वी ते पाच मजली होते असे म्हणतात. त्यांच्या बांधकामात नक्षीकाम केलेले आढळते. त्यांचा पाया द्वादश कोनी असून प्रत्येक बाजूस खिडक्या ठेवलेल्या आहेत. हे सर्वच बांधकाम, विशेषत: खिडक्यांची रचना मुसलमानी शिल्पशास्त्रास धरून आहे. या मनोऱ्यात चौदा फूट व्यासाच्या खोल्या असून त्यांना घुमटाकृती छत आहे.

बालेकिल्ल्याची पूर्वपश्चिम लांबी ३०० यार्ड असून दक्षिणोत्तर रुंदी १५० यार्ड आहे. पालखी दरवाजातून आत गेल्यावर तटबंदीच्या पश्चिम बाजूने जाऊ लागल्यास, १५० यार्डाच्या अंतरात दोन्ही बाजूस, कोसळून पडलेल्या इमारतींचे अवशेष आहेत. उजव्या बाजूस सात वाड्यांचे अवशेष लागतात; त्यास शिवाजीच्या राण्यांचे महाल म्हणतात. वाड्यांच्या समोरच संरक्षकांच्या खोल्यांची रांग होती. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेकडील तटबंदीत एक दार होते.

पालखी दरवाजातून आत शिरल्यावर डाव्या बाजूस सिंहासनाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. या वाटेने राजकीय कचेऱ्यांकडे जात असत. पूर्वेकडील तटबंदीत तीस फूट रुंदीची एक जागा आहे; तीत पूर्वी एक दरवाजा असावा. तटबंदीच्या या भिंती अजून उभ्या असून त्यांचे दरम्यान १२०x५० फुटांची मोकळी जागा आहे.

बालेकिल्ल्यात मध्यभागी, गंगासागराच्या पूर्वेस सिंहासनाची जागा आहे. सिंहासनाभोवती बांधीव चौथरा आहे. तो सुस्थितीत असून, सिंहासनाच्या दोन्ही बाजूंच्या इमारतीत पेशवेकालात धान्य साठवीत. कचेरीच्या टोकांच्या दोन खोल्या जामदारखानाच्या जागा होत. या खोल्यांची रुंदी पंधरा फूट आहे. सिंहासनासमोर पाच फूट रुंदीचा एक मोकळा मार्ग ठेविलेला असे.

सिंहासनासमोर, अगर बालेकिल्ल्याच्या पूर्वेकडील तटात बारा कमानदार खिडक्या आहेत; त्यांचे मोजमाप ३ ।। x१ ।। फूट आहे. सिंहासनासमोरच्या मोकळ्या जागेत शिवकालात कारंजे फवारत असे; त्याचे अवशेष अजून शिल्लक आहेत. या कारंजाशेजारी नगारखाना आणि बालेकिल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार आहे. ८

नगारखान्याच्या आतील बाजूस, दक्षिणेकडे, पूर्वी जेथे दरवाजा होता, त्याच्या डावीकडे रंगमहालाची इमारत होती असे म्हणतात.

सिंहासनाचे उत्तरेस, रंगमहालाच्या समोर जे भग्न अवशेष आहेत, तेथे शिवाजी महाराजांचा वाडा होता असे म्हणतात. बालेकिल्ल्यातल्या उरलेल्या सगळ्या अवशेषात्मक इमारती म्हणजे गडावरील कचेऱ्या होत.

पूर्वेकडील तटबंदीत मुख्यप्रवेशद्वाराचे वरच्या बाजूस, सिंहासनाचे अगदी समोर नगारखाना आहे. प्रवेशद्वार बत्तीस फूट उंच व आठ फूट रुंद आहे. नगारखान्याच्या कमानीची उंची जमिनीपासून साठ फूट असून बाजू बारा फूट जाड आहेत. मधून जाणाऱ्या रस्त्याची रुंदी चोवीस फूट आहे. समोरच असलेल्या दरबारच्या जागेची लांबी १५० फूट व रुंदी ७० फूट आहे. ही जागा सदैव मोकळी असे. या मोकळ्या जागेत एक विहीर होती व ती दगडमातीने बुजविली आहे (BBD. पृ. ४१०). एकोणतीस पायऱ्यांच्या जिन्याने नगारखान्यात जाता येते. नगारखान्याची एकूण उंची पन्नास फूट असून रुंदी तीस फूट आहे.

किल्ल्यावरील मनोऱ्यांचे व नगारखान्यांचे शिल्प सारासीन पद्धतीचे असल्यामुळे, मि. केनेडी यास वाटते की त्या इमारती शिवपूर्वकालीन असाव्यात किंवा हेही शक्य आहे की शिवाजीनेच त्या इमारती मुसलमान शिल्पकाराकडून घडविल्या असाव्यात. डग्लसने आपल्या बुक ऑफ बाँबे मध्ये हाच अभिप्राय व्यक्त केला आहे. तो म्हणतो की रायगडवरील, मुख्यत: नगारखान्याचे शिल्प कायरो अगर दमांस्कस येथील शिल्पाचे स्मरण करून देते (पृ. ४०९).

नगारखान्याच्या पूर्वेस थोड्या अंतरावर एक कोरडा तलाव आहे; त्याचे नाव कुशावर्त, येथून जवळच श्रीगोंदे टोक आहे. कुशावर्त व श्रीगोंदे टोक यांच्या दरम्यानच्या जागेत शिवाजी महाराजांच्या प्रधानांचे वाडे होते. शिवोत्तर कालांत पोतनिसांचा वाडा याच भागात होता. या टोकांच्या पूर्वेस, थोडे खालच्या पातळीवर, भग्न इमारतीचे एक ठिकाण दिसते; हे ठिकाण दारूखान्याचे कोठार होय. त्याची लांबी नव्वद फूट, रुंदी वीस फूट व त्याच्या भिंती साडेतीन फूट जाडीच्या होत्या. इ.स. १८१८ मध्ये कलकाईच्या टेकडीवरून, इंग्रज गोलंदाजांनी या कोठारावर गोळे टाकले; त्यायोगे हा दारूखाना उद्ध्वस्त झाला. जवळच खडकांत खोदलेली बारा टाकी आहेत; त्यात नेहमी पाणी असते.

बालेकिल्ल्याच्या वायव्यभागी, पीलखान्याची इमारत आहे. उत्तरेस गडावरील बाजारपेठेचे अवशेष जोत्याच्या रूपाने शिल्लक आहेत. पेठेच्या दोन रांगांत मिळून चव्वेचाळीस दुकाने होती. मधून चाळीस फूट रुंदीचा रस्ता आहे. बाजारपेठेच्या खालच्या बाजूस, पूर्वेकडील उतारावर ब्राह्मणवस्ती, ब्राह्मणतळे व एका मनोऱ्याचे भग्न अवशेष आहेत. तेथून ईशान्येस एक तटबंदीची जागा असून आत महादेवाचे मंदिर आहे. त्याच्या पश्चिमभागी प्रवेशद्वादारापाशी, तीन फूट उंचीची, दीड फूट रुंदीची, उत्कृष्ट खोदकाम केलेली मारुतीची पाषाणमूर्ती आहे. महादेवाच्या मंदिराभोवती नृत्यांगनांच्या रहाण्याच्या जागा असून, जवळच खोदलेले एक तळे आहे. महादेवाच्या मंदिराच्या पूर्वदरवाजापासून थोड्या अंतरावर एक अष्टकोनी चौथरा असून तेथे शिवछत्रपतींचे दहन झाले. आता त्यावर घुमटाकृती स्मारक उभारले आहे. या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतीवर पुढील शिलालेख आहे–

**प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया**
**श्रीमच्छत्रपते: शिवस्य नृपते: सिंहासने तिष्ठत: ।**
**शाके षण्णवबाणभूमिगणनादानन्दसंवत्सरे**
**ज्योतीराजमुहूर्तकीर्तिमहिते शुक्लेशसापें तिथौ ।।१ ।।**
**वापीकूपतडागराजिरुचिरं रम्यं वनं बीतिकौ**
**स्तम्मे: कुम्भिगृहे नरेन्द्रसदनैरभ्रंलिहे मीहिते ।**
**श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीराजिना निर्मितो**
**यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंमते ।।२ ।।** (सभासद परिशिष्ट १ पृ. ८५)

येथे पायरीत हिरोजी इंदलकराचे. नावाचा दुसरा एक लेख आहे. इमारतींच्या खात्यावरील हिरोजी 'इंदलकर' तो हाच असावा.

दहनभूमीपलीकडे भग्न इमारतींच्या अवशेषांची एक रांग आहे; ते शिबंदीचे निवासस्थान असावे. हे अवशेष बालेकिल्ल्यापासून सुमारे एक मैल अंतरावर आहेत. त्यांचे पलीकडे, सदर वस्तीपासून विलग असे एक घर होते. इ.स. १६७४ मध्ये इंग्रज वकील ऑक्झेंडन यास रहावयास दिलेले घर तेच असावे.

या अवशेषांच्या पूर्वेस माथ्यावरील भागाच्या टोकास, कालाकुंड नावाचे एक कुंड आहे.

रायगडचा माथा पूर्वपश्चिम दीड मैल लांबीचा असून त्यांची उत्तरदक्षिण रुंदी सुमारे एक मैल असावी. माथ्यावरचा आकार वेडावाकडा आहे. हिरकणी टोक माथ्याच्या पश्चिमेस असून टकमक उत्तरेस, भवानी टोक पूर्वेस आणि श्रीगोंदे टोक आग्नेस आहे. किल्ल्यास ही चारच टोके आहेत. हिरकणी टोक बालेकिल्ल्यापासून दोनशे फूट खाली आहे. त्यास बुरूज व तटबंदी आहे.

दंतकथा अशी की हिरकणी नावाची एक गवळण गडावर दूध विकण्यासाठी आली असता, रात्र झाल्यामुळे महादरवाजा बंद झाला. आपल्या तान्ह्या मुलासाठी तिला वाडी येथे घरी जाणे तर आवश्यक होते आणि दरवाजा उघडला जाऊन वाट मिळणे तर शक्यच नव्हते ! अपत्यप्रेमाच्या ओढीने ती या टोकावरून खाली उतरली. दुसऱ्या दिवशी शिवाजीमहाराजांस ही हकिकत समजताच त्यांनी तिला बोलावून आणले व स्वत: याबद्दल चौकशी केली. ती जागा दुर्गम करणे जरूर, हे जाणून त्यांनी तेथे तटबंदी करविली. हिरकणीची हकिकत ही सत्यकथा की दंतकथा, हे ठरविण्यास कागदोपत्री पुरावा नाही; म्हणून इतिहासलेखकास या कथेबद्दल मुग्ध रहावे लागत.

टकमक टोकाबद्दल अशीच दंतकथा आहे. एकदा शिवाजी महाराज काही निमित्ताने दुपारचे वेळी टकमक टोकापाशी उभे होते. उन्हाची वेळ, म्हणून त्यांच्या मस्तकावर एका नोकराने छत्र धरले. वारा सुटला आणि शिडात भरावा तसा छत्रीत भरला. नोकराचे पाय जमिनीपासून सुटले आणि तो टकमक टोकावरून बाजूस झाला ! पण उघडी छत्री हातातून न सोडल्यामुळे, वारा कमी होताच, काही क्षणांनी तो जमिनीवर टेकला. ज्या जागी तो जमिनीवर सुखरूप उतरला, तेथे जे गाव बसले त्यास छत्रीनिजमापूर असे नाव प्राप्त झाले.

रायगडच्या माथ्यावर झाडी नाही; कारण तेथील जमीन खडक आणि मुरूम यांची बनली आहे, पण बालेकिल्ल्याच्या पूर्व उतरणीवर थोडी झाडे वाढली असून तीतून इमारतीचे अर्धावृत भग्न अवशेष दिसतात. माथ्यावरच्या या भागात काही बांधीव हौद असून त्यात काही महिने पाणी असते. पश्चिम, दक्षिण व पूर्वभाग तुटलेल्या कड्यांसारखे असल्याने त्या बाजूस रायगडास तटबंदी नाही.'

■ ■ ■

## रायगडचा पूर्वेतिहास

इसवी सनाच्या १२ व्या शतकात रायरी उर्फ रायगिरी एका मराठे पाळेगराचे निवासस्थान होते. कोकणच्या प्रदेशात सत्ता कोणाचीही असली, तरी ती नाममात्र होती व राजधानीपासून दूर असल्यामुळे, या प्रदेशात राजसत्तेचा फायदा अगर तोटा कधी जाणवत नसे. ठिकठिकाणी दाट झाडी, त्या झाडीत खेडी, असे वस्तीचे स्वरूप होते. १४ व्या शतकात रायरीच्या मराठा पाळेगाराने अनागोंदी उर्फ विजयनगरच्या सम्राटाचे स्वामित्व पत्करले. इ.स. १४३६ मध्ये अल्लाउद्दीन शाह. बहमनी २रा याने रायरीवरील अधिकाऱ्यास आपले स्वामित्व मान्य करावयास लाविले. बहमनींची ही सत्ता इ.स. १४७९ पर्यंत टिकली. नंतर अहमदनगरच्या निजामशहाने रायरी आपल्या ताब्यात घेतला (कुर्ग पृ. २६३).

निजामशाहीच्या अमलात जावळी सुभा होता. त्यात परगणे महाड, तपे बिरवाडी, तपे तुडिल, तपे नाते, तपे बिन्हेरे हा रायरीच्या आसपासचा भाग, रायरीचा किल्ला व मावळातील कानदखोरे मोडत होते (पेद ४५ पृ.२). इ.स. १६१७ मध्ये मामले रायरीचा हवालदार आगा हाजी याकुद इस्तंबोली नावाचा निजामशाही अधिकारी होता. इ.स. १६१८ मध्ये आदिलशहाचे वतीने हैबतखानाने मामले रायरीवर हल्ला केला, लूट केली व सबंध कानदखोरे काबीज केले (राख, १६. ले. ६,७). याचा स्पष्ट अर्थ की निजामशहा व आदिलशहा या दोघांत यावेळी जावळी सुभ्यावरील अधिसत्तेबद्दल चुरस उत्पन्न झाली होती. युद्धानंतर आदिलशहाने मामले रायरीस कौल दिला व तेथील हवालदारी राजे पतंगराव यास दिली (पेद. ३१ ले. ८) हवालदारांच्या म्हणजे प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या बदल्या होत. इ.स. १६२१ मध्ये राजे पतंगराव याची बदली होऊन मलिक जमरूत रायगडचा हवालदार झाला (पसासं. २३९६).

पण इ.स. १६२४ मध्ये रायरी व बारा मावळांचा हवालदार म्हणून इब्राहीमखान नावाचा निजामशाही अधिकारी कारभार करीत असलेला दिसतो ! (पसासं. २०७, २१६). इ.स. १६२८ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये निजामशाही सेनेने दाभोळ काबीज करून आदिलशहाचा पराभव करण्याचा चंग बांधला. तळकोकणचा हवालदार हबसखान याने मावळच्या कान्होजी जेधे व खोपडे या जमीनदारास व सरदारास लिहिले की, आम्ही दाभोळच्या मसलतीसाठी जात आहोत; महाडास येऊन थांबतो; तुम्ही आम्हास येऊन सामील व्हा. त्याप्रमाणे कान्होजी जेधे व खोपडे महाडात येऊन दाभोळकडे गेल्याची पत्रे आहेत (पसासं. २६५; शिचसाखं. २ले. २२८ पृ. २२५). सारांश, या वर्षी मावळ व दाभोळपर्यंतचे कोकण निजामशहाच्या ताब्यात होते.

पण इ.स. १६३६ मध्ये बादशहा शहाजहान याने अकबराचे अपुरे काम पूर्ण करण्याच्या हेतूने निजामशाहीवर स्वारी केली आणि सबंध राज्य जिंकून घेतले. मोगली राजधानीपासून दूर असलेला हा प्रांत आपल्या ताब्यात ठेवणे अवघड, असे जाणून बादशहाने इ.स. १६३६ मे ६ या दिवशी आदिलशहाबरोबर तह केला. त्यात ठरले की मामले रायरी व निजामशहाचे कोकण विजापूरच्या आदिलशहास द्यावे व त्याबद्दल आदिलशहाने वीस लक्ष होन किंवा ऐशी लक्ष रुपये शहाजहानास द्यावेत. या तहामुळे रायगडवर आदिलशहाची सत्ता सुरू झाली (पसासं ४०७).

कोकण प्रांत विजापूरकरांच्या ताब्यात गेल्यामुळे जंजिरा किल्ल्याचा धनीपणा विजापूरकरास प्राप्त झाला व शिद्दी त्यांचा एक सरदार झाला. आदिलशहाने शिद्दी अंबर यास वजीर म्हणून किताब देऊन गौरविल्यामुळे त्याच्या मनात नवीन धन्याबद्दल निष्ठा उत्पन्न झाली.

इ.स. १६३६ ते १६४४ च्या दरम्यान शेख इब्राहीम, सय्यद कबीर लष्करी व शेख अली असे तिघे

रायगडाच्या हवालदारीचे काम करून गेले. त्यापैकी शेख इब्राहीम व सय्यद कबीर लष्करी यांनी बदअमल केल्यामुळे ते मारले गेले. १६४४ रहीमखान हवालदार झाला; पण त्याच्या वाईट वागणुकीबद्दल आदिलशहाकडे तक्रारी होऊ लागल्या. चंद्रराव मोऱ्याने जाखो रुद्र या आपल्या जासुदास शहाकडे पाठवून अनेक तक्रारी गुदरल्या. त्यामुळे त्याची हवालदारी काढून शहाने पुन्हा शेख अलीस हवालदार नेमिले. रायगडाच्या पायथ्याचे गावची प्रजा असंतुष्ट झाली होती; संचणी होईना. इ.स. १६४५-४६ मध्ये फतहमुल्क हवालदार झाला (शिचसा खं. १० ले. २ व ७; फासा खं. १ ले. ३१, ३२ पसासं २४९९, २५०५). सारांश, रायगड व आसमंत आदिलशहाच्या ताब्यात असला, तरी तेथे सुव्यवस्था नांदू शकत नव्हती. ही परिस्थिती शिवाजीच्या फायद्याची ठरणारी होती. प्रत्येक तप्यांत म्हणजे तालुकेवजा विभागात पाटील हेच वसुली करणारे सरकारी अधिकारी होते. रायगडच्या बेगमीस नेमून दिलेल्या गावच्या पाटलांनी गडाच्या हवालदाराच्या आशेत राहून आपले काम करावयाचे, अशी कारभाराची पद्धती होती. शिवाय प्रत्येक गावचा कोणीतरी खोत असे व त्याचे काही अधिकार असत. सदर अधिकारांची व्याप्ती मोठी असावी. रायगडच्या परिसरात दाट अरण्ये होती; तेथे रयत पारध करी. या पारधीतही खोताचा हक्क लाझिमा असे (शिचसा खं. १० ले, ८).

वर सांगितलेल्या सर्व हवालदारांची बदली प्रत्यक्ष विजापूर दरबाराकडून झाली; त्यावरून असे दिसते की रायगड किल्ल्यावर आदिलशहाचे प्रत्यक्ष नियंत्रण होते.

शिवाजी आणि जावळीकर 'चंद्रराव' मोरे यांचा प्रथम संबंध इ.स. १६४८ मध्ये आला. या वर्षीच मोऱ्यांतील प्रमुख दौलतराव मोरे निपुत्रिक मरण पावला. शिवाजीच्या सल्ल्यावरून त्याच्या बायकोने 'यशवंतराव' नावाचा मुलगा दत्तक घेतला आणि हणमंतराव मोरे याच्या मदतीने विस्तृत जागिरीचा कारभार चालविला. याच वेळी अफझलखान वाईच्या सुभेदारीवर येऊन जावळीची जहागीर आपल्या ताब्यात घेण्याचा विचार करीत होता, पण शिवाजीच्या सान्निध्यामुळे त्याचे उद्दिष्ट साध्य झाले नाही. जावळीचा प्रदेश दुर्गम होता. हणमंतराव व 'चंद्रराव' मोरे ही माणसे कर्तबगार होती व शिवाजी त्यांच्या पाठीशी होता (शिचनि; इ.सं.). इ.स. १६५४ मध्ये अफझलखानाची वाईहून कनकगिरीस सुभेदार म्हणून बदली झाली. अफझलखान जाताच मोरे व शिवाजी यात संघर्ष निर्माण झाला.

दौलतराव मोरे आपल्या प्रदेशात व अन्यत्र कसा दटाईने वागत असे, है सांगणारा मजकूर उपलब्ध आहे. रामोजी वाडकर व चंद्रराव मोरे यांचे बिनसल्यामुळे त्यास चंद्ररावाने चिखली येथे ठार केले. त्याचा मुलगा लुमाजी याचाही एका लढाईत मृत्यू होण्यास मोरेच कारणीभूत झाले होते (राखं २० ले. २८८; पसासं ७०७). रायगडपासून सुमारे सोळा मैलांवर असलेल्या बिरवाडीच्या माल पाटलांचे व दौलतराव मोऱ्यांचे वैमनस्य उत्पन्न झाले. मोरे बलवान; पाटील बिचारा दुबळा ! त्यामुळे पाटलाच्या प्रदेशातील पाटलाचे वतनी उत्पन्न मोरे खात होते, पण पाटील प्रतिकार करू शकत नव्हता. उलट, रायरीच्या हवालदारास निमूटपणे वसूल देणे व संचणी करणे, हे वतनदार पाटलास सरकारी सनदी नोकर म्हणून करणे भाग होते. पाटलाच्या उत्पन्नाचा प्रदेश दौलतराव मोऱ्याने कांगोरी किल्ल्याच्या तैनातास कायमचा लाऊन दिल्याने तर, त्या अन्यायावर कळस चढला ! यामुळे मोऱ्यांचे पारिपत्य हा प्रकार बिरवाडी टप्प्यांतील पाटलास वरदानासारखा वाटला. शिवाजी व मोरे यांच्या प्रकरणी वतनदारांची मदत मोऱ्यांस का मिळू शकली नाही. याचा अजमास या उदाहरणाने आपणास करता येतो. उलट, शिवाजीचे सामर्थ्य व न्यायीपण लक्षात घेऊन माळ पाटलाने आपली तक्रार शिवाजीकडे गुदरली व शिवाजीनेही त्याचे वतन

त्यास परत दिले; पण अट घातली की त्याने, प्रसंगी, दहा माणसांसह शिवाजीची चाकरी करावी! (पसासं. ६१५; सं. ३ पृ: १६७). आदिलशाही मुलुखांतील माणसांस अनुकूल करून आपल्या उद्योगी आणण्याचा प्रकार शिवाजीने कसा केला असेल, याची कल्पना आपणास अशा उदाहरणांवरून होते. मोऱ्यांवरील मोहीम सुरू करण्यापूर्वी शिवाजीने गोळे नावाच्या मातबर घराण्यातील कर्तबगार माणसास कौल दिला व त्यास मोऱ्यांपासून वेगळे केले. गोळ्यांचे मुख्य ठिक़ाण गोळगणी हे असून, त्यास अनुकूल करून घेतल्यावर शिवाजी रायगडच्या रोखाने निघाला (शिचसा. खं. १० ले. ४१).[१]

शिवाजीने जावळी घेतल्याचे प्रकरणाची तपशीलवार हकिकत आपणास शिवचरित्रप्रदीपमध्ये वाचावयास मिळते. मावळातील ज्या देशमुखास शिवाजीने आपणाकडे वळवून घेतले होते. त्यात कान्होजी जेधे, हैबतराव सिलीमकर व बांदल प्रमुख होते. त्यांनी व शिवाजीचा सरदार संभाजी कावजी यांनी मोऱ्यांचे मुख्य ठिकाण जे जावळी, त्यावर प्रथम हल्ला केला; पण त्यात त्यांना अपयश आले (NHMI पृ. ११२). मग पुण्याहून शिवाजीने दुसरे सैन्य धाडले, जोर येथे हणमंतराव मोरे याजबरोबर एक लढाई झाली; तीत हणमंतराव मोरे पडला व जोरचे ठिकाण शिवाजीच्या ताब्यात आले. जांभळी हे मोऱ्यांचे दुसरे ठिकाण जेध्यांनी काबीज केले. मोऱ्यांचे जावळी हे ठिकाण शके १५७७ मन्मथ नाम संवत्सर, पौष १४ रोजी शिवाजीच्या हाती आले (३१ डिसें. १६५५) अशी हकिकत जेथे करीन्यात आली आहे' (पृ. ४२). जेधे शकावलीत हाच मजकूर संक्षेपाने दिला असून तीत सिलीमकरांचा उल्लेख आला आहे. या मोहिमेतील शिवाजीच्या हस्तकांचा अधिक उल्लेख राखं. १७ ले. ९ वर पहावा. इतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेल्या मोऱ्यांच्या बखरीत या प्रसंगाची थोडक्यात हकिकत दिली आहे. 'जावळी अवघड वाट, जाळ्या कळकीच्या दाट, तेथे एक महिना झुंज जाहले.' (पृ. २७). 'चंद्रराव मारून शिवाजीने जावली घेतली, कृष्णाजी बाबाजी सुभेदार नेमला. विसो राम यास मजमू दिल्ही.' (पसासं. २६६७; साले. ७१७). मोऱ्यांचा प्रमुख यशवंतराव जावळीहून पळून रायगडावर जाऊन राहिला. प्रतापराव मोरे विजापुरास पळाला. त्याने शिवाजीस जावळीतून हुसकवण्यासाठी आदिलशहाची मदत मागितली (NHMI पृ. ११२).

रायगडच्या माथ्यावरून यशवंतराव मोऱ्यांनी शिवाजीस उपद्रव देण्यास सुरुवात केली. तेव्हा शिवाजीने प्रथम हैबतराव सिलीमकर यास सैन्यासह रवाना केले. मग ३० मार्च १६५६ रोजी शिवाजीने जावळीहून प्रयाण केले. शिवाजी ६ एप्रिल रोजी रायरीस आला (शिचप्र पृ. ५०) व रायरास वेढा पडला. जेधे व मावळचे देशमुख यांचा जमाव शिवाजीबरोबर होता; त्याची चांगली मदत झाली. एप्रिल महिना तसाच गेला. मग निरुपाय होऊन यशवंतरावाने गुंजणमावळचा देशमुख हैबतराव सिलीमकर याचे मध्यस्थीने बोलणे लाविले व गडाखाली येऊन शिवाजीची भेट घेतली. रायगड शिवाजीच्या हाती पडला. हैबतरावाची कामगिरी लक्षात घेऊन शिवाजीने त्याला गुंजणमावळात वतनदारी व शिक्कामोर्तब दिला. (शिचप्र पृ. ४२ व १८).

रायगड मे महिन्यात शिवाजीच्या हाती आला, ही गोष्ट संशयातीत आहे. मोरेबखरीत म्हटले आहे, 'रायगड तीन महिने चंद्ररायांही भांडविला. मग सल्ला जाहला. शिवाजी राजे यांसी सर जाहला' (२७; शिचप्र. पृ. ५५). बखरकाराने सांगितलेली रायगड तीन महिने झुंजल्याची मुदत ध्यानी घेता, मे महिन्यात रायगड पडला, या विधानास बळकटी वाटते. १५ जाने. १६५६ रोजी जावळी शिवाजीच्या हाती आली.२ दोन महिने व्यवस्थेत गेले; म्हणजे मार्चमध्ये रायगडच्या मोहिमेस आरंभ झाला, असे मानणे

योग्य होईल. पावसाळ्यापर्यंत रायगडची मोहीम लांबणे शिवाजीच्या फायद्याचे नव्हते; कारण पावसाळ्यात रायगडचा वेढा चालू ठेवणे शक्य नव्हते.

जावळीचा प्रदेश शिवाजीने का घेतला, याचा विचार करणे अगत्याचे होईल. राजस्थापना व विस्तार करताना संस्थापकास भूरचनेचा विचार अवश्य करावा लागतो. आपले मूळ राज्य व जिंकलेला प्रदेश ताब्यात ठेवण्याच्या दृष्टीने घाट व खिंडी यातील मार्गावर आपली पूर्ण सत्ता प्रस्थापित करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. रसद मिळविण्याचे मार्ग, योग्य ठिकाणी सैन्याची हालचाल करण्यास स्वाधीनच्या सोयी, या दृष्टीने घाट, खिंडी व चौक्या आपल्या ताब्यात आणणे, ही महत्त्वाची बाब प्रत्येक सेनापतीस सिद्ध ठेवावी लागते. रायगड काबीज करण्याची बाब नंतरची; अगोदर मार्ग ताब्यात आणणे हे शिवाजीचे कर्तव्यच होते. यावेळी शिवाजीने (१) मौजे केवनाळे व किनेसर या गावातून पारघाटास गायमुखाचे वर मिळणारा घाट, (२) मौजे क्षेत्रपाळ व कुमटें यांचे दरम्यानचा एक कोस लांबीचा घाट व काळधांडीचा मार्ग, (३) काडेनळीचा घाट व मार्ग (४) मौजे ढवळे व जोर यामध्ये असलेला अडीच कोस लांबीचा ढवळा घाट, (५) सापळखिंड (६) मौजे कर्जेपाशी असलेला घाटमार्ग (७) हातलोटचा घाट (८) पारघाट – इतके घाट आपल्या ताब्यात आणले. या प्रत्येक घाटातून बैलांच्या लमाणांवरून व्यापार चाले. तेथील जकातीची नाकी मोऱ्यांच्या देखरेखीखाली असत व त्यावर मोऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अवलंबून होते. या उत्पन्नांतून मोऱ्यांची संपत्ती, लष्करी सामर्थ्य व एकूण बडेजाव निर्माण झाला होता. त्यातील जकातीचे दर ठरलेले होते व ती दरिद्री प्रदेशांतील मोऱ्यांच्या सत्तेची वाहती आर्थिक गंगा होती. हे घाट ताब्यात येण्यात शिवाजीचा, वस्तुतः विजापूरकरांवर फार मोठा लष्करी विजय होता (शिचसा खं. १० ले. ३८; सा. ५ ले. ७११; पसासं २५९९).[१०]

आदिलशाह आजारी पडला आहे, अशी संधी पाहूनच शिवाजीने हे प्रकरण उरकून टाकले. ‘मुहम्मदशाह आजारी असल्याचे पाहून शिवाजीने तळकोकणच्या मुलुखावर लुटीचा झाडू मारून त्या प्रदेशातील किल्ल्यांपैकी राहीर नावाचा किल्ला कब्जात आणला’ (शिचवृसं खं. २ रा, पृ. ३५). इ.स. १६५६ मेच्या आरंभी कल्याण भिवंडीपासून चौल ते रायरीपर्यंतचा मुलूख शिवाजीच्या ताब्यात आला. (पेद ३१ ले. २४, २४ अ; पसासं. २६१०, २६११).

रायगड अति उंच व चढण्यास कठीण; वर्षांतून पाच महिने तेथे मुसळधार पाऊस पडतो. तो ताब्यात घेतल्यावर आपल्या विशिष्ठ दृष्टिकोनातून तो बांधण्यास शिवाजीने प्रारंभ केला. मोरेप्रकरणात गुंतला असता, त्या सुमारासच कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद खजिना घेऊन विजापूरकडे निघाल्याची बातमी शिवाजीस समजली. त्याने तो खजिना लुटून रायगडावर नेला, रायगडच्या बांधकामास तो उपयोगी पडला. उंच उंच दरवाजे, तट व बुरूज तयार झाल्यावर, तोफा वर नेल्यावर व जागा सुरक्षित केल्यावर, त्याने एका मार्गाशिवाय बाकीचे सर्व मार्ग कायमचे बंद केले. एके दिवशी त्याने लोकांस जमविले व सोन्याने भरलेली एक पिशवी व शंभर होनांचे कडे पुढे ठेऊन जाहीर केले की शिडी किंवा दोर यांच्या साहाय्याशिवाय व ठेवलेल्या मार्गाखेरीज किल्ल्यावर चढून जो कोणी निशाण लावील, त्यास बक्षीस मिळेल. एका अस्पृश्याने गड चढून व निशाण लाऊन राजांपुढे येऊन रामराम केला. राजाने त्यास बक्षीस दिले व तो चढून आल्याचा मार्ग कायमचा बंद करून टाकिला (शशि. पृ. २३८; NHM I पृ. ११५; शिचवृसं ३ पृ. ८५, ८६; ईलिडॉ. भाग ७ पृ. २८८).

रायगडप्रकरणी बखरकाराने म्हटले आहे, ‘‘मिळाले बारभाई, बुडाली चंदरराई।’’

■ ■ ■

## टीपा स्पष्टीकरण (प्रकरण–६)

१ स्वराज्यातील तीन दुर्ग खरे ग.ह. पृष्ठ क्र.१६

२ स्वराज्यातील तीन दुर्ग खरे ग.ह. पृष्ठ क्र.१६

३ स्वराज्यातील तीन दुर्ग खरे ग.ह. पृष्ठ क्र.२०

४ स्वराज्यातील तीन दुर्ग खरे ग.ह. पृष्ठ क्र.२६

५ रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.१

६ रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.१

७ रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.८

८ रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.९

९ रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.१७

१० रायगडची जीवनकथा आवळसकर शा.वि. म.रा.सं.मं. मुंबई १९६२ पृष्ठ क्र.१९

# प्रकरण ७


| | |
|---|---|
| निष्कर्ष | १८३–१८५ |
| (अ) संदर्भ ग्रंथ सूची | १८६–१८७ |
| (ब) दुय्यम साधने | १८७–१८७ |

# ७.१ निष्कर्ष

''महाराष्ट्रातील गडकोट दुर्ग प्रयोजन आणि व्यवस्थापन'' या विषयावर संशोधन करीत असताना शिवकाळात प्रशासकीय व लष्करी केंद्र याचा विचार करता यास निश्चित रूपाने विशेष महत्त्व होते.

वरील विषयाचा अभ्यास करताना पुरातात्विक सर्वेक्षण, शब्द रेखांकने छायाचित्रे याच्या साहाय्याने शोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

अस्सल साधनांद्वारे संशोधनात्मक लेखन केले आहे. महाराष्ट्रातील गड कोट दुर्ग हे संरक्षणाचा विचार करता उत्तम साधन मानले जात होते. प्रामुख्याने शिवाजीने संरक्षणाचा विचार करून गडकोटाचे महत्त्व ओळखून वेळोवेळी किल्ल्यांची डागडुजी करण्यावर विशेष भर दिला होता. काही गड नव्याने वसवले होते. जरूर पडेल तशी किल्ल्यांवर बांधकामेही केली जात होती.

ऐतिहासिक साधनांमध्ये अस्सल साधने व दुय्यम साधने यांचा वापर प्रबंधलेखनाकरता केला आहे. किल्ल्यांच्या संदर्भात आजवर केलेल्या अभ्यासाचा उल्लेख केला आहे.

महाराष्ट्रातील गड कोट दुर्ग यास शिवकाळाचा विचार करता विशेष महत्त्व आहे.

राजकिय संक्रमणामुळे निर्माण झालेली विविध स्थित्यंतरे या किल्ल्यांनी पाहिलेली आहेत.

शिवकाळाच्या दृष्टिकोनातून या गड कोट व दुर्गाकडे बघताना लष्करी स्वरूप व लष्करी संबंध त्याबरोबरच गडांची रचना व बांधणी याचा विचार करावा लागतो. त्यात गडावरील संबंधित अधिकारी, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, त्यांचे कार्य आणि गडाचा कारभार पाहण्यासाठी बांधलेल्या कचेऱ्या व कारखाने यांचा अंतर्भाव होतो. शिवाजी महाराजांनी येथील व्यवस्थेचा बारकाईने विचार केलेला होता. त्यांनी स्वराज्याला आवश्यक असणारी शासनव्यवस्था निर्माण केली होती आणि शिवकाळातील गडांवरून त्यावेळी फार मोठे शासकीय व्यवहार सुरू होते. यासाठी महाराजांनी एका विशिष्ठ पध्दतीने एक गड आणि त्याच्या आजूबाजूचा परिसर (गडाचा घेरा) हा तेथील शासकीय व लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यात दिलेला होता.

शिवाजीमहाराजांनी स्वराज्यरक्षणात गडांना महत्त्व दिले आणि तेथील व्यवस्था निर्दोष ठेवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गडावर नेमलेली निरनिराळ्या दर्जाची माणसे व गडोपयोगी सामान यांची पारख खुद्द महाराजांकडून व्हायची. एक गड, पण त्याला जबाबदार अनेक या नियमामुळे गडावरचा लष्करी विभाग कधी जायबंदी झाला आहे असे शिवकाळात कुठे आढळून येत नाही. त्यांनी गडाच्या व्यवस्थेचे दोन प्रमुख विभाग केले. पहिला म्हणजे गडावर नेमलेली माणसे आणि दुसरा म्हणजे गडासाठी लागणारी साधनसामुग्री. त्यात अव्यवस्था व गोंधळ यांना कधीच वाव दिला नाही.

शिवकाळात गडाच्या संरक्षणव्यवस्थेत तीन भाग होते. १) अधिकारी वर्ग २) सैन्य ३) इतर अधिकाऱ्यांमध्ये मुख्य व त्याच्या कार्याशी संबंधित असलेले त्याचे सहकारी याचा अंतर्भाव होत असे.[१]

शिवकालीन दुर्गावरचा सर्वोच्च अधिकारी म्हणजे हवालदार. रघुनाथ पंडिताने लिहिलेल्या 'राजव्यवहार कोशात' याला 'मुद्राधारी' म्हणून संबोधले आहे.

सर्वसाधारणपणे याला किल्लेदार म्हणण्याची पध्दत आहे. हवालदार पद मुलकी कारभारात देखील येत असे. सुभेदाराच्या हाताखाली राहून कारभार पाहणारा परगण्याचा मुख्य अधिकारी तो हवालदार.

शिवकाळात गडाचा हवालदार जणू गडाचा राजा. हुकुमत पन्हा रामचंद्र अमात्य बावडेकर आपल्या आज्ञापत्रात त्याचा उल्लेख करताना लिहितात की, ''किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार.'' स्वराज्यातल्या दुर्गावरचा हा हवालदार कुलवंत मराठा जातीचा, कबिलेदार आणि महाराजांनी सोपविलेला गड डोळ्यात तेल घालून जपणारा त्यांचा निष्ठावंत सेवक होता.

शिवाजीमहाराजांनी स्वराज्य रक्षणात गडांना महत्त्व दिले आणि तेथील व्यवस्था निर्दोष ठेवण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गडावर नेमलेली निरनिराळ्या दर्जाची माणसे व गडोपयोगी सामान यांची पारख खुद्द महाराज करायचे. एक गड पण, त्याला जबाबदार अनेक या नियमामुळे गडावरचा लष्करी विभाग कधी जायबंदी झाला नाही. शिवकालीन दुर्गांवरचा सर्वोच्च अधिकारी म्हणजे हवालदार होय.

शिवकाळाच्या दृष्टीकोनाचा विचार करता लष्करी स्वरुप व लष्करी संबंध त्याबरोबरच गडांची रचना व बांधणी याचा विचार करावा लागतो. शिवाजी महाराजांनी येथील व्यस्थापनाचा बारकाईने विचार केलेला होता. गडावरचा सारा कारभार हवालदार, सबनीस व सरनौबत यांच्या एकविचाराने चालत असे.

अमात्य रामचंद्रपंत आज्ञापत्रात लिहितात– किल्ल्यांची सेवा परम कठीण, शासन परम उग्र.

स्वराज्यातील गडावर केलेल्या सर्व अधिकाऱ्यांना अंतर्भाव हवालदाराच्या कार्यात केला जात असे.

राज्य संरक्षणाचे मुख्य कारण किल्ले. ते देशोदेशी स्थळे पाहून बांधावे.

अमात्य रामचंद्रपंत आज्ञापत्रात म्हणतात, ''स्थळास गलिमाचा वेढा आला तरी सामान व उपराळा (कुमक) आहे. तो गड हरहुनराने (हर प्रकारे) झुंजून स्थळ जतन करावे.

''महाराष्ट्रातील गड कोट दुर्गा प्रयोजन आणि व्यवस्थापन.'' या प्रबंध लेखनाच्या अभ्यासाचा हाच खरा संदेश आहे.

■ ■ ■

# (अ) संदर्भ ग्रंथ सूची


१) आवळसकर शा.वि.(संपादन)रायगडची जीवनकथा,महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई १९६२.

२) बेंद्रे बा. सी. गडकोट दुर्ग आणि त्यांची वास्तू मुं. म. ग्रंथमाला १९६५

३) करंदीकर ज. स. हिवरगावकर बा. रा. कौटिलीय अर्थशास्त्र प्रकाशक ग. र. मुळे कर्जत भाग १ ते २, १९२७.

४) कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटियर

५) कुलाबा गॅझिटीयर

६) कुलकर्णी डॉ. भिमराव चिटणीस बखर.

७) खरे ग.ह. श्री.दा. भिडे आज्ञापत्र सिटी बुक स्टॉल, पुणे

८) खरे ग.ह. स्वराज्यातील तीन दुर्गे, पुणे

९) गॅझेटीयर ऑफ द बॉम्बे प्रेसीडन्सी खंड १०

१०) घाणेकर प्र.के. अथातो दुर्गजिज्ञासा, स्नेहल प्रकाशन पुणे १९९९

११) पगडी सेतुमाधवराव(संपा.अनु.)मोगल दरबाराची बातमीपत्रे खंड१म.सा.सं.मं. मुंबई १९७९

१२) पगडी सेतुमाधवराव(संपा.अनु.)मोगल दरबाराची बातमीपत्रे खंड२म.सा.सं.मं. मुंबई १९९९

१३) पगडी सेतुमाधवराव (संपा.अनु.)मोगलदरबाराची बातमीपत्रे खंड ३ म.सा.सं.मं. मुंबई १९९९

१४) परकीय प्रकाशांचे वृत्तांत १६३९ ते १७१७ (मोगल इंडिया)

१५) पिंडे जयराम राधामाधव विलास चंपु

१६) परमानंद कविंद्र: शिवभारत, संस्कृत संहिता आणि मराठी भाषांतर संपादन आणि प्रकाशन दिवेकर, मुंबई १९२७

१७) पुरंदरे कृ वा, जोशी शं.ना.खरे ग.ह./शि.च.सा.१ ते १४ खंडे आपटे ब.द.आवळसकर,

१८) पिण्डये जयराम: पर्णालपर्वत ग्रहणाख्यानम, संस्कृत संहित आणि हिंदी भाषांतर(भाषांतर आणि संपादन) देवीसिंह चौहान, महाराष्ट्र सभा, पृष्ठे १९७०

१९) मराठे अ. द. राजकोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे २००८

२०) मेहेंदळे गं. भा., संतोष शिंत्रे शिवाजी महाराजांचे आरमार, परममित्र प्रकाशन २०१०

२१) मांडे प्रमोद गडकिल्ले महाराष्ट्राचे प्रफुल्ल प्रकाशन, पुणे २००८

२२) रामचंद्र व्ही.आर. वॉर इन ऐनशंट इंडिया मद्रास, १९४८.

२३) वाकसकर वि.स. ९१ कलमी बरखर

२४) सिडने टॉय स्ट्रॉंग होल्डस् ऑफ इंडिया विल्यम हेनेमन लंडन, १९५७

२५) हणमंते रघुनाथ नारायण राज्यव्यवहार कोश १६७८

२६) साने का.ना. (संपादन) सभासद बखर १९२३
२७) साने का.ना. (संपादन) चिटणीस बखर १९२४
२८) सक्सेना भिमसेन तारिके दिलकुशा १७०९
२९) तेंडुलकर महेश शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था. स्नेहल प्रकाशन, पृष्ठ २००९
३०) दिवेकर स.म.(संपादन) शिवभारत अध्याय १५ व १६

■■■

## (ब) दुय्यम साधने

१) आवळसकर शा. वि., संपादन रायगडची जीवनकथा, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, १९६२.

२) बेंद्रे बा.सी., गड कोट दुर्ग आणि त्यांची वास्तू मु.म.ग्रंथमाला १९६५.

३) बेंद्रे बा.सी., छत्रपती शिवाजी महाराज, १९६०

४) बेंद्रे बा.सी, छत्रपती संभाजी महाराज, १९६०

५) काळे द.वि, छत्रपती शिवाजी महाराज, १९६०

६) खरे ग. ह., स्वराज्यातील तीन दुर्ग

७) घाणेकर प्र.के., अथातो दुर्ग जिज्ञासा, स्नेहल प्रकाशन, १९२९

८) तापीकर श्रीकांत, महाराष्ट्रातील किल्ले, चंद्रमा प्रकाशन, १९८२

९) तापीकर श्रीकांत, फोर्टस इन महाराष्ट्र (इंग्रजी), चंद्रमा प्रकाशन १९९५

१०) तेंडूलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, २००९

११) मराठे अ. दि., राजकोश, डायमंड पब्लिकेशन, २००९

१२) पगडी सेतु माधवराव, छत्रपती शिवाजी नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली १९९८

१३) पुरंदरे ब.मो, राजा शिवछत्रपती, पुरंदरे प्रकाशन पुणे

१४) मांडे प्रमोद, गडकिल्ले महाराष्ट्राचे, प्रफुल्ल प्रकाशन, २००८

१५) मेहेंदळे गं.भा., संतोष शिंत्रे, शिवाजी महाराजांचे आरमार, परममित्र प्रकाशन, २०१०.

■■■